घटक १

# १

# आदिबंधात्मक समीक्षा – संकल्पना, स्वरूप आणि विकास

# (Archetypal Criticism)

**घटक रचना**

१.१ उद्दिष्टे

१.२ प्रस्तावना

१.३ मानवी मनाचे तीन स्तर

१.४ आदिबंध

१. ५ आदिबंधाचा आविष्कार

१.६ आदिबंध आणि आदिमता

१.७ स्वात्मसाधनेची प्रक्रिया

१.८ लोकसाहित्य आणि आदिबंध

१.९ आदिबंध आणि तुलनात्मक मानववंश शास्त्र

१.१० काही महत्त्वाचे आदिबंध

 १.१०.१ Persona (मुखवटा)

 १.१०.२ Shadow (छाया)

 १.१०.३ Animus ॲनिमस

 १.१०.४ Anima अनिमा

१.११ मातेचा आदिबंध

१.१२ वीरनायक आणि त्याचा धाडसी प्रवास

१.१३ वृद्धआप्त

१.१४ समारोप

१.१५ संदर्भ ग्रंथ सूची

१.१६ नमुना प्रश्नमंच

munotes.in

## १.१ उद्दिष्टे

- जाणीव आणि नेणीव याविषयीचे मानसशास्त्रीय विवेचन समजून घेणे.
- आदिबंध ही संकल्पना समजून घेणे.
- आदिबंधात्मक समीक्षेच्या स्वरूपाचे आणि विस्ताराचे आकलन करणे.
- मराठीतील आदिबंधात्मक समीक्षेचा विकास समजून घेणे.

## १.२ प्रस्तावना

उपयोजित समीक्षा म्हणजे विशिष्ट साहित्यकृतींची वा विशिष्ट लेखकाच्या साहित्याची साहित्यसिद्धान्त अथवा तत्वे यांचा वापर करुन केली जाणारी समीक्षा, ज्यामध्ये साहित्यकृतींचे विश्लेषण, अर्थनिर्णयन, मूल्यमापन अपेक्षित असते. या संदर्भात साहित्यशास्त्रीय सिद्धान्ताबरोबर मानसशास्त्र, समाजशास्त्र, तत्वज्ञान, भाषाविज्ञान अशा अन्य ज्ञानशाखांमधील सिद्धान्त व संकल्पनांचा वापर करुन विविध समीक्षा पद्धती अस्तित्वात येतात, त्यापैकी एक महत्त्वाची समीक्षा पद्धती म्हणजे 'आदिबंधात्मक समीक्षापद्धती'.

साहित्य हे माणसाच्या मनातील भावविश्वाचा वेध घेते तर मानसशास्त्र माणसाच्या मनाची चिकित्सा करते. गेल्या शतकात मानसशास्त्रामध्ये जी प्रगती झाली, तिचा प्रभाव अनेक ज्ञानशाखांवर झाला. विशेषकरून साहित्याच्या आकलनासाठी मानसशास्त्राची मदत नेहमीच घेतली जाते. कारण साहित्य ही मनाची निर्मिती असते. यातूनच मानसशास्त्रीय समीक्षा पद्धती विकसित झाली हे आपल्याला माहीत आहेच. साहित्यकृती ही लेखकाच्या व्यक्तित्वाचा, मनोविश्वाचा आविष्कार असते. साहित्यकृती आकार घेत असताना त्यातील आशय, त्याचे रूप, साहित्यकृतीत आलेली प्रतिमा, प्रतीके ही का वापरण्यात आली आहेत याचा शोध घेण्यासाठी आपण साहित्यकृतीत मनोविश्लेषणाचे तंत्र वापरतो. सिग्मंड फ्रॉईडने माणसाच्या मनाला जाणिवेपलीकडे नेणीवेची, अबोध मनाची पातळी असते ह्याची ओळख करुन दिली आणि साहित्यसमीक्षेमध्ये क्रांतिकारक बदल झाले. अशाच प्रकारचा मानवी मनाच्या आकलनाचा नवा सिद्धांत कार्ल गुस्ताव युंगने मांडला, तो म्हणजे सामूहिक नेणीवेचा सिद्धांत. माणसाचे मन खरवडले तर त्याखाली मानव वंशाच्या आदिम स्मृती दडलेल्या आहेत ही त्याने दिलेली नवी जाणीव संस्कृतीच्या अनेक क्षेत्रांना प्रभावित करुन गेली. साहित्यक्षेत्र याला अपवाद नव्हते. समाज असे म्हणताना माणसांचा समूह, त्यातील आर्थिक-सामाजिक स्तर हे आपल्याला अपेक्षित असतात. पण सामूहिक नेणीवेच्या पातळीवर, आपण विविध धर्म – संस्कृतीमध्ये वावरणारे सर्व, एका विशाल मानववंशाचे घटक आहोत, हे ध्यानात आले. माणसाची सामाजिकता अशी नव्या वैश्विक आणि

मानववंशीय पातळीवर समजून घेणे हा एक वेगळा प्रयत्न आहे. त्यामुळे जगातील सर्व मानव एका समान पातळीवर येतात. देश-काळ-संस्कृतीप्रमाणे जरी आपण वेगळे भासलो तरी आपले 'मूलद्रव्य' एकच आहे अशी काहीशी ही जाणीव आहे. ह्याचा पुरावा कसा शोधायचा? तर तो साहित्यात सापडतो. साहित्यात अनेक प्रतिमा, प्रतीके, आशयसूत्रे पुनरावृत्त होताना दिसतात. वैश्विक पातळीवर त्यांच्यामध्ये समानता आहे. धार्मिक श्रद्धा-समजुती, लोकसाहित्य ह्यामध्ये तर हे ठळकपणे दिसते. आपण आणि आदिम मानव ह्यांच्यात भावनिक पातळीवर फारसा फरक झालेला नाही. उलट एकीकडे आपण मानव म्हणून बौद्धिक आणि भौतिक प्रगती करतो आहोत, बाह्य जगाचा विस्तार करत आहोत तेव्हाच दुसरीकडे आपण आंतरिक विश्वाकडे खेचले जात आहोत. (त्यामुळे 'स्व'रूपाचा शोध घेताना या आदिमतेकडे आपण खेचले जातो. त्या स्मृती आपल्या नेणीवेचा भाग आहेत. नेणीवेच्या प्रदेशांना भेट देऊन आपल्याला एक समग्रतेचा अनुभव येतो. पण त्या प्रदेशात सहसा प्रवेश मिळत नाही. ह्या जणू आपल्या मनात दडलेल्या काळोख्या गुहा आहेत. त्या आतून उघडतात. म्हणजेच आपल्या नकळत उघडतात.) लेखक लिहिताना ती त्याची निर्मिती असते, जाणीवपूर्वक केलेली पण तरीही तो साहित्यकृतीवर पूर्ण हक्क सांगू शकत नाही. "बोलविता धनी वेगळाचि" असा अनुभव त्याला येतो. लेखक त्याच्या वैयक्तिकतेपेक्षा काही अधिक सांगतो आहे असा अनुभव वाचकालाही येतो. ते जे अधिक असते ते जितके लेखकाचे असते तितकेच सगळ्यांचे असते. लोकगीत जसे व्यक्तीचे नसून समूहाचे असते तसे.

एक गमतीशीर उदाहरण बघूया. लहान मूल झोपाळ्यात शांत झोपते? का? कारण ते आईच्या पोटात असताना आईच्या वावरण्यामुळे त्याला 'झोके' मिळालेले असतात. झोपाळ्यातील झोकयामुळे त्याच्या त्या स्मृती जागृत होऊन त्याला सुरक्षित वाटते. कदाचित यामुळेच पुढेही झोपाळ्याचे आकर्षण टिकून राहते. आता हा अनुभव सार्वत्रिक असला तरी शब्दांत नेमका मांडणे अवघड आहे. पण आपल्या स्मृतीचा, अगदी आतल्या स्तराचा तो भाग आहे. ह्यालाच नेणीव म्हणूया.

आईच्या कुशीतील ऊब आणि झोका यातील नाते आपल्याला ठाऊक नव्हते पण झोक्याचे आकर्षण मात्र आपणास ठाऊक होते. तसेच नेणीव, त्यातील आदिबंध आपणास ठाऊक नसतात. त्याचे साहित्य-संस्कृतीतील आविष्कार मात्र जाणवत असतात. आदिबंधात्मक समीक्षा आपल्याला ह्या दोघांमधील नाते उलगडून दाखवते. त्यामुळे आपल्याला साहित्यकृतीचे अधिक चांगले आकलन होते आणि मानवी संस्कृतीच्याही आकलनात भर पडते.

थोडक्यात आदिबंधात्मक समीक्षा मानसशास्त्रीय, मानवशास्त्रीय, सामाजिक, सांस्कृतिक अशी व्यामिश्र रूपाची आहे.

आदिबंध ही संकल्पना कार्ल गुस्ताव युंग (सी. जी. युंग) (१८७५-१९६१) या मानस शास्त्रज्ञाने मांडली.

प्रत्यक्ष समीक्षा पद्धतीकडे जाण्यापूर्वी साहित्याच्या भाषेबाबत आपण ज्या घटकांचा अभ्यास अनेकदा केला आहे आणि ज्यांच्या द्वारा आदिबंध प्रकट होतात असे आपण म्हणतो आहोत, त्या प्रतिमा आणि प्रतीके ह्या संकल्पनांची आपल्या प्रस्तुत संदर्भात उजळणी करु.

- **प्रतिमा** – व्यवहारभाषेत 'प्रतिमा' हा शब्द प्रतिबिंब, मूर्ती असा वापरला जातो पण शास्त्रीय भाषेत 'इंद्रियसंवेदनांची स्मृतिरुप प्रतिकृती' असा केला जातो. प्रतिमा म्हणजे शब्दातून निर्माण होणारे चित्र. रुपक, उपमा यातून अशी चित्रे निर्माण होतात. "पाण्यात खोल कालवावे तसे माझ्या घशात हंबरताहेत हुंदके (प्रभा गणोरकर)" किंवा कधी "अंग झिम्माड झालं हिरव्या बहरात" अशा ऐंद्रिय प्रतिमा येतात. आदिबंधात्मक साहित्यात एक समृद्ध प्रतिमासृष्टि अनुभवाला येते. पुढे काही उदाहरणे दिली आहेत. येथे प्रतिमा आणि प्रतीके असे काटेकोर वर्गीकरण करता येत नाही. कारण प्रतीके ही प्रतिमाच असतात. म्हणून आधी प्रतीक म्हणजे काय ते समजून घेऊ (इत्यादी, २००१ )
- **प्रतीक** - प्रतिमा संकेतरुपाने पुन्हा पुन्हा वापरण्यात आली की तिला प्रतीक म्हटले जाते.

  साहित्यभाषा प्रतिमा-प्रतीकांची भाषा असते व तिच्या मूळाशी रुपक व्यवहार असतो हे आपल्याला ठाऊक आहेच. आदिबंध सामूहिक अचेतन व्यक्त करत असल्यामुळे प्रतिमा-प्रतीकांचा आदिबंधात्मक साहित्यकृतीतील वापर वैशिष्ट्यपूर्ण असतो. ही प्रतिमा-प्रतीके प्रामुख्याने निसर्गाच्या जवळ जाणारी असतात. अनेकदा धर्म-संस्कृतीच्या संकेतानी बद्ध असूनही त्यांचे आवाहन वैश्विक असते. त्यांच्यात एक उत्कटता, एकप्रकाराचा आदिम जिवंतपणा असतो. ती संकेतबद्ध असूनही अर्थाच्या दृष्टीने लवचिक असतात आणि अनेक अर्थांचे सूचना करतात.

उदाहरणार्थ जी. ए. कुलकर्णी ह्यांच्या साहित्यात येणारी आदिबंधात्मक प्रतिमा-प्रतीक सृष्टीतील नमुने पाहू. वासनेने पेटलेल्या पुरुषाच्या नजरेला ते विशाल, क्रूर सर्पफण्याची उपमा देतात कारण नाग हे कामाचे, पौरुषत्वाचे प्रतीक आहे. वृद्धाच्या दृष्टीपथातील मृत्युला पायरीवर वाट पाहणा-या बोक्याची उपमा देतात. भाषेचा प्रवास उपमा-रुपकातूनच आदिबंधात्मक प्रतीकांपर्यन्त होतो. यातूनच प्रतीकात्म शैली आकाराला येते. काळा बोका मृत्युचे प्रतीक, सर्प हे वासनेचे प्रतीक, गाय हे स्त्रीचे प्रतीक अशी प्रतीके आढळतात.

काव्यातूनही अशी रुपके आढळतात. कुसुमाग्रज जेव्हा कोलंबसाचे गर्वगीत लिहितात तेव्हा तो कोलंबस कोणी एक ऐतिहासिक कोलंबस नसून ती वीरनायकाची प्रतिमा असते. पृथ्वीचे प्रेमगीतमध्ये पृथ्वी समर्पित स्त्रीतत्त्वाची प्रतिमा ठरते. पृथ्वी स्त्रीत्वाचे प्रतीक आहेच. पण त्यातही छटा आहेत. पृथ्वी-आकाश अशा संदर्भात ती अनिमा आहे, प्रेयसी आहे पण कृषिविषयक ती माता आहे. कारण तिच्यामध्ये सृजनशक्ती आहे. म्हणूनच सीता भूमिकन्या आहे. भूमी नांगरताना सीता सापडणे,

आयुष्याच्या शेवटी तिला भूमीने पोटात घेणे ह्यात मातेचा आदिबंध आहे. प्राक्कथांची भाषा तर प्रतीकांचीच भाषा असते. तिथे सूर्य संज्ञेचे प्रतीक असतो, अरण्य अचेतनाचा प्रदेश. निद्रा मृत्यु असते आणि झोपेतून उठणे पुनर्जन्म. स्लीपींग ब्युटीसारख्या परिकथेत असा पुनर्जन्म हा आदिबंध प्रकट झालेला दिसतो. मानवाच्या आदिम प्रतिभेची ही निर्मिती आहे. पुढेही आपण ह्या आदिमतेचे स्वरुप समजून घेणार आहोत.

आदिबंधात्मक समीक्षेचा वापर मराठी साहित्यात ७०-८० च्या दशकात सुरू झाला. समीक्षेच्या ह्या शाखेचा सैद्धांतिक परिचय मराठी साहित्य विश्वाला प्रामुख्याने प्रा. गंगाधर पाटील आणि म.सु. पाटील यांच्यामुळे झाला. अरुणा ढेरे यांनी आपल्या प्रबंधात आदिबंधात्मक समीक्षेचे उपयोजन करत चिं.त्र्यं. खानोलकर आणि जी. ए. कुलकर्णी यांच्या कथांचा अभ्यास सादर केला.

**आदिबंधात्मक समीक्षेचा पाया –**

विसाव्या शतकातील महत्त्वाच्या घटनांपैकी एक घटना म्हणजे मानसशास्त्राच्या क्षेत्रात सिगमंड फ्रॉईड (१८५६-१९३९)याने मांडलेला अबोध मनाचा विचार होय. मानवी वर्तनाचे आणि मानसिक हालचालींचे मूळ माणसाच्या अबोध मनात असते हे सांगून फ्रॉईडने मानसशास्त्रज्ञांपुढे अबोध मनाचे एक नवे अद्भुत दालन खुले केले. कार्ल गुस्ताव युंग ह्या फ्रॉईडच्या सहकारी-शिष्याने फ्रॉईडच्या अबोध मनाच्या संकल्पनेचा विस्तार केला. ह्या दोघांनी मांडलेल्या सिद्धांतांनी आज साहित्य, चित्र, शिल्प, लोकसंस्कृती, धर्म, तत्वज्ञान, मानववंशशास्त्र अशा अनेक क्षेत्रातील अभ्यासाला नव्याने चालना दिली आहे. युंगचे सगळ्यात मोठे योगदान म्हणजे त्याने अबोध मन म्हणजेच नेणीवेच्या संदर्भात, फ्रॉईडने सांगितलेल्या वैयक्तिक अचेतना बरोबर सामूहिक अचेतनाची कल्पना मांडली हे होय. आदिबंध ह्या सामूहिक अचेतनाचाच भाग आहेत. म्हणून आधी मनाचे हे स्तर समजून घेऊ.

## १.३ मानवी मनाचे तीन स्तर

युंग मन या कल्पनेसाठी 'सायकी' (psyche) हा शब्द वापरतो. यामध्ये सगळ्या मानसिक प्रक्रियांचा समावेश होतो. या मनाचे त्याने तीन स्तर मानले आहेत.

१. **संज्ञेचा / चेतनेचा स्तर –** हा स्तर जाणिवेशी संबंधित आहे, त्यालाच आपण 'सबोध मन' असेही म्हणतो. माणसाचे सर्व बौद्धिक / तार्किक विश्लेषण याच स्तरावर सुरू असते.

२. **असंज्ञ स्तर** – हा नेणिवेशी निगडीत आहे. याला 'अचेतन किंवा अबोध मन' म्हणता येईल. अबोध मनाविषयी पहिल्यांदा विवेचन फ्रॉईडने केले. जाणिवेच्या स्तराला लागूनच नेणीवेचा स्तर असतो. आपल्या अनुभवातील कितीतरी भाग कटू असतो, जो आपण व्यक्त पातळीवर आणू शकत नाही, कितीतरी अव्यक्त इच्छा असतात ज्या आतच दडपल्या गेलेल्या असतात, त्या जाणीवेच्या पातळीवर राहू शकत नाहीत म्हणून त्या नेणीवेचा भाग बनतात. मग नेणीवेच्या

ह्या स्तराचे दर्शन आपल्याला क्वचित स्वप्नात होते. स्वप्ने एक प्रकारे ह्या दडपलेल्या भावनांच्या पूर्तीचा मार्ग असतो. तसेच लेखकाच्या नेणीवेचे दर्शन त्याच्या साहित्यात होऊ शकते. असे अबोध मनाचे स्वरूप फ्रॉईडने सांगितले. युंगने अबोध मनाचा आणखी एक खोल स्तर आहे हे सांगून फ्रॉईडच्या अबोध मनाच्या कल्पनेचा विस्तार केला. फ्रॉईडने सांगितलेल्या स्तराला त्याने व्यक्तिगत अचेतन म्हटले व त्याखाली आणखी एक सामूहिक अचेतनाचा स्तर असतो, असे त्याने दाखवून दिले. या स्तराचा संबंध व्यक्तीच्या अनुभवांशी जोडता येत नाही. त्याचा संबंध मेंदूच्या आनुवांशिक संरचनेशी आहे.

असे म्हणू या की आपल्याला मानव म्हणून जन्म मिळताना आनुवांशिकरित्या हा स्तर मिळाला. किंबहुना हा वारसा सर्व माणसांमध्येच नव्हे तर सर्व प्राण्यांमध्येही समान असावा. या पायावरच व्यक्तीच्या मनाची इमारत उभी असते. हा वारसा जणू प्रत्येक व्यक्तीबरोबर नव्याने जन्म घेतो. भय, धोका, श्रेष्ठ सत्तेशी संघर्ष, जन्म, मृत्यु, स्त्री-पुरुष, आई-वडील यासारखे नातेसंबंध याविषयीच्या आदिम काळापासूनच्या मानवी संस्कृतीच्या स्मृती अमूर्तरूपात इथे साठविलेल्या असतात. ह्याला यीट्स या कवीने सार्थपणे 'ग्रेट मेमरी' (विशाल स्मृती) म्हटले आहे, जी व्यक्तीची नसून मानव वंशाची सामूहिक स्मृती आहे. सामूहिक अचेतनाचा एक भाग म्हणजे स्थायी भाव आणि सहज प्रवृत्ती (instincts) जो आपण अनुभवू शकतो. पण ह्याच सामूहिक अचेतनाचा एक स्तर असा आहे की जो जाणिवेचा भाग कधीच होत नाही. तो पृथ्वीच्या अंतर्भागातील लाव्ह्यासारखा सुप्त असतो. त्याचे अस्तित्व उद्रेकातूनच प्रगट होते. हा उद्रेक स्वप्नात, कलात्मक आविष्कारात, साक्षात्कारी अनुभवात होऊ शकतो. त्यावर आपले काहीच नियंत्रण नसते. तो स्वायत्त असतो.

- **अहं** – जाणिवेच्या आणि नेणिवेच्या स्तरांशी संबंध जोडणारा आणि त्यात सहभागी होणारा घटक म्हणजे 'अहं'. तो संज्ञेचा कारक आहे. आपल्याला बाह्य किंवा आंतरिक जगाच्या अनुभवाचा बोध व्हायचा असेल तर तो अनुभव अहंमधून संक्रांत व्हावा लागतो. अहंमधून अनुभव संक्रांत झाला नाही तर तो अबोध राहतो.

**काही उदाहरणातून आपण हा जाणीव-नेणीवेचा खेळ समजून घेऊ.**

ढग दाटून आलेले आपण पाहतो, पाऊस येणार हे कळल्यावर घरचे कोणी बाहेर गेले आहे, रस्त्यात अडकेल अशी जाणीव होऊन भीती वाटली, हे जाणिवेच्या पातळीवर घडले म्हणता येईल.

"मला काही सांगायचंय" नावाच्या नाटकात नायिकेला पावसाआधीची अशी काळोखी आली की भीती वाटते. कारण तिच्या आयुष्यातील काही अप्रिय घटना अशा वातावरणात घडलेल्या असतात. त्या दडपलेल्या स्मृति जाग्या होतात, म्हणून तिला त्रास होतो. याला आपण वैयक्तिक अचेतन म्हणूया.

पण मेघदूतात कालिदास म्हणतो त्याप्रमाणे “मेघालोके भवति सुखिनोऽपि अन्यथा वृत्तिचेतः।” ढग भरुन आले की सुखी माणसाच्या मनालाही एक अनामिक हुरहूर वाटते, हा सार्वत्रिक, वैश्विक अनुभव आहे. याचे कारण जाणिवेत सापडत नाही, तर ते नेणीवेत असले पाहिजे. हा सर्वांचाच अनुभव आहे तर तो सामूहिक अचेतनाचा भाग असला पाहिजे.

म. सु. पाटील म्हणतात त्याप्रमाणे “जाणिवेचे क्षेत्र नेणिवेच्या क्षेत्रापेक्षा फारच छोटे असते. नेणिवेचे क्षेत्र महासागरासारखे मानले तर जाणिवेचे क्षेत्र हे त्यातील एखाद्या बेटासारखे म्हणता येईल.” (पाटील म. सु., १९८९, पान १०) वेगळ्या शब्दांत सांगायचे तर जसा एखाद्या हिमनगाचा एक दशमांश भाग आपल्याला पृष्ठभागावर दिसतो, उरलेला हिमनगाचा मोठा अंश पाण्याखाली असतो. त्याप्रमाणे जाणिवेचे क्षेत्र मर्यादित असते.

- **नेणिव म्हणजे काय हे स्पष्ट करताना युंग म्हणतो,**

‘Everything of which I know, but of which I am not at the moment thinking; everything of which I was once conscious but have now forgotten; everything perceived by my senses, but not noted by my conscious mind; everything which, involuntarily and without paying attention to it, I feel, think, remember, want, and do; all the future things which are taking shape in me and will sometime come to consciousness; all this is the content of the unconscious’ (Bodkin, 1951 ) (मला ठाऊक आहे पण अत्ता ह्या क्षणी मी ज्याचा विचार करत नाही आहे, असे काही ज्याची मला पूर्वी जाणीव होती पण मी आता विसरून गेलो आहे, माझ्या इंद्रियांनी जाणलेले पण मनाने सावधपणे नोंद घेतली नाही असे काही, असे सगळेच जे अनियांत्रितपणे, मी विशेष प्रयत्न न करताही, मला जाणवते आहे, वाटते आहे, आठवते आहे, हवेसे वाटते आहे, मी करतो आहे. उदया भविष्यात आकार घेतील अशाही गोष्टी, ह्या सगळ्या माझ्या अचेतनाचा भाग आहेत.) ‘Besides these we must include all more or less intentional repressions of painful thought and feelings. I call the sum of these contents the “personal unconscious” (Bodkin, 1951 )

(याशिवाय कमी अधिक प्रमाणात अधिक जाणीवपूर्वक मी दडपून टाकलेले त्रासदायक विचार, भावना ह्याचा समावेश मी “वैयक्तिक अचेतनात” करतो)

ज्याला आपण सहज प्रवृत्ती किंवा instincts म्हणतो. तीही ह्याचाच भाग होत. आगीपासून धोका आहे हे अगदी लहान पिलालाही कसे कळते? स्थलांतर करणाऱ्या पक्षांना आपला मार्ग कसा लक्षात राहतो? इत्यादी प्रश्नांची उत्तरे या द्वारा देता येतील.

पण ह्या सामूहिक अचेतनाचा एक भाग असा असतो, जो पूर्णपणे जाणिवेच्या कक्षेत येत नाही. तो अगम्य राहतो. हा आशय स्वायत्त असतो आणि तो स्वप्नात, दिवास्वप्नात, कलात्मक व्यापारात, साक्षात्कारी अनुभवात सूचनेशिवाय डोकावतो. त्यामध्ये एक प्राकृतिक आवेग असतो. त्यांना आदिबंध म्हणतात.

“भौतिक शास्त्रात ज्याप्रमाणे लहरी आणि अणू या गोष्टी प्रत्यक्ष अनुभवाला न येताही परिणामांवरुन त्यांचे अस्तित्व अनुमानित केले जाते तसेच हे आहे.” (पाटील म. सु., १९८९, पान ११)

जाणिवेसाठी अहंची आवश्यकता असते हे तर खरेच. पण मानवाच्या विकासक्रमात जाणिवेचा उदय हा सामूहिक अचेतनातून झालेला आहे.

- **लहान मूल आणि अहं**

आपण लहान मुलाचे उदाहरण घेऊ. अगदी लहान मुलं, नुकतंच जन्माला आलेले, ते जेव्हा आईला बिलगते तेव्हा त्याला ही आपली आई अशी ओळख नसते. पण मानवी अपत्यांचा आईवर अवलंबून असण्याचा हजारो वर्षांचा अनुभव जणू पूर्वस्मृति सारखा किंवा कम्प्युटरच्या भाषेत सांगायचे तर प्रोग्राममधील आज्ञावलीसारखा त्याच्या बरोबर असतो. म्हणजे लहान मुलाचे मन ही सर्वस्वी कोरी पाटी नसते. अनुभवांची वांशिक स्मृती ते मूल सोबत घेऊन येते. आपल्या प्रत्येकालाच ती लाभली आहे. आपली सहज प्रवृत्ती हा त्याचा एक प्रकार झाला तर आदिबंध हा दुसरा. आदिबंधाचे स्वरूप पुढे सविस्तर पाहू. पण गर्भावस्थेत किंवा जन्माला आल्यानंतर, अहंचा उदय होण्यापूर्वी लहान मुलाची जशी अवस्था असते, तशीच अवस्था मानव अस्तित्वात येण्याच्या वेळी होती असे म्हणता येते. त्याच्याकडे फक्त सामूहिक अचेतन होते. पुढे सामूहिक अचेतनातूनच अहं जन्माला आले. त्याबरोबर संज्ञेचा अर्थात जाणिवेचा जन्म झाला. पण जाणिवेची मुळे सामूहिक अचेतनात असल्यामुळे अहं अचेतनाशी संपर्क राखून असतो, त्याचा अधिकाधिक भाग जाणिवेशी जोडून घेण्याचा त्याचा प्रयत्न असतो. अचेतनाच्या अंधारात दडलेला हा आशय म्हणजे आदिबंध.

## १.४ आदिबंध

सहजप्रवृत्ती कृतीप्रधान असते, तर आदिबंध आकलनप्रधान असतात. सामूहिक अचेतनातून प्रकट होणारा आणि जाणिवेशी जोडला जाणारा आशय हा नेहमी आदिबंधात्मक (Archetypal) असतो.

आदिबंध म्हणजे ढोबळ मानाने मूळ, आदिम प्रतिमा असे म्हणू या.

युंगने केलेली आदिबंधाची व्याख्या अशी आहे-

''Archetypes are, by definition, factors and motives that arrange the pscychic elements into certain images, characterized as archetypal, but in such a way that they can be recognized only from the effect they produced.” (आदिबंध म्हणजे, परिणामांवरूनच ज्या ओळखाव्या लागतात, अशा तऱ्हेच्या आदिबंधरूप विशिष्ट प्रतिमांमध्ये मानसिक मूलद्रव्यांची रचना करणारे कल्पनाबंध किंवा घटक.) (ढेरे, १९८६ , पान २३ ) असे म्हणता येईल की आदिबंध हे प्रतिमा- प्रतीकांद्वारा आपल्या जाणीवेचा भाग होतात. प्रतीक- प्रतिमा म्हणजे आदिबंध नव्हेत. तर त्यांना निर्माण करणारी प्रवृत्ती म्हणजे आदिबंध. प्रतिमा- प्रतीके हे आदिबंधाचे मूर्त आविष्कार आहेत. म्हणजे, प्रतिमा वा प्रतीक ही जर मूर्ती आहे असे मानले तर ती मूर्ती घडवणारा साचा म्हणजे आदिबंध. आपण सहसा मूर्तीच पाहतो व त्यावरून साच्याचा अंदाज बांधतो, तसेच हे आहे.

- **त्यांची तुलना प्लेटोच्या सत्** – तत्वांबरोबर करता येईल. उदा. गोत्व हे एक सत् – तत्त्व आहे. जगभरातल्या गायी रंग, वजन, वय अशा विविध निकषांमुळे एकमेकांपासून वेगवेगळ्या भासल्या तरी त्यांच्या ठिकाणी ‘सामायिक’ असणारी गोत्व नावाची काही गोष्ट असतेच. गाय त्यामुळेच गाय ठरते. (पाटील म. सु., १९८९, पान १३) आता गंमत अशी की गाय दाखवता येते, गोत्व दाखवता येत नाही. तसेच आदिबंधांविषयी पण म्हणता येईल. ते अमूर्त असतात. ते कधीही जाणिवेच्या पातळीवर येत नाहीत. त्यांच्या विषयी आपण बोलतो ते त्यांच्या प्रतिमा-प्रतीकात्मक आविष्कारांमुळे. हे आविष्कार विविध प्रकारचे असतात. त्यांच्यात काळानुरूप, संस्कृतीनुरूप फरक पडतात. पण त्यांच्यामध्ये दडलेले मूळ आकार म्हणजेच आदिबंध आपणास ओळखता येतात.

  एरिक नॉयमनने आदिबंधांना सहजप्रवृत्तींची प्रतिमाचित्रे म्हटले आहे. (येथे सहजप्रवृत्ती म्हणजे सामूहिक अचेतन अपेक्षित आहे.

  युंग आदिबंधाचे वर्णन अनुभवपूर्व, जन्मजात, अंतःस्फूर्त संज्ञारूपे असे करतो. एखाद्या पाण्याचा प्रवाह वाहताना त्याचे पात्र आकाराला येते. पाणी नसले की पात्र कोरडे पडते, पण पाऊस पडला की पाणी वाहू लागते व त्या पात्राचा आकार घेते आदिबंध त्या पात्रासारखे आहेत. मानवी आयुष्यातील अनेक अनुभव आपण आदिबंधांच्या मुशीत घेतो. एखादा अनुभव घेण्यापूर्वी काळ, अवकाश, कार्यकारणभाव अशा पूर्व-अटी असतात, तशीच आदिबंध ही अनुभवांची अनुभूवपूर्व अट आहे असे युंग मानतो. (पाटील म. सु., १९८९, पान 13) ह्या मुद्द्यावर आपण पुढेही चर्चा करू. कारण लोकसाहित्य, पुराकथा ह्या मध्ये आदिबंधाची पुनरावृत्ती का होते, व जगभरात कोणत्याही माणसाला ती कशी आकर्षित करू शकतात, ह्याचे उत्तर यात दडलेले आहे. अरुणा ढेरेही म्हणतात, सर्वस्पर्शिता आणि सार्वत्रिकता हे आदिबंधाचे दोन अंगभूत विशेष आहेत. जगाच्या पाठीवर कोणत्याही माणसाच्या मनात कोणत्याही काळात उद्भूत होणारे ते स्थलकालबंधनमुक्त असे मानसबंध आहेत. (ढेरे, १९८६ , पान २४ )

munotes.in

## १.५ आदिबंधाचा आविष्कार

युंगने आदिबंधाच्या संदर्भात साहित्याचा विचार केला. आदिबंधाचे अवतरण आदिप्रतिमांच्या रूपात जसे स्वप्नांमधून होते, प्राक्कथांमधून होते, तसेच मानवी कलांमधूनही होते. त्यातही विशेषकरून साहित्यातून होते. कलावंतांच्या निर्मिती प्रक्रियेशी त्याच्या नेणीवेचा दृढ संबंध असतो. प्रतिमा – प्रतीके ह्यांच्या माध्यमातून तो आपल्या दृष्टीस पडतो.

कलानिर्मिती करताना मानवी मन चेतन, अचेतन अशा सर्व पातळ्यांवरुन कार्यरत होते. हे आदिबंध मानवी स्वप्ने, कला, प्राक्कथा, विधी अशा अनेक गोष्टीतून ते आविष्कृत होताना दिसतात. अमूर्त आदिबंधांना मूर्त करणाऱ्या प्रतिमा म्हणजे आदिप्रतिमा. आदिप्रतिमांच्या माध्यमातूनच आदिबंधांची ओळख होत असल्यामुळे अनेकदा अभ्यासकांनी ह्या संज्ञांमध्ये फारसा भेद मानलेला दिसत नाही.

## १.६ आदिबंध आणि आदिमता

आदिबंध ह्या आदिम प्रतिमा आहेत असे म्हणत असताना “आदिमता” म्हणजे काय? हयाविषयी अरुणा ढेरे यांनी आपल्या प्रबंधात जे सविस्तर विवेचन केले आहे त्या आधारे समजून घेऊ.

खानोलकरांविषयी लिहीताना मानव आचवल लिहितात, “खानोलकरांची निर्मीती ही एका पछाडलेल्या कलावंताची निर्मीती आहे आणि तिच्यात वाचकाला पछाडण्याची शक्ती आहे.”

खानोलकरांच्या कादंबरीच्या जगात माणसे कोणतीही गोष्ट करतात ती एका आदिम उर्मीतून. प्रेम, द्वेष, सत्ता-संपत्तीचा वापर, तिची लालसा, श्रद्धा, ढोंग या सा-या गोष्टींचा इथल्या माणसांनी घडवलेला आविष्कार एका निखळ आदिम प्रेरणेतून घडवलेला आहे. म्हणून व्यक्ती आणि व्यक्तीजीवन यांचे बाह्य भौगोलिक, ऐतिहासिक तपशील या जगात महत्त्वाचे ठरत नाहीत. पूर्णतः नैसर्गिक प्रेरणांनी लवलवणारे असे या जगातले वातावरण आहे.

प्रभाकर पाध्ये खानोलकरांच्या संदर्भात आदिम प्रतिभा किंवा लेखकाची आदिम प्रकृती म्हणजे काय हे सांगताना म्हणतात, हा अनुभव आदिम प्रकृतीचा, म्हणजे संस्कृतीने संयमित न झालेला असा आवेगपूर्ण अनुभव असतो, जो प्राण्याच्या मूळ प्राकृतिक ऊर्जेचा स्वाभाविक आविष्कार करतो.

अरुणा ढेरेंनी अचेतनात सामावलेल्या ह्या आदिमतेविषयी म्हटले आहे, आज वैज्ञानिक दृष्टीच्या बळावर माणूस सृष्टीची सगळी रहस्ये प्रयोगांनी उलगडून पाहतो आहे पण जेव्हा विज्ञानाचा उदय झाला नव्हता, जेव्हा माणसाचे मन अगदी अप्रगत होते, त्यावर संस्कृतीची सालं धरली नव्हती, विज्ञानाची धार नव्हती, धर्माची पुढे नव्हती, जे होते ते पूर्ण नग्न मन, जिवंत जे माहित नव्हते, ते माहित होत गेले तेव्हा, तो माहित होण्याचा अनुभव मुळच्या प्रतिक्रिया तशाच जिवंत ठेवून त्या आदिम मनात ठसून

गेला. आश्चर्य, कुतूहल,भय, आदर, नम्रता, जे जे त्याक्षणी जागले ते अनुभवाच्या रुपात गोठले आणि मग त्याच्या लेखी तेच वास्तव बनून गेले. त्याच्या जीवनाशी ज्या त-हेने सृष्टीघटक जोडले गेले त्या तऱ्हेचे रंगरुप घेऊन ते प्रकट झाले. जसे आदिमानवाच्या लेखी पाणी शुभंकरही आहे, भयंकरही आहे. तेच त्याला पोटातही घेते. आदिम मनाच्या लेखी सृष्टीचा जन्मच मुळी पाण्यातून झाला आहे. सृष्टीच्या निर्मीतीसंबंधीच्या जगभरच्या कितीतरी कथा पाण्याशी संबधित आहे. खानोलकर 'कोंडुरा' ह्या जलाशयाचे वर्णन करतात तेव्हा कोंडुरा हे असे पृथ्वीच्या गर्भाशयातून वर आलेले पाणी आहे. (ढेरे, १९८६ , पान 113)

या सविस्तर उदाहरणातून सामूहिक अचेतनाची आदिम प्रतिभा आदिम प्रतिमा कशा निर्माण करते हे लक्षात येईल.

- **आदिबंध आणि साहित्य**

म. सु. पाटील साहित्यातील आदिबंधांविषयी लिहितात, आपण कालिदास, भावभूती, बाण, ज्ञानदेव, तुकाराम असे कवी पुन्हा पुन्हा वाचतो ते त्यांच्या काळातील जीवन समजून घेण्यासाठी वा त्या त्या लेखकांच्या जीवनात त्यांच्या व्यक्तिगत अनुभवविश्वात प्रवेश मिळविण्यासाठी नाही. आपल्याला दुसऱ्यांच्या जीवनात निरपेक्षपणे रस नसतो. आपल्याला स्वतःमध्ये रस असतो. म्हणून आपण इतरांच्या जीवनात डोकावून पाहण्याचा प्रयत्न करतो. तसे करताना त्यांच्यात आणि आपल्यात जे काही समान असते ते जाणीव आणि नेणीव अशा दोन्ही पातळ्यांवरुन आपणास जाणवत असते आणि ते आदिबंधापेक्षा अधिक काही नसते. असे आकृतिबंध आपल्याला युगानुयुगे साद घालतात. अक्षर साहित्यातील सनातन भाव भावनांचे आकृतिबंध रसिकाच्या भावयित्री प्रतिभेला चालना देणारे असतात. त्यामुळे शंभर वर्षापूर्वीचे सौभद्र वा दीड-दोन हजार वर्षापूर्वीचे शाकुंतल कालबाह्य होत नाही. (पाटील म. सु., १९८९, पान ५५)

युंग लेखकांचे प्रामुख्याने दोन प्रकार मानतो. एक वर्ग मानसशास्त्रीय (Psychological) लेखकांचा आणि दूसरा द्रष्ट्या (Visionary) लेखकांचा. पहिल्या वर्गातील लेखकांच्या कृतीत जाणिवेतील सामग्रीचा वापर असतो. लेखकाने स्वतःच इथे आपल्या पात्राचे मानसशास्त्रीय अवलोकन केलेले असते वा ते करण्याला वाव दिलेला असतो.

दुसऱ्या प्रकारातील लेखक मात्र बाह्य जगा इतकेच अंतर्मनाशी जोडले गेलेले असतात. जाणिवेइतकीच, त्यांच्या नकळत, ते नेणीवेतील सामग्री वापरतात. येथे कला एखाद्या स्वप्नासारखी असते, स्वप्न पाहणाऱ्याचे त्याच्यावर नियंत्रण नसते. तसे हे आदिबंध लेखकाच्या नेणीवेतून त्याच्या साहित्यात आपोआप प्रकट होता. त्या प्रकट होण्यात भूकंप वा

ज्वालामुखीचा आवेग असतो. युंग याचे कारण सांगतो की साहित्यातून लेखक समग्रतेचा शोध घेत असतो. ह्या प्रक्रियेत अचेतनाशी चेतनाचा मेळ घालत, लेखकाच्याही नकळत, कलाकृती स्वतःच आकार घेते. ह्या समग्रतेच्या शोधाला युंग स्वात्मसाधनेची प्रक्रिया म्हणतो.

## १.७ स्वात्मसाधनेची प्रक्रिया

माणसाला समग्रतेची ओढ असते. ती समग्रता प्राप्त करण्यासाठी त्याला वैयक्तिक अचेतनाच्या पलीकडील सामूहिक अचेतनाच्या अंधाऱ्या, अथांग प्रदेशात उतरावे लागते आणि त्याचा चेतन मनाशी मेळ घालत, संयोग साधीत, त्याला प्रकाशरूप देत एका विकासप्रक्रियेत आपल्या व्यक्तित्वाची पुनर्रचना करावी लागते. युंग या प्रक्रियेला स्वात्मसाधनेची प्रक्रिया (Individuation Process) म्हणतो. (पाटील म. सु., १९८९, पान ६०)

आज काही साहित्यिक समकालीन जीवनाचा आविष्कार प्राक्कथांच्या माध्यमातून करतात. त्यांना ते आविष्कारचे सार्थ माध्यम वाटते. प्राक्कथा जणू जीवनावर भाष्य करण्याचे साधन वाटते. उदाहरणार्थ गिरीश कर्नाडांची नाटके (नागमंडल, हयवदन इ.) किंवा आपण आधुनिक काळातही जांभूळ आख्यानसारख्या लोकनाट्याशी एकरूप होतो, घाशीराम कोतवालसारखे नाटक अनुभवताना त्याचे वर्णन 'अनैतिहासिक नाटक' असे करतो कारण आपण त्या नाटकात इतिहासाचा नव्हे तर आपलाच "स्व"चा वेध घेत असतो. असे म्हणूया की वाचक-प्रेक्षक म्हणून या कलाकृतींचा आनंद घेताना साक्षीभोक्ता म्हणून आपण स्वात्मसाधनाच करीत असतो.

यापूर्वी जिचा उल्लेख झाला त्या स्वात्मसाधनेला युंग स्वाभाविक प्रक्रिया मानतो. जिवंत राहण्याची जशी माणसामध्ये सहज उर्मी आहे, तशीच स्वात्मरुपे प्राप्त करुन घेण्याचीही. असे म्हणूया की माणसाला एकांगी व्यक्तिमत्व नको असते, समतोल हवा असतो. मग प्रत्यक्षात नसलेल्या गोष्टी तो अचेतन पातळीवर मिळवू पहातो. ह्या स्वात्म साधनेला अनेकदा गती मिळते ती मर्मावर झालेल्या आघातातून. अनेकदा वयात येणे, आईबाबांपासून दुरावणे, अतीव यातना, अपमान अशा गोष्टीतून हा प्रवास सुरू झालेला दिसतो. उदा ज्ञानेश्वर, तुकाराम ह्या संतांची चरित्रे पाहता येतील. त्यांच्या मनाचे ऊर्ध्वमुखी संक्रमण होते. त्यांना सामूहिक अ-चेतनाची हाक ऐकू येते आणि वेगवेगळे आदिबंध या प्रक्रियेत प्रकट होतात. खलनायकाच्या बाबतीत हेच संक्रमण अधोमुखी होते. वीरनायकांच्या कथेत आपल्याला अशाप्रकारची स्वात्मसाधना पहावयास मिळते.

## १.८ लोकसाहित्य आणि आदिबंध

लोक नव्याने लोकसाहित्याकडे आकर्षित होऊ लागले ह्याची कारणे सांगताना म. सु. पाटील म्हणतात, "ह्याचे एक कारण माणसाच्या आजच्या एकारल्या जीवनामध्ये शोधता येईल. वैज्ञानिक प्रगतीबरोबर आजचा माणूस हा अधिकाधिक बहिर्मुख होत चालला आहे. तो जाणिवेच्या पातळीवर अधिक जगताना आढळतो. या पातळीवरून जगताना त्याच्या भोवतालचे जग त्याला तुकड्यांच्या स्वरूपात अधिक जाणवते. ते त्याला एकात्म करता येत नाही. स्वत:शी नीट जोडून घेता येत नाही. त्यामुळे; तो सदाचा अस्वस्थ दिसतो. या अस्वस्थतेचे दर्शन आपणास आजच्या नवसाहित्यात घडते. माणूस जाणिवेच्या पातळीवर जितका अधिक जगू लागतो, तितकी त्याची नेणीव आतून जोर करुन उठते आणि तिचे अतार्किक व्यापार भयावह स्वप्ने, हिंसाचार, अनेक प्रकारच्या मनोविकृती ह्यांच्याद्वारे प्रकट होतात. या व्यापारांवर माणसाला ताबा ठेवता येत नाही; कारण ते सहजप्रवृत्तिमूलक असतात; त्यांचे स्वरूप पाशवी असते. त्यांना मानवी रूप देण्याचे एक माध्यम कला आहे. कलेत ह्या सहजप्रवृत्तींचा आविष्कार प्रतिमा-प्रतीकांमध्ये होतो, त्यात जाणीव नेणीवेला आपल्याशी जोडून घेते आणि जीवनाची संगती लावत असते." अशाप्रकारे आपल्या तुकड्या-तुकड्याच्या जगण्याला एकात्म रूप मिळवून देणारे लोकाविष्कार माणसाला नव्याने महत्त्वाचे वाटू लागले आहेत. अशा आविष्कारांना आपण जो प्रतिसाद देतो तो सहजस्फूर्त असतो. आपल्या मनात काहीतरी उचंबळून येते आणि ती दाद दिली जाते. म्हणूनच लोकसाहित्याविषयी असे म्हटले जाते की त्यात व्यक्त होणारे मन हे कुणा एका व्यक्तीचे मन नसते तर ते लोकसमूहाचे मन आहे. जगभरातील लोककथांचा अभ्यास करताना, विविध संस्कृतीतील, भौगोलिकदृष्ट्या एकमेकांपासून दूर असणाऱ्या समाजाच्या प्राक्कथांमध्ये (मिथ) साम्य आढळते याचेही हेच कारण होय.

- **आदिबंधांचे लोककथेत दर्शन कसे होते, याची काही उदाहरणे म. सु. पाटील यांनी दिली आहेत.**

  आपल्या अनेक लोककथा पाहिल्या तर त्यांतील राजाला दोन बायका असतात. त्यापैकी एक आवडती तर दुसरी नावडती असते. त्यांची प्रतीकात्मकता लक्षात घेतली तर हा प्रेयस् आणि श्रेयस् यांच्यातील संघर्ष असतो असे दिसून येईल. प्रेयसच्या मागे धावलो तरी श्रेयसची आतून ओढ असतेच. या संदर्भात आवडती बरोबरचे जगणे म्हणजे केवळ जाणिवेच्या पातळीवर जगणे ठरते. नावडत्या राणीचा संबंध अचेतन पातळीवरील जिण्याशी असतो. तिला नाकारणे म्हणजे अचेतन स्तराची दखल घेण्यास नकार देणे. अचेतन स्तराची दखल घेतल्याशिवाय स्वरूपाची ओळख होत नाही. राजाच्या मुखवट्यालाच राजास्व मानत असतो. अशावेळेस बरेचदा राजा अपत्यहीन असतो. कारण अचेतनाच्या स्वीकाराशिवाय निर्मिती शक्य नसते. मग त्याला

एखादा गुरु म्हणजे वृद्ध आप्त काही रहस्य सांगतो. त्याच्याच सल्ल्यानुसार राजा काही यज्ञविधी करतो. हे जणू अचेतनाशी जोडले जाणे. मग त्याला फळ मिळते, राजाकरवी ते राण्यांना मिळते. त्यातही नावडतीला कमी, आवडतीला अधिक मिळते. अशा कथांचा अर्थ आणि त्यांची आवाहकता त्यांच्या प्रतीकात्मतेत दडलेली असते. जो अर्थ आदिबंधाच्या सहाय्याने समजून घेता येतो.

ओवी वाङ्मयात विठ्ठलाकडे स्त्रियांनी किती वेगवेगळ्या रूपात पाहिले आहे. तो त्यांचा पिता आहे, गुरु आहे, सखा आहे, माऊली पण आहे. स्त्री मनातील ॲनिमसच्या ह्या विविधांगी प्रतिमा होत.

आदिबंधाच्या ह्या सिद्धांतामुळे लोककथा, दैवतशास्त्र, विधी यांच्याकडे बघण्याची एक वेगळी दृष्टी मिळाली. हयातूनच पुराकथांचा तौलनिक अभ्यास (comparative mythology) ह्या सारख्या ज्ञानशाखांचा उदय झालेला दिसतो.

## १.९ आदिबंध आणि तुलनात्मक मानववंश शास्त्र

मानववंश शास्त्रज्ञ विविध संस्कृतींचा अभ्यास करत असताना त्यांना नेहमी पडणारा प्रश्न हा असे की एकमेकांपासून भौगोलिक अंतराने लांब असणाऱ्या, ऐतिहासिक दृष्ट्या ज्यांचा विकास वेगवेगळा आहे, अशा संस्कृतीत कल्पनांचे, विधींचे, प्रतीके आणि प्रतिमांचे एवढे साम्य कसे? युंगने आदिबंधाचा सिद्धांत मांडे पर्यन्त याचे उत्तर सांस्कृतिक उसनवारी किंवा एका संस्कृतीतून अनेक इतर संस्कृतींचा जन्म असे देण्यात येत असे. पण युंगने हे दाखवून दिले की ह्या कल्पना, ही प्रतीके, ह्या प्रतिमा हा मानवाच्या सामूहिक नेणीवेचा उद्गार आहे. ही प्रतीके आदिबंधांची प्रभावशाली निर्मिती आहेत.

अशाप्रकारे आपण म्हणू शकतो की साहित्य, लोकसाहित्य, पुराकथा ही स्वात्म साधनेची विविध साधने आहेत आणि त्यातून आदिबंधाचा आविष्कार होता.

## १.१० काही महत्त्वाचे आदिबंध

आता साहित्य-संस्कृतीमध्ये पुन्हापुन्हा अवतरणारे काही महत्त्वाचे आदिबंध पाहू.

- **मुखवटा (Persona)**

  माणूस बाह्य जगाच्या संपर्कात येताना विशिष्ट स्वरूपाचे मानसिक वर्तन करत असतो. परिस्थितीशी जुळवून घेण्यासाठी, व्यक्तिगत सोयीसाठी हा मुखवटा कार्यरत होतो.

  व्यवहारात याचा अनुभव आपण घेतो की आपण जसे आहोत तसे समाजात व्यक्त होऊ शकत नाही. ते सर्वमान्य होणार नाही, हे आपल्याला ठाऊक असते. मग आपण आपल्या वर्तनावर

नियंत्रण मिळवून एक मुखवटा स्वीकारतो. अनेकदा सवयीने हा मुखवटाच आपण चेहरा मानू लागतो.

उदा. एखादी स्त्री घरातील आपली भूमिका पार पाडताना गृहिणीचा समाजमान्य मुखवटा स्वीकारते. स्वतःची ओळखही ती विसरून जाते. एकपात्री अभिनेत्या प्रमाणे अनेकदा आपण स्थल, काळ परिस्थितीनुसार अनेक मुखवटेही स्वीकारतो. हा मुखवटा खरे तर आपल्या व्यक्तिमत्त्वाचा वरवरचा भाग असतो पण आपण त्यालाच आपले व्यक्तिमत्व मानू लागतो. त्यामुळे आपण मुखवट्याशी इतके एकरूप होतो की आपले व्यक्तिमत्व एकांगी होते आणि आंतरिक मनाशी आपले नाते तुटते. स्वात्मसाधनेच्या प्रक्रियेतील पहिली पायरी म्हणजे हा मुखवटा गळून पडणे, त्याशिवाय स्व-रूपाची ओळख होऊ शकत नाही.

ह्यासाठी म. सु. पाटील योगी चांगदेवाचे उदाहरण देतात. योगीपणाच्या बाह्य मुखवट्याला खरे मानू लागल्यामुळे चांगदेवाला स्वरूपाचा विसर पडला होता. मुक्ताईने त्याला त्याच्या कोरेपणाची जाणीव करुन दिल्यावर त्याचा मुखवटा गळून पडला.

- **छाया (Shadow)**

मुखवटा स्वीकारताना साहजिकच सगळ्या सकारात्मक गोष्टी स्वीकारल्या जातात. पण त्याचबरोबर एक अस्वीकृत बाजूही असते. जी प्रसंगी निकृष्ट, आदिम, असंस्कृत, गैरसोयीची, कदाचित बालिश वाटावी अशी असते. त्याला छाया म्हणता येईल. छाया हा आदिबंध खलनायकाच्या रूपात व्यक्त होताना दिसतो. अनेकदा कलाकृतीत पात्राशी आरशातील प्रतिबिंब बोलते आहे, असे प्रसंग आपण पाहतो तो छायेचाच आविष्कार म्हणता येईल. तो नकारात्मकच असेल असे नाही. विदूषक, मित्र अशा सकारात्मक रूपातही तो व्यक्त होऊ शकतो.

ॲनिमस आणि अनिमा म्हणजे अनुक्रमे स्त्रीच्या मनातील पुरुषाची आणि पुरुषाच्या मनातील स्त्रीची शाश्वत प्रतिमा, शिवाय स्त्रीचे मातृरूप हाही महत्त्वाचा आदिबंध आहे तसेच वीरनायक आणि त्याच्याशी संबंधित वृद्ध आप्त, प्रवास याविषयी जाणून घेऊया.

- **ॲनिमस (Animus)**

पुरुषाच्या मनात जशी स्त्री-प्रतिमा असते त्याचप्रमाणे स्त्री-मनामध्ये पुरुषत्वाचे सनातन अंग असते त्याला ॲनिमस म्हणतात. स्त्रिया त्यांच्या संपर्कात येणाऱ्या पुरूषांचा अनुभव ह्या मुशीत घेतात. पुरुषाच्या बाबतीत त्याच्या अनिमा अर्थात स्त्री कल्पनेवर त्याचा आईचा अनुभव म्हणजेच मातृप्रतिमा प्रभाव टाकते. त्याप्रमाणे या आदिबंधात प्रतीत होणाऱ्या प्रतिमेवर तिच्या प्रत्यक्ष पित्याचा आणि तिच्या मनातील आदिम पितृप्रतिमेचा प्रभाव पडतो.

उदाहरण म्हणून जगप्रसिद्ध परिकथा "ब्युटि अँड द बीस्टचा विचार जोसेफ एल हँडरसन ह्या मानसशास्त्रज्ञाने केला आहे. (पाटील म. सु., १९८९, पान २६) या परिकथेतील पशू ब्युटीचा ॲनिमस आहे. त्याची खरी ओळख झाल्याशिवाय तिचा स्वात्मशोध पूर्ण होणार नाही. स्त्रियांच्या साहित्यामध्ये पुरुषाबद्दलचे आकलन ॲनिमसच्या मुशीत अवतरते. जनाबाईचा विठ्ठल, मिरेचा गिरीधर गोपाल ही त्याचीच रूपे म्हणावी लागतील. ॲनिमसची ऋणात्मक, आसुरी प्रतिमाही असू शकते. अनेकदा तो 'क्रियाशील' प्रकृतीचा 'निष्क्रिय' सहचर असतो. कधी तो अनोळखी सुंदर तरुण असतो. कधी मृत्यूचा देव असतो.

डॉ. अरुणा ढेरे म्हणतात, परिकथांमधले राजपुत्र अनेकदा चेटकिणीच्या शापाने दगड किंवा प्राणी बनतात. राजकन्या आपल्या प्रेमाने आणि हुशारीने त्यांना त्यांचे पूर्वरूप प्राप्त करुन देतात. ही प्रक्रिया म्हणजे ॲनिमस अबोध मनातून चेतन मनाच्या पातळीवर येण्याची प्रतीकात्म प्रक्रिया आहे. (ढेरे, १९८६, पान ६७)

ज्या प्रतीकांमधून पुरुषाचे प्रगटीकरण झाले आहे ती म्हणजे पर्जन्य, सूर्य, नाग, सिंह, कोंबडा, घोडा, मेंढा, मासा, बैल, नांगर, मुसळ, शिंग इत्यादी. जगभर सर्वत्र आढळतात.

- **अनिमा (Anima)**

मानसशास्त्रीय दृष्ट्या या प्रतिमेचे विवेचन करताना युंग म्हणतो की प्रत्येक पुरुषाच्या मनात स्त्रीची एक प्रतिमा असते. ही विशिष्ट स्त्रीची प्रतिमा नसून एक शाश्वत अशी प्रतिमा असते. स्वात्मसाधनेच्या प्रक्रियेत उदयाला येणारी अंतःप्रतिमा म्हणून युंगने तिचा उल्लेख केला आहे. पुरुषाच्या सायकितील सनातन अशी स्त्री प्रतिमा असे तिचे वर्णन करता येईल.

म. सु. पाटील याविषयी म्हणतात की पुरुषाच्या मानसिकतेत स्त्रीला आणि स्त्रीच्या मानसिकतेत पुरुषाला चिरंतन स्थान मिळाले आहे. आपल्याकडील अर्धनारीनटेश्वरच्या कल्पनेत शिवाच्या ठिकाणी शक्तीचे अंग म्हणजे अनिमा म्हणता येईल. (पाटील म. सु., १९८९, पान १९)

आपल्या साहित्यात दिसणाऱ्या उर्वशी, राधा, सीता, द्रौपदी ही अनिमाचीच विविध रूपे आहेत.

कलावंताला वैयक्तिक आयुष्यात स्त्रीचा जो अनुभव आई, बहीण, प्रेयसी या रूपात येत असतो. त्याला तो ह्या स्त्रीत्वाच्या सनातन मुशीत अनुभवत असतो. त्यामुळे असे म्हणूया, की ह्या प्रतिमा प्रकट होण्याचे कारण कदाचित वैयक्तिक असेलही, पण ह्या अनिमा प्रतिमा काव्यरूप धारण करुन प्रगट होतात तेव्हा त्या प्रतिमा सार्वत्रिक, सामूहिक आणि सांस्कृतिक बनतात. थोडक्यात कवितेतील 'ती' ही कोणी विशिष्ट मुलगी नसून मानवी मनातील आदिम स्त्रीत्वाचे प्रकट रूप असते.

बालकवींच्या “गर्द सभोती रान साजणी, तू तर चाफेकळी” किंवा फुलराणी यासारख्या कवितेत अनिमाचेच प्रकटीकरण दिसते.

मर्ढेकर लिहितात,

***दवांत आलीस भल्या पहाटे***
***शुक्राच्या तोऱ्यात एकदा***
***जवळूनी गेलीस पेरीत आपुल्या***
***तरल पावलामधली शोभा***

तेव्हा ‘ती’ अचेतन मनाच्या रात्रीतून आल्याचे जाणवते. तिच्या भोवती दवाचा पडदा गूढता वाढवतो. कवी अनेकदा आपल्या प्रतिभेला “अनिमा”च्या रूपात पाहतो.

युंगने चार प्रकारच्या स्त्री प्रतिमा सांगितल्या आहेत. (अर्थात त्या तेवढ्याच मर्यादित आहेत असे मानण्याचे कारण नाही.)

i) पहिल्या प्रकारची प्रतिमा म्हणजे इव्हची प्रतिमा. शुद्ध दैहिक पातळीवरच्या स्त्रीचे प्रतिनिधित्व ही प्रतिमा करते. उदा. रती वा उर्वशी

ii) दुसऱ्या प्रकारची स्त्री प्रतिमा ही शकुंतलेसारखी आहे, ती जरी वासनेतून आकाराला आली असली तरी रोमॅंटिक आणि सौन्दर्यवादी पातळीवरची अशी ही प्रतिमा आहे.

iii) तिसरी प्रतिमा ही मिरेसारखी आहे, जी आत्मिक शक्तीच्या जोरावर प्रेमाला अलौकिक उंची प्राप्त करुन देते.

iv) चौथी प्रतिमा समजुतीच्या अधिक शुद्ध आणि पवित्र पातळीवर वावरते. युंगने मोनालिसाची प्रतिमा या पद्धतीची आहे असे म्हटले आहे (ढेरे अ., १९८६ , पान ५८)

स्त्रीची मानवी जीवनातील रूपे अशी विविध पातळ्यांवरची आहेत. कधी पोषक, सात्विक तर कधी निर्दय, तामसी, कधी उग्र, मायवीही. कैकयी, शूर्पणखा ही देखील स्त्री रूपेच आहेत. म्हणूनच अनिमाची धनात्मक (सकारात्म) आणि ऋणात्मक (नकारात्म) रूपे मानण्यात येतात. दोन्हींची प्रतिबिंबे साहित्यात उमटलेली दिसतात.

लोककथांमध्ये लोभी बायको, जी नवऱ्याला पुन्हा पुन्हा वर मागायला भाग पाडते अशी जी दिसते. तीही अनिमाचे एक ऋणात्मक रूप म्हणता येईल.

प्रत्येक पूर्ण व्यक्तीत एक अनिमा आणि एक ॲनिमस यांचे अस्तित्व असते. व्यक्तीला या दोहोंचा मेळ घालत सुसंघटित आयुष्य जगायचे असते. जी. ए. कुलकर्णी यांच्या बाधा या कथेत रमेला दिवाकर हा हवासा वाटणारा पुरुष आहे. तिचे लग्न गोपाळरावांशी झाल्यावर ती त्याला

विसरूनही गेली आहे पण ती संसारात रमत नाही. शेवटी सगळे आयुष्य तिच्या हातातून जेव्हा निसटते तेव्हा तिला भासते की तलावाच्या पाण्यातून दिवाकर तिला बोलावतो आहे. हा दिवाकर प्रत्यक्षातला नव्हे तर रमेमधला ॲनिमस आहे.

## १.११ मातेचा आदिबंध

मानवी जीवनावर अतिशय परिणाम करणारा आदिबंध म्हणजे मातेचा आदिबंध. प्रत्येक माणसाच्या मनात, मातृत्वाच्या अनुभवाचे जे सनातन, संचित रूप असते, ते म्हणजेच मातृत्वाची आदिप्रतिमा होय.

जन्म आणि मृत्यु यांच्या मधल्या आयुष्याचे पोषण करणारी ही प्रतिमा आहे. जिथे सर्व चिंता-व्याधींचा विलय होतो असे निर्भर मायेचे प्रतीक म्हणजे माता. युंगचे मत आहे की साहित्यात वारंवार दिसणाऱ्या मातृप्रतिमा ह्या साक्षात जन्मदात्या आईच्या असण्यापेक्षा मातेत प्रतिबिंबित झालेल्या मातृत्वाच्या आदिबंधाच्या असतात. आपल्या जन्मदात्या आईलाही किंबहुना एक प्राक्कथात्म वलय लाभते. जगन्माऊली रूपात तर तिला दैवी अधिष्ठान प्राप्त होते. आपल्याकडे विठ्ठलाकडे असे मायस्वरूपात पाहण्यात आले शिवाय सर्व देवी आदिमायेची – महामातेची रूपे आहेतच. देव-भक्त हे संबंधच आई-मुलाच्या रूपात चितारले आहेत.

महामातेचा हा आदिबंध अनेकदा दरी, जमीन, समुद्र, त्याचा तळ, झरे, सरोवर, गुहा, घर अशा प्रतीकांद्वारा किंवा जे जे रक्षण करणारे आहे, पोषण करणारे आहे अशा मध्यमांद्वारा व्यक्त होतो. सुफलनाशी निगडीत, गर्भाशय सूचित करणारी प्रतीकेही आदिमातेची प्रतिमा सुचवितात. उदा. कुंभ, नवरात्रीमध्ये मुद्दाम अंकुरित केली जाणारी धान्याची रोपे इ.

एकप्रकारची मातृप्रतिमा शुभ आहे, मंगल आहे, तर दुसऱ्या प्रकारची मातृ प्रतिमा उग्र, रौद्र, विनाशक आहे. जी जन्म देते, तीच मृत्युही देते या धारणेतून काली, दुर्गा, महिषासुरमर्दिनी अशी रौद्र मातृरूपेही दिसतात.

मुलाला आरंभी आईच जगाची ओळख करुन देते. पण मुलामधील अहंला जाणतेपण येऊ लागते, तसे मुलाचे मूलपण कमी होऊन तो पुरुष होऊ लागतो. त्याचे आईवर अवलंबून असणे कमी होते. हा बदल महामातेतील रुद्ररूपाला पटत नाही. ती पुन्हा त्याच्यावर नियंत्रण मिळविण्याचा, त्याला गिळंकृत करण्याचा प्रयत्न करते. लोककथेतील नायकांचे वाट चुकणे, तळघरात अडकून पडणे, पशू रूप प्राप्त करणे हे अडथळे रुद्रमाता निर्माण करते. चेटकिणी, अजगर, कृष्णशक्ती ही तिची रूपे असतात. वीरनायकाच्या कथेत अनेकदा ड्रगन फाईटचे वर्णन येते. मुलाने आपल्या पासून दूर जाऊ नये म्हणून रुद्रमाता ड्रॅगनचे भयंकर रूप घेऊन त्याला ग्रासू पहाते.

ह्याची तुलना अनेकदा सूर्यास्ताशी केली जाते. सूर्य संज्ञेचे प्रतीक आहे. वीरनायक जसा विकसित होऊ लागतो तसा जन्मदात्रीपासून दूर जातो. पण संध्याकाळी तो थकतो. तेव्हा मातेचे अंधकारमय कृष्णरूप त्याला गिळंकृत करते. सूर्यास्त होतो. पण वीरनायकाचा शेवट होत नाही. अंधाराचे रहस्य जाणून तो दुसऱ्या दिवशी नव्या तेजासह जन्माला येतो. काही वेळा परशुरामाने आपल्या आईचा रेणुकामातेचा वडिलांच्या आज्ञेने वध केला अशा कथा येतात. तेव्हा मुलाने मातृसत्ता नाकारून पितृसत्ता स्वीकारल्याचे ते द्योतक ठरते.

निसर्गातही पाण्यासारखी कितीतरी तत्वे आहेत जी जीवन देणारी आहेत आणि प्रलय घडवणारी आहेत. त्यामुळे मातृरूप द्विविध आहे.

आईतच प्रेयसीचे रूप पाहून वडिलांशी स्पर्धा करणारा इडिपस गंड मानसशास्त्रात सांगितला आहे, तोही अनेक कथा-कवितांमधून प्रतिबिंबित होतो. त्याच बरोबर आई हे सगळ्यात सुरक्षित स्थान असल्यामुळे. गर्भाशयातील संज्ञाविहीन, आई पोषण करत असलेल्या अवस्थेची ओढ वाटून तिच्याकडे परत जाण्याची ओढही दिसून येते.

## १.१२ वीरनायक आणि त्याचा धाडसी प्रवास

प्राक्कथांमधून सर्वत्र आढळणारी, एक सर्वपरिचित आदिप्रतिमा आहे. अधिक नेमक्या शब्दात सांगायचे तर वीरनायक हा संज्ञेच्या विकासाचा आदिबंध आहे. प्राणिसदृश अवस्थेपासून संज्ञेच्या विकासाची प्रक्रिया वीरनायकाच्या रूपाने प्रकट होते. विकासाच्या प्रत्येक टप्प्यावर अहं बदलत असतो, त्यामुळे वीरनायकाचा प्रवास हा एका अर्थाने स्वात्मसाधनाच असते. तो स्वात्मरूपाच्या शोधात असतो. वीरनायक अनेकदा धाडसी प्रवासाला जातो, अनेक संकटे पार केल्यावर, प्रवासाच्या अंतिम टप्प्यात त्याला एखादे रत्न, गुलबाकावलीचे फूल, खजिना मिळतो, राजकन्येशी त्याचे मिलन होते, त्याला राज्याची प्राप्ती होते. ही स्वात्मरूपाची प्रतीके म्हणता येतील. वीरनायकाला असा लाभ होणे म्हणजे एक प्रकारे जाणीव-नेणीवेचा संयोग होऊन त्याच्या व्यक्तित्वाला पूर्णता येणे. या प्रवासातील काही टप्पे महत्त्वाचे आहेत. वीरनायक कधी असामान्य आईबापांचा मुलगा असतो, कधी नावडतीचा तर अनेकदा अनाथ किंवा आईबाबांपासून दुरावलेला असतो. पौगंडावस्थेतून यौवनात पदार्पण करताना तो घरदार सोडून जाताना दिसतो. आईबाबांच्या कोशातून बाहेर पडल्याशिवाय जणू त्याचा विकास होऊ शकत नाही. यासाठीच तो त्यांच्यापासून दूर जातो. तो कधी सात अरण्ये वा सात समुद्र ओलांडतो. येथील सात हा आकडा मानवाच्या प्रतीकसृष्टीत परिपूर्णतेचा, समृद्धीचा, समग्रतेचा द्योतक म्हणून येतो. हे जणू वीरनायकाचे संक्रमण आहे. या प्रवासात तो बदलत जातो. अरण्ये, समुद्र किंवा वीरनायक कधी जातो तो पाताळलोक म्हणजे नेणीवेचा प्रदेश आहे. तिथे त्याला राक्षस, चेटकिणी भेटतात. त्यांच्या वेढ्यात सापडलेली राजकन्याही भेटते. ही राजकन्या म्हणजे अनिमा या आदिबंधाचे

प्रतीक होय. ती नेणीवेच्या/ अचेतनच्या अंधाराने वेढलेली असते. पुरुषाच्या ठायी असलेल्या या स्त्री-तत्वाला पुरुषत्वाशी संयोग झाल्याशिवाय पूर्णत्व प्राप्त होत नाही. पण ही गोष्ट इतकी सोपी नसते. नेणीवेतील अनिमा जाणिवेच्या पातळीवर येताना नेणीवेतील काळोखाचे, तेथील राक्षसांचे पाश अधिक घट्ट होतात. नायकाच्या शक्ती अपुऱ्या पडू लागतात. तो हतबल होतो, कधी कैदेत सापडतो. अशा आणीबाणीच्या वेळी त्याला वृद्धआप्त भेटतो. हाही एक महत्त्वाचा आदिबंध ज्या विषयी पुढे अधिक विवेचन आपण करणार आहोत. वीर नायकाचा हा 'प्रवास' हा आदिबंधही लक्षात घ्यायला हवा. जन्म-मृत्यूच्या प्रवासाशी तो निगडीत आहे. चेतन-अचेतनचा मेळ घालण्यासाठीचा हा प्रवास प्रत्येक व्यक्तीला गरजेचा असतो.

या प्रवासाची, त्यातील अडथळ्यांची प्रतीकरूपे प्राक्कथांमध्ये सर्वत्र आढळतात.

सागरातून होडीने केलेला प्रवास असाच प्रतीकात्म आहे. चित्र, शिल्प साहित्य सर्वत्र तो आढळतो. पाण्यावरच्या या प्रवासाला जन्ममृत्युच्या प्रवासाचा संदर्भ आहे. भवसागर तरुन जाणे म्हणतो ते ह्याच अर्थाने. सिंधुसंस्कृतीतील अवशेषात दफनविधीमधे मृताबरोबर जी भांडी दफन केली आहेत त्यावर होडीची, वल्ह्यांची कोरीव चित्रे आढळतात. पैलतीर गाठायचा आहे ही ओढ संत साहित्यापासून ते "ओ रे माझी" सारख्या हिंदी चित्रपटगीतापर्यंत सर्वत्र आढळते. एखादा आदिबंध किती वेगवेगळ्या प्रकारे अवतरीत होतो ह्याचे हे बोलके उदाहरण आहे.

अनेकदा हिरोमिथ ही 'मोनो मिथ' आहे असे म्हटले जाते, म्हणजे सर्व प्राक्कथांची जननी प्राक्कथा. जगभरातील हीरो मिथचा अभ्यास करणारा द हिरो विथ अ थाउजेंड फेसेस (१९४९ मध्ये प्रथम प्रकाशित) हे जोसेफ कॅम्पबेल यांचा ग्रंथ महत्त्वाचा मानला जातो. राम, कृष्णापासून ते सुपरमॅन पर्यन्त हीरो मिथची अनेक रूपे आपल्या परिचयाची आहेत. अनेकदा वीरनायकाचे दैवतीकरण झालेले दिसते. हीरो मिथचा हा साचा इतका प्रभावी आहे की चरित्र ग्रंथ लिहिताना, आत्मचरित्र लिहिताना लेखकाच्या नकळत तो या आदिबंधाच्या साच्यात रचना करू लागतो.

## १.१३ वृद्ध आप्त

पित्याच्या प्रतिमेचा एक वेगळा आविष्कार वृद्ध आप्ताच्या आदिबंधात्मक प्रतिमेमध्ये होतो.

संज्ञाविकासाच्या धडपडीत असलेला वीरनायक जेव्हा अडचणीत सापडतो, त्याच्या जिवाला जेव्हा धोका संभवतो, तेव्हा त्याला मार्ग दाखवणारा, सल्ला देणारा वृद्ध अनेक परीकथांमध्ये आढळतो. केवळ कथांमध्ये नव्हे तर प्रत्यक्ष आयुष्यातही अशा गुरु करवी, मार्गदर्शकाकरवी स्वप्नात योग्य मार्ग सांगितल्याचे दाखले आपण ऐकतो. त्याचे एक स्पष्टीकरण असे देता येईल की मनाच्या अगदी एकाग्र अवस्थेत आपल्याला हा विचार सुचलेला असतो, पण हे आपले आपल्याला सुचले हे मानायला आपण

तयार नसतो. पण जाणीव नेणीवेच्या पातळीवर बोलायचे झाल्यास वीर नायक हा संज्ञेच्या आदिबंधाचे प्रतीक आहे. तो संज्ञेच्या अंगाने एकांगी विचार करू लागला की तो जाणिवेच्या पातळीवर वावरू लागतो की त्याला सर्जनशील विचार सुचेनासे होतात, तो एक प्रकारची हतबलता अनुभवतो. अशा वेळेस वृद्ध आप्त हा जणू नेणीवेबरोबर तुटलेला संबंध जोडून देतो. परिकथेत या प्रतिमा जादूगारचे वा मांत्रिकाचे रूप घेतात.

**आदिबंधात्मक समीक्षेचे स्वरूप आणि व्याप्ती**

आदिबंधाचा सिद्धांत हा मानसशास्त्र आणि मानवशास्त्र या दोन ज्ञानशाखांतील आधुनिक विचारप्रणालीत उगम पावून तो आजच्या साहित्यसमीक्षेत रूढ झाला आहे.

नॉर्थ्रोप फ्राय यांच्या 'ॲनॅटॉमी ऑफ क्रिटिसिझम', 'फेबल्स ऑफ आयडेंटिटी' आणि मॉड बॉडकिनच्या 'आर्किटायपल पॅटर्नस् इन पोएट्री' या ग्रंथांनी आदिबंध, आदिबंधात्मक समीक्षा हे शब्द रूढ केले आणि समीक्षेच्या प्रांतात एक नवी दिशा दाखवली. ही समीक्षापद्धती वंशचिन्हात्मक, दिव्यकथात्मक, विधीविधानात्मक या नावांनी देखील ओळखली जाते.

आदिबंधात्मक समीक्षेचा पाया कार्ल गुस्ताव युंगच्या 'सामूहिक अचेतनाच्या' कल्पनेवर आधारित आहे पण त्याला आज जे विकसित रूप प्राप्त झाले आहे ते देणाऱ्या इतर काही अभ्यासकांचा उल्लेख करणेही महत्त्वाचे आहे.

मानसशास्त्रीयदृष्ट्या आदिबंध ही संकल्पना मांडण्याचे श्रेय जसे युंगला द्यावे लागते, तसे प्राक्कथांचा आदिबंधात्मक अभ्यासाचा पाया रचण्याचे श्रेय फ्रेझरला द्यावे लागते. स्कॉटिश मानवशास्त्रज्ञ सर जेम्स फ्रेझर यांनी 'द गोल्डन बाऊ' हा महाकाय ग्रंथ १२ खंडात १८९० ते १९१५ या काळात प्रकाशित केला. जगभरातल्या कथांचा हा संग्रह हा अतिशय मोलाचा ठेवा आहे.

याचबरोबरीने ज्यांचा उल्लेख करायलाच हवा असे अभ्यासक म्हणजे युंगचे शिष्य असणारे मानसशास्त्रज्ञ डॉ. एरिक नॉयमन. 'आर्ट अँड द क्रिएटिव अनकॉन्शस', द ग्रेट मदर : ॲन ॲनालिसिस ऑफ द आर्किटाइप', द आर्किटायपल वर्ल्ड ऑफ हेनरी मूर' ही त्यांची ग्रंथसंपदा आदिबंधात्मक समीक्षेच्या विकासात अतिशय महत्त्वाची ठरली. युंगने सांगितलेल्या प्रमुख आदिबंधांपैकी मातृत्वाचा आदिबंध, त्याची मानसशास्त्रीय पार्श्वभूमी, विधायक आणि विघातक असे त्याचे दुहेरी स्वरूप आणि मानवी संस्कृती व साहित्यातील त्याचे अवतरण त्याने 'ग्रेट मदर' या ग्रंथात मांडून अभ्यासाला नवी दिशा दिली.

munotes.in

**आदिबंधात्मक समीक्षा नेमके काय करते?**

या प्रश्नाचे उत्तर देताना गंगाधर पाटील यांनी बॉडकिन यांचा आधार घेऊन अभ्यासाच्या दिशा सुचवताना म्हटले आहे, आदिबंधाच्या आश्रयाने काव्यात्म अनुभवांचे दोन अंगांनी विश्लेषण करता येते.

१) एखाद्या समाजाच्या सांस्कृतिक भावसृष्टीत व काव्यसृष्टीत सातत्याने परावर्तित होणाऱ्या अनेकविध आदिप्रतिमांचा शोध घेऊन त्यांच्या विविध रूपांचा वा आकृतिबंधांचा तुलनात्मक अभ्यास करता येईल.

२) अशा प्रकारच्या काव्यगत आदिप्रतिमांना प्रतिसाद देणाऱ्या रसिकाच्या मनातील आंतरिक अनुभवांचा अभ्यास करता येईल.

आदिबंधात्मक समीक्षा एखाद्या संहितेचे सूक्ष्म वाचन करते. एखाद्या साहित्यकृतीत आदिबंधात्मक प्रतिमा कशी प्रकट होते? ती आदिबंधात्मक अनुभवाला साकार कशी करते? ती कोणते काव्यात्म कार्य करते? ह्याची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न ही समीक्षापद्धती करते.

ह्या पद्धतीने एखाद्या साहित्यकृतीचा व लेखकाचा अभ्यास केल्यावर लक्षात येते की आदिबंधात्मक प्रतिमा साहित्यकृतीच्या भावविश्वाला प्रभावित करते. आदिबंधात्मक प्रतिमा लक्षात घेतली तर कलाकृतीतील विविध घटकांची संगती लागून कलाकृतीला एकजिनसी, सेंद्रिय रूपबंध ध्यानात येतो.

अनेकदा अभ्यासांती असे लक्षात येते की विशिष्ट कलाकृतीच्या वा कलाकाराच्या भावविश्वात एखाद्या विशिष्ट आदिबंधाला केंद्रस्थान मिळालेले असते. त्याची कारणे अनेकदा लेखकाच्या जडणघडणीत असू शकतात. ही खासियत म्हटली पाहिजे की आदिप्रतिमा आणि प्रतीके प्रकट होताना त्यात जाणीव आणि नेणीव दोघांची सरमिसळ झालेली असते. देशकालपरिस्थितीचे, संस्कृतीचे रंग समाविष्ट झालेले असतात.

उदाहरणार्थ, खानोलकरांच्या साहित्यात कामवासना केंद्रस्थानी असून अनिमा आणि ॲनिमसची विविध रुपे तिथे पहायला मिळतात. रात्र काळी घागर काळीमधील लक्ष्मी म्हणजे अनिमाच आहे. लक्ष्मी हे एक विनाशक स्त्रीरुप आहे. लक्ष्मीला आपल्या स्त्रीत्वाची जाणीव होते तेव्हा भरतीच्या पाण्याची अघोरी ओढ जाणवते. हे अनावर कामप्रेरणेचे रूप म्हणता येईल. काळ्याभोर पाण्यावरुन उपडी जाणरी घागर तिला दिसते. मातृरुप भासणारे पाणी सर्जनाचे प्रतीक आहे तसेच प्रलयाचेही प्रतीक आहे. एकाचवेळी सर्जक आणि विनाशक अशा स्त्रीत्वाचे प्रतीक. लक्ष्मी अशीच आहे. उपडी घागर वासनेचा अतृप्त घडा आहे, लक्ष्मीचे रिकामे राहिलेले गर्भाशय तिथे प्रतीत होते. लक्ष्मीचे हे रुप घडताना खानोलकरांच्या अवतीभवतीचे कोकणातील वातावरण, तिथल्या स्थानिक श्रद्धा, समजूती,

खानोलकरांचा वैयक्तिक अनुभव हेही ह्यात मिसळले आहेच म्हणजे जाणीव-नेणीवेचे रंग परस्परात मिसळून गेले आहेत.

ह्या समीक्षापद्धतीचा वापर सरसकट सगळ्या साहित्यकृतींसाठी करता येत नाही. अनेक साहित्यकृती केवळ जाणीवेच्या पातळीवर राहतात. त्यात व्यक्त झालेल्या प्रतिमांचा आशय लेखकाच्या व्यक्तीगत अनुभवाचे फलित असतो. मुख्य म्हणजे वाचकाला वाचताना तो आदिबंधात्मक असल्याचा अनुभव येत नाही. गंगाधर पाटील म्हणतात, कलाकृतीत "आदिबंधात्मक ललित घटना" असणे गरजेचे आहे. अशी घटना निर्माण झालेली नसेल तर त्या कलाकृतीत 'असंज्ञ अर्थबंध' ध्वनित होत नाहीत. अशा साहित्यकृतींना ही समीक्षा पद्धती लागू होणार नाही. म्हणून ते म्हणतात की ही समीक्षा पद्धती युंगच्या भाषेत फक्त 'साक्षात्कारी' कलाकृतींनाच लागू होते. साक्षात्कारी कलाकृती ही अर्थ सुलभतेने सांगणारी नसते. तिच्यामध्ये नेणीवेच्या पातळीवरील अनेकदा स्तिमित, भयचकित करणारा, लोकविलक्षण असा आशय प्रतीत होतो. ज्याचे स्वरूप काहीसे गूढ असते. ज्ञानेश्वर -तुकारामांचे काव्य, केशवसुत, मर्ढेकर, पु. शि. रेगे यांची कविता, जी. ए. कुलकर्णी, कमल देसाई यांच्या कथा यांचा समावेश गंगाधर पाटील यांनी मराठीतील साक्षात्कारी कृतींमध्ये केला आहे. (पाटील ग. , १९८१ , पान ८०-८१ ) जगातील श्रेष्ठ साहित्यामध्ये, ज्याला आपण अभिजात साहित्यही म्हणतो आदिबंधात्मक आशय आढळतो. त्याच्यामुळेच त्या साहित्याला एक सार्वत्रिक आवाहन प्राप्त होते. उदा. रामायण, महाभारत. एखाद्या कलाकृतीचे मूल्यमापन करताना अशा आशयाचा अभाव ही तिची मर्यादा मानली जाते हेही लक्षात घेण्यासारखे आहे.

ह्या टप्प्यावर समीक्षापद्धतीचा मूलभूत सिद्धांत समजून घेणे गरजेचे ठरते. "काव्य ही एक प्रतीकरूप भाषा असून ती मिथ, स्वप्न व लोककथा यांच्याप्रमाणेच मानवी मनातील आदिम आणि सर्वस्पर्शी भावविश्वाचा आविष्कार करत असते आणि त्यामुळेच ती जणू साऱ्या मानवजातीची एक सार्वकालीन, सर्वस्पर्शी व स्वाभाविक भाषा बनली आहे. म्हणून काव्याचे आकलन हे मानवी प्रतीकसृष्टी, काव्यसृष्टी, तीमधील संकेत व परंपरा यांच्या संदर्भात करुन घेणे आवश्यक असते." (पाटील ग., १९८१, पान ८३)

साहित्यकृतीच्या केंद्रस्थानी असणाऱ्या आदिबंधाचे आणि मिथच्या मुळाशी असणाऱ्या आदिबंधाचे अगदी निकटचे नाते असते. त्यामुळे आदिबंधात्मक समीक्षा पद्धती मिथ क्रिटीसिझमशी सहसंबंध राखून असते.

संज्ञेच्या विकासाशी नाते सांगणाऱ्या काही प्राक्कथा या निमित्ताने पाहता येतील. उदा. सर्पमाता कद्रू आणि गरुडमाता विनीता यांची गोष्ट. तिथे सर्पमाता सहजप्रवृत्तीचे द्योतक आहे तर विनीता संज्ञेचे. मग विनीतेला कद्रूचे दास्य स्वीकारावे लागते. याचा वेगळा अन्वयार्थ लक्षात येतो. तिचा पुत्र गरुड स्वर्गातून अमृतकुंभ घेऊन येतो आणि तिची दास्यातून सुटका करतो. हा संज्ञेचा विजय आणि विकास होणे

मानता येते. रामायणात कैकयी टेरीबल मदरच्या रूपात दिसते. मारुती चिरंजीव असून आजही कुठे कुठे संकटात सापडलेल्या प्रवाशांना भेटतो, योग्य मार्ग दाखवतो ही समजूत 'वृद्ध आप्त'चेच रूप आहे. मानवाची सारी प्राक्कथानिर्मितीच मानवी संज्ञेच्या विकासक्रमाशी निगडीत आहे. ज्या ज्या वेळी अस्तित्वाचा प्रश्न उभा राहतो, संक्रमणाची वेळ उदा. पौगंडावस्था असते, अशावेळेस मानवी मन आपल्या भावना ह्या कथांच्या रूपाने अनुभवते आणि अनेकदा नव्याने आविष्कृत करते. म्हणूनच ह्या प्राक्कथांचे नवे अन्वयार्थ आजही कलाकारांना खुणावत राहतात.

मिथ आणि साहित्य यांचे साहचर्य लक्षात घेऊन नॉर्थ्रोप फ्राय या समीक्षकाने साहित्यगत आदिबंधासंदर्भात एक नवा सिद्धांत मांडला. आपल्या 'ॲनोटोमी ऑफ क्रिटिसिझम' या ग्रंथात त्याची शास्त्रशुद्ध मांडणी केली. मानवाच्या जीवनातील जन्म-तारुण्य, प्रौढत्व, वृद्धत्व आणि मरण या चार अवस्था अनुक्रमे वसंत (स्प्रिंग), उन्हाळा (समर), ऑटम् (शरद किंवा शिशिर), हिवाळा (विंटर) या चार ऋतूंच्या मिथांमधून व्यक्त झालेल्या आढळल्या. या कथांमधून अनुक्रमे सुखात्मिका, रोमान्स, शोकात्मिका व सटायर हे चार साहित्यप्रकार निर्माण झाले असे प्रतिपादन त्याने केले.पुढील आकृतीत त्याचे हे वाङ्मयीन मानवशास्त्राचे (लिटररी अनथ्रोपॉलॉजी) प्रमेय संक्षेपाने दाखविले आहे–

| **दिनचक्र** | **ऋतुचक्र** | **जीवनचक्र** | **मिथ (कथाचक्र)** | **साहित्यप्रकार** |
|---|---|---|---|---|
| उषःकाल | वसंत | जन्म | नायकाची जन्मकथा | रोमान्स |
| मध्यान्ह | ग्रीष्म | लग्न, मिलन, विजय | स्वर्ग प्रवेश - विजयाची कथा | सुखात्मिका |
| सूर्यास्त | हेमंत | मृत्यु | नायकाचा मृत्यु | शोकांतिका |
| रात्र | शरद/ शिशिर | प्रलय | प्रलयाची कथा | सटायर |

साहित्याच्या सर्व प्रकारांचे मूळ 'क्वेस्ट मिथ' / ऋतुकथांमध्ये आहे असे फ्रायचा सिद्धांत सांगतो. अर्थात ह्या सिद्धांताला मर्यादा आहेत. विशेषतः भारतीय संस्कृतीच्या संदर्भात त्यावर आक्षेप घेता येतात. उदा. त्याने शरद ऋतुतून शोकात्मिकेचा जन्म सांगितला आहे. भारतात आपण जिवेत् शरदः शतम् अशा शुभेच्छा देतो. इथे शरद ऋतू आणि शोकात्मिका अशी सांगड घालता येत नाही. फारतर शिशिराचा संबंध मृत्युशी जोडता येईल. तसेच भारतीय संस्कृतीत 'शोकात्मिका' हा नाट्यप्रकार मानण्यात आलेला नाही हेही लक्षात घेण्यासारखे आहे.

विविध अभ्यासकांच्या ह्या प्रयत्नातून आदिबंधात्मक समीक्षेचा विकास होऊन साहित्यापासून ते धार्मिक विधींपर्यन्त अनेक गोष्टींच्या आकलनासाठी ती उपयुक्त ठरलेली दिसते. असे असले तरी ती समीक्षेचे फार मोठे क्षेत्र व्यापू शकली नाही. ह्याचे कारण तिच्या मर्यादा तिच्या स्वरूपातच सामावलेल्या आहेत. त्याही समजून घेऊ.

**आपली प्रगती तपासा**

१) आदिबंध म्हणजे काय? मुखवटा आणि छाया हे आदिबंध स्पष्ट करा.

----------------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------------

## १.१४ समारोप

आदिबंधात्मक साहित्य हा अचेतन मनाचा अहंशी संबंध येऊन लेखकाच्याही नकळत त्याच्या साहित्यात होणारा गूढ आविष्कार आहे. तो आविष्कार उत्स्फूर्त आहे. सर्जनशील मनाची ती झपूर्झा अवस्था आहे. तिचा आस्वादही वाचकाला अचेतनाशी जोडून समग्रतेचा अनुभव देणारा आहे, किंबहुना ही समीक्षा पद्धती मूलतः अनुभवनिष्ठ आणि आस्वादक आहे. साहित्यकृतीचा अनुभव सामूहिक नेणीवेचा अनुभव देणारा आहे का, हीच त्याची कसोटी आहे. आदिबंधात्मक समीक्षेचे क्षेत्र मर्यादित आहे हे आपण पहिलेच. ती सरसकट प्रत्येक साहित्यकृतीसाठी वापरता येत नाही. तसेच कलाकारही आदिबंधात्मक आशयाचा ठरवून आविष्कार करू शकत नाही. तो त्याच्या अचेतनचा आविष्कार असल्याने त्याच्या नकळतच त्याची निर्मिती होते, त्यामुळे मानसशास्त्रीय विश्लेषणास वाव देणाऱ्या साहित्यकृतींची निर्मिती करण्याचा जसा प्रयत्न लेखकांनी केला तसा इथे संभवत नाही. आज बाहुबली सारखा महाचित्रपट निर्माण करताना त्याला आदिबंधात्मक स्वरूप देण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न दिसतो. डिस्ने लहान मुलांसाठी चित्रपट तयार करताना त्यात असाच प्रयत्न करते कारण लहान मुलांचे भावविश्व आणि परिकथा ह्या अचेतनाला अधिक जवळ असतात. पण असे प्रयत्न दृश्य माध्यमात अधिक शक्य आहेत. त्यामुळे आदिबंधात्मक समीक्षेचा मोठा प्रवाह निर्माण झालेला दिसत नाही. अर्थात दैवत शास्त्र, विधी, मिथ, लोकसाहित्य याच्या अर्थनिर्णयात आणि तुलनात्मक अभ्यासात मात्र ही पद्धती नक्कीच मौलिक भूमिका बजावते. साहित्यकृतीबाबत अनेकदा 'साक्षात्कारी' साहित्यकृतींचे मूल्यमापन मात्र ह्या पद्धतीच्या उपयोजनाशिवाय पूर्णत्वास जाणार नाही हे खरे आहे.

## १.१५ संदर्भ ग्रंथ सूची

Bodkin, M. (1951). *Archetypal patterns in Poetry.* London : Oxford.

इत्यादी, प. ग. (२००१). *वाङमयीन संज्ञा संकल्पना कोश.* मुंबई : ग रा भटकळ फाउंडेशन.

कुलकर्णी, ग. म. (१९८२). *नवसमीक्षा - काही विचारप्रवाह.* पुणे : मेहता पब्लिशिंग हाऊस.

ढेरे, अ. (१९८६). आदिबंध आणि स्वातंत्र्योत्तर मराठी कथा कादंबरी. पुणे : Savitribai Phule Pune University. Retrieved from https://www.google.com/url?sa=t&rct=j&q=&esrc=s&source=web&cd=&cad=rja&uact=8&ved=2ahUKEwjciPzMvNTwAhXK4jgGHcV4DCAQFjAAegQIshodhganga.inflibnet.ac.in: http://hdl.handle.net/10603/156278

ढेरे, र. च. (१९७८). *लज्जागौरी.* पुणे : श्रीविद्या प्रकाशन.


पाटील, ग. (१९७५). *सुहृदगाथा.* पुणे : कॉन्टिनेन्टल प्रकाशन.

पाटील, ग. (१९८१). *समीक्षेची नवी रुपे.* मुंबई : मॅजेस्टिक प्रकाशन.

पाटील, म. स. (१९८९). *आदिबंधात्मक समीक्षा.* पुणे : नीहारा प्रकाशन.

पाध्ये, प. (१९७७). *आस्वाद.* मुंबई : मॅजेस्टिक.

भागवत, द. (१९५६). *लोकसाहित्याची रूपरेखा.* मुंबई : मुंबई ग्रंथ संग्रहालय.


This Photo by Unknown Author is licensed under CC BY-SA-NC

## १.१६ नमुना प्रश्नमंच

### अ) दीर्घोत्तरी प्रश्न

१. युंगने सांगितलेले सायकीचे तीन स्तर कोणते ?

२. आदिबंध म्हणजे काय ते स्पष्ट करा.

३. मुखवटा आणि छाया हे आदिबंध स्पष्ट करा.

४. अनिमा आणि ॲनिमस म्हणजे काय ते स्पष्ट करा.

५. द्विविध स्वरूपाचा मातेचा अनुबंध स्पष्ट करा.

६. लोकसाहित्य आणि आदिबंध यांचा अन्योन्य संबंध स्पष्ट करा.

७. आदिबंधात्मक समीक्षेच्या विकासाला आकार देणाऱ्या महत्त्वाच्या अभ्यासकांच्या कार्याचा आढावा घ्या.

८. वीरनायक आणि संबंधित इतर आदिबंध स्पष्ट करा.

### ब) टीपा लिहा

१. आदिबंध आणि तुलनात्मक आमनवंशशास्त्र

२. लोकसाहित्य आणि आदिबंध

३. स्वात्मसाधनेची प्रक्रिया

४. मुखवटा अणि छाया

### क) एका वाक्यात उत्तरे लिहा

१. आदिबंधाची संकल्पना कोणत्या मानसशास्त्रज्ञाने मांडली?

२. सिग्मन फ्रॉईड यांनी कशाचा विचार मांडला?

३. 'द गोल्डन बाऊ' हा महाकाय ग्रंथाचे रचिते कोण आहेत?

४. "पुरुषाच्या मनात जशी स्त्री-प्रतिमा असते, त्याचप्रमाणे स्त्रीच्या मनात पुरुष पुरुषत्वाचे सनातन अंग असते" त्यास काय म्हणतात?

५. 'मन' या कल्पनेसाठी युंग कोणता शब्द वापरतो?

❖❖❖

# २

# समाजशास्त्रीय समीक्षा पद्धती

**घटक रचना**


२.१ उद्दिष्ट्ये

२.२ प्रास्ताविक

२.३ विषय विवेचन

- २.३.१ समाज : संकल्पना व स्वरूप
- २.३.२ समाजाची लक्षणे
- २.३.३ संस्कृती : संकल्पना व स्वरूप
- २.३.४ मानवी संस्कृतीचे दोन भाग
- २.३.५ साहित्य, समाज आणि संस्कृती अनोन्य संबंध
- २.३.६ समाजशास्त्रीय समीक्षा पद्धती : संकल्पना व स्वरूप
- २.३.७ हिपोलिट तेनचा 'त्रिमिती सिद्धांत'
- २.३.८ मार्क्सचा 'पाया आणि इमला' सिद्धांत
- २.३.९ समाजशास्त्रीय समीक्षेची वैशिष्ट्ये
- २.३.१० समाजशास्त्रीय समीक्षेचे घटक
- २.३.११ साहित्याच्या समाजशास्त्रीय अभ्यासाची व्याप्ती
- २.३.१२ समाजशास्त्रीय समीक्षा पद्धतीच्या मर्यादा
- २.३.१३ मराठीतील समाजशास्त्रीय समीक्षा

२.४. समारोप

२.५. संदर्भ ग्रंथ सूची

२.६. नमुना प्रश्नसंच


munotes.in

## २.१ उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अध्ययनानंतर

१. समाज म्हणजे काय ? समाजाची लक्षणे कोणती ? याची ओळख होईल.

२. मानवी संस्कृतीचे स्वरूप लक्षात येईल.

३. साहित्य, समाज आणि संस्कृती यातील अन्योन्य संबंध समजून घेता येईल.

४. समाजशास्त्रीय समीक्षा पद्धतीची ओळख होईल.

५. साहित्याचे माध्यम असणारी भाषा ही सुद्धा एक सामाजिक वस्तू असल्याचे स्पष्ट होईल.

६. लेखकाच्या व्यक्तिमत्त्वातील सामाजिक रंगांचा शोध घेणे शक्य होईल.

७. तेन आणि मार्क्स यांचे सिद्धांत समजून घेता येतील.

८. समाजशास्त्रीय समीक्षा पद्धतीची वैशिष्ट्ये व मर्यादा लक्षात येतील.

९. मराठीतील समाजशास्त्रीय समीक्षेचे स्वरूप समजून घेता येईल.

## २.२ प्रास्ताविक

प्रस्तुत प्रकरणात आपणास समाजशास्त्रीय समीक्षा पद्धतीचा सविस्तर विचार करावयाचा आहे. त्यादृष्टीने सर्वप्रथम समाज, समाजाची लक्षणे, मानवी संस्कृती, साहित्य, समाज आणि संस्कृती यांच्या परस्परसंबंधांची माहिती करून घेणे आवश्यक आहे. तसेच समाजशास्त्रीय समीक्षेची संकल्पना व स्वरूप, समाजशास्त्रीय घटक, तेनचा त्रिमिती सिद्धांत, मार्क्सचा पाया आणि इमला सिद्धांत, समाजशास्त्रीय समीक्षेची वैशिष्ट्ये आणि मर्यादा, मार्क्सवादी समीक्षा आणि समाजशास्त्रीय समीक्षेतील फरक, मराठीतील समाजशास्त्रीय समीक्षेचा आढावा या मुद्यांचे विश्लेषण करावे लागणार आहे.

दैनंदिन व्यवहारात ‘समाज’ हा शब्द अतिशय ढोबळ व संकुचित अर्थाने वापरला जातो. देशवाचक, समूहवाचक, धर्मवाचक वगैरे अर्थाने हा शब्द व्यावहारिक भाषेत वापरला जातो. परंतु त्यापेक्षा निराळा असा समाजशास्त्रीय अर्थ या संकल्पनेमागे आहे. एक सामाजिक व्यवस्था या अर्थाने समाज ही संकल्पना समाजशास्त्रात वापरली जाते. समाज म्हणजे परस्पराशी आंतरक्रिया करणाऱ्या व्यक्ती आणि समूहाची मिळून तयार झालेली एक व्यापक संघटना होय. लोकसंख्या, प्रदेश, प्रजोत्पादन आणि संस्कृती ही या समाजाची लक्षणे होत.

munotes.in

प्राण्यांना केवळ जैविक परंपरा असते. माणसांना सामाजिक, सांस्कृतिक परंपरा असते. त्यामुळे मानवी वर्तन व्यवहारावर सामाजिक प्रभाव आणि नियंत्रण पाहायला मिळते. सामाजिकरणाची ही प्रक्रिया मानवामध्ये लहानपणापासूनच सुरू झालेली आढळते. सहवासातून संस्कारीत झालेल्या मानवी संस्कृतीचे भौतिक संस्कृती व अध्यात्मिक संस्कृती असे दोन भाग पडलेली दिसतात.

साहित्य हा मानवी समाजाच्या जीवनातील एक महत्त्वपूर्ण सांस्कृतिक उपक्रम आहे. म्हणून समाज, संस्कृती आणि साहित्य यांचा अन्योन्य असा संबंध असतो. या परस्पर संबंधाला सर्वप्रथम माराम स्ताइल या फ्रेंच महिलेने अधोरेखित केले. त्यानंतर 'साहित्य ही समाजाचे अभिव्यक्ती आहे' असा विचार लुई डी बोनाल्ड यांनी मांडला आणि साहित्याच्या समाजशास्त्रीय अभ्यासाला वेगळी दिशा प्राप्त झाली.

साहित्यनिर्मिती ही व्यक्तिगत नव्हे तर सामाजिक घटना आहे. व्यक्ती स्वकालाशी, स्वकालीन सामाजिक - सांस्कृतिक जडणघडणीशी कमी जास्त प्रमाणात जोडली गेल्याचे दिसते. साहित्यकृतीचे रसग्रहण, मूल्यमापन, उपयोजन इत्यादी गोष्टीही समाजाशी निगडित असतात. साहित्य व्यवहारावर समाजाचे नियंत्रण येते. साहित्याच्या प्रांतात विभिन्न काळात विविध स्वरूपात आकाराला आलेली अभिरुची, ग्रंथनिर्मिती, प्रकाशन, ग्रंथप्रदर्शन यावर उमटलेल्या प्रतिक्रिया जाणून घेतानाही समाजशास्त्रीय समीक्षेचा उपयोग होतो. एकूण साहित्यातील सामाजिकता शोधणे हा प्रांत समाजशास्त्रीय समीक्षेचा आहे. साहित्यात येणाऱ्या सर्व घटकांना सामाजिक संदर्भ असतो. त्या दृष्टीने साहित्य व्यवहार हा सामाजिकतेने व्यापला असून समाजशास्त्रीय समीक्षा पद्धतीत त्या अंगाने अभ्यास केला जातो.

साहित्याचे माध्यम असणारी भाषा आणि समाज यांचे नाते दृढ स्वरूपाचे असते. विशिष्ट भाषेशिवाय विशिष्ट जीवनानुभव व्यक्त होणे शक्य नाही. म्हणूनच समाजनिर्मित भाषा ही साहित्याचा मुख्य आधार आहे असे मानता येते. भाषा ज्या समाजात जन्मते ; त्या समाजात लेखकही जन्माला येतो. एक व्यक्ती म्हणून लेखक जा समाज गटात वाढतो त्या समाजाच्या जीवनपद्धतीचा परिणाम त्याच्या जडणघडणीवर होत असतो. त्या दृष्टीने लेखकाच्या व्यक्तिमत्त्वातील सामाजिक अंगांचा शोध घेणे शक्य असते. यावरून साहित्य व समाज यांचा परस्परपूरक, परस्पराश्रयी आणि निकटचा संबंध लक्षात येतो. थोडक्यात साहित्यकृतीच्या आकलन आणि अर्थनिर्णयनासाठी समाजशास्त्रीय समीक्षा पद्धतीचा उपयोग होतो असे म्हणता येते.

## २.३ विषय विवेचन

विद्यार्थी मित्रांनो प्रस्तुत घटकात आपण 'समाजशास्त्रीय समीक्षा पद्धती' सविस्तरपणे समजून घेणार आहोत. अलीकडच्या काळामध्ये वेगवेगळी शास्त्रे आणि कलांच्या आधारे साहित्याचा अभ्यास होऊ

लागला आहे. इतिहास, मनोविज्ञान, मानववंशशास्त्र, समाजशास्त्र आणि विविध भारतीय लोककला यांचा यामध्ये प्रामुख्याने उल्लेख करता येईल. परिणामी अलीकडे साहित्याचा सामाजिक अंगाने अधिक व्यापक व सखोल अभ्यास केला जात आहे. साहित्याचा समाजशास्त्रीय भूमिकेतून अभ्यास करणारी ही पद्धत लवचिक आणि साहित्यगत आशय सामाजिक अंगाने उलगडणारी अशी आहे. साहित्य आणि समाज या दोन्ही संकल्पना मानव्यसापेक्ष आहेत. त्यामुळे त्यांच्यातील दृढ अशा अन्योन्य संबंधांना नाकारता येत नाही. साधारणपणे १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात समाजशास्त्र ही स्वतंत्र ज्ञानशाखा उदयास आली आणि तेव्हापासून साहित्याच्या अभ्यासकांनी समाजशास्त्रीय संकल्पनेचा आधार घेऊन साहित्याचा विचार करायला सुरुवात केली. त्यातूनच 'समाजशास्त्रीय समीक्षा पद्धती' आकाराला आली आहे. त्या अनुषंगानेच सर्वप्रथम समाज आणि संस्कृती या संकल्पना आपण समजून घेणार आहोत.

### २.३.१ समाज : संकल्पना व स्वरूप

**व्याख्या**

१. 'socious' या लॅटिन शब्दापासून सोसायटी हा शब्द तयार झाला असून त्याचा अर्थ संगती (association) सहवास (companionship) असा आहे. 'एकमेकाशी सहकार्य करतात त्या व्यक्तींचा मोठा समूह म्हणजे समाज' असा त्याचा अर्थ होतो.

२. "A society is a group of individuals Involved in persistent social interaction or a large social group sharing the same Spatial or social territory, typically subject to the same political authority and dominant cultural expectations." **(https://en.m.wikipedia.org)**

३. "A large group of people who live together in an organized way, making decisions about how to do things and sharing the work that needs to be done. All the people in a county, or in several similar countries, can be referred to a society." **(https:// dictionary.combridge.org)**

४. **Prof. Right** - "It is a system of relationship that exists among the individuals of the groups." (ही एक अशी नातेसंबंधाची प्रणाली आहे जी गटातील व्यक्तींमध्ये अस्तित्वात आहे.)

५. **Linton** - "Any group of people who have lived and worked together long enough to get themselves organized and to think of themselves as a social unit with well detined limits" (लोकांचे कोणतेही गट ज्यांनी स्वत:पर्यंत संघटित

munotes.in

राहण्यासाठी आणि स्वत:ला एक निश्चित परिभाषित मर्यादेसह सामाजिक एकक म्हणून विचार करण्यासाठी पुरेसे कार्य केले आहे.)

६. **A. W. Green** - "It is the largest group in which individual have relationships" (सर्वात मोठा गट की ज्यात व्यक्तींचे संबंध असतात.)

७. **Maciver** - "It is a Web of social relationship, which is always changing" ( समाज म्हणजे जे नेहमी बदलत असते असे सामाजिक संबंधांचे जाळे होय.)

८. **Adam Smith** - "Society is an artificial device of natural economy."

९. **जॉन्सन** - "विशिष्ट भौगोलिक प्रदेशात स्थायिक झालेल्या लोकांमधील स्थायी, सातत्यपूर्ण व नियमित स्वरूपाच्या परस्परसंबंधाची व्यवस्था म्हणजे समाज होय."

यावरून असे म्हणता येते की शाळा, ऑफीस, कारखाने, क्रीडांगणे इत्यादी ठिकाणी अचानक निर्माण झालेल्या तात्पुरत्या स्वरूपाच्या संबंधांना समाज म्हणता येत नाही. व्यक्तीव्यक्तींमधील सुनिश्चित, स्थायी व पुन्हा पुन्हा दिसणारे संबंधच समाज या संकल्पनेत अभिप्रेत आहेत.

- **'समाज' या संकल्पनेचे स्वरूप**

माणूस हा समाजशील प्राणी आहे. तो समाज करून राहतो. माणसाला जैविक आणि सामाजिक वारसाही लाभलेला असतो. दैनंदिन व्यवहारात मात्र समाज हा शब्द धर्म, जात, वंश, वर्ग, लिंग यासारख्या स्त्री-पुरुषांच्या समुदायासाठी योजना जातो. तो संकुचित व ढोबळ अर्थाचा आहे. रोजच्या बोलण्यातील 'भारतीय समाज', 'हिंदू समाज', 'दलित समाज', 'आर्य समाज' या उदाहरणातील 'समाज' या शब्दापूर्वी लावलेल्या विशेषनामानुसार त्या शब्दाचा अर्थ घेतला जातो. म्हणजे देशवाचक, समूहवाचक, धर्मवाचक वगैरे वेगवेगळ्या अर्थाने 'समाज' हा शब्द वापरला जातो. परंतु इतका मर्यादित अर्थ या शब्दाला नाही. एक 'सामाजिक व्यवस्था' या अर्थाने समाज ही संकल्पना समाजशास्त्रात वापरली जाते. समाज म्हणजे परस्परांशी आंतरक्रिया करणाऱ्या व्यक्ती आणि समूह यांची मिळून बनलेली एक व्यापक संघटना अथवा व्यवस्था होय. सामाजिक आंतरक्रियेमुळेच व्यक्ती आणि समूहात निश्चित स्वरूपाचे सामाजिक संबंध निर्माण झालेले दिसून येतात.

माणसांनी मिळून बनलेला समुदाय म्हणजे समाज असे जरी वाटत असले, तरी केवळ लोकांचा समूह म्हणजे समाज नव्हे. व्यक्ती - व्यक्ती, व्यक्ती - समूह, समूह - समूह यांच्यात स्थिर स्वरूपाचे सामाजिक संबंध आकाराला येऊन त्याची एक स्वतंत्र व्यवस्था अस्तित्वात आल्यावरच त्याला समाज म्हटले जाते. समाजाला स्वतःची संरचना असून तो सातत्यशील

munotes.in

असतो. समाजस्थिती व्यक्तींमध्ये सामाजिक संबंध दृढ झालेले असतात. ते सुटे सुटे नसून ते वस्त्राप्रमाणे एकमेकात गुंतलेले असतात. त्यांना परस्परांची जाणीव असते. परस्परांच्या प्रेरणा, भावना, हेतू, विचार, मूल्ये इत्यादी आंतरिक घटकांचा प्रभाव परस्परांच्या वर्तनावर पडतो. कौटुंबिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, संस्कृती इत्यादी क्षेत्रेही त्यामुळे प्रभावित होतात. त्यातून मित्रत्व किंवा शत्रुत्वपूर्ण संबंधाचा जन्म होतो. थोडक्यात अशा विविध प्रकारच्या सामाजिक संबंधांनी 'समाज' आकाराला येतो.

समाजस्थित व्यक्तींच्या आंतरक्रिया या रूढी, परंपरा, चालीरीती, मूल्ये, संकेत यांच्या आधाराने घडत असतात. व्यक्तीच्या या जीवन जगण्याच्या पद्धतीतीला समाजाची संस्कृती म्हटले जाते. समाज आणि संस्कृती एकमेकाला पूरक आहेत म्हणूनच त्यांना एकाच नाण्याच्या दोन बाजू म्हटले जाते. थोडक्यात संस्कृतीमुळे समाज टिकतो तर समाजामुळे संस्कृती रुजते असे म्हणता येते.

अनेक लहान मोठ्या समूह, उपसमूहांनी मिळून समाज बनतो. त्यात कुटुंब, अर्थ, धर्म, शिक्षण यासारख्या अनेक सामाजिक संस्थांचा अंतर्भाव असतो. समाजाच्या विविध प्रकारच्या गरजांची पूर्तता करण्याचे काम या यंत्रणांना करावे लागते. समाजात व्यक्ती जन्माला येतात आणि मृत्यू पावतात. परंतु समाज मात्र पिढ्यानपिढ्या टिकून राहतो. प्रत्येक समाजातील लोकांत एकतेची भावना प्रबळ असते. या संघटित भावनेमुळे समाजाचे स्वतंत्र अस्तित्व टिकवून ठेवण्यास मदत होते. अशा या व्यापक आणि प्रवाही स्वरूपाच्या समाज या संकल्पनेची सर्वसमावेशक व्याख्या करणे कठीण आहे. अभ्यासाच्या सोयीसाठी काही समाजशास्त्रज्ञांनी केलेल्या व्याख्यांचा विचार करता येईल.

munotes.in

### २.३.२ समाजाची लक्षणे

हॅरी जॉन्सन या समाजशास्त्रज्ञाने समाजाची जी चार लक्षणे अथवा वैशिष्ट्ये सांगितली आहेत ती पुढीलप्रमाणे आहेत.

१. **विशिष्ट भूप्रदेश -** भारतीय समाज, अमेरिकन समाज म्हंटल्यावर त्या त्या प्रदेशाच्या भौगोलिक सीमा लक्षात येतात. शिवाय विशिष्ट प्रदेशात स्थायिक झालेल्या मानवी समूहाला तेथील भौगोलिक परिस्थितीला अनुरूप जीवन जगावे लागते. त्या दृष्टीने विशिष्ट भूप्रदेश हे जॉन्सनने सांगितलेले समाजाचे वैशिष्ट्य महत्त्वाचे ठरते.

२. **प्रजोत्पादन -** समाजाचे अस्तित्व टिकून राहण्यासाठी स्त्री-पुरुष संबंधाद्वारे प्रजोत्पादन होणे आवश्यक ठरते. प्रजोत्पादनाद्वारे लोकसंख्येची वृद्धी होते आणि प्रत्येक मानवी समूहाला या लोकसंख्येची सतत गरज भासते.

३. **संस्कृती** - माणसाची वैशिष्ट्यपूर्ण जीवन जगण्याची पद्धती म्हणजे संस्कृती होय. प्राप्त परिस्थितीशी जुळवून घेताना आलेले अनुभव, मिळालेले ज्ञान, साकारलेल्या भौतिक गोष्टी, मूल्ये या सर्वांचा समावेश संस्कृतीमध्ये होतो. अर्थात या सर्व गोष्टीतील भिन्नतेमुळे प्रत्येक मानव समूहाची संस्कृती देखील भिन्न असू शकते.

४. **स्वतंत्रता** - एक मानवी समूह दुसऱ्यापासून वेगळा असतो, स्वतंत्र असतो. समग्र समाज म्हणजेच व्यापक असा मानवी समूह होय. या मोठ्या मानवी समूहातच लहान लहान उपसमूह सामावलेले असतात. मोठ्या समूहाची जशी संस्कृती असते, तशी प्रत्येक उपसमूहाची देखील स्वतंत्र संस्कृती असते. उदा. आदिवासी आणि भटके-विमुक्त हे दोन उपसमूह असून ते दोन्ही उपसमूह एकमेकापासून स्वतंत्र आहेत.

अशाप्रकारे समाजाचे स्वरूप व संकल्पना समजून घेतल्यानंतर संस्कृती या घटकाचा सविस्तर परिचय करून घेता येईल.

### २.३.३ संस्कृती : संकल्पना व स्वरूप

**व्याख्या**

१. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** - "मनुष्य व्यक्तिश: व समुदायश: जी जीवनपद्धती निर्माण करतो आणि जीवनसाफल्यार्थ स्वतःवर व बाह्य विश्वावर संस्कार करून जे आविष्कार करतो ती पद्धती वा तो आविष्कार म्हणजे संस्कृती होय."

२. **इरावती कर्वे** - "संस्कार पूर्ण व संस्कारमय जीवन जगण्याची देशकालविशिष्ट रीत (जीवनपद्धती व जीवनमूल्ये) म्हणजे संस्कृती."

३. **प्रा. क्रेच** - "एखाद्या समाजाने आपल्या लोकांचे जीवनविषयक प्रश्न सोडविण्यासाठी जी एक विशिष्ट वस्तुरूप व वर्तनरूप परंपरा निर्माण केलेली असते तिला संस्कृती म्हणतात. आपला एक घाट असतो. एखाद्या समाजाने निर्माण केलेल्या विविध संस्था व त्यात ध्वनित झालेल्या त्या समाजाच्या समजुती, मूल्ये, मानदंड व जीवनविषयक गृहीतके यांचा संस्कृतीमध्ये अंतर्भाव होतो."

४. **Taylor** - "Culture or Civilization is that complex whole which includes knowledge belief, art, morals, law, customs and any other capabilities and habits acquired by man as a member of society."

५. **एडवर्ड टायलर** - "समाजाचा सदस्य या नात्याने समाजात राहून माणसाने हस्तगत केलेले ज्ञान, विज्ञान आणि कला; त्यांच्या जोरावर परिस्थितीशी समायोजन करून मिळवलेले कौशल्य व क्षमता तसेच नीतिमत्ता, कायदा, रूढी यांना अनुसरून केले जाणारे वर्तन यांचा संच म्हणजे संस्कृती."

हॅरी जॉन्सनने समाजाची जी चार लक्षणे सांगितली आहेत त्यातील 'संस्कृती' हे अत्यंत महत्त्वाचे लक्षण आहे हे वरील व्याख्यांवरुन स्पष्ट होते. अशा या संस्कृती शब्दाची नेमकी व्याख्या करणे कठीण आहे. दैनंदिन जीवनात हा शब्द अतिपरिचयाचा झाला असला तरी व्यवहारात मात्र तो एकाच अर्थाने वापरला जात नाही. अतिशय साध्या शब्दात सांगायचे तर 'प्रकृती म्हणजे निसर्ग. विकृती म्हणजे निसर्गात होणारे विकार आणि संस्कृती म्हणजे प्रकृतीत विकार होऊ नये म्हणून त्यावर करायचा संस्कार.'

'संस्कृती' या शब्दाला अतिशय जीवनव्यापी अर्थ आहे. मात्र प्रादेशिक, धार्मिक, वांशिक, जातीय, प्रांतीय इत्यादी दृष्टीने तो मर्यादित केल्याचे आढळते. घराण्याची संस्कृती, पुणेरी संस्कृती, आदिवासी संस्कृती, भारतीय - युरोपीय संस्कृती, हिंदू - इस्लामी संस्कृती या सारख्या उदाहरणांनी 'संस्कृती' या शब्दाला मर्यादित व संकुचित अर्थ प्राप्त झाल्याचे लक्षात येते. याशिवाय संस्कृतीचे प्राचीन, मध्ययुगीन, अर्वाचीन असे कालिक भेदही निर्माण झाल्याची निदर्शनाला येते. अशाप्रकारे विविध दृष्टिकोनातून 'संस्कृती' या शब्दाकडे पाहिले जाते. व्यवहारात त्या अर्थाने उपयोग केला जातो. त्यामुळे 'संस्कृती' या शब्दाचा अर्थ निश्चित करणे अशक्य होते.

'संस्कृती' हे मानवाचे खास वैशिष्ट्य आहे. पशुपक्ष्यांचे जीवन चाकोरीबद्ध असते. त्यात बदल अथवा नवनिर्मितीची शक्यता नसते. पशुपक्ष्यांना नैसर्गिक जीवन असते मात्र ते निसर्गाचा उत्पादनसाधन म्हणून उपयोग करू शकत नाहीत. त्यांच्यावर जे अत्यल्प संस्कार झालेले असतात तेही नैसर्गिकच असतात. निसर्गाशी समायोजन साधून त्यांना जगावे लागते. मात्र मनुष्य याच सृष्टीत बदल घडू शकतो. मातापित्यांच्या छत्राखाली मनुष्याचे संरक्षण होते. खाणे-पिणे, बोलणे-वागणे, वस्त्र-अलंकार, आचार-विचार, श्रद्धा-समजुती, सण-उत्सव, व्रत-वैकल्ये, रूढी-परंपरा, पाप-पुण्य तसेच कुटुंब, शिक्षण, भाषा या सामाजिक संस्थांद्वारे माणसावर सातत्याने संस्कार होत असतात. संस्काराच्या या परंपरेला अथवा सामाजिक वारस्यालाच संस्कृती म्हणता येते. निसर्ग, माणसे, समाजसंस्था आणि ईश्वरविषयक कल्पना या चार गोष्टींशी माणसाचा विविध प्रकारे संबंध येतो. त्या सर्व संबंधाचा विचार संस्कृतीमध्ये समाविष्ट असतो.

मनुष्य इंद्रिय सामर्थ्याने ज्ञानाचा संचय करून त्याचे जतन, संवर्धन, संक्रमण करू शकतो. या ज्ञानाच्या आणि शास्त्राच्या जोरावर माणसाने आपले जीवन अधिक सुखी, समृद्ध आणि संपन्न बनविले आहे. सुखी होणे ही संस्कृती निर्माणामागची प्रेरणा असली तरी ती वैयक्तिक नाही, तर सामूहिक आहे. या संस्कृतीचा उपभोग मानवी समाज सामुहिकपणे घेतो. त्यादृष्टीने संस्कृतीही स्थलकालविशिष्ट अशा समाजाची असते. म्हणून तर संस्कृतीला कोणत्याही मानव समाजाने निर्माण केलेली 'देशकालविशिष्ट जीवनपद्धती' म्हणतात. जगभरात अनेक लहान-मोठे समाज अस्तित्वात असल्याने संस्कृती वैचित्र्यही मान्य करावे लागते.

### २.३.४ मानवी संस्कृतीची दोन अंगे

समाजाप्रमाणे संस्कृतीसुद्धा विकसनशील आणि विस्तारशील असते. अशा या संस्कृतीचे विल्यम ऑगबर्ग याने दोन भाग सांगितले आहेत.

**१. भौतिक संस्कृती -**

माणसाने निर्माण केलेले पदार्थमय जग हे संस्कृतीचे भौतिक अंग होय. आपले जीवन सुखी व्हावे यासाठी माणसाने अनेक गोष्टी तयार केल्या आहेत. उदा. हत्यारे, अवजारे, यंत्रे, रस्ते, वस्त्रे, वाहने, वीज, घरे, औषधे, शेती, भांडी, दागिने, करमणूक साधने या गोष्टींचा समावेश भौतिक संस्कृतीत करता येतो. या सुखसोयींनी मानवी जीवन समृद्ध व संपन्न झाले आहे. मानवी समाजाच्या डोळ्यांना दिसणाऱ्या या वस्तुरूप निर्मितीला भौतिक संस्कृती म्हणता येते. निसर्गात मानवी क्रियेने बदल घडून आल्यामुळे भौतिक संस्कृती आकाराला येते.

**२. अध्यात्मिक संस्कृती -**

माणसाच्या अंतःकरणातील स्वाभाविक सुखवासना व स्वार्थबुद्धी आणि तजन्य दुर्गुण (मत्सर, द्वेष, आळस, कौर्य इ.) यांना नियंत्रित करण्यासाठी वा त्यावर विजय मिळवण्यासाठी माणसांनी निर्माण केलेल्या पाप-पुण्य, स्वर्ग-नरकदी धर्मकल्पना, नीतिनियम, कायदे-कानून, विद्या - कला - साहित्य - तत्वज्ञान आणि शिष्टाचार इत्यादी मानवनिर्मित कल्पनामय जग हे संस्कृतीचे अध्यात्मिक अंग होय. समाजातील चालीरीती, आचार, परंपरा, सामाजिक संस्था, समजुती, श्रद्धा, मूल्ये, निष्ठा व मानदंड या साऱ्यांचा समावेश संस्कृतीच्या अध्यात्मिक अंगामध्ये होतो. यासंदर्भात समाजशास्त्रीय अंगाने आपली भूमिका मांडताना तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात की, " ज्या मानवी क्रियेत मानवी निसर्गावर म्हणजे आत्म्यावर ( वैदिक रूढीप्रमाणे आत्मा या शब्दाने स्थूल शरीर, इंद्रिये, मन व ज्ञानशक्ती यांचा बोध होतो.) संस्कार करून बदल करण्यास प्राधान्य देते त्यास 'अध्यात्मिक संस्कृती' म्हणण्याची प्रथा आहे."

भौतिक अंगाने सुख-समृद्धी येऊन सुधारणा होते, तर आध्यात्मिक संस्कृतीमुळे मानसिक उन्नती होते. थोडक्यात या दोन्हीमुळे मानवी जीवन परिपूर्ण होत असते. विशिष्ट सामाजिक सांस्कृतिक संदर्भांनी युक्त प्रतीके, प्रतिमा, वाक्प्रचार, परंपरासंचित, पुराणकथा इत्यादी त्या त्या समाजाचे आणि समाजस्थिती लेखक - कलावंताच्या भावविश्वाचे भरण-पोषण करतात. त्यांच्या सानिध्यातच साहित्यिकाची वाढ होत असते. भावभावना, कल्पना, विचार आणि संकल्पना यांच्या सहाय्याने जीवनाचा वेध घेणे. त्यातून प्राप्त झालेल्या जीवनार्थाला, अनुभवाला आकार देणे हे लेखक कलावंताचे कार्य असून त्यासाठी संस्कृतिसंचित उपयोगी पडते. कलावंताच्या रसरूपगंधात्मक

अनुभूतीला व त्या त्या काळातील सांस्कृतिक परंपरांमुळे विशिष्ट दिशा लाभते. बालगंधर्व आणि बालगंधर्वकालीन मराठी नाट्यसंगीताची परंपरा हे याचे उत्तम उदाहरण आहे.

समाजशास्त्रीय समीक्षा साहित्य निर्मितीमागील सामाजिक-सांस्कृतिक धारणांचा, तत्त्वप्रणालींचा मागोवा घेते. सामाजिक सांस्कृतिक जीवनातील यज्ञकल्पना, भक्तियोग, राष्ट्रप्रेम, लोकशाही, व्यक्तिस्वातंत्र्य यासारख्या तत्त्वप्रणालींनी साहित्यनिर्मितीच्या आशयावर आणि अभिव्यक्तीवर कोणते परिणाम केले, त्याचा अभ्यास समाजशास्त्रीय समीक्षा पद्धतीद्वारे केला जातो.

### २.३.५ साहित्य, समाज आणि संस्कृती अन्योन्य संबंध

साहित्य, समाज आणि संस्कृती यांच्यातील संबंध हे अन्योन्य स्वरूपाचे असतात, असे हरी लेव्हिन यांनी म्हटले आहे. साहित्य हे केवळ सामाजिक, सांस्कृतिक कारणांचा परिणाम नसते, तर ते सामाजिक, सांस्कृतिक परिणामांचे कारणही असते. अनेकवेळा साहित्य, समाज आणि संस्कृती यांच्या परस्पराश्रयी आणि परस्परपूरक संबंधांची चर्चा संकुचित आणि वरवरची केली जाते. एखाद्या विशिष्ट सामाजिक परिस्थितीचा किंवा विशिष्ट आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय प्रणालीचा निर्देश करून साहित्य आणि समाजाच्या संबंधाचे परीक्षण करण्याचा प्रयत्न केला जातो. 'साहित्य म्हणजे समाजाची अभिव्यक्ती' या द बोनाल्डच्या विधानाने या अन्योन्य नात्याची चर्चा सुरू झालेली असली तरी हा विचार सर्वसाधारण वाटतो. 'साहित्य हा समाजाचा आरसा असतो' हा गृहीत विचार तर ठोकळेबाज वाटतो. म्हणूनच या ठिकाणी मोघम विचार मांडण्यापेक्षा साहित्य, समाज आणि संस्कृती यांच्यातील अन्योन्य संबंधाचा शोध घेणे महत्त्वाचे ठरते.

साहित्य हे केवळ सामाजिक परिस्थितीचे अपत्य असत नाही तर साहित्याचाही सामाजिक परिस्थितीवर परिणाम होत असतो, असाही एक महत्त्वपूर्ण दृष्टिकोण मांडला जातो. विचारवंतांच्या मते 'साहित्य केवळ सामाजिक परिस्थितीची फलनिष्पत्ती नसते, तर विशिष्ट सामाजिक प्रवाहांना विचारसरणीला जन्म द्यायला ते कारणीभूत ठरू शकते.' उदा. आंग्लकालखंडापासून ते टिळक, आगरकरांपर्यंतच्या समाजसुधारकांनी, लेखकांनी सामाजिक सुधारणेसाठी जे बहुमूल्य वैचारिक लेखन केले त्याचा परिणाम म्हणजे महाराष्ट्रात घडून आलेले अमुलाग्र सामाजिक परिवर्तन होय. या दृष्टीने 'साहित्य ही सुद्धा एक सामाजिक संस्था आहे' असे म्हणता येईल. ज्याप्रमाणे विविध सामाजिक संस्था लोककल्याणासाठी कार्यरत असतात त्याप्रमाणे साहित्यातूनही समाजाचे प्रश्न, समस्या मांडल्या जातात व व्यापक प्रमाणावर समाजदर्शन घडविले जाते.

भाषा ही समाजाची निर्मिती आहे तर साहित्य हे भाषेचे माध्यम म्हणून वापर करते. या अनुषंगाने विचार करता 'भाषा ही एक सामाजिक वस्तू' असल्याचे स्पष्ट होते. या संदर्भात प्रा शरच्चंद्र मुक्तिबोध म्हणतात, "ध्वनींना प्राप्त होणारा अर्थ समाज देत असतो, तो ध्वनींच्या गुणधर्म नव्हे. ... भाषा ही

व्यक्तीच्या नव्हे तर समाजाच्या आयुष्यात तयार होत असते." या विचारावरून असे मत व्यक्त करता येते की, भाषेची निर्मिती सामाजिक असून संदेशाची देवाणघेवाण आणि मानवी विचारप्रक्रिया यासाठी भाषेची आवश्यकता असते. या मानवी विचार प्रक्रियेतूनच धर्म, न्याय, नीती, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, साहित्य, कला आदी समाजप्रणित क्षेत्रे विस्तारली आहेत. शब्द, अर्थ, वाक्यरचना, रूपके, प्रतीके या सर्वांना समाजाच्या संदर्भात सार्वत्रिक समाजमान्यता मिळालेली असते. म्हणूनच समाजाचे माध्यम असणारी भाषा आणि समाज व त्याची जीवनपद्धती यांचे दृढ स्वरूपाचे नातेसंबंध तयार झालेले असतात. विशिष्ठ भाषेशिवाय विशिष्ट जीवनानुभव व्यक्त होणे शक्य नाही. म्हणूनच साहित्य, कलांचा भाषा हा एक मुख्य आधार आहे असे म्हणता येते. उदा. बहिणाबाईंच्या अनुभवकथनाला खानदेशी - अहिराणी बोलीच सर्वार्थाने योग्य असल्याचे लक्षात येते. तसेच नवनिर्माणक्षम साहित्यिकाने आपल्या अनुभूतीच्या आधारे नवनिर्मिती केली असली तरी त्या सर्व प्रक्रियेला सामाजिक वास्तवाचा आधार असतो. साहित्यिक हा समाजाचा एक घटक असल्याने समाजात घडणाऱ्या सर्व घटनांचा कळत-नकळत पडसाद त्यांच्या साहित्यात उमटणे हे अपरिहार्य ठरते. साहित्यिक आपल्या मनःपटलावर उमटलेल्या घडामोडींना प्रतिभेच्या साहाय्याने स्वभाषेत आविष्कृत करतो. साहित्यिकाची साहित्यनिर्मिती ही समाज जीवनाचा एक भाग असून लेखक त्या अनुषंगानेच 'सामाजिक आशय' प्रकट करीत असतो.

लेखकाच्या सामाजिकतेचा अभ्यास केवळ त्याच्या साहित्यरूपावरूनच करता येतो, असे म्हणता येत नाही. अनेकदा तो साहित्यबाह्य अशा चरित्रात्मक कागदपत्रावरूनही करता येतो. कारण लेखक हा एक समाजाचा नागरिक, घटक असतो. अनेक सामाजिक, राजकीय समस्यांवर त्यांने विचारप्रकटन, मतप्रदर्शन केलेले असते. तसेच त्याने समकालीन समस्यांमध्ये भाग घेतलेला असतो. मूलतः लेखक हा निर्मितीक्षम कलावंत असला तरी तो नेहमीच एका विशिष्ट समाजाचा घटक असतो. व्यक्ती आणि समाज यांच्या संबंधाबाबतचे सर्व प्रश्न त्याच्याही बाबतीत उपस्थित होत असतात. त्याच्या कृती उक्तीला नेहमीच एक सामाजिक परिमाण असते. म्हणूनच लेखक आणि समाज या दोहोत असलेला संबंध अमान्य करता येत नाही. त्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत समाजाच्या पारंपरिक संस्कारांचा, मूल्यव्यवस्थेचा, जीवनपद्धतीचा निश्चितच वाटा असतो. म्हणून लेखक ज्या मानवगटाचे, समाजाचे प्रतिनिधित्व करतो, त्याची जीवनपद्धतीच त्याच्या अनुभवाचे संदर्भक्षेत्र असते. लेखकाच्या समाजजीवनातील प्रश्न, समस्या, श्रेय-प्रेय-कल्पना, नीतिमूल्ये इत्यादी विशेषच त्यांच्या लेखनाचे विषय ठरत असतात. लाक्षणिक अर्थाने व्यक्ती म्हणजे लेखक हे निमित्तकारण असते आणि अनुभव हे उपादानकारण असते आणि साहित्यकृती हे रूपात्मककारण असते. आकार किंवा रूप (Form) हा त्या कलाकृतीतच असून साधन आणि माध्यम यांच्याद्वारे तो आकार प्रकट होत असतो. ही प्रक्रिया कुंभाराकडून मातीचा घडा तयार होण्यासारखी आहे. या प्रक्रियेत कुंभार हे निमित्तकारण,

मातीचा गोळा हे उपादानकारण, चाक आणि हात ही साधने आणि गती हे माध्यम असते. साहित्यनिर्मितीत सुद्धा हीच प्रक्रिया अंतर्भूत असते हेच या उदाहरणावरून स्पष्ट होते.

साहित्य ही समाजजीवनातून निर्माण झालेली आणि समाजजीवनाला वळण लावू पाहणारी एक सामाजिक संस्था आहे. लेखक, वाचक आणि समाज ही त्रिसूत्री साहित्याच्या निर्मितीला उपकारक ठरते. जेव्हा एखादी सर्जनशील व्यक्ती समाजजीवनातून प्रेरणा घेऊन समाजाशी संवाद साधण्यासाठी किंवा आत्माभिव्यक्तीसाठी लेखन करते तेव्हा त्या व्यक्तीला लेखक म्हणतात येईल. हा लेखक कितीही प्रतिभावंत असला तरी त्याला आपल्या समाजाचे, काळाचे संदर्भ घेऊन जगावे लागते. वर्गरचना, रूढी-परंपरा, मूल्यव्यवस्था, संस्कार आणि आर्थिक स्तर असे विविध संदर्भ घेऊन जगत असतानाच त्याला आपली नवनिर्मिती जास्तीत जास्त प्रभावी व्हावी यासाठी प्रयत्न करावे लागतात. याकरता तो नवनवीन वाटा शोधत असतो. नवनवीन प्रयोग करत असतो. म्हणजेच विशिष्ट काळातील साहित्याचा निर्माता असलेला लेखक व त्याच्या मनावर त्या विशिष्ट काळात झालेले संस्कार, त्याने स्वीकारलेली जीवनदृष्टी, त्याची शारीरिक आणि मानसिक जडणघडण कोणत्या वातावरणात झाली इत्यादी बाबींचा विचार करावा लागतो. असे असले तरी लेखकांनीही सामाजिक भान ठेवून वाङ्मयीन मूल्ये व जीवनमूल्ये जोपासण्याचा प्रयत्न करणे आवश्यक असते.

साहित्याची विविध प्रयोजने शास्त्रकारांनी सांगितली आहेत. तसेच केवळ रिकामा वेळ घालविण्यासाठी, करमणुकीसाठी, वाचक गुंतून राहावा या हेतूनेही अनेक लेखक लेखन करीत असतात. अशा प्रकारचे लेखन करणाऱ्या लेखकांच्या आणि समाजाच्या वाट्याला काहीच येत नाही. असे लेखन अथवा लेखक समाजजीवनावर कोणताही प्रभाव टाकू शकत नाहीत. सामाजिक प्रश्न, समस्या याबद्दल या लेखकांना कोणतीच आस्था नसल्याने असे लेखन अथवा लेखक सामाजिक परिणाम साधू शकत नाहीत. समाज जीवन प्रभावित करू शकत नाहीत. सर्वच भाषांमध्ये असे काही लेखक आढळतात. या लेखकांनी वरील प्रवृत्तीचा स्वीकार करून आणि सामाजिक बांधिलकी पासून दूर जाऊन आपला लेखन व्यवसाय कसा किफायतशीर होईल याकडे लक्ष दिलेले दिसते. लेखकाने केलेली साहित्याची उपासना आणि संस्कृतीची जोपासना यावर राष्ट्राचे भवितव्य अवलंबून असते. म्हणूनच लेखक आणि त्याची वाङ्मयनिर्मिती ही त्या त्या देशाची अभिमानाची गोष्ट असते. "आम्ही एक वेळ लंडन देऊ, पण आम्ही आमचा सेक्सपियर देणार नाही" असे जे इंग्लंडमध्ये म्हटले जाते त्यात सखोल अर्थ दडला आहे. मराठीमध्ये संत, पंत व तंत यांनी साहित्याची साधना केली आणि मराठी भाषा जिवंत केली, समृद्ध केली. आगरकर-चिपळूणकर यांनी समाजप्रबोधनासाठी लेखणी वापरली. म्हणूनच 'लेखकाच्या लेखणीतून समाजाचे कल्याण साधणारी शाई असली पाहिजे' असे जे म्हटले जाते त्याची सत्ता पटल्याशिवाय राहत नाही.

साहित्याचा समाजशास्त्रीय अंगाने शोध घेत असताना ज्याप्रमाणे लेखक आणि समाज यांच्यातील नात्याचा उलगडा होतो त्याप्रमाणे वाचकाबाबतही विचार करावा लागतो. वाचक हा सुद्धा समाजातीलच एक घटक आहे. वाचक वाचतो ते ज्ञानसंवर्धनासाठी, करमणुकीसाठी किंवा भोवतालच्या जीवनाच्या दगदगीतून पळून जाण्यासाठी. वाचकाच्या अभिरुचीवरून साहित्याचे सामाजिक मूल्येही अजमावता येते. समाजातल्या प्राणवायूवरच वाचक जगत असतो. वाचकाच्या दृष्टीने साहित्याभ्यास करत असताना वाचक कोणत्या सामाजिक परिस्थितीत वाड्मयाचे वाचन करतो हे समजावून घेतले पाहिजे. साहित्य म्हणजे एक प्रकारची देवघेव असते. लेखक आपल्या भावना विचार देत असतो तर वाचक ते घेत असतो. वाचकाचे वय, लिंग, वर्ग, सामाजिक दर्जा, जात यावरून वाचकाची अभिरुची बनत असते. कुणाला रहस्यकथा आवडतात. कुणाला विनोदी साहित्य तर कुणाला दलित साहित्य. कधी कधी एखादा वाचक याची दखलही घेत नाही. यावरून असे म्हणता येते की, प्रत्येक वाचकाची अभिरुची वेगळी असते. वाचकाची बुद्धी, शिक्षण, वातावरण, आर्थिक परिस्थिती, आलेले अनुभव, साहित्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण यावर त्याची वाङ्मयीन अभिरुची अवलंबून असते. सारांश रूपाने असे म्हणता येते की, साहित्याचा समाजशास्त्रीय दृष्टीने विचार करताना वाचकाचाही विचार महत्त्वपूर्ण ठरतो. त्या अनुषंगाने चिकित्सा करता लेखक-वाचक समाज आणि साहित्य यांचाही सहसंबंध तपासणे आवश्यक आहे.

साहित्य समाजात उगवते समाजात फुलते आणि समाजालाच गंध वाहण्यात धन्यता पावते. साहित्यकृती जेवढी समाजसापेक्ष असेल तेवढी ती अधिक चांगली असते. म्हणजेच समाजाशिवाय साहित्य नाही आणि साहित्याशिवाय समाजाचा विकास नाही असे म्हणता येते. समाजातील बदलामुळे साहित्यात बदल होतात आणि अंशात्मक का होईना समाजात बदल घडविण्याचे सामर्थ्य निश्चितच साहित्यात आहे. महाराष्ट्रातील समाज सुधारकांनी प्रबोधनकारांनी समाज जागृती घडवण्यामध्ये जे यश मिळवले ते इथे लक्षात घेण्यासारखे आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, प्रादेशिक साहित्य, आदिवासी साहित्य आणि समाज यांच्या घनिष्ठ संबंधाची येथे कल्पना येते. 'समाजाच्या जाणिवा प्रगल्भ करण्याच्या हेतूने मी लिखाण करतो' असे गंगाधर गाडगीळ म्हणतात, तर समाजाचे प्रबोधन व्हावे या हेतूने आगरकर चिपळूणकरांनी लेखन केल्याचे दिसून येते. समाजातील तळागाळातील व्यक्तींच्या सुख-दुःखाची समाजाला जाणीव करून देणे हे दलित साहित्याचे प्रयोजन मानता येते तर ग्रामीण जीवनातील सुसंगत व विसंगत घटनांचे दर्शन घडविणे हे ग्रामीण साहित्याचे प्रयोजन दिसते. या दृष्टीने साहित्य व समाज यांचा किती अतूट संबंध आहे ते लक्षात येते.अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबऱ्यातील आशय, हरिभाऊंच्या कादंबरीतील सामाजिक भावजीवन, वि. स. खांडेकर यांच्या कादंबऱ्यातील सामाजिक संघर्ष, दलित लेखकांच्या साहित्यातील सामुहिक उद्रेक यावर दृष्टिक्षेप टाकल्यास वरील विधानाची सत्यता पटते.

समाजाच्या तलावातच साहित्याची सुमने फुलतात हे एकदा स्पष्ट झाल्यानंतर साहित्याच्या समाजशास्त्रीय अभ्यासाची गरजही ध्यानात घेणे आवश्यक ठरते. माणूस हा समाजशील, समूहातील प्राणी आहे. समाज जीवनापासून मानवाची आत्मानुभूती वेगळी असू शकत नाही. माणसाला ज्या कल्पनेने, अनुभूतीने जीवनाचा साक्षात्कार होतो तो भोवतालच्या समाजातूनच निर्माण झालेला असतो. म्हणजे साहित्यात जे आहे, जे येते, ते समाजातूनच येते. या दृष्टीने साहित्य आणि समाज यांचे नाते घनिष्ठ असते. कोणत्याही साहित्याची जाण अधिक सुसंगत बनवायची असेल तर साहित्य व्यवहाराचा समाजाशी असलेला निकटचा आणि महत्त्वपूर्ण संबंध नीट समजावून घेणे गरजेचे आहे. साहित्याची निर्मिती ही स्थळकाळबद्ध अशा सामाजिक सांस्कृतिक वातावरणात होत असते. या दृष्टीने साहित्याचा निर्मितीच्या अंगाने समाज व संस्कृतीशी संबंध येत असतो. उदा. मर्ढेकर स्वकालीन औद्योगिक संस्कृतीने निर्माण केलेल्या विविध सामाजिक-सांस्कृतिक समस्यांना दाहकतेने, अंतर्भेदी दृष्टीने थेटपणे भिडतात. यावरून असे दिसते की, समाजव्यवस्थेची प्रकृती आणि प्रवृत्ती ज्याप्रमाणे असेल त्याप्रमाणे सांस्कृतिक परिवर्तन घडतात. या सांस्कृतिक परिवर्तनाचा साहित्य संवेदनेवर परिणाम होतो. इतकेच नव्हे तर सामाजिक व सांस्कृतिक बदलांचा परिणाम केवळ साहित्याच्या आशयावरच होतो असे नाही तर साहित्याच्या अभिव्यक्तीवर आणि तदनुषंगाने साहित्याच्या आकृतिबंधावरही होत असतो.

अशा पद्धतीने साहित्य, समाज आणि संस्कृती यांचा अन्योन्य संबंध स्पष्ट करता येईल. कोणत्याही साहित्याच्या निर्मितीची बीजे जीवनातील वास्तवात असतात आणि जीवनाच्या जडणघडणीत साहित्याचाही वाटा असतो. एवढेच नव्हे तर समाज आणि संस्कृती यांच्या घडणीमध्येही साहित्याचा वाटा असतो. समाजातील वैशिष्ट्यपूर्ण परिस्थितीचा, परिवर्तनाचा, बदलाचा किंवा साचलेपणाचाही परिणाम साहित्यावर होत असतो. असे असले तरी मराठीतील साहित्याची समाजशास्त्रीय अंगाने होणारी समीक्षा अजूनही सर्वकष आणि संपन्न व्हायला हवी असे वाटते.

### २.३.६ समाजशास्त्रीय समीक्षा : संकल्पना व स्वरूप

**व्याख्या**

१. "समाजशास्त्र या ज्ञानशाखेतील मूलभूत ज्ञानाच्या आधारे साहित्य समीक्षेत वापरण्यासाठी नेमक्या समाजशास्त्रीय संकल्पनांची जाणीवपूर्वक निवड करून साहित्याची केलेली समीक्षा म्हणजे समाजशास्त्रीय समीक्षा होय." **(मराठी वाङ्मयकोश, खंड चौथा)**

२. "समाजशास्त्र या ज्ञानशाखेचे मूलभूत ज्ञान मिळवून साहित्य समीक्षेत समाजशास्त्रातील नेमक्या कोणत्या संकल्पना वापरता येतील याची जाणीवपूर्वक निवड करून प्रत्यक्ष

वाङ्मयाच्या संदर्भात त्याचा वापर करणे म्हणजे समाजशास्त्रीय समीक्षा करणे." **(मिलिंद मालशे, अशोक जोशी)**

३. विशिष्ट सामाजिक दृष्टिकोण यांच्या विचारांच्या आधारे साहित्याचे विश्लेषण किंवा समाजाच्या संदर्भात केलेला पद्धतशीर अभ्यास म्हणजे समाजशास्त्रीय समीक्षा पद्धती होय.

- **समाजशास्त्रीय समीक्षा पद्धतीचे स्वरूप**

साहित्याचा सामाजिक अंगाने अभ्यास करणे हे समाजशास्त्रीय समीक्षेचे काम आहे. माणसाच्या वैयक्तिक आणि सामाजिक आयुष्यात खूपच घनिष्ठ नाते असते, हेच गृहीततत्त्व स्वीकारून समाजशास्त्रीय समीक्षा साहित्याचे मूल्यमापन करते. एक कलाकृती म्हणून साहित्यकृतीला समजून घेणे, यापेक्षा समाजविषयक आकलनात भर घालणे हे समाजशास्त्रीय समीक्षा पद्धतीचे उद्दिष्ट आहे. साहित्याचे माध्यम म्हणून लेखकाकडून वापरली जाणारी भाषा समाजात जन्माला आलेली असते. भोवतालचे सामाजिक वास्तव हे साहित्याचे आशयद्रव्य असते. इतकेच नव्हे तर साहित्याची निर्मिती ही सुद्धा सामाजिक व्यवहाराचा एक भाग असते, असे मानून समाजशास्त्रीय समीक्षा वाटचाल करत असते. हिपोलिट तेन या फ्रेंच तत्त्वज्ञाने मांडलेला त्रिमिती सिद्धांत समाजशास्त्रीय समीक्षा पद्धतीचा पाया (Base) आहे. त्या आधाराने साहित्यकृती आणि त्या साहित्यकृतीत प्रतिबिंबित झालेला समाज याची समीक्षा केली जाते. साहित्यकृती ज्या काळात लिहिली जाते तो काळ (द मोमेंट), साहित्यकृती किंवा लेखक ज्या वंशात जन्मतो-वाढतो त्या वंशाच्या विशिष्ट जाणिवेतून (द रेस) आणि आजूबाजूचे समकालीन रीतीरिवाज, सामाजिक पर्यावरण (द मिल्स) यातून जो मानवी स्वभाव घडतो त्याची अभिव्यक्ती साहित्याच्या माध्यमातून होत असते, हे तेनच्या सिद्धांताचे सूत्र आहे. थोडक्यात साहित्य हे निर्मितीकालीन युगधर्माचे, सामाजिक पर्यावरणाचे आणि निर्मात्याच्या वांशिक जाणिवांचे सारांश स्वरूप असते. साहित्यगत आशय, साहित्याची भाषा आणि सौंदर्यतत्त्वे यांच्या मुळाशी समाजभान असते. यावर श्रद्धा ठेवून समाजशास्त्रीय समीक्षा वाटचाल करते. साहित्यकृतीचा केवळ सौंदर्यवादी भूमिकेतून विचार न करता ती व्यापक समाजजीवनाचा आविष्कार आहे, असे समजून समाजशास्त्रीय समीक्षक परीक्षण करतो.

समाजस्थिती भाषा, धर्म, नीतिमूल्ये, तत्त्वज्ञान, ज्ञान-विज्ञान, अर्थकारण, राजकारण, विविध कला, रूढी परंपरा, श्रद्धा समजुती, विधी संस्कार, अन्नपदार्थ, वस्त्रालंकार आणि आचार-विचार आदी सांस्कृतिक व्यवहाराच्या अनुषंगाने साहित्याचा विचार प्रस्तुत समीक्षा पद्धतीत अपेक्षित असतो. साहित्यकृतीमध्ये देश, काळ, परिस्थितीचे प्रतिबिंब पडते, ते नेमकेपणाने ओळखून त्याची मीमांसा करणे हे समाजशास्त्रीय समीक्षेचे मुख्य कार्य असते.

मार्क्सवादी समीक्षा व समाजशास्त्रीय समीक्षा पद्धतीत काही घटक समान असून काही विश्लेषण पद्धती व तत्त्वप्रणाली मार्क्सवादी समीक्षेकडून समाजशास्त्रीय समीक्षेने स्वीकारलेल्या आहेत. मार्क्सवादी समीक्षा आर्थिक संरचनेला पायाभूत मानते आणि समाज व साहित्य यातील संबंधाची चिकित्सा करते. समाजशास्त्रीय समीक्षेत साहित्यनिर्मिती वंश, युग आणि वातावरणाच्या कोणत्या अवस्थेत झाली तसेच कोणत्या नैतिक परिस्थितीत ती लिहिली गेली याचा शोध घेतला जातो. प्रा. दिगंबर पाध्ये यांनीही "साहित्यकृतीला मध्यवर्ती ठेवून मराठीमध्ये जी समाजशास्त्रीय म्हणावी अशी समीक्षा लिहिली गेली त्या समीक्षेला मुख्य संदर्भ मार्क्सवादाचा आहे" असे म्हटले आहे.

थोडक्यात विशिष्ट कालखंडातील साहित्याचा सामाजिक अंगाने शोध घेणे, साहित्यात आविष्कृत झालेली सामाजिक विचारप्रणाली उलगडून दाखवणे यासारख्या गोष्टी समाजशास्त्रीय समीक्षेच्या कक्षेत येतात. प्रा. पाध्ये यांनी या समीक्षा पद्धतीचा नेमका उद्देश स्पष्ट केला आहे. ते म्हणतात, "एखाद्या काळातील समाजाला अभिप्रेत असणारी जीवनविषयक कल्पना, आदर्श जीवनविषयक संकेत, जीवनविषयक त्या समाजाचे भान, समाजजीवनातील सुप्त संघर्ष व सामाजिक बदलाच्या दिशा याचे दर्शन साहित्याद्वारे घेता येते. समीक्षेचे खरे उद्दिष्ट हा असा शोध घेणे हे असते."

साहित्य ही सामाजिक वस्तू (Social Product) आणि सामाजिक शक्ती (Social Force) असते. या अर्थाचे विचार हॅरी इगल्टनने मांडले आहेत. समाजशास्त्रीय समीक्षेमध्ये साहित्याचा एक सामाजिक घटना या दृष्टीने अभ्यास होतो.

- **समाजशास्त्रीय समीक्षा पद्धतीचे प्रकार**

समाजशास्त्रीय समीक्षा पद्धतीच्या माध्यमातून तत्कालीन समाजाची जडणघडण, ज्ञानाचा व्यूह, सांस्कृतिक परंपरा इत्यादींचा अभ्यास केला जातो. हा अभ्यास दोन प्रकारे केला जातो.

**१. समाजलक्ष्यी -**

या प्रकारांमध्ये वेगवेगळ्या काळातील सामाजिक परिस्थितीचा विचार करण्यासाठी, तिचे निदान करण्यासाठी साहित्याचा एक साधन म्हणून उपयोग करतात. साहित्यातील विविध घटकांची चिकित्सा करून त्याचा अर्थ लावून विशिष्ट समाजाविषयी काही निष्कर्ष काढले जातात. हा समाजलक्ष्यी अभ्यास होय.

**२. साहित्यलक्ष्यी -**

या अभ्यासामध्ये साहित्याला, साहित्यकृतीला केंद्रस्थानी ठेवून तिचा समाजाच्या संदर्भात सामाजिक दृष्टिकोनातून अभ्यास केला जातो. साहित्यातील विविध घटक विशिष्ट सामाजिक परिस्थितीत ते कसे प्रभावित होतात, त्याचा येथे विचार होतो.

## २.३.७ हिपोलिट तेनचा 'त्रिमिती सिद्धांत'

फ्रेंच समीक्षक व विचारवंत हिपोलिट तेन (इ.स. १८२८ ते १८६३) याला समाजशास्त्रीय समीक्षा पद्धतीचे जनक मानले जाते. समाजशास्त्रीय दृष्टीने साहित्याचा पद्धतशीर अभ्यास करता येतो हे सांगण्याचा मान तेनकडे जातो. त्याने 'History of English Literature' या ग्रंथाद्वारे साहित्य आणि सामाजिक परिस्थिती यांच्या संबंधाविषयी विवेचन केले आहे. साहित्यकृती ही लेखकाचा वंशवारसा, आजूबाजूची परिस्थिती आणि काळाच्या ओघातील विशिष्ट बिंदू याचा परिपाक होय, असे समीकरण त्याने मांडले. उत्कृष्ट कलाकृती कशामुळे व कधी निर्माण होते याची कारणे सांगताना तेनने वंश (Race), परिस्थिती (Milieu) आणि युगप्रवृत्ती (Moment) या तीन घटकांचा उल्लेख केलेला आहे. साहित्यकृती ही या तीन घटकांचा परिणाम असते, असे सूत्र तो मांडतो. तेनने सांगितलेले हे तिन्ही घटक स्वतंत्र आहेत. म्हणून एखाद्या समाजाच्या साहित्याचा विचार करताना कधी वंश, कधी युगप्रवृत्ती तर कधी परिस्थिती या घटकावर भर देऊन विचार करता येतो. यालाच तेनचा 'त्रिमिती सिद्धांत' म्हणतात. तेनने यासंदर्भात विशिष्ट पद्धतीने शास्त्रीय विवेचन केले असून या संदर्भात त्यांचे योगदान मोठे आहे. आपला सिद्धांत अधिक स्पष्ट करताना तेनने 'Fossil' चा दाखला दिला आहे. Fossil म्हणजे पुरातन काळातील अस्तित्वात असलेल्या एखाद्या प्राण्याचा किंवा वृक्षाचा आज अस्तित्वात असलेला सांगाडा होय. सांगाड्यावरून प्राणी वा वृक्ष्याची कल्पना येते. तसेच साहित्यावरून लेखकाचा शोध घेता येतो, असे तेनने म्हटले आहे. तेनने आपला हा सिद्धांत इंग्रजी साहित्याला लावून दाखवण्याचा प्रयत्नही केला आहे. तेनने सांगितलेले तीन घटक सविस्तरपणे अभ्यासता येतील.

### १. वंश (Race) -

एखाद्या मानवसमूहाला जन्मजात व वारसा म्हणून प्राप्त झालेली वैशिष्ट्ये, स्वभावधर्म, शरीररचना इत्यादीचा तेनप्रणित 'वंश' या संकल्पनेत समावेश होतो. माणसे वेगवेगळ्या परिस्थितीत जीवन जगत असली तरी त्यांच्यावर मूलभूत अशा काही खुणा शिल्लक राहत असतात, असे तेनला वाटते. विशिष्ट प्रदेशातील, वंशातील किंवा युगमानातील व्यक्तींची विचार करण्याची पद्धती, त्यांचे मनोविकार हे विशिष्ट प्रकारचे असतात हे लक्षात घेऊन तेनने अशी कल्पना मांडली आहे. त्या त्या प्रदेशाने, त्या प्रदेशाच्या वैशिष्ट्याने तेथील व्यक्तीची अस्मिता नियत होते असे ते म्हणतो. द.ग.गोडसे यांनी आपल्या 'शक्तीसौष्ठव' ग्रंथात मराठी वृत्ती-प्रवृत्तीचा आणि महाराष्ट्राच्या भौगोलिक वैशिष्ट्यांचा अन्वयार्थ लावण्याचा जो प्रयत्न केला आहे तो या दृष्टीने लक्षात घेता येईल.

munotes.in

## २. परिस्थिती (Milieu)

परिस्थिती या घटकाकडे तेनने अधिक लक्ष दिले आहे. तेनच्या या संकल्पनेत इतर अनेक गोष्टींबरोबर विशिष्ट प्रदेशाचे हवामान, तेथील भूगोल यांना महत्त्वाचे स्थान आहे असे दिगंबर पाध्ये यांना वाटते. तर गो.म. कुलकर्णी यांना Milieu (परिस्थिती) यामध्ये साहित्यिक ज्या काळात वावरला, त्या काळातील एकूण परिस्थिती, पर्यावरण (Environment) अभिप्रेत आहे. माणूस कधीही एकटा नसतो. निसर्ग व इतर माणसे त्याला नेहमी व्यापून राहिलेली असतात. भोवतालची भौतिक व सामाजिक वस्तुस्थिती माणसाची शारीरिक व मानसिक जडणघडण करण्यास कारणीभूत होते. Race ने अनुवंशिकता नियत होते. Milieu ने त्या विशिष्ट दिशेने त्याची प्रवृत्ती-प्रकृती घडते. 'प्राचीन माणूस', 'आधुनिक माणूस' या संज्ञांचा Milieu शी संबंध आहे.

## ३. युगप्रवृत्ती (Moment)

युगप्रवृत्ती या तिसऱ्या घटकांचे स्पष्टीकरण तेनने अतिशय नेमकेपणाने दिले आहे. तो म्हणतो की, 'प्रत्येक युगामध्ये काही प्रभावशाली कल्पना असतात. इतकेच नव्हे तर शतकानुशतके टिकून राहण्याची क्षमता असणारे काही बौद्धिक बंध असतात' त्यादृष्टीने विचार करता माणसाविषयीची विशिष्ट संकल्पनात्मक भूमिका असणाऱ्या कालखंडाला उद्देशून 'युगप्रवृत्ती' म्हणता येईल. युगप्रवृत्ती या घटकात वांङ्मयीन परंपरांचाही समावेश करणे शक्य आहे, असे तेनने सांगितले आहे. वांङ्मयीन परंपरेचे महत्त्व सांगणारा तेन हा पहिला विचारवंत तत्त्वज्ञ होता. मात्र त्याने वांड्मयीन परंपरांकडे फारसे लक्ष दिले नाही. थोडक्यात युगप्रवृत्तीचा धर्म हा वंश आणि पर्यावरणाच्या संयोगातून निर्माण होतो. त्यालाच 'Moment' असे म्हणता येते. स्वातंत्र्यपूर्व काळातील वाङ्मय आणि १९६० नंतरचे वाङ्मय याचा विचार केला तर प्रवृत्तीशी वांङ्मयाचा संबंध असतो हे लक्षात येते.

थोडक्यात उपरोक्त सर्व घटकांच्या सहाय्याने कोणत्याही साहित्यकृतीचे समग्र मूल्यमापन करणे योग्य ठरते. याबाबत दि. के. बेडेकर म्हणतात की, "सामाजिक परिस्थिती व वाङ्मयीन कृतीचा घाट यांचा परस्परसंबंध नसतोच असेही मानता येत नाही. तो संबंध अगदी गणिती पद्धतीने मांडता येईल, असेही नाही. तो संबंध दुरान्वयाचा आहे हेच खरे. असे असूनही तो संबंध माहित करून घेण्याने रसग्रहणाला मदत होते. म्हणून सामाजिक परिस्थितीची जाणीव रसिकाला हवी." एकंदर समाजशास्त्रीय पद्धतीद्वारे एखाद्या साहित्यकृतीचे खोलवर आकलन करून घेता येते. साहित्य हे व्यक्तिनिष्ठ असते. या भ्रामक कल्पनेला तेनने अशाप्रकारे नाकारले. साहित्य हे विशिष्ट सामाजिक परिस्थितीचे अपत्य असते मोती आणि शिंपल्या सारखा असं म्हणत असतो त्यांच्या विचाराचा प्रभाव वांङ्मयेतिहासलेखनावरही पडलेला दिसतो. परंतु बरेचसे साहित्य प्रचलित साहित्य परंपरा,

munotes.in

संकेत रूढी यांच्या प्रभावातून निर्माण होते, याकडे तेनचे दुर्लक्ष झाल्याचे दिसते. त्यामुळे तेनच्या सिद्धांतावर अनेकांनी अनेक प्रकारचे आक्षेप घेतल्याचे दिसून येते

### २.३.८ मार्क्सचा 'पाया आणि इमला' सिद्धांत -

कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एंगल्स यांच्या विचार व्युहातून आकाराला आलेल्या तत्वज्ञानाला मार्क्सवाद म्हटले जाते. सामाजिक, राजकीय आणि आर्थिक विचारातून ते उत्पन्न झालेले असून ते जीवनाच्या सर्व अंगांना व्यापून टाकणारे तत्वज्ञान आहे. समाज मनुष्यनिर्मित आहे आणि योग्य परिस्थिती निर्माण झाल्यास माणसे तो बदलू शकतात. म्हणून योग्य परिस्थिती निर्माण करून कामगार वर्गाने समाजसत्तावादी समाजाची निर्मिती करावी अशी मार्क्सची भौतिकवादी, कार्यशीलतेवर भर देणारी तात्विक विचारसरणी आहे. समाजव्यवस्था बदलत असते आणि हा बदल उत्पादनसाधने, उत्पादनपद्धती व त्या पद्धतीत निर्माण झालेले सामाजिक संबंध यांच्या बदलामुळे घडून येतो. खरे तर मार्क्स आणि इंगल्स यांनी साहित्यविषयक स्वतंत्र ग्रंथनिर्मिती केलेली नाही. तरीही त्यांच्या लेखनात साहित्यविचार आलेले आहेत. त्या आधारे साहित्यातील सामाजिकतेचा शोध घेता येतो. मार्क्सच्या विचारधारेनुसार समाजातील उत्पादन संबंध (Production Relation) हा कोणत्याही समाजरचनेचा पाया असतो आणि त्याला पूरक अशी नैतिक, धार्मिक, राजकीय, विचारप्रणालीची अतिरचना जन्मते. साहित्य हे त्याचाच भाग आहे. त्यामुळे साहित्यातील सामाजिकतेचा मागोवा घेताना उत्पादनसंबंधाचे स्वरूप आणि लेखकाची वर्गीय जाणीव महत्त्वाची असते असे मार्क्सवाद मानतो.

मार्क्सवाद हा अर्थशास्त्र, इतिहास, समाज आणि क्रांतिविषयक सिद्धांत आहे. सामाजिक वास्तवाच्या पार्श्वभूमीवर वांङ्मयाचे मूल्यमापन होऊ शकते. हेच या मार्क्सवादी समीक्षेचे सूत्र आहे. मार्क्सचा पाया (Base) आणि इमला (Super structure) या संकल्पनेचा मार्क्सवादी समीक्षेवर प्रभाव आहे. "Economic production is the base of any society and therefore art, culture they are all superstructure built upon them" म्हणजे आर्थिक उत्पादन हा कोणत्याही समाजाचा पाया असून कला, साहित्य आणि संस्कृती हे त्यावरचे इमले आहेत.

मार्क्सचा हाच वरील सिद्धांत 'पाया-इमला' सिद्धांत म्हणून ओळखला जातो. धर्म, कायदा, तत्त्वज्ञान इ. प्रमाणेच साहित्य (आणि कला) हेही इमल्याचाच एक भाग असते. पाया आणि इमला या संरचनेतील विविध घटक एकमेकांवर आणि पायावर प्रभाव टाकत असतात. पण शेवटी निर्णायक घटक पायास्थानी असलेली अर्थव्यवस्था असते. थोडक्यात उत्पादन हा कोणत्याही समाजाचा पाया असून साहित्य आणि संस्कृती हे त्यावरचे इमले आहेत. मार्क्सवादी समीक्षकांच्या मते, साहित्य हे मूलतः समाजसन्मुख असते. समाजातील संघर्षाचे आणि परिवर्तनाचे पडसाद साहित्यात उमटतात. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक अधिरचनेला (सुपरस्ट्रक्चर) अर्थव्यवस्था ही पायाभूत

असते. असे असले तरी साहित्य हे समाजातील अर्थव्यवस्थेचे निखळ प्रतिबिंब असते किंवा ते अर्थव्यवस्थेवर निष्क्रियपणे अवलंबून असते असे म्हणता येणार नाही. आर्थिक प्रेरणा आणि साहित्याचे स्वरूप यांचे एकास एक नाते नसते. ही या विचाराची मर्यादा म्हणता येईल.

मार्क्सवादी समीक्षा पद्धतीचा प्रभाव समाजशास्त्रीय समीक्षेवर असला तरी दोन्ही समीक्षा पद्धती एक नसून वेगवेगळ्या आहेत, हे आपण ध्यानात घेतले पाहिजे असे गो.म. कुलकर्णी म्हणतात. मार्क्सवादी समीक्षेचा मूलभूत दृष्टिकोण प्रामुख्याने अर्थशास्त्राधिष्ठित आहे. मार्क्स, एंगल्स, प्लेखानोव्ह, लेनिन, ग्रामची, ट्राटस्की, गोल्डमन, फिशर या विचारवंतांची मार्क्सवादी मीमांसा महत्त्वाची आहे. सार्त्र, बॅख्ट, गॉर्की, नेरुदा अशा मार्क्सवादाने प्रभावित झालेल्या काही साहित्यिकांनी या संदर्भात मोलाची कामगिरी केली आहे. या पद्धतीचा वापर करून विशिष्ट काळातील उत्पादन संबंध व लेखकांचा वर्ग यांच्याद्वारे साहित्यातील जीवनाशयाचा संबंध जोडता येतो. समाजाच्या उत्पादन साधनात बदल झाला की साहित्याच्या स्वरूपात कसा बदल होतो हे या पद्धतीद्वारे स्पष्ट करता येते. १९ व्या शतकातील मराठी समाजात घडलेले स्थित्यंतर आणि आधुनिक मराठी साहित्याचा झालेला उदय हे याचे उदाहरण आहे. त्याचबरोबर एखाद्या वर्गाचे समाजातील स्थान, त्या स्थानात होणारे बदल आणि साहित्यातून अभिव्यक्त होणारा आशय हे नातेसुद्धा या पद्धतीद्वारे जुळवता येते.

उत्पादन संबंधाला आधार म्हणून स्वीकारल्यामुळे मार्क्सवादी पद्धती अधिक वस्तुनिष्ठ ठरली आहे. साहित्यातून व्यक्त होणारा जीवनाशय वर्गीय असतो अशी मार्क्सवादाची धारणा असली तरी माणसाच्या निर्मितीशीलतेकडे मार्क्सवाद दुर्लक्ष करत नाही. शिवाय या पद्धतीद्वारे साहित्यातील सामाजिकतेसंबंधी कारण व परिणाम या स्वरूपाचे अचूक विश्लेषण करता येतेच असे नाही. ही ह्या पद्धतीची मर्यादा ठरू शकते. मराठी समीक्षेत लालजी पेंडसे यांनी मार्क्सवादी समीक्षेला ओळख प्राप्त करून दिली. पुढे बा.र.सुंठणकर, शरच्चंद्र मुक्तिबोध, दिगंबर पाध्ये, संदीप पेंडसे यांनी मार्क्सवादी समीक्षेला पुढे नेण्याचे कार्य केले. तर गं.बा. सरदार, दि.के. बेडेकर यासारख्या समीक्षकांनी मार्क्सवादी समीक्षा पद्धतीचा कल्पक वापर केल्याचे दिसते. असे असले तरी काही अपवाद वगळता मराठीत मार्क्सवादी समीक्षा फारशी लिहिली गेली नाही असे खेदाने म्हणावे लागते.

## २.३.९ समाजशास्त्रीय समीक्षेची वैशिष्ट्ये

१. समाजशास्त्रीय समीक्षा पद्धती ही मूलतः आशयवादी समीक्षा पद्धती आहे.

२. या पद्धतीद्वारे सामाजिक परिस्थिती व साहित्यनिर्मिती यांचा संबंध स्पष्ट केला जातो.

३. या पद्धतीद्वारे समाजविषयक आकलनात भर घातली जाते.

४. तत्कालिन समाजाचे दर्शन घेणे वा सामाजिक दस्तऐवज दाखवणे हे या समीक्षा पद्धतीचे मुख्य उद्दिष्ट आहे. मात्र हा संबंध सरळसोट नसतो.

५. साहित्यात उमटणाऱ्या एखाद्या काळातील समाजाला अभिप्रेत असणाऱ्या जीवनविषयक कल्पना, आदर्श संकेत, समाजभान, संघर्ष व सामाजिक बदलाच्या दिशा यांचा शोध घेणे हे या पद्धतीचे खरे उद्दिष्ट आहे.

६. साहित्यातील नवे प्रवाह, साहित्याची लोकप्रियता, साहित्य व साहित्यिक यांचे समाजातील विशिष्ट स्थान यांच्या स्पष्टीकरणासाठी ही समीक्षा पद्धती उपयोगी ठरते.

### २.३.१० समाजशास्त्रीय समीक्षेचे घटक

साहित्यातून सामाजिक परिस्थितीचे दर्शन कसे घडते ते या समीक्षा पद्धतीच्या सहाय्याने शोधता येते. स्वातंत्र्योत्तर काळात जन्माला आलेल्या विविध प्रवाहामुळे या समीक्षा पद्धतीची आवश्यकता वाटू लागली आहे. या समीक्षा पद्धतीचे घटक पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. तत्कालीन समाजजीवनाचे एकंदर स्वरूप

२. ज्ञानाचे प्रचलित व्युह

३. त्या त्या काळातील सांस्कृतिक परंपरा व त्यांचे विशेष

४. कलावंताची प्रकृती

५. संस्कृती वितरणाची विविध माध्यमे

६. श्रोत्यांच्या अभिरुचीची केंद्रे

७. साहित्य मंडळे, प्रकाशन संस्था, विविध सांस्कृतिक संघटना आणि त्यांचे कार्य

८. साहित्य आणि साहित्येत्तर कलांची स्थितीगती, त्यांचे परस्परसंबंध

९. संवेदनविश्वावर परिणाम करणारे चित्रपट, आकाशवाणी, दुरदर्शन, प्रदर्शने, संगीत मैफिलीत, फॅशन्स इ. घटक.

१०. विद्यापीठातील अभ्यासक्रमांची आखणी, पाठ्यपुस्तकांचे स्वरूप

११. नवप्रतिभावंत आणि त्यांची प्रभावकक्षा

१२. परकीय कलाकृती, संस्कृती, विज्ञान इत्यादींचा परिचय व संपर्क

munotes.in

### २.३.११ साहित्याच्या समाजशास्त्रीय अभ्यासाची व्याप्ती

साहित्याच्या निकोप विकासासाठी साहित्यातील सामाजिकता तपासून पाहण्याची गरज एकदा समजावून घेतल्यानंतर ही तपासणी कोणकोणत्या अंगाने करणे गरजेचे आहे हेही पाहिले पाहिजे. या अभ्यासात कोणकोणत्या प्रश्नांची उत्तरे शोधली पाहिजेत, असाही प्रश्न उद्भवतो. म्हणून साहित्याच्या समाजशास्त्रीय अभ्यासाची व्याप्ती कशी असावी व ती कितपत असावी याची चर्चा करणे गरजेचे आहे

१. साहित्यामध्ये समाजजीवनाचे पुरेसे प्रतिबिंब उमटले आहे का?

२. समाजातील सर्व घटकांचे चित्रण झाले आहे का?

३. झालेले चित्रण वास्तवाला धरून आहे का?

४. सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक बदलांची नोंद साहित्याने घेतली आहे का?

५. व्यक्तिमनातील सूक्ष्म बदलांचे चित्रण झाले आहे का?

६. समाजजीवनाला रुचेल, पटेल अशा शैलीचा वापर केला आहे किंवा नाही.

७. साहित्यात समाजमूल्ये, जीवनमूल्ये कितपत आहेत?

८. लेखकाची समाजाकडे बघण्याची दृष्टी काय आहे?

९. समाजाचे प्रबोधन करणे व समाजाला प्रेरणा देण्याचे कार्य साहित्याकडून पुरेशा प्रमाणात होत आहे काय?

१०. समाजाला वाचण्यास प्रवृत्त करण्याचे सामर्थ्य साहित्यामध्ये आहे काय?

११. वाचकांची अभिरुची वाढविण्याचे कार्य साहित्याने केले आहे काय?

१२. समाजाच्या स्थैर्यासाठी, माणसाच्या सुखी जीवनासाठी साहित्याचा कितपत उपयोग होत आहे?

१३. लेखकाची संवेदनशीलता कोणत्या प्रकारची आहे?

१४. देशातील साक्षरतेचे प्रमाण, वाचकांची संख्या, प्रकाशन संस्था, वाचनालये यांचाही अभ्यास होणे तितकेच गरजेचे आहे.

१५. साहित्य व शासनसंस्था यांचे संबंध कसे आहेत?

१६. साहित्य निर्मितीवर कोणत्या वर्गाचे वर्चस्व आहे? त्याचे स्वरूप काय आहे?

१७. लेखकाला मिळणारे मानधन, त्याची आर्थिक परिस्थिती, त्यांना मिळणाऱ्या सोयी सवलती इत्यादीचा अभ्यास करणे.

munotes.in

१८. वाङ्मयाच्या विविध प्रकारांचा तुलनात्मक आढावा घेणे. उदाहरणार्थ कथा, कादंबऱ्या, ललितगद्य, नाटक इत्यादी

१९. साहित्याची समीक्षा करण्याची पद्धती

२०. साहित्याचा जनमाणसावर होणारा परिणाम

या आणि अशा अनेक प्रश्नांच्या अनुषंगाने साहित्याचा समाजशास्त्रीय दृष्टीने अभ्यास झाला पाहिजे.

### २.३.१२ समाजशास्त्रीय समीक्षा पद्धतीच्या मर्यादा

समाजशास्त्रीय समीक्षा पद्धती महत्त्वपूर्ण आहे तरी या पद्धतीच्याही काही मर्यादा आहेत.

१. सामाजिक दृष्टीने अभ्यास करताना प्रत्येक वेळी प्रत्येक साहित्यकृतीच्या अर्थनिर्णयनासाठी किंवा मूल्यमापनासाठी निकष मिळतातच असे नाही.

२. प्रत्येक कलाकृतीचा संबंध सामाजिक, आर्थिक परिस्थितीची जोडणे शक्य नसते. उदा. विशिष्ट भावना व्यक्त करणाऱ्या कविता.

३. या समीक्षा पद्धतीकडून साहित्याचे साहित्य म्हणून असलेले महत्त्व फारसे लक्षात घेतले जात नाही.

४. सामाजिक भूमिकेतून दीर्घकाळ विचार करणारी मराठी समीक्षा सर्वकष व संपन्न अशी आढळत नाही.

५. समाजशास्त्रीय समीक्षेने वास्तववादी साहित्याचे स्वरूप योग्य प्रकारे जाणून घेणे आवश्यक असते.

६. साहित्याचा समाजशास्त्रीय अभ्यास करताना समाजाची आर्थिक स्थिती, राहणीमान, विशिष्ट आकडेवारी याबाबत माहिती मिळेलच असे नाही.

७. साहित्यामध्ये समाजाचे प्रतिबिंब पडते असे कल्पून ही समीक्षा पद्धती वाटचाल करते. कलात्मक सत्य हे वास्तव सत्याहून वेगळे असते, ते प्रतीकात्मक असते याचा फारसा विचार ही समीक्षा पद्धती करत नाही.

८. लेखकाची लालित्यपूर्ण शैली, आकृतिबंध व कलात्मकता, भाषिक सौंदर्य, पात्रांची मानसिक आंदोलने इत्यादी घटकांचा विचार या समीक्षेमुळे शक्य होत नाही.

थोडक्यात एखाद्या साहित्यकृतीचे अर्थनिर्णयन व मूल्यमापन करण्यासाठी जी समीक्षा पद्धती उपयुक्त ठरेल तिचा वापर करणे आवश्यक आहे, याचे भान साहित्याच्या मीमांसकाला बाळगणे गरजेचे ठरते.

## २.३.१३ मराठीतील समाजशास्त्रीय समीक्षा : स्थूल परिचय

ज्ञानकोशकार श्री.व्यं. केतकर यांनी लिहिलेल्या 'महाराष्ट्रीयांचे काव्यपरीक्षण' (१९२८) हा ग्रंथ म्हणजे मराठी समाजाच्या ग्रंथाभिरूचीचा शोध होय. त्यामुळे समाजशास्त्रीय समीक्षेची वाट रुंद करणारा ग्रंथ म्हणून त्याकडे पाहता येते. समाजशास्त्रीय भूमिकेतून जाणीवपूर्वक केलेले हे लेखन नाही. तरीही प्रत्यक्ष पुराव्यांच्या आधारे निष्कर्ष काढण्याची त्यांची पद्धती आणि साहित्याकडे पाहण्याची त्यांची दृष्टी ही समाजशास्त्रीय असल्याचे दिसते. 'कळ्यांचे नि: श्वास' या कथासंग्रहाला लिहिलेल्या प्रस्तावनेतही ही दृष्टी आढळते.

समाजशास्त्रीय समीक्षेचा मराठीतील पहिला ग्रंथ म्हणून दिगंबर पाध्ये यांनी ज्या ग्रंथाचा उल्लेख केला आहे, तो म्हणजे लालजी पेंडसे यांचा 'साहित्य आणि समाजजीवन' (१९३५) हा ग्रंथ होय. मार्क्सवादी तत्त्वांचा अवलंब करून त्यांनी साहित्याचे समाजशास्त्रीय विश्लेषण केलेले आहे. वर्गसंघर्ष, सामाजिक जाणीव, वर्गजाणीव यासारख्या समाजशास्त्रीय संज्ञांचा वापर या पुस्तकात केलेला आहे. अशा प्रकारच्या संकल्पनांचा वापर करून स्वातंत्र्योत्तर काळात बा.र. सुंठणकर यांनी समाजशास्त्रीय समीक्षा लिहिलेली आहे. त्यांनी 'महाराष्ट्रीय संत मंडळाचे ऐतिहासिक कार्य' या ग्रंथात मध्ययुगीन महाराष्ट्राची समाजरचना, संत चळवळीशी असणारा संबंध, संतांनी केलेले कार्य आदीची चर्चा केलेली आहे. अर्थात साहित्याचा समाजाशी यांत्रिक संबंध जोडण्याच्या पद्धतीमुळे हा ग्रंथ वादग्रस्त ठरला.

'संत साहित्याची सामाजिक फलश्रुती' हा गं.बा. सरदार यांचा एक महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे. त्यात संत साहित्याची सखोल व समतोल मीमांसा आढळते. सरदारांच्यामुळे मराठी संत साहित्याच्या संदर्भातील  समाजशास्त्रीय समीक्षा विकसित होत गेल्याचे निदर्शनास येते. ललित साहित्याच्या संदर्भात असा प्रयोग दि.के. बेडेकर आणि शरच्चंद्र मुक्तिबोध यांनी केल्याचे दृष्टीस येते. 'नवी मळवाट' च्या पहिल्या आवृत्तीला लिहिलेल्या प्रस्तावनेत मुक्तिबोध यांनी केलेली मांडणी समाजशास्त्रीय समीक्षेचा उत्तम नमुना आहे. तसेच दि.के. बेडेकर यांनी 'केशवसुतांची काव्यदृष्टी' मध्ये समाजशास्त्रीय समीक्षा पद्धतीचा वापर करून साहित्याचे विवेचन केले आहे.

याशिवाय डॉ. मु.ग. पानसे यांचे 'यादवकालीन महाराष्ट्र', द.ग. गोडसे यांचे 'पोत', शक्तिसौष्ठव', रा.ग. जाधव यांचे 'साहित्य आणि सामाजिक संदर्भ', अनिल सहस्रबुद्धे यांचे 'साहित्य आणि समाज' आदी ग्रंथांचा उल्लेख करता येईल. तसेच 'मराठी साहित्यातील स्पंदने' या ग्रंथाद्वारे गो.म. कुलकर्णी यांनी समाजशास्त्रीय समीक्षा पद्धतीची सांगोपांग ओळख करून दिली असून डॉ. रवींद्र ठाकूर यांचा 'मराठी कादंबरी : समाजशास्त्रीय समीक्षा' हा ग्रंथही महत्त्वाचा मानला जातो. त्याचबरोबर हरिश्चंद्र थोरात, नागनाथ कोत्तापल्ले यांनीही मराठी समाजशास्त्रीय समीक्षेत मोलाचे योगदान दिल्याचे दिसून येते.

munotes.in

एकंदर मराठी साहित्य समीक्षेत समाजशास्त्रीय समीक्षेची चर्चा पुष्कळ होत असले तरी प्रत्यक्षात तिची समृद्ध परंपरा निर्माण होऊ शकली नाही असेच म्हणावे लागते.

**आपली प्रगती तपासा**

१) समाजशास्त्रीय समीक्षा पध्दतीची वैशिष्ट्य लिहा.

-----------------------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------------------

## २.४ समारोप

सारांशरूपाने असे म्हणता येते की, समाजशास्त्रीय समीक्षा समाजरचनेला उपयोगी ठरणारे आणि साहित्य व्यवहाराला प्रेरक, पूरक किंवा मारक ठरणारे सर्वच समाजशास्त्रीय घटक विचारात घेते. साहित्य, समाज आणि संस्कृती यांच्या परस्परसंबंधांचा अभ्यास समाजशास्त्रीय समीक्षेत येतो. लेखकाचा साहित्यकृतीतून व्यक्त होणारा दृष्टिकोण, व्यक्तिरेखा, घटना-प्रसंग, साहित्यप्रेरणा इत्यादींचा या समीक्षा पद्धतीत अभ्यास करता येतो. याशिवाय लेखकाची समग्र साहित्यनिर्मिती, साहित्यप्रकार, साहित्यप्रवाह, साहित्यासंदर्भातील तात्त्विक प्रश्न आणि वाङ्मयेतिहासाची मांडणी या समीक्षा पद्धतीद्वारे केली जाऊ शकते. समाजरचनेचे घटक आणि साहित्य संघटनेचे घटक यांचे अन्योन्य संबंध स्पष्ट करणे हेच समाजशास्त्रीय समीक्षा पद्धतीचे मुख्य प्रयोजन आहे.

समाजशास्त्रीय समीक्षा पद्धतीमध्ये साहित्यकृतीला केंद्रस्थानी ठेवून साहित्यकृतीतील विविध घटकांचा समाजाच्या संदर्भात समाजशास्त्रीय दृष्टीने विचार केला जातो. येथे साहित्याचा एक साधन म्हणून उपयोग केला जातो. समाजातील घटनाप्रसंगांचे चित्र साहित्यात उमटते. व्यक्ती समाजाचाच घटक असल्याने समाजातील सुष्ट-दुष्ट प्रवृत्तीची दखल, सामाजिक परिवर्तने यांची दखल लेखक आपल्या साहित्यकृतीत घेतो. त्याचा आविष्कार साहित्यातून करतो. एकंदर समाजशास्त्रीय समीक्षेमुळे समाजाची जडणघडण, समाजाचा विकास व विकासाची दिशा याची जाणीव होण्यास मदत होते. साहित्याचा समाजमनावर होणारा परिणाम, साहित्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण, समीक्षा मूल्ये, वाचकांची व वाङ्मय व्यवहाराची स्थितीगती या सर्वाचाच विचार समाजशास्त्रीय समीक्षा पद्धतीत करणे अपेक्षित असते.

munotes.in

## २.५ संदर्भ ग्रंथ सूची


१. अवलोकन : मराठी समीक्षा आणि साहित्य, दिगंबर पाध्ये, लोकवाङ्मयगृह, मुंबई, २०१२

२. भारतीय संस्कृती कोश, खंड ९ वा

३. महाराष्ट्र संस्कृती : घडण आणि विकास, ह. श्री. शेणोलीकर, प्र. न. देशपांडे, डायमंड पब्लिकेशन

४. मार्क्सवादी साहित्यविचार, शिरवाडकर के. र. - मार्क्सवादी साहित्यविचार

५. वाङ्मयीन संज्ञा - संकल्पना कोश, प्रभा गणोरकर व इतर, भटकळ फाउंडेशन

६. साहित्य आणि समाज, डॉ. सदा क-हाडे, लोकवाङ्मयगृह, मुंबई, १९९९

७. साहित्यविचार आणि समाजचिंतन, प्रा. शरच्चंद्र मुक्तिबोध

८. समाज आणि संस्कृती, दिगंबर पाध्ये, मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ, लोकवाङ्मयगृह, मुंबई, १९९८

९. साहित्यसिद्धांत, अनु. डॉ. स.ग. मालसे, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००२

१०. पाश्चात्य साहित्यशास्त्र : सिद्धांत आणि संकल्पना, डॉ. सुरेश धायगुंडे, निर्मल प्रकाशन, पुणे, १९९०

११. यादव आनंद - साहित्याची निर्मितीप्रक्रिया

१२. History of English Literature, 1863

१३. Marxisam and Literature, Raymond William, Oxford University Press, 1977


**माहिती जालावरील संदर्भ**


1. https://www.aksharnama.com

2. https://mr.m.wikipedia.org

3. https://en.m.wikipedia.org

4. https://dictionary.cambridge.org

## २.६ नमुना प्रश्नसंच

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न लिहा.**

१. साहित्य, समाज आणि संस्कृती यांचा अन्योन्य संबंध स्पष्ट करा.

२. हिपोलिट तेनप्रणित समाजशास्त्रीय समीक्षेचे स्वरूप सांगा.

३. समाजशास्त्रीय समीक्षा पद्धतीची वैशिष्ट्ये व घटक लिहा.

४. मराठीतील समाजशास्त्री समीक्षेची वाटचाल स्पष्ट करा.

**ब) टीपा लिहा**

१. तेनचा त्रिमिती सिद्धांत

२. समाजशास्त्रीय समीक्षा पद्धतीची व्याप्ती

३. समाजशास्त्रीय समीक्षा पद्धतीच्या मर्यादा

४. समाजशास्त्रीय समीक्षा पद्धतीचे प्रकार

**क) एका वाक्यात उत्तरे लिहा**

१. हॅरी जॉन्सनने समाजाची कोणती लक्षणे सांगितली आहेत ?

२. मानवी संस्कृतीची दोन अंगे कोणती ?

३. कोणत्या तत्त्वज्ञानाला 'मार्क्सवादी तत्त्वज्ञान' म्हटले जाते?

४. समाजशास्त्रीय समीक्षेत कोणते गृहीततत्त्व स्वीकारून साहित्याचे मूल्यमापन होते ?

❖❖❖

munotes.in

घटक ३

# ३

# मार्क्सवादी समीक्षाविचार

**घटक रचना**


३.१ प्रास्ताविक

३.२ कार्ल मार्क्स

३.३ कार्ल मार्क्सचा सिद्धांत

३.४ मार्क्सवाद आणि मार्क्सवादी साहित्यविचार

३.५ मार्क्सवादी समीक्षा

३.६ मार्क्सवादी साहित्यसमीक्षा वैशिष्टे

३.७ मार्क्सवादी मराठी साहित्य आणि समीक्षा

३.८ मराठी मार्क्सवादी साहित्यसमीक्षा वैशिष्टे

३.९ मार्क्सवादी समीक्षापद्धतीची सामर्थ्यस्थळे

३.१० मर्यादा

३.११ सारांश

३.१२ संदर्भ ग्रंथ सूची

३.१३ नमुना प्रश्नसंच

३.१४ अधिक वाचन


munotes.in

**उद्दिष्टे**

१. मार्क्सवाद आणि मार्क्सवादी साहित्यविचार अभ्यासणे.

२. मार्क्सवादी समीक्षापद्धती समजून घेणे.

३. मार्क्सवादी अभ्यासक, समीक्षक यांचे विचार समजून घेणे.

४. मराठीतील मार्क्सवादी समीक्षापद्धतीचे स्वरूप अभ्यासणे.

५. साहित्यकृतीची मार्क्सवादी समीक्षा करणे.

## ३.१ प्रास्ताविक

एखादी विशिष्ट वाङ्मयीन कलाकृती हा साहित्यसमीक्षेचा मूळ विषय असतो. समीक्षा व्यापारात विशिष्ट कलाकृतीची चिकित्सा केली जाते. विशिष्ट वाङ्मयीन कलाकृतीची चिकित्सा करण्यासाठी समीक्षकाला जीवनसंस्कृतीचे, अनेक शास्त्रांचे, वाङ्मयीन वादांचे ज्ञान असणे आवश्यक असते. कलाकृतीची समीक्षा ही मुख्यत्वे समीक्षाशास्त्राच्याआधारे करणे अभिप्रेत असते. जीवन आणि शास्त्र यांचा अनुबंध समीक्षेच्या कक्षेत येत असतो. समीक्षक विशिष्ट कलाकृतीचे रूप, प्रयोजन, परिणाम, जीवनव्यापार, कलात्मकता, सौंदर्यात्मकता आदी घटकांच्याआधारे कलाकृतीची समीक्षा करीत असतो. तो कलाकृतीचे रूप, शब्द, भाव, अर्थ याद्वारे कलाकृतीच्या नवनिर्मितीचा, तिच्या वेगळेपणाचा, तिच्या व्यापाराचा सर्जक शोध घेत असतो.

जागतिक स्तरावरील सामाजिक परिवर्तनाच्या वा सामाजिक स्थित्यंतराच्या परिवर्तनात मार्क्सवादी विचारांना महत्त्व आहे. जगातील अनेक देशांतून मार्क्सवादी विचारांवर साधकबाधक चर्चा झालेली आहे. समाजात परिवर्तन घडून यावे यासाठी अनेक साहित्यातून मार्क्सवादी विचार प्रकर्षाने मांडला गेले आहेत. काही वेळा संघर्षमय वातावरणही निर्माण झालेले आहे. असे संघर्षमय वातावरण जेव्हा निर्माण होते तेव्हा तो एकप्रकारे क्रांतिकाळ सुरू होत असतो. म्हणजेच मार्क्सप्रणित पायातील बदलाचे ध्वनी इमल्यात प्रतिध्वनी म्हणून उमटत असतात. एकप्रकारे या क्रांतिकारी जाणिवा निर्माण होतात. उदाहरणार्थ, भारतातील गिरणी व्यवसाय.

## ३.२ कार्ल मार्क्स

कार्ल मार्क्स यांचा जन्म १८१८ मध्ये जर्मन येथे झाला आहे. त्यांचा 'दास कॅपिटल' हा ग्रंथ भांडवलशाही व्यवस्थेचे विश्लेषण करणारा असून नव्या साम्यवादी सामाजिक रचनेची निर्मिती व्हावी ही विचारप्रणाली जगासमोर ठेवणारा आहे. मार्क्सने या ग्रंथातून नफात्य भांडवलशाही आणि या भांडवलशाहीवर निर्माण होणारे मानवी संबंध, गरिबी, विषमता, शोषणीय व्यवस्था आदी विषयी नवा दृष्टिकोन दिला आहे.

कार्ल मार्क्स याचा अभ्यासविषय मानवी समाज आहे. हा विषय खरेतर गतिशील आहे कारण समाज हा सतत बदलत असतो, परिवर्तित होत असतो. समाजरचनेतील सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक, कलात्म दृष्टिकोन यात परिवर्तन होत असते. या परिवर्तनाच्यामागे कोणते नियम, घटक असतात याविषयीचा विचार मार्क्सच्या भूमिकेमागे केंद्रस्थानी असलेला दिसतो. त्यातूनच पुढे विचारप्रणाली, कला याविषयीचे विचार त्याने सविस्तर मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. विचार आणि कला यांचा संबंध समाजाच्या स्थितीगतीत, परिवर्तनात महत्त्वाची भूमिका बजावत असते हे मार्क्सने

विषद केलेले आहे. समाजाच्या परिस्थितीचे, चढ-उतारांचे, स्थितीगतीच्या वास्तव चित्राचे प्रारूप समोर आणले. त्यांचा ऐतिहासिक भौतिकवाद ही जगाला मिळालेली एक मोठी देणगी आहे. मार्क्सचे समाजशास्त्र हे ऐतिहासिक दृष्टीने महत्त्वाचे आहे. गॉर्डन चाइल्ड या मानववंशशास्त्रज्ञ अभ्यासकाने ही त्याचा निर्वाळा दिला आहे. मार्क्सची समाजमीमांसा 'जीवन आणि साहित्य' या ग्रंथात शरदश्र्चंद्र मुक्तिबोध यांनी केली आहे. "मानवी समाज आणि निसर्ग मूलवंत आहे. निसर्गाशी संघर्ष करीतच मानवी समाज स्ववंशाचे संरक्षण आणि संवर्धन करू शकतो. मूळ घटक व्यक्ती नव्हे, मानवी समाजच होय. यांमध्ये संघर्ष चालत आलेला आहे." (शरदश्चंद्र मुक्तिबोध जीवन आणि साहित्य, पृ. ३८) मानव आणि निसर्ग हा संघर्ष अनादी काळापासून चालत आलेला आहे, हे लक्षात येते. उदाहरणार्थ, मानव भटकंतीचा त्याग करून स्थिर जीवन जगू लागला ही त्याच्या जीवनातील मूलभूत भौतिक क्रांती असे म्हणता येईल. या क्रांतीतून पुढे कालपरत्वे वर्ग जाणिवा निर्माण होत गेल्या त्यातून परिवर्तन घडत गेले. समविभागणीमुळे वर्गव्यवस्था निर्माण होत गेली.

## ३.३ कार्ल मार्क्सचा सिद्धांत

कार्ल मार्क्सचा सिद्धांत आर्थिक संबंधाशी निगडित आहे. आर्थिक संबंध हेच सर्व सामाजिक व्यवहाराचे प्रेरक असतात; आणि उत्पादनसंबंध हे या समाजाची आर्थिक चौकट असते. याच पायारूप चौकटीवर राजकीयतेचा, सामाजिकतेचा इमला उभा राहत असतो. माणसाच्या सामाजिक जीवनपद्धतीवरून त्याची जीवनपद्धती आकाररूप घेते वा ठरत असते. सामाजिक संबंध हे मूलतः उत्पादनशक्तीशी निगडित असतात. स्थलकालानुसार उत्पादनपद्धतीत बदल होत राहतो. सामाजिक संबंधही बदलतात, वर्ग निर्माण होतात. त्यातून वर्गकलह वाढत जातो. (उदा. मालक-कामगार)

मार्क्सवादी समीक्षाविचारात कार्ल मार्क्स यांचा 'पाया आणि इमला' (Base & super structure) हा सिद्धांत महत्त्वाचा ठरतो. समाज, साहित्य, संस्कृती, कला, राजकारण, विषमता आदी घटकांविषयीचा आधुनिक विचार करताना वा त्यातील परस्परसंबंध तपासताना हा सिद्धांत विचारात घेणे आवश्यक आहे. एखाद्या व्यक्तीच्या महत्त्वपूर्ण क्रिया ऐतिहासिक एकतेने बांधलेल्या असतात तशाच त्या एकमेकांत गुंतलेल्याही असतात अशी मार्क्सवादी भूमिका आहे. या भूमिकेला अनुसरून सामाजिक परिवर्तनाचे तत्त्वज्ञान समजून घ्यावे लागते. प्रस्तुत सिद्धांतातील पाया (Base) हा त्या काळातील उत्पादन संबंधांची समष्टी होय. हे उत्पादन संबंध मानवी जाणिवेतून विकसित होत असतात. वस्तुतः त्या त्या समाजातील भौतिक संबंध  हे विविध प्रक्रियांशी निगडित असतात. सामाजिक उत्पादन, संपत्ती, संपत्तीचे सामाजिक वाटप, विनिमय आदी प्रक्रिया उत्पादन संबंधित असतात. गिरणी मालकाचे कामगारांशी असलेले संबंध हे भांडवलदारी स्वरूपाचे होत. जर उत्पादन साधने, उत्पादन पद्धती बदलल्या वा विकसित झाल्या तर या संबंधात फरक पडतो, ते बदलतात. अर्थव्यवस्था वा अर्थरचना बदलली की सामाजिक संबंधाच्या प्रक्रियेला सुरुवात होत असते.

समाजामध्ये जे सामाजिक शोषण होते त्याविरुध्द ज्या चळवळींचा जन्म झाला आणि समाजातील या असमानतेला, शोषणाला विरोध केला त्यापैकीच एक मार्क्सवाद होय. आर्थिक सत्तेच्याआधारे जे शोषण केले जाते त्याविरुध्द मार्क्सवाद सक्षमपणे उभा राहिलेला दिसतो. भांडवलशाही समाजव्यवस्थेमध्ये श्रमिकांचे शोषण होत असते. म्हणूनच उत्पादनाची साधने सर्वांच्या मालकीची होणे मार्क्सला अधिक महत्त्वाचे वाटते. उत्पादनाची साधने सर्वांच्या मालकीची झाली तर शोषणव्यवस्था, वर्गसंघर्ष थांबेल आणि वर्गसंघर्षविरहित नवी समाजरचना अस्तित्वात येईल असे मार्क्सला वाटत होते.

'पाया आणि इमला' या सिद्धांतातील इमला (super structure) हा तत्कालीन समाजाची आत्मसंबंधित सामाजिक उभारणी होय. यामध्ये व्यक्तीचा, समाजाचा त्या काळातील धार्मिक, राजकीय, सामाजिक संस्थांच्या आणि माणसाचा अन्योन्य संबंध प्रस्थापित होत असतो. मूलतः इमल्याची उभारणी ही आर्थिक पाया या अनुषंगाने होत असते. उत्पादन संबंधांची गोळाबेरीज म्हणजे त्या त्या समाजाची ती आर्थिक रचना, सामाजिक रचना यांचा पाया असतो. या पायावर राजकीय, सांस्कृतिक, सामाजिक इमला आकार रूपास येतो. त्यातूनच पुढे भौतिक जीवनातील उत्पादनपद्धती बौद्धिक वा सांस्कृतिक जीवनाला आकार देतात. व्यक्तीचे सामाजिक अस्तित्त्व हे त्याच्या जाणिवा ठरवत असतात, हा मार्क्सचा निष्कर्ष येथे महत्त्वपूर्ण ठरतो. प्रत्येक काळात विशिष्ट जाणिवा कार्यरत असतात, त्या काळात त्या प्रभावीही ठरत असतात. त्यामुळेच त्याचा आविष्कार साहित्यात होत असतो. उदाहरणार्थ यादवकालीन व्यवस्थेत भक्ती ही प्रेरणा प्रेरक ठरलेली दिसते.

## ३.४ मार्क्सवाद आणि मार्क्सवादी साहित्यविचार

मार्क्सवाद हे सर्वंकष कामगार वर्गाच्या मुक्तीचे तत्त्वज्ञान आहे. भांडवलदारी व्यवस्था आणि कामगार यांच्यात उत्पन्नाचे समान वाटप व्हावे हे मार्क्सवादाला अपेक्षित होते. मूलतः मार्क्सवादी तत्त्वज्ञानाला अनित्यात्मक (dialectic) भौतिकवाद म्हणतात. अनित्यतावाद मार्क्सने हेगेल पासून घेतला आहे आणि भौतिकवाद फायरबाख पासून घेतला आहे. हेगेल हा राजनिष्ठ तर फायरबाख भांडवलदारी लोकशाहीवादी होता. या दोन्ही विचारप्रणालीतून भांडवलदारी तत्त्वज्ञान आकाररूप घेत गेले. त्यातून पुढे कामगारवर्गीय तत्त्वज्ञान निर्मित झाले.

शरद पाटील मार्क्सवादी तत्त्वज्ञानाविषयी म्हणतात, "मार्क्सवादाचे शुद्ध (pure) तत्त्वज्ञान अनित्यात्मक भौतिकवाद आहे. तर व्यावहारिक (applied) तत्त्वज्ञान ऐतिहासिक भौतिकवाद. शोषणशासनाची वर्ग ही एकमेव संस्था असल्याचे ऐतिहासिक भौतिकवाद मानतो. त्यामुळे त्याचे आवरण वर्गवाद आहे. कोणत्याही वर्तमान वागत समाजाचे सम्यक आकलन करण्यासाठी प्रथम त्याच्या आर्थिक पायाचा अभ्यास केला पाहिजे, नंतर त्याच्या वैचारिक वरच्या इमल्याचा आणि मग



munotes.in

या दोन्ही अभ्यासाचा संयोग (sublation, विधायक नकारीकरण) हा ऐतिहासिक भौतिकवादाचा गाभा आहे. त्यामुळे हे केवळ वर्गांतांचे तत्त्वज्ञान आहे." (शरद पाटील, मार्क्सवाद फुले-आंबेडकर व त्याचे टीकाकार, समाजप्रबोधन पत्रिका, जाने- मार्च, १९९१, पृ.१९)

कार्ल मार्क्सने समाजातील उत्पादनसंबंधांतून निर्माण होणारी शोषणीय व्यवस्था आणि मानवी दुःख यांना आपल्या विचारांमध्ये महत्त्वाचे मानले होते. समाजातील आर्थिक, सामाजिक परिस्थिती हे मानवी दुःखाचे मूळ कारण असून व्यवस्था परिवर्तन घडून या दुःखाचा शेवट करता येईल अशी त्याच्या तत्त्वज्ञानाची धारणा होती. यामधूनच त्यांची ऐतिहासिक भौतिकवादी पद्धत पुढे आली.

मार्क्सवादी साहित्यविचार हा काळाच्या ओघात वेगवेगळ्या अंगानी पुढे येत गेलेला आहे. मुख्यत: मार्क्सवादी साहित्य विसाव्या शतकात पुढे आलेले दिसते. मार्क्सवादी साहित्यविचाराच्या मांडण्या अनेक दृष्टिने होऊ लागल्या. परंतु मार्क्सवादी साहित्यविचार हा जीवनवादी असलेला दिसतो. साहित्यातील वास्तवावर भर देणारा विचार आहे. काही विचारवंतानी या वास्तवाचा अतिरिक्त विचार ही केलेला दिसतो. सामाजिक जीवनाचे प्रतिबिंब साहित्यात तंतोतंत उमटावे या अनुषंगानेही एक संकोची भूमिका पुढे आली. तर या विरोधी सामाजिक परिवर्तनाच्या भागावर अधिक भर देणे आणि साहित्य विशिष्ट मूल्यांना प्रतिबध्द असणे आवश्यक आहे, अशी भूमिकाही घेण्यात आली. वस्तुतः या दोन्हीही भूमिका मार्क्सवादी साहित्याला मान्य नाहीत. आपण पुढील विवेचनात काही अभ्यासकांच्या सैध्दांतिक मांडणीचा परामर्श घेऊ.

लुकाचच्या मते साहित्याचे विशेष लक्षण म्हणजे जीवनाचे समष्टीदर्शन आणि नमुनादर्शित्व हे असते. (समष्टीकरण म्हणजे साहित्याची अस्तित्वाशी असलेली परिपूर्ण जोड होय. आणि नमुनादर्शित्व म्हणजे साहित्यातील सामान्यीकरण होय.) लुकाचची भूमिका त्याच्या पुढील विधानातून अधिक सुस्पष्ट होते. 'The central aesthetic problem of realism is the adequate presentation of the complete humanity.' [वास्तववादाचा केंद्रीय कलास्वरूपशास्त्रीय प्रश्न म्हणजे संपूर्ण मानवतेचे योग्य सादरीकरण.] (George Lucacs, studies in European Realism, London, Routledge and Kegan Panel, 1972, Pg.7) कादंबरी या साहित्यप्रकाराची चर्चा करताना लुकाचने The Theory of Novel या ग्रंथात एक सिद्धांतन मांडले आहे. 'कादंबरी आधुनिक माणसाचा आपले स्वत्व (Essence) आणि आपले अस्तित्व (Existence) यांची सुसंगती साधण्याचा प्रयत्न आहे.' कादंबरीचा नायक मुख्यतः वैयक्तिक कृतीतून जीवनाचा अर्थ शोधत असतो. काही वेळा तो एकाकी पडतो, काही वेळा तो आत्मनिष्ठ होतो, तर काही ठिकाणी तो परात्म होत जातो. एकूणच कादंबरीचा नायक हा समस्याप्रधानतेशी निगडित होत जातो. आणि त्यातूनच तो आपले स्वत्व, अस्तित्व शोधत असतो.

munotes.in

फ्रेंच समीक्षक गोल्डमन साहित्यातील जीवनाविषयी, दृष्टिकोनाविषयी आपली भूमिका व्यक्त करताना सामूहिकतेला महत्व देतो. 'साहित्य वास्तवाचे व व्यक्तिमत्वाचे प्रतिबिंबन असत नाही. तर ते एक सामाजिक समूहाची वा वर्गाची/वर्णाची जीवन जाणीव असते.' गोल्डमनच्या विचारात जीवनसंदर्शन (world vision) ही कल्पना महत्वाची राहिलेली दिसते. (world vision) ही कल्पना स्पष्ट करताना तो म्हणतो. 'what I have called a world vision is a convenient term of the whole complex of ideas, aspirations and feeling which links together the members of a social group (a group which in most cases assumes the existence of a social class) मी ज्याला जीवन-संदर्शन म्हणते. ती एका सामाजिक समूहाच्या सदस्यांना (अशा समूहामागे बहुधा सामाजिक वर्गाचे अस्तित्व ग्रहीत असते.) एकत्रित जोडणाऱ्या कल्पना, प्रेरणा आणि जाणिवा यांचे संपूर्ण संकुल व्यक्त करणारी सोयीस्कर संज्ञा आहे. (Lucien Goldman, the hidden god London I Routledge and kegan Paul, 1977, pg 7) गोल्डमन यांची भूमिका सामूहिक बोधाला अधोरेखित करणारी आहे. ह. ना. आपटे यांचे कादंबरी लेखन याच स्वरुपाचे जीवनसंदर्शन आहे. त्यातील जीवन हे व्यक्तिगततेच्या पलिकडचे आहे. सामाजिक आणि बौद्धिक प्रक्रियेशी ते निगडित आहे. ते सामूहिक बोधाचे (collective consciousness) दर्शन घडविते. साहित्याचा समाजशास्त्रीय अंगाने अभ्यास करताना गोल्डमन भौतिक संदर्भानाही प्राधान्य देतो. समाजशास्त्रीय आकलनाला तो कादंबरी अधिक अनुकूल मानतो.

साहित्य आणि सामाजिक जाणीव, परिवर्तन याविषयीचा विचार करताना ग्रामचीचा धुरिणत्व (Hegemony) सिद्धांत पाहणे आवश्यक ठरते. धुरिणत्व ही संकल्पना समाजाच्या जाणिवेच्या सुनियोजित परिवर्तनावर आधारित आहे. एखाद्या सत्ताधारी वर्गाला आपले अस्तित्व आणि स्थैर्य प्रस्थापित करण्यासाठी सामाजिक जाणिवांचे परिवर्तन घडवून आणावे लागते. सत्ताधारी वर्ग (अधिशास्ता) समाजावर सत्ता प्रस्थापित करीत असतो. आपला दबाव सतत ठेवत असतो. परंतु ग्रामचीला जे धुरिणत्व अभिप्रेत आहे ते आपल्या विचारप्रणालीने समाजाच्या सर्व घटकांकडून मान्यता प्रस्थापित करणे आणि सर्वसंमतीने राज्य करणे. एकूणच धुरिणत्व या संकल्पनेत संमती अभिप्रेत आहे. ग्रामचीच्या या धुरिणत्व संकल्पनेत बौद्धिक, नैतिक, सांस्कृतिक नेतृत्वाला प्राधान्य असलेले दिसते. या घटकान्वयेच समाजात योग्य परिवर्तन घडून येऊ शकते. यासाठी केंद्रीय विचारसरणी (central ideology) अधिक फलदायी ठरते. शासन करणारा वर्ग वा वर्ण हा शासित वर्गाच्या संमतीने राज्य करण्यासाठी त्या शासित वर्गाची जाणीव लक्षात घेऊन आपली जीवनसृष्टी अनुकूल करू शकते. यावर मार्क्स म्हणतो, "प्रत्येक युगात अधिशासन करणाऱ्या कल्पना या अधिशासन करणाऱ्या वर्गाच्या कल्पना असतात म्हणजेच जो वर्ग सत्ता गाजवितो तोच वर्ग बौद्धिक सत्ताही गाजवितो." एकूणच वर्णव्यवस्थेवर उभा राहिलेला समाज हे अशा धुरिणत्वचे उदाहरण आहे. पुरुषांचे स्त्रियावरील वर्चस्व हे सर्व संमतीच्या वर्चस्वाचे उदाहरण आहे. समाजात जेव्हा उत्पादनसंबंध आणि उत्पादनपध्दती

यामध्ये बदल होतो तेव्हा सामाजिक परिवर्तनाला सुरूवात होते तेव्हाच खरे प्रतिधुरिणत्व (counter legemony) साकारते. नवी मूल्ये, विचारधारा साहित्यातून व्यक्त होतात. उदाहरणर्थ, दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य.

लेनिनचा साहित्यविचार हा मुख्यतः वर्गसंघर्ष आणि क्रांतिकारक जाणिवा व्यक्त करणारा आहे. साहित्यकृतीची बांधणी ही सामाजिक संघर्ष आणि सामाजिक परिवर्तनाची गती या जाणिवेतून करावी अशी भूमिका तो घेताना दिसतो. तर गॉर्की मानवी परिणामाची जोड देत सामान्य माणसाच्या असामान्य कृतीकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न वास्तववादाच्या दृष्टीकोनातून करताना दिसतो. गॉर्कीचा साहित्यविचार हा 'सामाजिक बांधिलकी' मानणारा आहे. गॉर्कीची विचारसरणी लेनिनला जवळची आहे. गॉर्कीचा साहित्यविचार मार्क्सवादी साहित्यविचाराला कसा प्रेरक आहे, हे के. रं. शिरवाडकर यांनी मुद्देसूद अधोरेखित केलेले आहे. "साहित्य मानववादी असते. माणूस हाच साहित्याचा केंद्रबिंदू असतो ह्याचा गॉर्कीने प्रखर पुरस्कार करून मार्क्सवादी साहित्यविचाराच्या मानववादी चौकटीवर भर दिला. त्याचप्रमाणे लोकभावना साहित्याला तेजस्विता आणते आणि लोकजीवनापासून वियुक्त झालेले साहित्य निष्प्राण अथवा अधः पतित होते या मताची मांडणी केली. साहित्यकृती लोकाभिमुख असावयास पाहिजे हा आग्रह त्याच्या वैचारिक दृष्टीतून अपरिहार्यपणे येतो." (केशव शिरवाडकर, मार्क्सवादी साहित्यविचार, पृ. ५४)

ट्रॉट्स्की हा सामाजिक प्रेरणेवर भर देतो. मानवी जाणिवा या सामाजिक आवर्त प्रत्यावर्तामधून रूप धारण करतात आणि साहित्यातून त्या व्यक्त होतात, असा त्याचा साहित्यविचार आहे. हा साहित्यविचार वास्तववादाचा पुरस्कार करणारा असल्याचे दिसते. तर ल्युकाच हा विचारवंत वास्तवाचे प्रतिदर्शन करण्यासाठी रूप (form) हा एक मार्ग मानतो. मार्क्सवादी विचारामध्ये रूपाचा विचारविमर्श करणारा ल्युकाच हा एक महत्वाचा विचारवंत. त्याने मार्क्सवादी साहित्यविचारात घातलेली भर मोलाची आहे. त्याच्या विवेचनात जीवनवादी दृष्टीकोणाला महत्व आहे. लेखक जी साहित्यकृती जन्माला घालतो त्याची मुळे जीवनविषयक दृष्टीत असतात. कलावंताच्या निर्मितीला तो वास्तवाची नवरचना मानतो. माणूस हेच साहित्याचे केंद्र आहे हे त्याच्या विवेचनातून स्पष्ट होते. विसाव्या शतकातील हा प्रभावी मार्क्सवादी समीक्षक आहे. कार्ल मार्क्स आणि हेगेल यांच्या द्वंद्वात्मक तत्त्वज्ञानाच्या आधारे तो वास्तववाद ही संकल्पना मांडतो. त्यातूनच त्याने वास्तववादाची सार्थ मांडणी केली आहे.

रशियन क्रांतिनेता लिऑ ट्रॉट्स्की (Leon Trotsky) हा एक प्रगल्भ मार्क्सवादी राजकारण आणि साहित्याचा अभ्यासक. त्याने साहित्यस्वरूप याविषयीची चर्चा केली आहे. त्याने रशियन रूपवादाच्या भूमिकेला छेद दिला होता. रूपवादी आशयाला विरोध करतात, तो ट्रॉट्स्कीला मान्य नव्हता. कलेत आशयाला, जीवनानुभूतीला त्याने महत्त्व दिले होते. रूपवादी श्क्लॉव्हस्की याने मार्क्सवाद्याना एका

पुस्तिकेद्वारे पाच प्रश्न ठेवून आव्हान दिले होते. त्याला ट्रॉट्स्कीने मार्क्सवादी भूमिकेतून उत्तरे दिली आहेत. (पहा - रशियन रुपवाद : साहित्याचे साहित्यपण, के. रं. शिरवाडकर यांच्या साहित्यवेध या ग्रंथात) यातून मार्क्सवादी भूमिका स्पष्ट झाली आहे. ट्रॉट्स्कीच्या मते साहित्याचे आकलन करून घेण्यासाठी तत्कालीन काळ, समाज, संस्कृती, जीवनधारणा समजून घेणे आवश्यक ठरते. कोणताही समाज संपूर्णपणे स्वतःची नवी कला निर्माण करू शकत नाही. त्यामध्ये एक सांस्कृतिक सातत्य असते.

कलेच्या निर्मिती प्रक्रियेपासून त्याच्या सौंदर्यदृष्टिपर्यंतचे विवेचन करताना मार्क्स निसर्ग आणि माणूस यांच्यातील सहसंबंध अधोरेखित करीत मानवी कलात्मक जाणीव मानवीकरण या संकल्पनेतून स्पष्ट करतो. निसर्गावर प्रभुत्व मिळविण्याच्या प्रयत्नातून प्राथमिक कलात्मक जाणीव होत गेली. पुढे प्रगतावस्थेत वस्तूकडे पाहण्याची व्यवहारवादी दृष्टी निर्माण झाली. त्यातून सर्जक कलात्म दृष्टी वाढत गेली. याच सौंदर्य जाणिवेतून कलेचे विविध प्रकार निर्माण होत गेले. त्यातून कलेचे स्वायत्त आणि रूप प्राप्त झाले. मार्क्स आणि एंगल्स यांनी कलेच्या ऐतिहासिक उगमाचे भौतिकवादी स्पष्टीकरण केले आहे. यामध्ये वास्तवाकडे कलात्मक दृष्टीने पाहिले गेले. या सर्वांमध्ये श्रम या घटकाला प्राधान्य दिले गेले. वास्तव आणि सौंदर्य यामधून माणसाची कलात्मक दृष्टी विकसित होत गेली. हा एक सामाजिकतेचा भाग आहे, हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

- **सारांशरूपाने मार्क्सवाद आणि मार्क्सवादी साहित्यविचार यासंदर्भात काही मुद्दे पुढीलप्रमाणे सांगता येतील.**

    १) मार्क्सवाद एक गतिमान आणि परिवर्तनशील तत्वज्ञान आहे.

    २) मार्क्सचा द्वंद्वात्मक भौतिकवाद आणि मार्क्स-एंगल्स यांनी कला साहित्य या संदर्भात मांडलेले विचार ही दोन तत्वे मार्क्सवादी साहित्याप्रमाणे असलेली दिसतात.

    ३) मानवी जीवनाचा विकास हा मार्क्सवादी तत्वज्ञानाचा आणि साहित्याविचाराचाही पाया आहे.

    ४) मार्क्सवादी दृष्टी मानवमानवादी आहे. त्यामुळे मानव आणि मानवी इतिहास हे मार्क्सवादाचे सूत्र असल्याचे दिसते.

    ५) मार्क्सवाद वास्तववादावर श्रद्धा ठेवून साहित्याचे मूल्यमापन करण्यावर भर देतो.

    ६) मानवी इतिहास हा वर्गसंघर्षाचा इतिहास आहे. समाज संस्कृतीच्या विकासात आर्थिक रचना अंतर्भूत असते असा मार्क्सवादाचा विश्वास आहे.

    ७) मार्क्सवादी साहित्यविचार विश्लेषणात्मक आहे. कलाकृतीचे विश्लेषण करून प्रत्येक घटकाचा आणि कलाकृतीचा कस कशात आहे ते सांगण्याचा प्रयत्न करतो.

    ८) मार्क्सवादी साहित्यविचार हा साहित्य आणि जीवन याविषयीचा विचार आहे.

९) वर्ग संघर्षावर आधारित मानवी इतिहास निर्माण होतो. सरंजामशाही, भांडवलशाही, कामगारशाही यामधून समाज प्रगतीकडे वाटचाल करेल आणि अंतिमतः वर्गविरहित असा साम्यवादी समाज, समाजरचना अस्तित्वात येईल हे मार्क्सवादाचे ऐतिहासिक भौतिकवादावर आधारित भविष्यकथन आहे.

१०) मार्क्सवादी विचारभूत समाजव्यवस्था ही उत्पादन साधनांवर सामूहिक मालकी असावी; अर्थव्यवस्था समान असावी आणि भौतिक वा वैज्ञानिकीकरणावर भर असावा अशी आहे. तसेच काम आणि पैसा ही वितरणव्यवस्था समानतेच्या तत्त्वानुसार आणि वर्गविहीन असावी अशाप्रकारची समाजव्यवस्था अभिप्रेत आहे.

मार्क्स आणि एंगल्सच्या मते कला आणि साहित्य हे तत्कालीन सामाजिक परिस्थितीचे, संबंधाचे प्रतिबिंब असते. साहित्याचे वास्तववादी स्वरूप, त्याचा कल, स्वातंत्र्य आदिविषयी त्यांनी आपली मते नोंदविली आहेत. साहित्याचा सामाजिक संदर्भ, विरोध-विकासवादी ऐतिहासिक दृष्टी या अनुषंगाने साहित्याचा विचार विमर्श केला आहे. त्यातून पुढे मार्क्सवादी साहित्य समीक्षा आकारास येत गेलेली आहे.

## ३.५ मार्क्सवादी समीक्षा

साहित्य आणि समाज यांचा अतूट संबंध आहे. साहित्यातून समाज आणि समाजातून साहित्य निर्मित होण्यास मदत होत असते. याअनुषंगाने अनेक साहित्यप्रवाहातूनही चर्चा झालेली आहे. साहित्य आणि समाज यांचा परस्परसंबंध अनेक अभ्यासकांनी विशद केलेला आहे. यामध्ये मार्क्सवादी साहित्यविचाराला महत्वाचे स्थान आहे. मार्क्सवादी साहित्यविचार आणि समीक्षा साहित्यकृतीच्या आशयाला महत्व देते. साहित्याचा समाजाशी असलेला अतूट संबंध आग्रहाने नोंदविण्याची भूमिका घेते. समाजात क्रांतिकारी परिवर्तन घडवून आणण्यात साहित्य मोलाची कामगिरी बजावू शकते यावर त्यांचा भर आहे. मार्क्सवादी समीक्षा वाचकांना क्रांतिकारी कृतीच्या दिशने प्रोत्साहित करावे ही भूमिका घेताना दिसते. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरपासून मार्क्सवादी समीक्षेने विविधांगी स्वरूपात मोलाची भर घातली आहे. विसाव्या शतकात या समीक्षेने रूपवादी सामीक्षेला आव्हान दिले होते. साहित्यकृतीमधील आशय, सामाजिक-आर्थिक घटक यांना समीक्षाविचारात मार्क्सवादी समीक्षेने महत्व दिले. साहित्याने वास्तव अधोरेखित करावे हे तत्व मार्क्सवादी साहित्यविचारकेंद्री आहे. तर मार्क्सवादी समीक्षा सामाजिक-आर्थिक वास्तवाला प्राधान्यक्रम देते.

मार्क्सवाद द्वंद्वात्मक भौतिकवाद, ऐतिहासिकतेचा वैशिष्ट्यपूर्ण सिद्धांत आणि क्रांतिकारी प्रगतीवादी व्यक्तीच्या अंतिम विजयावरील श्रद्धा यावर भर देतो. मार्क्सवादी समीक्षा देखील याच संकल्पनांनी उभी राहिलेली आहे. कार्ल मार्क्सचा पाया आणि इमला हा सिद्धांत मार्क्सवादी साहित्यविचारात

महत्वाचा आहे. आर्थिक व्यवस्थेतील उत्पादन संबंधाना पाया मानून राजकारण, तत्वज्ञान, साहित्यकला, विचारप्रणाली यांची इमारत (इमला) उभी आहे. म्हणूनच वर्ग, वर्गवर्गातील आर्थिक संबंध समजून घेणे आवश्यक ठरते. हा मार्क्सवादी समीक्षेचा एक महत्वपूर्ण दावा आहे. त्यानूसार आर्थिक-सामाजिक वास्तव मार्क्सवादी साहित्य समीक्षेत महत्वाचे ठरते.

कार्ल मार्क्स यांनी कला आणि कलाविषयक विविध प्रश्न यांवर प्रकाशझोत टाकताना काही कल्पना समोर ठेवल्या आहेत. या कल्पना मूलतः मार्क्सवादी समीक्षाविचाराचा पाया आहे. त्यातूनच कार्ल मार्क्सचे विचार समोर आलेले आहेत. मार्क्सच्या मते, आर्थिक संबंध हा समाजाच्या इमारतीचा पाया आणि सामाजिक, राजकीय, नैतिक, धार्मिक विचारप्रणालीची अतिरचना उभी राहते. कला ही या अतिरचनेचाच भाग आहे. आर्थिक पाया आणि अतिरचना हे दोन्ही घटक परस्परांना प्रभावित करतात. या मार्क्सच्या विचारातूनच Base & super structure हा सिद्धांत आकारास आलेला आहे. या सिद्धांताने मार्क्सवादी समीक्षाविचाराला चालना दिली. सामाजिक-आर्थिक विचाराच्या आधारावर हा समीक्षाविचार आकाररूप घेत विस्तारत गेला.

मार्क्सवादी समीक्षेने साहित्य, समाज, साहित्यसमाजाची निर्मिती, स्वरूप, वर्गीयरचना आदींच्या स्वरूपविचाराला प्राधान्य दिलेले दिसते. साहित्यकृतीच्या सामाजिकतेवर भर देणारा हा समीक्षाविचार आहे. एखादी व्यक्ती ही समाजाच्या नीतिनियमांनुसार परिस्थितीनुरूप वास्तवात घडत असते. व्यक्ती, समाजवास्तव यांचे आकलन या समीक्षाविचारांमागे आहे.

साहित्य आणि कला यासंबंधी कार्ल मार्क्स आणि एंगल्स यांनी जे विचार मांडले त्यातून मार्क्सवादी समीक्षा आकररूप घेत गेली. पुढील मार्क्सवादी समीक्षकांनी आर्थिक निश्चिततावाद, वैशिष्ट्यपूर्ण इतिहासदृष्टी, प्रगतिवादी दृष्टिकोण ही तत्वे मानली. फ्रांट्स मेरिंग व शिऑर्गी प्ल्येखानॉव्ह समीक्षकांनी सर्वप्रथम मार्क्सवादी समीक्षेचा पाया रचण्यास मदत केली. पुढे अनेक समीक्षकांनी मार्क्सवादी समीक्षेविषयी उहापोह केला. त्यातून पुढे 'समाजवादी वास्तववाद, उदरमतवादी मानवतावाद ही परंपरा आली.

मार्क्सवादी समीक्षेत (पश्चिम युरोप) व्यक्तिस्वातंत्र्य, लोकशाही, समता, यांना प्राधान्य देण्यात आलेले दिसते या तीन मूल्यांचा मार्क्सवादी समीक्षेवर प्रभाव पडला. युरोपात युध्दोतर काळात तीन उपपंथ उदयास आले होते.

१) क्रिटिकल रीअलिझम (चिकित्सक वास्तववाद)

२) क्रिटिकल थिअरी (चिकित्सक सिद्धांतवादी पंथ)

३) न्यू लेफ्ट (मवडावा विचार)

डयर्डी ल्युकॉक्सचा चिकित्सक वास्तववाद (क्रिटिकल रीअलिझम), फ्रॅंकफुर्ट संप्रदायाचा चिकित्सक सिद्धांतवादी पंथ (क्रिटिकल थिअरी) आणि फ्रान्स मधील नवडावा विचार (न्यू लेफ्ट) हे तीनही पंथ

munotes.in

समाजवादी (रशिया) वास्तववादापासून बरेच दूर गेलले होते. असे असले तरी या तीनही पंथात काही महत्वाची वैशिष्ट्ये समान होती. हे अशोक जोशी यांनी सांगितले आहे. ती पुढीलप्रमाणे-

१) मानवतावाद, मानवी स्वातंत्र्य व्यक्तिप्राधान्य शोषणमुक्ती परात्मभावरितता, ज्ञानस्वायत्ता या उदारमतवादी विचारांतील प्रमुख जीवनमूल्यांचा स्वीकार;

२) मार्क्सवादी विचारातील ऐतिहासिकतेच्या कल्पनेवरील विश्वास;

३) सांस्कृतिक क्षेत्र व कृतिप्रवणता (प्रॉक्सिस) यांना केंद्रस्थान देणे.''

(मराठी वाङ्मयकोश, पृ.२६१)

मार्क्सवादी समीक्षेमध्ये ल्युकाक्स हा एक महत्वाचा समीक्षक आहे. याच्या चिकित्सक वास्तववादामध्ये समग्रता, प्रातिनिधिकता, समाजवादी परिदर्शन, परात्मता या प्रमुख संकल्पना आहेत. या संकल्पनाद्वारे युरोपात आधुनिक साहित्याबरोबरच श्रेष्ठ साहित्यकृतीची समीक्षा होऊ लागली होती. तसेच ल्युशिअन गोल्डमनने मार्क्सवाद आणि संरचनावाद यांची सांगड घालण्याचा प्रयत्न करून कादंबरी या साहित्यप्रकाराची समीक्षा केली. त्याने 'साहित्य आणि कला व्यक्तीकेंद्रित नसून व्यक्तिपलिकडे जाणारी, स्वनिर्मिती करणारी संरचना असून ती सामाजिक संरचनेला समांतर असते' हा सिद्धांत मांडला. त्याचा हा सिद्धांत मार्क्सवादी विचाराच्या आणि संरचनावादी विचाराच्या जवळ जाणारा आहे. एकूणच मार्क्सवादी समीक्षेत ल्युकाक्स व गोल्डमन हे महत्त्वाचे समीक्षक मानले जातात.

मार्क्सवादी विचार आणि समीक्षा यावर इटालियन मार्क्सवादी विचारवंत आंतॉन्यो ग्रामशी याचा प्रभाव १९७०च्या दशकात पडलेला होता. त्याच्या विचारात श्रम करणाऱ्या घटकाला प्राधान्य आहे. श्रम करणारा घटक समाज परिवर्तनात महत्त्वाची भूमिका बजावत असतो. ग्रामशीने बौद्धिक व सांस्कृतिक श्रमांना आणि ते श्रम करणाऱ्यांना समाज परिवर्तनातील महत्त्वाचे घटक मानले. श्रमिकांनी बुद्धिवंताबरोबर सहकार्य करून सांस्कृतिक व बौद्धिक क्षेत्रात अधिसत्ता स्थापन करावी आणि जीवन व मूल्यवस्थेत बदल घडवून आणावा हा विचार त्याच्या विवेचनात आहे. या विचाराचा प्रभाव मार्क्सवादी विचारावर पडलेला आहे.

मार्क्सवादी समीक्षेचे सुवर्णयुग १९७०च्या दशकात सुरू झाले. या दशकात मार्क्सवादाच्या मूळ गाभ्याचा पूनर्शोध घेऊन समकालीन आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक वास्तवाचे विश्लेषण, अर्थनिर्णयन करून नवे सिद्धांत मांडले गेले. उदाहरणार्थ ईगलटनने साहित्यकृतीला भाषिक संघटन मानले. तर लुई आल्थूजरने कलेला विचारप्रणालीचा भाग मानले. ब्रेख्त या जर्मन नाटककाराने नाटकाच्या समूहनिष्ठतेला महत्त्वाचे मानले. "नाटक बुद्धिनिष्ठ असावे" हा आग्रह त्याने धरला. त्याने व्यक्तिपेक्षा समूहभावना महत्त्वाची मानली. त्याचा हा विचार एकूणच मार्क्सवादी समीक्षेत्त मोलाची भर घालणारा ठरला.

के. रं. शिरवाडकर यांनी गोल्डमनच्या समीक्षापद्धतील तीन दृष्टीकोन सांगितले आहेत ते म्हणतात, "प्रथम संहिता विशिष्ट जीवनदृष्टीची निर्मिती आहे", हे ध्यानात घेतले जाते, दुसऱ्या टप्प्यावर ही जीवनदृष्टी विशिष्ट काळातील एका समूहाचा आणि सामाजिक जीवनाचा परिपाक असते, हे लक्षात घेऊन त्या अनुरोधाने तिची तपासणी केली जाते आणि शेवटी प्रवृत्ती आणि जाणिवा सामाजिक आणि आर्थिक जीवनात मूळ धरून आहेत ह्यांची नोंद घेतली जाते."
(के. रं. शिरवाडकर, साहित्यवेध, पृ. २०३)

मार्क्सवादी समीक्षाविचार कार्ल मार्क्स पासून ते पुढे ल्युकाच, ग्रामची, अडोर्नो, बेंजामिन, गोल्डमन आदी मार्क्सवादी विचारवंतांनी पुढे आणला. अलथ्यूसर, सार्त्र, माक्यूर्ज आदी भाष्यकारानी आपल्या विचारमंथनातून मार्क्सवादी साहित्याची चर्चा केलेली आहे. मूलतः मार्क्सवादी साहित्यविचार समजून घेताना ऐतिहासिक आणि तात्विक अंगाने विचारविमर्श करणे आवश्यक आहे. कारण मार्क्सवादी सहित्याविचार हा मानवी जीवनाला त्याच्या सामाजिक स्थित्यांतराला महत्त्व देतो. पर्यायाने तो याच स्थित्यंतराच्या, परिवर्तनाच्या प्रक्रियेतून विकसित होतो. मार्क्सवाद याच ऐतिहासिकतेचा मागोवा घेऊ पाहताना दिसतो आणि तत्वज्ञानाच्या साहाय्याने साहित्य, कला याचे स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न करतो. आणि सामाजिक संदर्भ हा मार्क्सवादी साहित्य समीक्षेचा महत्वाचा घटक ठरतो. लुनाचास्कींने साहित्याचे सामाजिक विश्लेषण करणे मोलाचे मानले होते. एखाद्या साहित्यकृतीचे आकलन करण्यासाठी सामजिक गती, प्रगतीची पार्श्वभूमी, आर्थिक परिस्थिती समजून घेणे आवश्यक ठरते. लुनाचास्कींच्या मते मार्क्सवादी साहित्यसमीक्षा ही मूल्यमापनात्मक आहे. तो साहित्यकृतीतील सामजिक प्रेरणा शोधण्यावर भर देतो

अमेरिकन मार्क्सवादी साहित्यसमीक्षक फ्रेडरिक जेम्सन (Fredric Jameson) हा हेगेलप्रणित मार्क्सवादी विचारांच्या प्रभावातून आपले सिद्धांतन साकारतो. तो आपल्या साहित्यसमीक्षेचा विचार रूपवाद, संरचनावाद, विरचनावाद या आधुनिक विचारधारांच्या संदर्भात करतो. 'मार्क्सिझम ॲण्ड फॉर्म' (Marxism and form) या ग्रंथात आपल्या समीक्षा पद्धतीला त्यांनी 'द्वंद्वात्मक समीक्षा' (Dialectical criticism ) असे म्हटले आहे. हेगेल, मार्क्स यांच्या विचारांमधून तो सर्वसमावेशक अशी भूमिका घेताना दिसतो. घटक-समष्टीसंबंध विकास, द्वंद्व विकास, साकल्याची संकल्पना (totality) यांना अधिक महत्त्व देतो. तसेच मार्क्सवाद आणि रूप-कल्पना या ग्रंथात मार्क्सवादी समीक्षादृष्टीतून 'रूपा'चा विचार केला आहे. यामध्ये आंतरिक रूपाकडे जाण्याचा प्रयत्न करतो. मूलतः साहित्यकृतीचा आशय कधीही रूपहीन नसतो. तो सामाजिक जीवनाचा एक भाग असतो. जेम्सनच्या मते "आशयाला अर्थ-निरूपणाची अथवा स्पष्टीकरणाची जरूरी नसते कारण तो आधीच अर्थपूर्ण असतो; तो आधीच एक सामाजिक आणि ऐतिहासिक अनुभव म्हणून सिद्ध (झालेला) असतो." (के. रं. शिरवाडकर, साहित्यवेध, पृ. २२६ ) ते पुढे म्हणतात, "हेगेलवादाच्या मते कला उत्तरोत्तर आपले मूर्त स्वरूप टाकून

munotes.in

अमूर्तशा अंतिम सत्यात विलीन होते, तर मार्क्सवादाच्या मते ती आपल्या विकासमार्गावर अमूर्तता सोडीत अधिकाधिक मूर्त, स्पष्ट आणि वास्तवाभिमुख होते. हा भेद लक्षात घेता हेगेलवाद्यांना उच्च कला तात्विक असते असे वाटणे आणि मार्क्सवाद्यांना ती सामाजिक असते असे वाटणे साहजिकच आहे. मार्क्सवादी समीक्षेच्या दृष्टीतून कलाकृतीचे सामर्थ्य अथवा तिची दुर्बलता तिच्यातील अंगभूत सामाजिक आणि ऐतिहासिक आकलनावर अथवा त्यांच्या अभावावर अवलंबून राहिले हे स्पष्ट आहे; आणि हे सामर्थ्य तिच्या अंगी असणे, अधिकाधिक असणे हे मानवी भवितव्याच्या दृष्टीने आवश्यक आहे.” ( के. रं. शिरवाडकर , साहित्यवेध पृ. २२७)

लेनिनचा एक विश्वासू सहकारी म्हणून ए. व्ही. लुनाचार्स्की होता. लुनाचार्स्की हा साहित्यसमीक्षक आणि कला अभ्यासक म्हणून मार्क्सवादी अभ्यासात प्रसिद्ध होता. तो साहित्यकृतीचे विश्लेषण समाजशास्त्रीय भूमिकेवरून करावे हे प्रमुख तत्त्व मानतो. तो रूपवादी समीक्षेला विरोध करतो. मार्क्सवादी समीक्षकांविषयीची त्याची भूमिका जीवनविषयक आहे. समीक्षकाने शिक्षकाची भूमिका बजावत नवोदित लेखकांना मार्क्सवादी भूमिकेचे मार्गदर्शन करावे. लेखकाचे कलात्मक दोष दाखवून द्यावे आणि स्वतःची भूमिका ठामपणे मांडावी. पर्यायाने तसा निर्भयपणा समीक्षकाच्या अंगी असावा, अशी भूमिका लुनाचार्स्की याची आहे.

ब्रिटनमधील समीक्षक जॉर्ज थॉम्सन साहित्यानिर्मितीची भूमिका मार्क्सवादी अंगाने घेतात. काव्यनिर्मिती आणि काव्यविकास याविषयीची त्यांनी केलेली समीक्षा मार्क्सवादी अंगाने जाणारी आहे. ‘सामाजिक पार्श्वभूमी’ हा घटक त्यांच्या अभ्यासकेंद्री आहे. मानवी जीवन, भाषा हया घटकान्वये ते भौतिकवादाशी सुसंगत अशी माडंणी करतात. ‘फिशर’ हा समीक्षकही साहित्य निर्मितीच्या प्रश्नाचा विचार भौतिकवादानुसार करतो. ‘विचार’ मूलतः वास्तव अनुभवातून निर्माण होतात आणि साहित्यकलेत भाषा हा एक घटक महत्वाची कामगिरी करीत असतो. भाषानिर्मिती भौतिकवादी उपपत्ती त्याने मांडली आहे. फिशर ‘अनुभव-वास्तव-अनुभव’ हा कलानिर्मितीचा प्रमुख आधार मानतात. तर गॉकीने साहित्य आणि समाज यांचा परस्परसंबंध अधोरेखित केलेला आहे. समाजवादी वास्तववाद (Socialist Realism) हा सिद्धांत मांडला आहे. हा सिद्धांत मार्क्सवादी साहित्याचे एक प्रमुख वैशिष्ट मानले जाते. त्याचा हा सिद्धांत विरोधविकासात्मक भौतिकवाद आणि ऐतिहासिक भौतिकवाद या प्रमेयांवर आधारित आहे. त्यात समाजाच्या भविष्याचे सूचकत्व असते. त्याचा हा विचार समीक्षेत गतिशील समीक्षामूल्य स्वरूपातील आहे.

प्लेखानोव्ह साहित्य समीक्षकेत सौंदर्यमूल्याला प्राधान्य देतो. सौंदर्यमूल्याचा विचार तो ऐतिहासिक भौतिकवादाच्या अनुषंगाने करतो. सौंदर्याचा संबंध उपयुक्तेशी त्याने जोडला आहे. मार्क्सवादी समीक्षकाची भूमिका ही विश्लेषकाची असावी. कला कशी असावी वा असू नये हे त्यांने सांगू नये तर कला वा साहित्य हे सामाजिक परिप्रेक्ष्यातून पाहत समाजदर्शनाच्या प्रगतीचा वा अधोगतीचा आलेख

कसा व्यक्त होतो आहे त्याचे विश्लेषण करावे. हे करीत असतानाही कलेच्या स्वायत्ततेला बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. कलेला साधन म्हणून पाहता कामा नये. प्लेखानोव्हने अशा समीक्षकाना विरोध (कला साधन म्हणून पाहणाऱ्या) केला आहे. क्रिस्तोफर कॉडवेल सौंदर्यमूल्याचा मार्क्सवादी भूमिकेतून समाजाच्या संदर्भात नव्याने विचार मांडतो. त्याच्या विचाराचा, समीक्षेचा प्रभाव मराठी मार्क्सवादी समीक्षकांवरही पडलेला आहे. कॉडवेल मन, जाणिवा आणि भाषा या अनुषंगाने जी मीमांसा करतो ती ऐतिहासिक भौतिकवादसापेक्ष आहे. साहित्याचे सामाजिक स्वरूप त्याला अभिप्रेत आहे. जसे मानवी समाज बदलतो तसेच कलेमध्ये ही बदल होत असतो हा ऐतिहासिक भौतिकवादाचा नियम त्यालाही अभिप्रेत होता या नियमानुसार वर्गानिर्मिती, श्रमनिर्मितीचा परिणाम साहित्यावर होतो. साहित्य समीक्षा करताना कॉडवेल साहित्याच्या आशयाचा विचार प्राधान्यक्रमाने करतो. साहित्याचा आशय समाजाला किती उपकारक ठरतो हे तो महत्वाचे मानतो तसेच सौंदर्य दृष्टिकोनाविषयीच्या कल्पनेला तो बदलती प्रवाही दृष्टी मानतो. सौंदर्यकल्पना सतत बदलत राहते म्हणजेच प्राचीन सौंदर्यकल्पना, भांडवलशाही सौंदर्यकल्पना वेगवेगळी आहे. एकूणच सौंदर्य हे वास्तवाची लौकिकाची निर्मिती आहे.

उपरोक्त सर्व समीक्षकांच्या विचारांचा परामर्श घेतला असता मार्क्सवादी समीक्षा मार्क्सवादी विचारप्रमेयावर आधारित असून ती अनेक अंगानी समृद्ध होत गेलेली आहे. साहित्यनिर्मितीच्या प्रक्रियेचा शोध घेण्याची भौतिकवादी अभ्यासपद्धती मार्क्स-एंगल्स यांनी सूचित केलेली आहे. लेनिन लुनाचार्स्की यांनी समीक्षा तत्वांचे उपयोजन कसे करावे याचे निर्देशन केले. सर थॉम्सनने कविता, नाटक, महाकाव्य या साहित्यप्रकारांकडे पाहण्याची मार्क्सवादी दृष्टी दिली. ल्युकासने वास्तव प्रश्नांची मार्क्सवादी अंगाने चिकित्सा केली. फिशरने साहित्य आणि कला यांची आवश्यकता काय आहे आणि शोषणमुक्त समाजव्यवस्था कशी निर्माण होऊ शकते याविषयाची चर्चा केली आहे. गॉकीने समाजवादी वास्तवतावादाची मांडणी करुन साहित्य, साहित्यिक यांची भूमिका व्यक्त केली आहे. मार्क्सवादी समीक्षेचे समाजवादी वास्तववाद हे एक वैशिष्ट्य वा लक्षण ठरलेले आहे. कॉडवेलने विरोध विकासात्मक भैतिकवादाच्या आश्रयाने साहित्यनिर्मितीची उपपत्ती मांडली आहे. तर प्लेखानोव्हने मार्क्सवादी समीक्षेअंतर्गत सौंदर्यशास्त्र उभे करण्याचा प्रयत्न केला आहे.

मार्क्सवादी साहित्य आणि समीक्षाविचार लक्षात घेताना आपणांस मार्क्सचा सिद्धांत जसा समजून घेणे आवश्यक ठरते तसेच मार्क्सवादी विचारवंत, समीक्षक यांचा साहित्य, कलाविषयक दृष्टिकोणही समजून घ्यावा लागतो. त्यांनी मार्क्सवादी साहित्यसमीक्षेला दिलेली चालना महत्त्वाची आहे. कार्ल मार्क्सचा साहित्य आणि समाजविषयक दृष्टिकोण पुढील अनेक विचारवंत, समीक्षकांनी तो वेगवेगळ्या अंगाने पुढे विकसित केलेला आहे.

मार्क्सवादी समीक्षेचा समाजशास्त्रीय समीक्षेवर प्रभाव पडलेला आहे, असे असले तरी समाजशास्त्रीय आणि मार्क्सवादी समीक्षापद्धती एक नाहीत, हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे कारण मार्क्सवादी समीक्षेत अर्थरचनेला, अर्थशास्त्राला महत्त्व आहे. तर समाजशास्त्रीय समीक्षेत समाजरचना, समाजशास्त्र यांना महत्त्व आहे. समाजरचनेचे घटक आणि साहित्यसंरचनेचे घटक याचे अन्योन्यसंबंध स्पष्ट करणे समाजशास्त्रीय समीक्षेचे मुख्य कार्य आहे. माणूस हा समाजाचा एक महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे माणूस आणि समाज यांच्यातील परस्परसंबंधांतून मानवी कृती घडत असते. एखाद्या विशिष्ट कलाकृतीची निर्मिती ही विशिष्ट काळात, विशिष्ट समाजात, संस्कृतीत होत असते. त्यामुळे साहित्याला एक सामाजिक घटित मार्क्सवादी साहित्यविचारात मानले गेले आहे. कार्ल मार्क्सचा साहित्य आणि समाजविषयक दृष्टिकोण एंगल्स, लेनिन, जॉर्ज ल्यूकाच, गोल्डमन, रेमंड विल्यम, पिएट माशरे, अडोर्णो वोलोसिनोव इत्यादींनी अधिक विस्ताराने पुढे आणला. साहित्यगत पात्र, भाषा, संरचना, संघर्ष, परिणाम आदींचा विचार या सर्व विचारवंतांनी वेगवेगळ्या अंगांनी केलेला आहे. या विचारांमधून प्रतिबिंबवादी नमुनारूप (Reflection Model), निर्मितीवादी नमुनारूप (Production Model), विकासवादी नमुनारूप (The Genetic model), न-ज्ञान नमुनारूप (The Negative Knowledge Model), भाषाकेंद्री नमुनारूप (Language Contred Model) ही मार्क्सवादी विचारांधून पाच नमुनारूपे उदयास आलेली आहेत. विसाव्या शतकात साहित्यचिकित्सेच्या अनुषंगाने मार्क्सवादी साहित्यविचाराची ही पाच नमुनारूपे निर्माण झालेली दिसतात.

मानवी जीवन हे एक सामाजिक वास्तव आहे. याच सामाजिक वास्तवातून साहित्यनिर्मिती होत असते. समाजाचा त्यातील वास्तवाचा परिणाम साहित्यावर होत असतो. मार्क्सवादी समीक्षक साहित्य आणि समाज यामधील परस्परसंबंध तपासतात. त्याचबरोबर वर्तमान, भविष्य आणि समाजात 'वर्ग', वर्गविहिन समाज कसा असावा या विषयीच्या चर्चा संकल्पनाद्वारे करतात. साहित्यबाह्य राजकिय, नैतिक कसोट्या याआधारे मूल्यमापनात्मक व निर्णायक समीक्षापद्धतीचा अवलंब करतात. समाज, समाजाचे लागेबांधे, आणि लेखकनिर्मित साहित्यकृतीचा ध्वन्यर्थ याविषयी भूतकालीन कल्पना कोणत्या होत्या, त्या आता कशा आहेत, त्या कशा असावयास हव्या हे सांगण्यावर समीक्षक भर देतात. डॉ.स.गं.मालशे याविषयी म्हणतात, "साहित्य आणि समाज यांचे ते केवळ अभ्यासकच नसतात, तर भविष्यवेत्ते, शास्ते व प्रचारकही असतात आणि ही उभयविध प्रयोजने परस्परांपासून विभक्त राखणे त्यांना अवघड जात असते." (समाजशास्त्रीय समीक्षा, डॉ.स.गं.मालशे (अनु))

'द क्रिटिक ऑफ पॉलिटिकल इकॉनॉमी' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत कार्ल मार्क्सने साहित्य आणि समाज यांच्यातील नाते सूक्ष्मपणे लक्षात घेतले आहे. विशिष्ट काळात झालेला कलेचा विकास आणि सामाजिक विकास, भौतिक सामग्रीचा पाया आणि व्यवस्थापन यंत्रणा यातील संरचना यामध्ये साक्षात संबंध नसतो हे सांगितले आहे. तसेच सामाजिक प्रक्रियेमधील सामाजिक संबंध, उत्पादनशक्ती,

जाणीव या अंगामध्ये आधुनिक काळात श्रमविभागाच्या तत्वामुळे कसा अंतर्विरोध निर्माण होतो त्याचे ही विवेचन केले आहे. एकूणच, कार्लमार्क्सची धारणा ही भविष्यात वर्गविरहित समाजात श्रमविभाग नष्ट होईल आणि कलावंत हा समाजाशी एकात्म होईल अशी होती. मार्क्सवादी समीक्षा एखाद्या लेखकाच्या साहित्यकृत्तीमधील गर्भित सामाजिक हेतू उघड करून दाखवित असते. त्यातून तिचे सामर्थ्य प्रकट होत असते. हे एक महत्त्वाचे वैशिष्ट या समीक्षापद्धतीचे आहे.

फ्रेंच अभ्यासक तेन याने वंश (race), पर्यावरण (milieu), युग (काळ) (moment) या घटकांद्वारे साहित्य आणि समाज या विषयीची सैध्दांतिक मांडणी केली आहे. सामाजिक परिस्थिती, त्या परिस्थिती घडलेले मानवी मन यांनी विशिष्ट काळातील कला निर्धारित होते. (A work of art is determined by an aggregate which is the general state of the mind and surrounding circumstances.) हा तेन यांचा विचार व्यक्तीचे मन हे विशिष्ट सामाजिक वातावरणाने घडत असते, हे अधोरेखित करणारे आहे. त्यांच्या race, milieu आणि moment या त्रिसूत्री मधील moment मध्ये येणारे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक घटक हे वातावरणाशी निगडित असतात. लेखकाच्या कलाकृतीतील सभोवताल हा लेखकाच्या सभोवतालाला काहीसा कवेत घेऊ पाहणारा असतो. तेनच्या मांडणीत भौगोलिक परिस्थितीपासून ते राजकिय वातावरणापर्यंतच्या अनेक प्रेरणांचा समावेश केला आहे. या अनुषंगाने मराठी साहित्याचा विचार केला तर प्रारंभीच्या संतसाहित्याची भक्ती ही प्रेरणा दिसते तर पुढे जाऊन विसाव्या शतकात समाज सुधारणा या अनुषंगाने लेखन झालेले आहे. फ्रेंच समीक्षक द बोर्नोल्ड, 'साहित्य हे समाजाचा आविष्कार' (literature is an expression of society) समाजातील अनेक सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकिय आदींना साहित्य कवेत घेत असते. त्यामुळे साहित्य आणि समाज यांचा निकटचा संबंध आहे.

कार्ल मार्क्स यांच्या सिद्धांतनातील ऐतिहासिक भौतिकवाद महत्वपूर्ण ठरलेला आहे. कारण मार्क्सप्रणित साहित्यसमीक्षेतील समाजवादी वास्तववावदाचा (socialist realism ) उगम यातूनच झालेला आहे. मार्क्सवादी विचारप्रणालीचे सूत्र गो. म. कुलकर्णी यांनी नोंदविले आहे ते येथे पाहू. "The mode of production in material life determine the general character of social, political and spiritual process of life, it is not the consciousness of men that determines their existence, but on the contrary their social existence determines their consciousness." (गो. म. कुलकर्णी, नवसमीक्षा, (संपा.) पृ. १०४) हे कार्ल मार्क्स यांचे प्रसिद्ध सूत्र आहे. यातून ऐतिहासिक भौतिकवाद (Historical Materalism) हे सिद्धांतन साकारले आहे. कोणत्याही कलेत वास्तव जीवनाचे घटक असतात. जसे की उत्पादनसाधने, उत्पादनपद्धती यातून निर्माण होणारे वर्ग त्यांचे परस्परसंबंध, त्यातून निर्माण होणारे प्रश्न, विचारात्म उत्तरे आदीतून एक विचारात्म संघटना तयार होते. लेखकाला वा कलावंताला या सर्व बाबी लेखनास उद्युक्त करणाऱ्या

असतात. समाज, समाजवास्तव युगभान सांस्कृतिकता, राजकियता आदीच्या आधारे साहित्य निर्मिले जात असते. साहित्य आणि समाज यांचा अन्योन्यसंबंध स्पष्ट होत असतो. समाजशास्त्रीय समीक्षेचेही हे एक मुख्य प्रयोजन आहे. समाजाची संरचना संस्कृती त्यातील विविध घटक यांच्यांशी कसा आणि कोणत्या प्रकारे संबंध येतो हे दाखविणे समाजशास्त्रीय समीक्षेचे एक महत्वाचे कार्य आहे. एकूणच मार्क्सवादी समीक्षेचा समाजशास्त्रीय समीक्षेवर प्रभाव आहे तरीही मार्क्सवादी आणि समाजशास्त्रीय या दोन्ही भिन्न समीक्षापध्दती आहेत हे आपण लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

मार्क्सवादी विचार आणि समीक्षेने अनेक विचारप्रवाहांवर प्रभाव पाडलेला होता. स्त्रीवादी साहित्यविचारालाही तो पूरक ठरलेला दिसतो. मिशेल बारेट आणि ज्यूलिआ क्रिस्तेवा या स्त्रीवादी समीक्षकांनी मार्क्सवादी दृष्टीकोनातून स्त्रियांच्या मानसिक, सांस्कृतिक दमनाचा विचार करून विषम भौतिक वास्तवाला जबाबदार धरले होते. भांडवलशाहीत स्त्रीशोषण कसे होत गेले त्याचे विविध प्रकार कोणते या विषयाकडे सूक्ष्मपणे पाहण्यास स्त्रीवादी विचारास मार्क्सवादी समीक्षाविचार पूरक ठरला होता. मूलतः मार्क्सवादी स्त्रीवादाचा उगम स्त्रियांच्या शोषणाचे मूळ भांडवलशाहीत शोधण्याच्या प्रयत्नातून झाला. सामाजिक वर्गरचनेमुळे निर्माण होणारी विषमता हे एक या भूमिकेचे विचारसूत्र आहे. कौटुंबिक श्रमांना ‘श्रम’ हा दर्जा मिळावा आणि त्याचे मोल मिळावे ही भूमिका या स्त्रीवादात असलेली दिसते. स्त्रियांना मिळणारा दुय्यम दर्जा, सामाजिक अप्रतिष्ठा, असमान संधी, कमी रोजगार दर या बाबींना मार्क्सवादी स्त्रीवादाने विरोध केलेला आहे.

## ३.६ मार्क्सवादी साहित्यसमीक्षा वैशिष्टे

१) मार्क्सवादी साहित्यसमीक्षा मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिकवादाच्या परिप्रेक्ष्यातून आकाररूपास आली आहे.

२) मार्क्सवादी जीवनदर्शन आणि मार्क्सवादी समीक्षा यांचे प्रणेते कार्लमार्क्स आणि फ्रेडरिक एंगल्स हे आहेत. त्याच्या कला-साहित्यविषयक भूमिकेतून साहित्यसमीक्षा आकारास आली आहे. ऐतिहासिक आणि विरोधविकास भौतिकवाद या मूलप्रमेयांच्या आश्रयाने सामाजिक प्रश्नानंची चिकित्सा केली गेली.

३) ऐतिहासिक भौतिकवाद हा मार्क्सवादी साहित्यसमीक्षेचा आधारस्तंभ आहे. या नियमाने शासकीय संस्था, राजकारण, धर्म, नीतिमत्ता याकडे पाहण्याची नवी दृष्टी दिली.

४) मार्क्सवादी समीक्षकांना जीवनवादी, मानववादी, सामाजिक भूमिका मान्य आहे.

५) लुकाचने आशय आणि रूपाच्यासंदर्भात द्वंद्वात्मक संयोगसंबंधी विचार केला आहे. हा विचार मार्क्सवादी साहित्यसमीक्षेला चालना देणारा ठरला आहे.

munotes.in

६) प्रस्तुत समीक्षापद्धती विशिष्ट कलाकृतीतून/साहित्यकृतीतून समकालीन सामजिक, राजकीय, आर्थिक संबंध कसे व्यक्त करते याचा शोध घेते.

७) मार्क्सवादी साहित्यसमीक्षणात आशय–अभिव्यक्तीवर भर देत आशयाच्या मौलिकतेला प्राधान्य दिले आहे.

८) मार्क्सवादी मुलप्रमेयांवर (ऐतिहासिक भौतिकवाद, विरोधविकासात्मक भौतिकवाद, शोषणमुक्त समाजनिर्मिती) निष्ठा ठेऊन मार्क्सवादी समीक्षेला अनेक अगांनी विकसित केले.

९) मार्क्सवादी समीक्षक साहित्यकृतीचा समाजसापेक्ष विचार करताना दिसतात. आणि आशयाचा समाजसापेक्ष विचार करतात.

१०) मार्क्सवादी साहित्यसमीक्षेला वस्तुनिष्ठ करण्यास ऐतिहासिक भौतिकवाद महत्त्वपूर्ण ठरला आहे.

## ३.७ मार्क्सवादी मराठी साहित्य आणि समीक्षा

मराठीतील मार्क्सवादी सहित्यविचाराचा प्रारंभ मुख्यतः १९३२ पासून सुरू होत गेलेला दिसतो. सह्याद्री, प्रतिमा या मासिकांमधून लालजी पेंडसे, पु.य.देशपांडे, के.नारायण काळे, अनंत काणेकर, प्रभाकर पाध्ये इत्यादी अभ्यासकांनी मार्क्सवादी अंगाने समीक्षालेखन केले. लालजी पेंडसे यांचे ‘साहित्य आणि समाजजीवन’ (१९३५) हा मराठी मार्क्सवादी समीक्षाविचारातील पहिला ग्रंथ मानला जातो. गं.बा.सरदार, दि.के.बेडेकर, शरदच्चंद्र मुक्तिबोध या अभ्यासकांनी आपल्या साहित्यसमीक्षापर लेखनात मार्क्सवादी जीवनदृष्टीला अधिक महत्त्व देत लेखन केले आहे.

लालजी पेंडसे यांच्या वर्गीय वांङ्मयीन दृष्टीला समकालीन समीक्षक, अभ्यासक यांनी (१९३५-४०) विरोध दर्शविला होता. असे असले तरी अनेक अभ्यासक समीक्षकांनी या वांङ्मयीन भूमिकेतील विचारप्रणाली समजून घेतली. या विचारप्रणाली मधील सत्त्व मराठी साहित्यविचार आणि समीक्षेत टिकून राहिले आहे. मराठी साहित्यात मार्क्सवादी विचारधारेला अनुसरून अनेक साहित्यिकानी लेखन केले आहे. या विचारधारेतून मानवतावादी विचार व्यक्त केलेले आहेत. सामाजिक व्यवस्थेतील आर्थिक विषमता, शोषणव्यवस्था आणि शोषितांच्या जाणिवा व्यक्त करत परिवर्तनासाठी आवाहन करणारे लेखन होत गेले आहे. मार्क्सवादी अंगाने साहित्याशय अधिक तीव्रपणे रेखाटला गेला. शरदच्चंद्र मुक्तिबोध, नारायण सुर्वे प्रभुतींच्या लेखनात हे स्पष्टपणे साकारले आहे. शरदच्चंद्र मुक्तिबोध यांच्या ‘सृष्टीसौंदर्य आणि साहित्यमूल्य’ या ग्रंथाने या समीक्षापद्धतीचा फार उत्तम प्रकारे परिचय करून दिला आहे. तसेच त्यांच्या ‘जीवन आणि साहित्य’ या लेखनातून मार्क्सवादी साहित्यविचार साकारला आहे.

munotes.in

मराठीमध्ये विसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकात मार्क्सवादाचा परिचय झाला. यानंतर मराठीत अनेकांनी मार्क्सवादाला अनुसरून साहित्यनिर्मिती केलेली दिसते. अनंत काणेकर यांचे 'चांदरात' मधील काही कविता; विंदा करंदीकरांचा 'स्वेदगंगा', 'माझ्या मन बन दगड', 'ही जनता अमर आहे'; नारायण सुर्वे यांचा कविता तसेच भा.वि.वरेरकर, अण्णाभाऊ साठे, बाबूराव बागूल, अनिल बर्वे यांच्या कथनात्म साहित्यात मार्क्सवादी विचार अधोरेखित होताना दिसतात.

विं.दा.करंदीकरांचा 'स्वेदगंगा' या काव्यसंग्रहातील स्वेदगंगा ही कविता श्रमिक, कष्टकरी यांच्या संघटित शक्तीचे महत्व सांगणारी असून समूहनिष्ठा व्यक्त करणारी आहे. तसेच नारायण सुर्वे यांची कविता कष्टकऱ्यांची बाजू मांडणारी आहे. त्याच्या कवितेतून भावनांची मांडणी होताना ते मार्क्सवादी विचार मांडतात. मार्क्सवादी विचारसरणीचे नाते मानवतावादाशी निगडित आहे, त्याचे दर्शन सुर्वे यांच्या कवितेत होते. त्यांच्या 'ऐसा गा मी ब्रह्म' या काव्यसंग्रहात मी, आम्ही, तुम्ही ही सर्वनामे येतात यातील मी, आम्ही ही सर्वनामे कष्टकरी माणसाचे प्रतिनिधित्व करणारी आहेत. तर तुम्ही हे सर्वनाम सत्ताधारी वर्गाला अधोरेखित करणारे आहे. 'मी', 'आम्ही'चा संघर्ष 'तुम्ही'शी म्हणजेच या समाजव्यवस्थेतील भांडवलदारी व्यवस्थेची चाललेल्या संघर्षाचे दर्शन घडविणारे आहे.

लेखक समाजव्यवहाराचे ज्ञान करून घेत असतो. ते त्याच्या साहित्यकृतीतील समाजरचनेतून व्यक्तही होत असते. लेखक/कवी यांनी व्यक्तीची सामाजिकता जेव्हा कळते तेव्हा त्या व्यक्तीचे समाजव्यवहारातले स्थानही स्पष्ट होत असते. तसेच सामाजिक जाणीव व्यक्तीला/समूहाला झाली की या समाजात जी विषमता आहे त्याचीही जाणीव होत असते. त्यातून असंतोष निर्माण होतो. आपली परिस्थिती, सभोवताल, राजकारण, सत्ताधारीवर्ग आदीचे जाणीव साहित्यातून मांडली आहे. कवी नारायण सुर्वे यांची कविता याचे उदाहरण आहे. नारायण सुर्वे सामाजिक क्रांतीच्या विचाराने प्रेरित झालेले दिसतात त्यांचा 'जाहिरनामा' या संग्रहातील अनेक कविता या संदर्भात पाहता येतील. (जाहिरनामा, सूर्यकुलातील लोक, पुढच्या युगांची सर्व दुःखे, संवाद, आयुष्य, चंद्रासाठी चार हिताच्या गोष्टी इत्यादी.)

एखाद्या साहित्यकृतीचे सूत्र उलगडून दाखविणे, तिचे आकलन करून घेणे–देणे, हे समीक्षाव्यवहाराचे महत्त्वाचे उद्दिष्ट असते. साहित्यकृतीच्या आकलनासाठी, मूल्यमापनासाठी विशिष्ट विचारप्रणाली, निकष उपयुक्त ठरत असतात. मराठीतील मार्क्सवादी भूमिकेविषयी दि.के.बेडेकर म्हणतात, "मार्क्सने स्वतः मांडलेल्या भूमिकेचा विचार येथे बाजूला ठेऊन मार्क्सवादी म्हणून मराठी वाचकाला परिचित झालेल्या मीमांसेचा विचार केला तर तीमध्ये कलानिर्मितीला विशिष्ट आर्थिक वर्गसमूहांच्या निष्ठांचे केवळ प्रचारतंत्र म्हणून मानले जाते, व कलेची स्वायतत्ता अमान्य केली जाते. जीवननिष्ठा म्हणजे या आर्थिक व्यवहारांवर अवलंबून असणारी बांडगुळे आहेत. असाही अर्थ लावला जातो." (दि.के.बेडेकर, साहित्य-विचार, पृ.३२६) ही परखड भूमिका मार्क्सवादी साहित्यसमीक्षेच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण आहे.

दि.के.बेडेकर यांचा समीक्षा विचार हा सामाजिक, आर्थिक, राजकिय आदी व्यवहारांशी संदर्भ कथन करणारा आहे. दि.के.बेडेकरांची साहित्यसमीक्षा नवविचारकेंद्रित असून जीवनवादी दृष्टिकोन जोपासणारी आहे. त्यांच्या 'विचारयात्रा' या ग्रंथात याचा प्रत्यय येतो. सभोवतालच्या साहित्यविश्वातील विविध घडामोडींनी बेडेकरांसमोर जे प्रश्न उपस्थित केले होते त्या प्रश्नांच्या उत्तरांचा चिकित्सक शोध घेण्याच्या प्रयत्नातून त्यांच्या समीक्षा विचाराने आकाररूप घेतलेले आहे. त्यांच्या समीक्षाविचारात सामाजिकतेला महत्त्व आहे. म्हणूनच ते केवळ साहित्यकृतीचे रूप वा रंग यांना महत्त्व न देता आशयाला महत्त्व देतात.

मार्क्स विचारांना तत्वज्ञानाच्या चौकटीतून बाहेर काढू पाहणारा विचारवंत आहे. तो स्वतःच्या विचाराला तत्वज्ञान आणि विज्ञान असे म्हणत नाही. त्याला व्यवहारिक-समीक्षात्मक (प्रॅक्टिकल क्रिटिकल) भूमिका घेणारी आहे. उत्पादन संबंध आणि उत्पादनशक्ती या परस्परावलंबी व विरोधी अंगामधला अंतर्विरोध समाजपरिवर्तनात मध्यवर्ती असतो. वर्गसंघर्षाचे मूळ हे उत्पादनसंबंधाच्या अंतर्गत विरोधी स्वरूपात असते. दि.के.बेडेकर यांनी मार्क्सवादी कलातत्वचर्चा सविस्तर केलेली आहे. ती मार्क्सवादी साहित्यसमीक्षेला पूरक ठरणारी आहे. तसेच द.ग.गोडसे यांच्या 'पोत' मध्ये सामाजिक जाणीव आणि कलात्मक सौंदर्य यांचे अंगभूत संबंध चिकित्सकरित्या केले आहे.

शरदच्चंद्र मुक्तिबोध साहित्याचा विचार मार्क्सवादी भूमिकेतून करताना सौंदर्यशास्त्राचा आधार घेतात. ते जीवनाचा कलेशी अनुबंध जोडतात. 'सृष्टी, सौंदर्य आणि साहित्य' हा ग्रंथ या दृष्टीने मार्मिक भाष्य करणारा आहे. तर के.रं.शिरवाडकर यांचा 'मार्क्सवादी समीक्षाविचार' हा ग्रंथ मार्क्सवादी साहित्यसमीक्षविचाराचा उहापोह करणारा मैलाचा दगड ठरतो. कला आणि जीवन यांचा सहसंबंध, सहसंदर्भ अशा अनेक अभ्यासकांनी तपासण्याचा प्रयत्न केलेला आहे. शरदच्चंद्र मुक्तीबोध हे मार्क्सवादी विचारांचा प्रामुख्याने पुरस्कर्ते आहेत. त्यांच्या 'साहित्य आणि जीवन' या ग्रंथात त्याचा प्रत्यय येतो.

उपरोक्त मराठीतील मार्क्सवादी साहित्यसमीक्षेचा सारांशरूपाने विचार करायचा तर शरदच्चंद्र मुक्तिबोध  यांनी मार्क्सवादी तात्विक चर्चेला प्राधान्य दिलेले दिसते. दि.के.बेडेकर आधुनिक साहित्य आणि वांङ्मयीन प्रश्नचर्चा मार्क्सवादी अंगाने करताना दिसतात. साहित्यकृतीच्या कलात्मक मूल्यमापनासाठी ते कलेचे निकष समोर ठेवतात आणि समाजसापेक्षतेच्या स्पष्टीकारणासाठी मार्क्सवाद स्वीकारताना दिसतात. गं.बा.सरदार प्राचीन साहित्याच्या संदर्भात मार्क्सवादी समीक्षादृष्टी ठेवून लेखन करताना दिसतात. समाजशास्त्र, मानवतावादाच्या अंगाने आपण साहित्याचा विचार केला पाहिजे असे निर्देशन करणारे हे लेखन आहे.

## ३.८ मराठी मार्क्सवादी साहित्यसमीक्षा वैशिष्टे

१) मराठीतील प्रारंभीची मार्क्सवादी विचारसरणीची तत्वित्क चर्चा आचार्य जावडेकर, श्रीनिवास सरदेसाई यांनी लोकशिक्षण मासिकात १९२९ मध्ये केली. मुख्यतः मराठीतील मार्क्सवादी समीक्षा ही नियतकालिकामधून झालेली दिसते. ऐतिहासिक भौतिकवादाच्या अनुषंगाने लिहिला गेलेला 'वांङ्मयाची व्याप्ती' हा के. नारायण काळे यांनी लिहिलेल्या लेखाने मराठी मार्क्सवादी समीक्षेची मुहूर्तमेढ रोवली गेली. हा लेख प्रतिभा मासिकाच्या (८ मे १९३३) च्या दहाव्या अंकात प्रसिद्ध झाला होता.

२) मराठीतील मार्क्सवादी समीक्षेच्या अंगाने लिहिला गेलेला पहिला ग्रंथरूप आविष्कार म्हणजे लालजी पेंडसे यांचा 'साहित्य आणि समाजजीवन' (१९३५) हा होय. ह्या ग्रंथात साहित्य, कलानिर्मितीची प्रक्रिया, साहित्य प्रयोजन, समीक्षेची आधारभूत तत्वे, ऐतिहासिक भौतिकवादाच्या अंगाने साहित्यचर्चा केली आहे. त्यांनी संतसाहित्याची केलेली समीक्षा मार्क्सवादी अंगाने आहे. ते संताच्या नैराश्यवृत्तीवर टीका करतात. त्यांची ही समीक्षा आवेशपूर्ण आहे.

३) श्री बा.रं.सुंठणकर यांनी महाराष्ट्रीय संत मंडळाचे ऐतिहासिक कार्य या ग्रंथात कोणत्याही सामाजिक चळवळी या मुख्यतः सामाजिक परिस्थितीवर अवलंबून असतात हे अधोरेखित करतात. संत चळवळ ही समाजसापेक्ष आहे त्यातून ऐतिहासिक भौतिकवादाची सापेक्षतः सुंठणकर स्पष्ट करताना दिसतात. सामाजिक वर्ग आणि मानवी मनोरचना यांच्यातील अन्योन्य-संबंध ते सांगतात. सामाजिक, आर्थिक, परिस्थितीचा साहित्यावर परिणाम होत असतो. या गृहितकानुसार ते संतसाहित्याचा परामर्श घेतात.

४) प्रा. गं.बा.सरदार आपल्या संत वांङ्मयाची सामाजिक फलश्रुती या पुस्तकात 'ऐतिहासिक भौतिकवाद' या तत्त्वानुसार संतसाहित्याचे अवलोकन करतात. सामाजिक परिस्थिती आणि साहित्य यांचा संबंध ते स्पष्ट करतात. संतसाहित्यात वर्गभेदाची जाणीव व्यक्त होते पण वर्गलढ्याची नाही. संतांनी समाजक्रांतीचा लढा अभिप्रेत नव्हता तर त्यांना धर्मसुधारणा, लोकजागृती अभिप्रेत होती. हे गं.बा.सरदार यांच्या विवेचनातून व्यक्त होते.

५) लालजी पेंडसे यांचे विचार पु.य. देशपांडे यांनी खोडून काढले आहेत. 'प्रतिभा' या पाक्षिकामध्ये 'साहित्य आणि समाजजीवन' ही लेखमाला १९३६ मध्ये प्रकाशित झाली आहे. पुढे 'नवी मूल्ये' (१९४६) या पुस्तकात त्यांनी मार्क्सवादाचे सिध्दांत आपणास मान्य नसल्याचे घोषित केले आहे. येथे ते व्यक्तिवादी भूमिकेचा पुरस्कार करताना दिसतात. ते म्हणतात, "व्यक्तिस्वातंत्र व व्यक्तित्व विकस हे आधुनिक ललित वांङ्मयाचे व आधुनिक कलेचे सर्वश्रेष्ठ मूल्य होय.' (पु.य. देशपांडे, नवी मूल्ये, पृ.४)

६) प्रा.वि.ह कुलकर्णी यांनी सह्याद्री मासिकात एप्रिल, मे (१९३८) या दोन अंकातील 'मार्क्सवाद व मराठी टीकात्मक वाङ्मय' लेखांतून समीक्षा केली आहे. त्यातून ते स्वतःची साहित्यविषयक भूमिका मांडतात. पु.य..देशपांडे यांच्या विवेचनावर ते आक्षेप घेतात. कलेचा उगम केवळ व्यक्तिविरुद्ध समाज यामध्येच असतो असे नाही, तर व्यक्तिविरुद्ध निसर्ग यामध्येही असतो. प्रा.वि.ह. कुलकर्णी यांची भूमिका भौतिकवादी आहे.

७) अनंत काणेकर 'जीवनासाठी कला' हे तत्त्व मानतात. 'जीवन नसते तर कला जन्माला आली असती का?' असा प्रश्न ते उपस्थित करतात. तसेच ललित वांङ्मयाने मने घडवावी अशी भूमिका घेतात. मार्क्सवादी समीक्षकांना ते 'समाजशास्त्राभ्यासी वास्तववादी' असे म्हणतात. ते मार्क्सवादाविषयी म्हणतात, "मार्क्सवादी तत्वज्ञानाने मला एक नवी दृष्टी देऊन कायमचे उपकृत करून ठेविले आहे." (अनंत काणेकर, काव्यानंद व करुण कव्यानंद, साहित्य, वर्ष ४, अंक ५, ऑक्टोबर, १९५१, पृ.२९)

८) मार्क्सवादी समीक्षेत दि.के.बेडेकर यांनी मोलाची भर घातली आहे. 'साहित्यनिर्मिती आणि समीक्षा', 'साहित्यविचार' या पुस्तकातून ते समाजशास्त्रीय आशयनिष्ठ भूमिका घेतात. त्यांचा कलाविचार कलाकृती, कलाकृतीनिर्मितीचे स्वरूप, आणि कलावंत व वास्तव याचे नाते या अनुषंगाने साकार झालेला आहे.

९) मार्क्सवादी समीक्षेत प्रा.शरदच्चंद्र मुक्तिबोध यांचे समीक्षालेखन महत्त्वाचे ठरलेले आहे. 'युगवाणी' मध्ये १९४८ पासून ते समीक्षालेखन करीत होते. आशय आणि आकृती यांच्या विरोधात्मक एकतेची कल्पना त्यांनी स्पष्ट केली आहे. आकृती आशयाशिवाय अस्तित्वात येत नाही तसेच आशय हा देखील आकृतीस्वरूपात आकार घेत असतो. ते आशयनिष्ठ समीक्षेवर भर देतात.

१०) मराठीत मार्क्सवादी तत्वांनुसार समीक्षा करणारे लालजी पेंडसे ते प्रा शरदच्चंद्र मुक्तिबोध अशी एक परंपरा (१९३५ ते १९६३) आपणास सांगता येते. ऐतिहासिक आणि समाजशास्त्रीय भूमिकेने ऐतिहासिक भौतिकवादाच्या मराठी मार्क्सवादी समीक्षेला बैठक प्राप्त करुन दिली. त्यामुळे मराठी समीक्षेचे क्षेत्र अधिक व्यापक होऊ शकले.

११) जीवनदर्शन, वास्तववाद यांना मार्क्सवादी समीक्षेने नवा अर्थ प्राप्त करून दिला. केवळ प्रतिबिंबवाद वास्तवव्यवहारात असून गरजेचा नाही तर त्याला ध्येयवादाची जोड असावी हे या समीक्षेने मांडले. "समाजवादी वास्तववाद" हे समीक्षामूल्य मराठी समीक्षकांनी मानले. मार्क्सवादी समीक्षा ही जीवनवादी, आशयनिष्ठ आहे.

## ३.९ मार्क्सवादी समीक्षापद्धतीची सामर्थ्यस्थळे

१) एखाद्या विशिष्ट साहित्यकृतीतील सामाजिक स्वरूपअंगाचे दर्शन घडविणे.

२) साहित्यातील प्रवृतींचे सामाजिकदृष्ट्या स्पष्टीकरण साहित्येतिहासातील प्रश्नांवर प्रकाश टाकणे.

३) साहित्यकृती ही एक सांस्कृतिक कलावस्तू कशी असते ते उलगडते.

४) साहित्यकृतीचे आकलन, स्वरूपविश्लेषण, अर्थनिर्णयन, समाजावरील संभाव्य परिणाम यांचा विचार करता येतो.

५) साहित्यकृतीमागील हेतू, प्रेरणा, परिणाम याचे विश्लेषण या समीक्षापद्धतीद्वारे करता येते.

६) मार्क्सवादी पद्धतीने साहित्याच्या सांस्कृतिक अंगाकडे पाहता येते (गं.बा.सरदार यांचा 'संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती' हा ग्रंथ).

७) साहित्याची सामाजिकता, कलात्मकता स्पष्ट करता येते (शरदच्चंद्र मुक्तिबोध यांचे लेखन उदा. 'सृष्टी, सौंदर्य आणि साहित्यमूल्य' हा ग्रंथ).

८) सामाजिक वास्तवाच्या विश्लेषणाची मार्क्सवाद ही एक विशिष्ट पद्धती आहे.

९) समग्नता (totality) आणि द्वंद्वात्मकता (dialectic) या कार्लमार्क्स यांच्या समाजशास्त्रीय लेखनातील संकल्पनांचे उपयोजन आवश्यक ठरते.

## ३.१० मर्यादा

मानवतावादी मानवेंद्रनाथ रॉय यांनी नवमानवतावाद (न्यू ह्यूमनिझम) ही संकल्पना पुढे आणली आणि याला त्यांनी पुढे जाऊन रॅडिकल ह्यूमनिझम असे नाव दिले. मूलतः मानवेंद्रनाथ रॉय हे प्रारंभी मार्क्सवादी होते. त्यामुळे मार्क्सवादी विचारसरणीचा त्यांनी अभ्यास करून काही निष्कर्ष मांडले होते. आणि काही दोष ही अधोरेखित केले होते. भांडवलशाही, समाज आणि व्यक्तिस्वातंत्र्य ही कार्ल मार्क्सची टीका रॉय मान्य करतात. पण व्यक्ती प्रतिष्ठा, न्याय आणि नैतिक मूल्ये यांवर आधारित समाजव्यवस्था अस्तित्वात येऊ शकलेली नाही हे रॉय अधोरेखित करतात.

भारतीय मार्क्सवादाविषयी शरदच्चंद्र मुक्तिबोध आपले निरीक्षण नोंदविताना म्हणतात, भारतीय मार्क्सवादाने आरंभापासूनच आमूल सामाजिक परिवर्तनाचे चित्र उभे केले खरे, परंतू मुख्यतः भांडवली अर्थरचनेचे निर्माण झालेल्या वर्गवैषम्याचे लढेच तेवढे लढविले गेले. या क्षेत्रात अर्थातच त्यांनी थोर कामगिरी बजावली. परंतु ज्या समाजात क्रांती आणावयाची त्याचे सर्वांगीण स्वरुप कळल्याशिवाय क्रांतीचा विचार फोल ठरतो. भारताचे चातुर्वर्ण्यविशिष्ट स्वरूप मार्क्सवाद्यानी खऱ्या अर्थाने लक्षात

घेतले असावे असे वाटत नाही; तसे झाले असते तर भारतीय परिस्थितीला अनुकूल असा मार्क्सवादाचा सृजनशील असा वेगळा विकास झाला असता." (शरदच्चंद्र मुक्तिबोध, जीवन आणि साहित्य, पृ.१४०, १४१) भारतीय मार्क्सवाद हा आर्थिकतेविषयी कार्य करतो. त्याने आर्थिक लढ्यावर लक्ष केंद्रित केलेले दिसते. कलेच्या क्षेत्रात मार्क्सवादी विचार फारच कमी झाला. मार्क्सवादी समीक्षाविचाराने सामाजिकतेवर अतिरिक्त भर दिलेला आहे. त्यामुळे साहित्याच्या गुणवैशिष्ट्याकडे दुर्लक्ष झालेले आहे. पर्यायाने ही समीक्षापद्धती एकांगी स्वरूपात होत गेली. एका विशिष्ट साहित्यकृतीचे कलात्म मूल्यमापन करायचे झाल्यास या समीक्षापद्धतीने वापरलेले निकष त्या साहित्यकृतीला पुरेसा न्याय देऊ शकत नाही ही या समीक्षाविचाराची मर्यादा आहे.

कार्ल मार्क्स यांचा पाया आणि इमला हा सिद्धांत आर्थिक घटकाला प्राधान्य देणारा आहे. म्हणून तो काहींना अस्वीकारार्ह वाटला. आर्थिक गती ही सामाजिक स्थितंतराची एकमेव प्रेरणा मानणे चूक आहे अशाप्रकारची टीका या सिद्धांतावर करण्यात आली. मात्र एंगल्सने या टीकेला उत्तर देताना आर्थिक घटक हा एकमेव कर्ताकरविता असतो अथवा सामाजिक परिवर्तन म्हणजे एक यांत्रिक प्रक्रिया आहे असा त्याचा अर्थ लावणे चूकीचे आहे आर्थिक परिस्थिती जरी पायाभूत असली तरी इमल्यातील विविध घटक ऐतिहासिक चळवळीवर प्रभाव पाडतात. आणि काही वेळा तिचे स्वरूप ठरविण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडतात. एकूणच आर्थिक घटक हा पायाभूत असून त्यात समाजकारण, राजकारण, धर्म, तत्वज्ञान, साहित्य इत्यादी घटक महत्वाची जबाबदारी पार पाडत असतात.

मार्क्सवादी साहित्यविचार हा वास्तववादाला महत्त्व देतो. पण वास्तववाद मार्क्सवाद्यांच्या दृष्टीने म्हणजे वास्तवाचे हुबेहूब रेखाटन नव्हे किंवा सामाजिक समस्यांचा उहापोहही नव्हे. मार्क्स, एंगल्सने अशा वास्तववादी, यथातथ्यावादी (naturalistic) साहित्यावर प्रतिकूल टीका केली आहे.

मार्क्सवादी सहित्यविचारात रूपा (form) चा विचार फारच कमी झाल्याचे दिसते. ही एक मार्क्सवादी साहित्यविचाराची मर्यादा आहे. लुकाच आणि अडोर्नो यांना ही उणीव जाणवत होती.

ट्रॉट्स्कीच्या मते कलेच्या स्वरूपाचे विश्लेषण मार्क्सवादी समीक्षेला करता येईल परंतु त्याच्या सौंदर्याचे रसग्रहण करण्यास ती मार्गदर्शक ठरू शकणार नाही, ही मर्यादा तो नोंदवितो.

लालजी पेंडसे प्रतिबिंबवाद यावर भर देतात. परंतु कार्ल मार्क्स वा एंगल्स यांनी सरळ प्रतिबिंबवाद मान्य केलेला नाही. त्यामुळे पेंडसे यांचा प्रतिबिंबवाद मार्क्सवादी साहित्यविचार, समीक्षा अंगाने पटणारा नाही. दि.के.बेडेकर मात्र या प्रतिबिंब कल्पनेला टाळताना दिसतात. त्यामुळे त्यांची समीक्षादृष्टी स्वायत्त व स्वयंपूर्ण होताना दिसते. त्यांच्यावर हेगेलचा प्रभाव असल्याने त्यांच्या मार्क्सवादी दृष्टीला सखोलता प्राप्त होत गेलेली दिसते.

**आपली प्रगती तपासा**

१) मार्क्सवादी समीक्षाविचाराचे स्वरूप स्पष्ट करा.

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

## ३.११ सारांश

मार्क्सवादी साहित्यविचार आणि समीक्षा यांना एक वैश्विकतेची व शाश्वततेची बाजू आहे. त्यामुळे मार्क्सवादी समीक्षा विचाराला कायमच महत्त्व राहणार आहे.कार्ल मार्क्स, फ्रेडरिक एंगल्स आदी मार्क्सवादी अभ्यासक कला, साहित्य याविषयी घेतलेली भूमिका त्यातून त्यांनी केलेली तात्विक मांडणी यातून मार्क्सवादी विचारसरणी पुढे आली या विचारांमधील मार्क्सवादी साहित्याची समीक्षा करताना काही मार्क्सवादी विचारवंतानी मर्यादा जशा अधोरेखित केल्या तसेच त्यात भर ही घातली आहे. मार्क्सवाद ही एक विचार करण्याची पद्धती आहे. या पद्धतीच्या शास्त्रीयतेमुळे आणि सौंदर्यशास्त्राच्या जडवादी गृहीतांमुळे समीक्षेच्या क्षेत्रात हे एक प्रभावी अस्त्र आहे. कारण विविध कलानुभवांना यथार्थ परिप्रेक्ष्याबरोबरच मानवी जीवनसापेक्ष स्थान कथन करते. कोणत्याही साहित्यकृतीच्या वहनासाठी योग्य पद्धतीची निवड करणे आवश्यक असते. साहित्यकृतीतील समाजजीवनाचा पैस, निर्मिती प्रक्रिया, साहित्यकृतींतर्गत वास्तव आणि लौकिक जीवनव्यवहार यांची द्वंद्वात्मकता उलगडण्यासाठी मार्क्सवादी साहित्य समीक्षा उपयुक्त ठरते.

मार्क्सवादातील पाया-इमला (base-superstructure) हा सिद्धांत महत्वपूर्ण ठरलेला आहे. मार्क्सच्या मते सामाजिक जीवनातील परिवर्तनात अनेक क्षेत्राचा परिणाम पडत असतो. त्याचा परिणाम पायावर म्हणजेच अर्थकारणावर होतो. अर्थकारण हे पाया आणि राजकारण, धर्म, कला, साहित्य, तत्वज्ञान हे इमला असते. पायाचा उपरोक्त सर्वांवर परिणाम होत असतो. त्यामुळे हा सिद्धांत काहीचा सर्वसमावेशक भूमिका घेणारा आहे. इतर वादांपेक्षा विशेषत: (रूपाचा आग्रह धरणारा रुपवाद साहित्याच्या ऐतिहासतेला नाकारणारा संरचनावाद, संहितेच्या अर्थाला मृगजळ मानणारा वि-रचनावाद) मार्क्सवादाची भूमिका सर्वसमावेधक राहिलेली दिसते. म्हणूनच मार्क्सवादी समीक्षा वेगळी ठरते.

## ३.१२ संदर्भ ग्रंथ सूची


१. कुलकर्णी गो. म., नवसमीक्षा(संपादन), मेहता पब्लिसिंग हाऊस, पुणे, ऑगस्ट १९८२

२. देशपांडे पु.य., नवी मूल्ये, नागपूर प्रकाशन, नागपूर, १९४६

३. बेडेकर दि.के., साहित्यनिर्मिती आणि समीक्षा, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, दुसरी आवृत्ती, जून १९६६

४. मुक्तिबोध शरदश्चंद्र, जीवन आणि साहित्य, अभिनव प्रकाशन, मुंबई, डिसें १९७२

५. शिरवाडकर केशव, मार्क्सवादी साहित्यविचार, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, जून १९८०


## ३.१३ नमुना प्रश्नसंच

१. कार्ल मार्क्सचा सिद्धांत सांगा.

२. मार्क्सवादी समीक्षाविचाराचे स्वरूप आणि वैशिष्टे लिहा .

३. मार्क्सवादी समीक्षाविचाराच्या मर्यादा सांगा.

४. मराठीतील मार्क्सवादी समीक्षाविचाराचे स्वरूप सोदाहरण स्पष्ट करा .

५. टिपा लिहा .

- मार्क्सवाद
- ग्रामचीचा धुरिणत्व सिद्धांत
- मार्क्सवादी समीक्षेची सामर्थ्यस्थळे
- दि.के.बेडेकर यांचा समीक्षाविचार

## ३.१४ अधिक वाचन


१. पाध्ये दिगंबर, अवलोकन मराठी समीक्षा आणि साहित्य

२. पेंडसे लालजी, साहित्य आणि समाजजीवन

३. राजाध्यक्ष विजया, मराठी वाङ्मयकोश

४. सरदार गं.बा., संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती

५. शिरवाडकर के. रं., साहित्यवेध


❖❖❖

munotes.in

घटक : ४

# उपयोजित समीक्षा

## अभ्यासक्रमास लावलेल्या कलाकृतींची समाजशास्त्रीय पद्धतीने समीक्षा

## अनुक्रमणिका


| क्र | अध्याय | लेखक |
|---|---|---|
| ४(१अ) | लचांड (कथा) | सदानंद देशमुख |
| ४(१आ) | फिनिक्स च्या राखेतून उठला मोर (कथा) | लेखक जयंत पवार |
| ४(२) | चौक (नाटक) | लेखक: मकरंद साठे |
| ४(३अ) | टुमदार कुणाची छान (लावणी) | शाहीर परशराम |
| ४(३आ) | दादला नको ग बाई (भारूड) | संत एकनाथ |
| ४(३इ) | शहर (कविता) | कवी - दया पवार |
| ४(३ई) | नाही नदी नाही नाला | कवी - इंद्रजित भालेराव |


munotes.in

घटक : ४

# ४(१अ)

## उपयोजित साहित्याकृति

## कथा - लचांड

**(लेखक: सदानंद देशमुख)**

**घटक रचना**

४.१अ.१ प्रास्ताविक

४.१अ.२ लेखकाविषयी

४.१अ.३ लचांड" या कथेविषयी

४.१अ.४ कथानक आणि समीक्षा

४.१अ.५ सारांश

४.१अ.६ संदर्भ ग्रंथ सूची

४.१अ.७ नमुना प्रश्नमंच

४.१अ.८ पुरक वाचन

## ४.१अ.१ प्रास्ताविक

लेखकाच्या व्यक्तिमत्वाचा ठसा त्याच्या साहित्य निर्मितीवर पडलेला दिसून येतो. सामाजिक स्थित्यंतरे, भोवतालचे वातावरण, विविध समस्यांचे लेखकाने केलेले चिंतन त्याचा जीवनानुभव साहित्यकृतीतून व्यक्त होतो. बाळशंकर देशपांडे लिहितात," ज्या साहित्यात लेखकाचे व्यक्तिमत्व प्रतिबिंबित झालेले असते, त्याला ' पर्सनल किंवा सब्जेक्टिव्ह साहित्य' असे म्हणतात"...... साहित्य आणि साहित्यिकांचा घनिष्ठ संबंध असायलाच हवा असे अनेक पाश्चात्य विचारवंतांनी म्हटले आहे. आणि तोच विचार येथे करणे आवश्यक आहे कारण सदानंद देशमुख यांचे साहित्य हे वर्तमानकाळातील शेती निष्ठ संवेदनानी परिपूर्ण आहे.

## ४.१अ.२ लेखकाविषयी

सदानंद देशमुख यांच्या साहित्यात ग्रामीण समाजजीवन कसे दिसून येते हे पहाण्यासाठी त्यांची सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक पार्श्वभूमी लक्षात घेणे आवश्यक आहे सदानंद देशमुख यांचा जन्म बुलढाणा जिल्हयातील अमडापूर येथे ३० जुलै १९५९ रोजी झाला. आपल्या लेखनामागील

प्रेरणांबाबत ते म्हणतात-" मी लेखनासाठी खेड्याशी जोडून राहिलो. इथलं अस्वस्थ, खळबळजनक वातावरण समजून घेतलं; त्यावर वाङ्मयीन उपाय शोधण्यासाठी फार नम्र आणि सोशीक होऊन, इथल्या ग्रामव्यवस्थेला, समाजाला, माणसाला, शिवाराला मी समजून घेतलं, माझ्या निर्मितीच्या शोधात मी भटकलो, निर्मितीची प्रतीक्षा केली. शेतावर पेरणी करणारा शेतकरी ज्या निष्ठेने हंगामाची आणि सुगीची वाट पाहतो. तशी मीही वाट पाहिली. कुठलाही आतताईपणा किंवा घाई न करता…."

डॉ. देशमुख यांचा जन्म बुलढाणा जिल्ह्याच्या चिखली तालुक्यातील अमडापूर या खेड्यात एका शेतकरी कुटुंबात झाला. मराठी विषयात त्यांनी एम.ए.ची पदवी घेतली. त्यानंतर आचार्य ही पदवी त्यांनी प्राप्त केली. त्यांनी लिहिलेल्या साहित्यामध्ये कादंबरी, ललित साहित्य, कविता, कथालेखन या सर्वांचा समावेश होतो.. त्यांच्या 'बारोमास' या कादंबरीचा हिंदी, व इंग्रजी भाषेत अनुवादही झाला आहे. त्यांच्या साहित्यावर संशोधनही करण्यात आले आहे. पुणे विद्यापीठात विशेष ग्रंथकार म्हणून त्यांची पुस्तके पदव्युत्तर पदवीसाठी अभ्यासक्रमात आहेत.

डॉ. सदानंद देशमुख हे चंद्रपूर येथे भरलेल्या ६५ व्या विदर्भ साहित्य संमेलनाचे संमेलनाध्यक्ष होते.

लेखक सदानंद देशमुख यांची साहित्य संपदा:-

अंधारवड (कथासंग्रह)

अमृतफळ (कादंबरी).

उठावण (कथासंग्रह)

खुंदळघास (कथासंग्रह)

गाभूळगाभा (कथासंग्रह)

गावकळा (कवितासंग्रह)

चारीमेरा (कादंबरी)

जमीनजुमला

तहान (कादंबरी)

बारोमास (कादंबरी)

भुईरिंगणी (ललितगद्य)

महालूट (कथासंग्रह)

मेळवण (कथासंग्रह)

बळ घेऊन भुईचं

रगडा (कथासंग्रह)

लचांड (कथासंग्रह)

munotes.in

## ४.१अ.३ " लचांड" या कथेविषयी

**" लचांड" ही कथा ग्रामीण आणि प्रादेशिक ही म्हणता येईल.** वैदर्भीय समाज, वैदर्भीय भाषा घेऊन आलेली लचांड ही कथा विदर्भातील ग्रामीण समाजाचे प्रतिबिंब दाखवते. विदर्भातील प्रचंड दुष्काळ, प्रचंड उन्हाळा आणि त्यातून होणारी गरीब शेतकऱ्याची, सामान्य व्यक्तीची होरपळ लेखकाने बारकाईने टिपली आहे, अनुभवली आहे आणि आपल्या कथेमधून रेखाटली आहे.

## ४.१अ.४ कथानक आणि समीक्षा

" लचांड" कथेत पाणी टंचाईमुळे गेलेला बळी यातून समाजातील शोकांतिका अधोरेखीत केली आहे. पिण्याचे पाणी न मिळणारे हे खेडे टंचाईग्रस्त आहे. पाण्याच्या अभावामुळे खेड्यातील गरीबांच्या जीवनाचा असमतोल झालेला दिसतो. पाण्याचे दुर्भिक्ष्य श्रीमंतांना फारसे जाणवत नाही दुष्काळाच्या, पाणी टंचाईच्या झळा त्यांना तितक्याशा लागत नाहीत. पैशाच्या जोरावर ते पाणीही विकत घेऊ शकतात. शेतकऱ्याचे, मजूराचे श्रम तर त्यांना फुकटच मिळतात. गरीब- श्रीमंत हा असमतोल ग्रामीण भागातून अधिक प्रमाणात दिसून येतो . मूठभर श्रीमंतांना या ग्रामीण योजनांचा लाभ होतो पण कोरडवाहूंचे अनेक प्रश्न, समस्या तेवढयाच प्रमाणात आहेत. त्यापैकीच एक समस्या म्हणजे पाणीटंचाई!

'लचांड" ही कथा पाण्याचा प्रश्न घेऊन येते. ग्रामीण भागात पाण्याचा प्रश्न अतिशय भीषण स्वरूपाचा आहे. गावातील विहिरींना पाणी नसल्यामुळे दोन मैलावरून पाणी आणावे लागते. कथानायक जयराम आणि त्याची बायको यांची ही कथा आहे.. बायको आजारी असल्यामुळे ते काम जयरामला करावे लागते. त्यामुळे तो वैतागलेला असतो. याशिवाय त्याच्या पुरुषसत्ताक मानसिकतेला असं पाणी भरण्याचं काम करणं कमी पणाचे वाटते. त्याची मुलगी कमळी जोपर्यंत होती तोपर्यंत त्याच्या वर पाणी भरण्याची वेळच कधी आली नव्हती; पण ती सासरी गेल्यामुळे हे पाणी भरून ठेवण्याचे काम त्याच्यावर आले होते. यातून जयरामच्या मनाची धारणा दिसून येते. समाजातील पुरुषांच्या मानसिकतेची एक झलक लेखक आपल्याला हलकेच दाखवून जातात. त्यातच गावातील मोकाट गाढवे येऊन जरा कुठे पाणी दिसलं की पिऊन टाकत असत. इथे माणसांनाच प्यायला घोटभर पाणी महाग झाले होते तिथे गाढवांना पाणी कुठून देणार..? पाण्याचा एकेक थेंब अमृतासमान झालेला असतो. खेड्यातील चित्रण यथायोग्य पद्धतीने व्यक्त झाले आहे.

जयराम आणि त्याचा मित्र रंगनाथ यांच्यातील संवादातून गावाची दुष्काळग्रस्त परिस्थितीची भिषणता कळून येते. रंगनाथ ला देखील स्वतःचे पाणी कावडीनं भरावं लागतं होतं फक्त मालकाकडे बैलगाडीतून दोन ड्रम पाणी पोहोचवले होते. कारण पाण्याचे ड्रम वाहून नेऊन म्हातारे बैल घायाळ

munotes.in

झाले होते. त्यांना अधिक त्रास नको असा विचार मालकाने केला होता. हा विचार स्वार्थीपणाकडे झुकणाराच दिसत होता. ग्रामीण भागातील कृषिप्रधान संस्कृती चा पायाभूत घटकाकडे, बैलाकडे पाहाण्याचा मालकाचा दृष्टीकोण आणि जयराम किंवा त्याच्या बायकोचा दृष्टीकोण कसा भिन्न आहे हे दिसून येते. मालक, पेरणीसाठी बैल व्यवस्थित राहिले पाहिजेत यासाठी रंगनाथला त्याच्याघरचे पाणी बैलगाडीतून आणायला परवानगी देत नाही पण स्वतःचे पाणी मात्र बैलगाडीत ड्रम भरून आणतो तेही रंगनाथ कडूनच! मालकाचा आपल्या नोकराकडे बघण्याचा आणि नोकराचा मालकाकडे बघण्याच्या दृष्टीकोनातील फरक लेखकाने बारकाईने शब्दबद्ध केला आहे. रंगनाथ म्हणतो- " नाई. कण्हारते बिट्या मालक... बैलं सम्दे डंगरे घायाळ झाले म्हन्ते.... त्याह्यले हकनाक बेजार नका करू म्हन्ते... पेरणीच्या घाती बखाड लागून भुईस लागले त पेरणी व्हनार नाई सम्दे वावरं पडीत पडतान, अन् मैगसन्या भुई पुकून भिकारी व्हावं लागलं.. आसं मालक म्हन्ते... म्हणून फकस्त मालकाच्या घरी आता बैलगाडीवर दोन डराम नेतो. मपल्या घरचं कायडीनचं भरतो"

**कण्हारते या** शब्दातून मालकाची कुरकुर दिसून येते. तर जयराम मात्र या गोष्टीकडे वेगळ्या दृष्टीकोनातून बघतो. तो म्हणतो, " खरंच हाये मालकाचंबी तुपल्या. काय बेसुमार बैल- दोर गळाठलेत आवंदाच्या सालात. हाल हायेत बिचार्याचे.... चाया पाण्याची इतली आबाळ आजून नाई झाली. या दा बारा सालात... माणसायचं भंड पडो. पणदेवा बापा बापा नारायेणा. या मुक्या जिवाची तरी आमासीक कदर कर बापा! चाया पाण्यावाचून पटाल ढोरं मरून राह्यले गळाठून...." तो याकडे भूतदयेच्या दृष्टीकोनातून बघतो. पण जयराम मात्र आपल्या गलितगात्र झालेल्या बैलाचे सगळं करत असतो.त्याला घरातील एक सदस्य म्हणूनच वागवतो.त्याच्या वेदनांनी व्याकूळ होतो.त्या कमी कशा करता येतील त्या बद्दल विचार करतो.पण असा निरुपयोगी बैल पाच - पन्नास रुपयांना खाटकाला विकावा असा विचार देखील त्याच्या किंवा त्याच्या बायकोच्या मनाला शिवत देखील नाही. स्वतःला औषधपाणी नाही झालं तरी चालेल पण बैला चा बळी घ्यायचा हा विचार देखील जयरामच्या बायकोला कसनुसा वाटतो.बैला बद्दलची कृतज्ञता ,प्रेम आपुलकी जिव्हाळा स्वतःच्या लेकरांपेक्षाही काकणभर जास्तच दिसते.आणि ते ग्रामीण कृषी प्रधान संस्कृतीतील वास्तव आहे. कडब्याची पेंढी तीन- चार रुपयास एक अशी झालेली असते माणसालाच एका भाकरी ऐवजी अर्धी भाकरी खावी लागते तिथे बैलास चारा कुठून आणावा? हा प्रश्न सगळ्या गावातल्या लोकांना पडला आहे. झाडांचे नुसते सापळे झालेले आणि शिवारात हिरवळीचा एक थेंबही नाहीं. अशी गावची विदारक परिस्थिती रेखाटली आहे.

अशा परिस्थितीत पाण्यासाठी मैलोनमैल झिजवावं लागतं त्यामुळे जयरामच सगळं अंग ठणकत असतं. त्यातही मोकाट गाढवे रांजणातील पाणी पिऊन जातात. यात खेड्यातील घराचे चित्रही लेखकाने हुबेहुब रेखाटले आहे. एके दिवशी अंधारात रांजणातील पाणी गाढवे पीत आहे त असे पाहून त्यंच्यावर घाव घालतो. पण शोकांतिका अशी की गाढवाच्या ठिकाणी त्याची बायको तिथे असते आणि गैरसमजातून तिलाच त्याने मारून टाकलेले असते. असा भीषण प्रसंग घडून कथा संपते.



munotes.in

**दुष्काळाची** दाहकता लेखकाने अतिशय बारकाईने रेखाटली आहे. गव्हाणीतील बैल, स्वतः ची बायको, शिवारातली झाडे सगळ्यांची परिस्थिती सारखीच झाली होती. बैल गळाठलेला होता तर बायको सतत परसाकडे जाऊन गळून गेली होती.  बैलाच्या हाडांचे सापळे उभे राहिले होते आणि बायको शिवारातल्या वरपून टाकलेल्या झाडावानी झडझड दिसत होती. दुष्काळाचे चटके सर्वांनाच बसू लागले होते.पंधरा दिवसांपूर्वीच त्या बैलाचा जोडीदार गेला होता आणि कथेच्या शेवटी जयरामची जोडीदारीण देखील या **दुष्काळाचा बळी** ठरते असेच म्हणावे लागते.

अशा परिस्थितीत शेती कशी करावी? असा प्रश्न जयरामलाही पडलेला दिसतो आणि त्याचे उत्तर कोणाकडेही नसते. गव्हाणीतल्या बैलावर गोमाशा बसत होत्या त्यामुळे बैलाला त्रास होत असतो त्याचा त्रासदूर करण्यासाठी जयराम त्याच्यावर तरकट टाकतो त्यामुळे माशा त्या बैलाला अधिकच त्रास देऊ लागतात. बैलाला गोमाशा दूर करायचे देखील त्राण नसते आणि बैलाचा त्रास बघून जयरामचं रडकुंडीला आलेला असतो जयरामकडे पाहून त्या बैलाच्याही डोळ्यातून पाणी येते. **शेतमजूर आणि त्याचा बैल( जितराब) यांच्या अबोल भावविश्वाचा वेध लेखकाने अतिशय अचूकपणे घेतला आहे असे दिसते.**

दुष्काळामुळे टँकरने पाणी पुरवठा होता; पण जमीनीच्या पोटातच पाणी राहीले नाही तर बाहेर येणार कसे? कुठे बोर घेतले जातात. इथे ग्रामीण भागातील परिवर्तनाचे चित्र लेखकाने थोड्याफार प्रकारे रेखाटले आहे. जयराम आणि रंगनाथ यांच्या संवादावरून ग्रामीण भागातील लोकांची जीवनपद्धती कळते.

जयराम विचारतो," आवंदाच्या साली कसा काय हाये कान्नू पावसाळा..... काई खबरबात! तू आयकत असशील ना मालकाच्या टी.व्ही. वर बातम्या बितम्या?"

यावर रंगनाथ म्हणतो, " आयकतेत कधी मंधी. अवकाळी पावसाचं काई नाई. पण सरकार किती तरी म्हंजी लय कोटी रुपये खर्च करणार हाये म्हन्तात पाण्यासाठी. दिल्लवून पैसे येणार हायेत म्हणत्यात पाणी पुरोठ्यासाठी...."

"..... पाणी कुठून आणतान मंगसन्या?"

" आणतान टँकर भरून धरणा फिरणावून. पाण्याच्या हिरवून. समद्या खेड्यापाड्यास टँकरन पाणी- पुरोठा व्हनार हाये आता. हापशाबी व्हतान...."

" आरे पण कधी? जीव गेल्यावर? अन् त्या हापशा चं काई खरं नाई. आरे मस्तकातचं नाई तर नाकात कुठून उतरणार? भुईच्या पोटातच पाणी राह्यलं नाई त काय फायदा?"

" पण चालूच हाये सरकारचं त्याच्या परीनं. सरकार तरी कुठी कुठी पुरी पडणार हाये म्हणा... लय देते तरीबी सरकार लोकांस. आसं काल रामभाऊ म्हणत व्हते. तिच्यातलं आपणास काय समजते म्हणा..."( पृष्ठ १७२-१७३)

संवादातून लेखकाने ग्रामीण परिवेश( Millue) अचुकपणे अधोरेखीत केला आहे.. ग्रामीण भागातील सद्यपरिस्थिती, तेथील जनजीवन, लोकांचा आर्थिक व सामाजिक स्तर लक्षात येते.१९९२ सालचा मराठवाड्यातील दुष्काळ लेखकाने कथेत मांडला आहे. केवळ जयराम आणि त्याच्या पत्नीवरच नाही तर संपूर्ण महाराष्ट्रावरच वाईट वेळप्रसंग आला आहे असे रंगनाथ म्हणतो त्यावरून लेखकाने कथेमध्ये वापरलेला कालखंड कोणता हे लक्षात येते. दोन मैलावर पाणी आणताना दुष्काळाचे चित्र अधिक स्पष्ट होते. सदानंद देशमुख यानी ते अतिशय साक्षेपीभावाने रेखाटले आहे.

त्याचप्रमाणे जयरामची मानसिकता देखील दिसून येते ." सालं, दोन पोरी झाल्या. पण लगन व्हवून लेकाच्या सासरी गेल्या. त्यातली एखांदी पोरग व्हवून जन्मास येती. त आता जवान व्हवून ते पोरग कामास हाताखाली आलं आस्तं... आदार झाला आस्ता कामाधामाचा...." पुरुषसत्ताक पद्धतीचे द्योतक असलेली मानसिकता जयरामच्या बोलण्यातून डोकावते. जयराम आणि त्याची बायको जन्मभर ढोराप्रमाणे राबलेले मजूर आहेत.जयरामचे पत्नीवर प्रेम आहे. तिच्या ढासळत्या तब्येतीमुळे तो कासावीस होतो पण मग अचानक पुरुषी अहंकारामुळे तो तिच्यावर डाफरायला देखील मागेपुढे बघत नाहीं. गव्हाच्या वाळल्या शेतास आग लागावी तसा भडकून उठतो.( पृष्ठ १७६) त्यावर त्याची बायको देखील अद्धातद्ध्वा बोलते. बायको आजारी म्हणून तिच्यावर कातावणारा जयराम व्याकुळतेने म्हणतो,"..... जाय नं दवाखान्यात. इकू इच्यामिनी दोन चार किलो जवारी. तुपल्या जिवास सुकतं सम्दं...."( पृष्ठ१७६) पण रागाचा पारा उतरतो, त्याच्या आवाजातला लोण्याचा गोळा तिला जाणवतो, तेवढयानं देखील ती सुखावते. खर्च नको म्हणून ती " थांबून जाईल आपलमत्या..." असे म्हणत वेळ मारून नेते. एवढेच नाही तर आपल्या औषधपाण्यासाठी पाच पन्नास रुपयांस बैलास विकून टाकावा ही कल्पना देखील तिला असहय होते.पारंपरिक नवरा- बायको मधील वादविवादाचे, त्यांच्यातील प्रेमाचे, काळजीचे देखील वास्तव चित्रण लेखकाने रेखाटलेले दिसते.

गप्पा मारता मारता गाढवापासून पाण्याचा रांजण जपून ठेवण्यासाठी रंगनाथ त्याला रांजणच घरात ठेव असा सल्ला देतो. तो सल्ला जयरामला अगदी व्यवहार्य वाटतो. दुसऱ्याच दिवशी हे काम करावं असं तो ठरवतो. पण आजची रात्र थोडे सावध रहावे लागणार होते. तो सावध रहातो देखील पण तिच रात्र वैऱ्याची ठरते. दमलेल्या, भागलेल्या जयरामला कधी झोप लागते ते कळतच नाही. रांजणावर आवाज येतो तशी त्याची झोपमोड होते. आधीच गाढवावर संतापलेला जयराम नेहेमीची काठी न घेता जाडजूड सोटा घेऊनच जोरदार प्रहार करतो. वार वर्मी लागतो. रांजणावर असलेली आकृती तिथेच मृत्यूमुखीं पड़ते; पण जयरामचे दुर्दैव असे की, ते गाढव नसून त्याची पत्नी पाणी काढत असते. आपला सोटा लागून मेलेली आपली पत्नी आहे हे कळाल्यामुळे त्याच्या जीवाची विलक्षण तडफड होते. जयराम व जयरामसारख्या कष्टकऱ्याची पराकोटीची असहाय्यता कथेतून लेखकाने वास्तववादी पद्धतीने मांडली आहे.

दुष्काळाचा असाही एक बळी ठरतो.

त्याच्या कथेविषयी वासुदेव मुलाटे म्हणतात," ग्रामीण वास्तवाला उभे करण्यासाठी त्यानी निवडलेले विषय आणि अनुभवचित्र अत्यंत पूरक अशी आहेत. विदर्भातील ग्रामजीवनाची ही कथाचित्रे आहेत. त्यांना अनुरूप अशी" भाषा" वापरून ते अधिक प्रत्ययकारी करतात. ..... त्यात अकृत्रिमता आहे व्हाडी बोलीतील संवाद वातावरण निर्माण करण्यास मदतच करतात."

साहित्य ही एक सामाजिक संस्था आहे व समाजनिर्मित भाषा हे त्याचे माध्यम आहे. प्रतीकात्मक व छंदोबद्धता ही जी साहित्याची पारंपरिक साधनतंत्रे आहेत, त्यांची प्रकृतीच मुळी सामाजिक आहे.. या रुढ पारंपरिक गोष्टी किंवा प्रमाणके यांचा उद्भव समाजातच शक्य आहे. शिवाय हे प्राकृतिक विश्व व व्यक्तीचे अंतरिक किंवा व्यक्तिनिष्ठ विश्व, ही दोन्ही विश्वे जरी साहित्यिक" अनुकृती" चे विषय ठरत असले, तरीसुद्धा साहित्य हे त्याही पुढे जाऊन" जीवना" चे" प्रतिनिधित्व" करीन असते आणि" जीवन" हे बव्हंशी एक सामाजिक वास्तवच असते.... खरोखर विशिष्ट तऱ्हेच्या सामाजिक संस्थांशी असलेल्या घनिष्ठ लाग्याबांध्यातूनच प्राय: साहित्याचा उद्भव होत अलिला आहे आणि आदिम समाजाच्या बाबतीत तर कविता ही मंत्रानुष्ठान. यातुविद्या, रोजचे काम किंवा क्रीडा यांपासून वेगळी दाखवताच येत नाही. साहित्याला सामाजिक प्रयोजन किंवा उपयोगही असतो व तो काही शुद्ध व्यक्तिगत असू शकत नाही. साहित्याभ्यासातून उपस्थित होणारे बहुसंख्य प्रश्न निदान अंतिमत: वा गर्भितपणे तरी सामाजिक प्रश्नच असतात." असे रेने वेलेक यांनी म्हटलेले आहे . त्यामुळे" लचांड" या कथेतील भाषेकडे बघणे आवश्यक आहे. कारण साहित्याची निर्मिती, आकलन, आस्वाद व समीक्षा हे भाषेवरच अवलंबून असते. डॉ सदानंद देशमुख यांनी त्यांची वैदर्भीय भाषा वापरली आहे आणि ती सहज व ओघवती आहे. परिणामकारक आहे. संवादासाठी बोली भाषा वापरली आहे. बोली भाषेविषयी अरविंद कुलकर्णी म्हणतात- " बोली भाषेतसुद्धा एकच पथ्य सांगता येईल की त्या त्या साहित्यकृतींचा एक अविभाज्य भाग म्हणून आली पाहिजे. केवळ बोलीसाठी बोली अशी भूमिका योग्य नाही. त्यामुळे साहित्यकृतीची कलात्मकता धोक्यात येईल." प्रमाण भाषेपेक्षा बोली भाषेतून लिहिले गेलेले साहित्य हे अधिक प्रभावी ठरते. ग्रामीण साहित्यात तर त्या बोलीचा समावेश नसेल तर ते साहित्य बोजड व अपरिणामकारक ठरते.पण लचांड या कथेमध्ये वैदर्भीय बोली अतिशय सहजपणे अवतरली आहे. बोलीभाषेनुसार व प्रदेशानुसार येथील समाजजीवन रेखाटले आहे.

- **भाषिक वैशिष्ट्ये**

  १. **सहजता: "** लचांड" कथेतील भाषा अगदी सहज आहे. प्रमाणभाषा आणि बोलीभाषा यांचे मिश्रण कथेला एक प्रवाहीपण प्राप्त करून देते. संवादांना एक लय प्राप्त करून देते आणि भाषेतून तेथील समाजजीवनाचे चित्रण रेखाटण्यात लेखक यशस्वी झाले असे म्हणता येते. उदा. झाडं कसे मेल्या माणसाचा मुडदा उकरून उभा केल्यागत दिसतात.

  " मंधवा हौद भरून आणाय गेलतो त आज पुन्हंदी चार ढोरं दिसलेत पंढरीत. सुभाना डवर चामड सोलत व्हता. कोणाचे मेले?"

" कान्नू? त्यात काय आता आप्रुप राहयल म्हणा.... पण आशानं कशी व्हावं पुढच्या साली कुणबीक ? औतास काय जुतून, पेरणी डवरणी करावं? काय समजत नाई..." ( पृष्ठ१६९)

अशी सहज समजणारी भाषा लेखकाने मांडली आहे.

२. **परिणामकारकता:** कथेमध्ये संवाद अतिशय परिणामकारक पद्धतीने दिसतात. त्यातून कोणता भाव व्यक्त होतो ते स्पष्ट होते आणि उत्कृष्ट सामाजिक चित्रण यातून दिसून येते.

उदा. माणसाची खायची जवारी पाच रुपये किलो झाली. एक तिथं आर्धी भाकर खावी लागते तर बैलास कुठून आणायचा चारा? कुठून आणायचा आलप? शिवारात हिरवळ काहीच नाही. सम्दी मोकाट्या दोरायनं पाटात ढकलून शेण करून टाकली. उंच झाडांचा पाला माणसांनी ढोरास वरपून टाकला. आता ढोरं रानात हाकलून दिली तरी जात नाही. त्यांना माहीत झालं, तिकड खायला काहीच नाही. शिवारात दगड अन् माती याच्याशिवाय काहीच नाही. झाडांचे नुसते सापळे उभे आहेत. त्यावर हिरवळीचा एक थेंबही नाही...."( पृष्ठ१६९)

अशा अनेक वाक्यांमधून ग्रामीण समाज, तेथील वास्तव, तेथील परिवेश अतिशय परिणामकारक रित्या लेखक डॉ सदानंद देशमुख यांनी रेखाटला आहे.

३. **चित्रमयता:** हे देखील एक भाषिक वैशिष्ठ्य म्हणता येईल .त्यातील चित्रमयशैलीतून लेखक अतिशय उत्कटपणे व्यक्त झाले आहेत. लेखणीतून डोळ्यासमोर प्रत्यक्ष चित्रण उभे करण्यात लेखक यशस्वी झाले आहेत असे म्हणता येईल.

"अंगणातल्या रांजणातून गुंडीनं अर्धी बाटली पाणी उपसलं. गोठ्यातल्या बैलाकडे चालवलं. त्याच्या पुढ्यात मांडलं. तर बैलान त्याला हुंगलंही नाही. बीमार माणसासारखी अन पाण्यावरची त्याची वासनाच गेलेली. निर्जीव डोळ्यानं, डोक्यावरचे शिंगाड तोलत जयरामकडे पाई लागला. अंगावर गोमाशाचं मव्हळ भणभणत होतच .... काही चिलटं, डास उठून कचाकच की कचाकच चावू लागले.... बिटी बिटी डोळ्यांनी हतबत्य झाल्यावाणी तो बैलाकडे पाहलागला. तर बैलाच्या डोळ्यातून आसवाच्या रेषा खाली घरंगळत सरकू लागल्या. आपल्या मालकाचा आपल्यावरील लोभ पाइन बैलास कसमसून आलं. तशी जयरामने पुन्हांदी बाटली पुढं सरकावली. ती मान ठेवावा तशी नुसती हुंगली... अन् नाई पाह्यजेल आता. काईच नाई पाह्यजेल. असं गरीब डोळ्यानी म्हणाला. डोक्यावरच्या भारणसुद झपक्या शिंगाडायचं ओझं झालं होतं. तर ते असह्य होऊन तशीच मान पुढं लांबवली. व्हटाळी भुईवर टेकवून भुईचा टेका घेतला. अन नाई सोसत आता.... असा जयरामला डोळ्यांनी बोलू लागला. "( पृष्ठ १७०)

या सारख्या अनेक वर्णनातून दुष्काळग्रस्त परिस्थितीचे यथायोग्य चित्रण दिसून येते.

४. **भावनांचे उत्कट चित्रण:** छोट्या छोट्या वाक्यांमधून, प्रसंगवर्णनांतून भावनांचे उत्कट चित्रण केले गेले आहे. जयरामचा त्रागा, वैताग, असहाय्यता, अपरिहार्यता, आनंद, दु:ख, कळवळा, चीड, संताप सारे अतिशय उत्कटपणे अभिव्यक्त झाले आहे. बैलाचे आणि त्याचे नातेसंबंध यातून देखील दोघामधील भावना अतिशय उत्कटपणे व्यक्त झाल्यामुळे ग्रामीण कृषिप्रधान संस्कृतीतील मनुष्य आणि जनावर( विशेषतः बैल) यांच्यातील सहसंबंच अधोरेखीत व्हायला मदत होते. मालक- नोकर संबंध, जयराम- त्याच्या बायकोमधील वाद-विवाद- सुसंवाद यातून त्या त्या वेळेच्या त्या त्या भावना यथायोग्य प्रतिबिंबित झाल्या आहेत. आणि लेखकाने तो क्षण अचूकपणे पकडला आहे.

**आपली प्रगती तपासा**

१) लचांड कथेची समाजशास्त्रीय पद्धतीने समीक्षा करा.

----------------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------------

## ४.१अ.५ सारांश

ग्रामस्तरावरचे वास्तवदर्शी चित्रण करून गावगाड्याच्या बदलत्या वर्तमानाचा वेध घेणारे लेखक म्हणून वेध घेणारे लेखक म्हणून सदानंद देशमुख यांना ओळखले जाते ग्रामस्तरावरच्या अन्न, वस्त्र, निवारा मूलभूत गरजा तर दूरच पण पाण्यासारखी नैसर्गिक गोष्ट देखील नागरिकांना मिळू नये; आणि त्यात जनावरांचा आणि माणसांचा बळी जावा हे अतिशय करुण वास्तव लेखकाने येथे अधोरेखीत केले आहे.

अशाप्रकारे, सदानंद देशमुख यांच्या कथेतून व्यक्ती, समाज आणि कृषि-संस्कृतीचे चित्रण व्यक्त होते. सदानंद देशमुख यांनी ग्रामीण वास्तवाच्या पातळीवरून जीवनाचा वेध "लचांड" या कथेत घेतला आहे.

## ४.१अ.६ संदर्भ ग्रंथ सूची

१. लचांड कथासंग्रह: लेखक: सदानंद देशमुख: शब्दालय प्रकाशन

२. साहित्यबंध: संपादक डॉ सतीश कामत: शब्दालय प्रकाशन

३. file:///home/chronos/u-1215effe555352c6880c76788f38eff75a2a614f/MyFiles/Downloads/09_chapter%204.pdf

४. https://hi.m.wikipedia.org/wiki/%E0%A4%B8%E0%A4%A6%E0%A4%BE%E0%A4%A8%E0%A4%82%E0%A4%A6_%E0%A4%A8%E0%A4%BE%E0%A4%AE%E0%A4%A6%E0%A5%87%E0%A4%B5%E0%A4%B0%E0%A4%BE%E0%A4%B5_%E0%A4%A6%E0%A5%87%E0%A4%B6%E0%A4%AE%E0%A5%81%E0%A4%96

५. http://210.212.169.38/xmlui/handle/123456789/876


## ४.१अ.७ नमुना प्रश्नमंच

१. "लचांड" या कथेची समाजशास्त्रीय पद्धतीने समीक्षा करा.

२. "लचांड" या सदानंद देशमुख लिखित कथेतून व्यक्ती, समाज आणि कृषि-संस्कृतीचे चित्रण व्यक्त होते. " या विधानाचा परामर्श समाजशास्त्रीय समीक्षा पद्धतीने घ्या.

आ) टीपा लिहा.

१) 'लचांड' मधील वातावरण निर्मिती

२) 'लचांड' मधील समाज जीवनाचे प्रतिबिंब

३) "लचांड" मधील प्रादेशिकता

## ४.१अ.८ पुरक वाचन


१.https://mr.m.wikipedia.org/wiki/%E0%A4%B8%E0%A4%A6%E0%A4%BE%E0%A4%A8%E0%A4%82%E0%A4%A6_%E0%A4%A6%E0%A5%87%E0%A4%B6%E0%A4%AE%E0%A5%81%E0%A4%96

२. समीक्षेची नवी रुपे- गंगाधर पाटील मुंबई १९८१

३. शिरवाडकर, के. रं - मार्क्सवादी साहित्यविचार पुणे-१९८०


❖❖❖

घटक : ४

# ४(१आ)

## कथा - फिनिक्स च्या राखेतून उठला मोर

**लेखक जयंत पवार**

**घटक रचना**

४.१आ.१ प्रास्ताविक

४.१आ.२ लेखकाविषयी

४.१आ.३ " फिनिक्स च्या राखेतून उठला मोर " या कथेविषयी

४.१आ.४ कथानक आणि समीक्षा

४.१आ.५ सारांश

४.१आ.६ संदर्भ ग्रंथ

४.१आ.७ सरावासाठी प्रश्न

४.१आ.८ पुरक वाचन

### ४.१आ.१ प्रास्ताविक

कोणतीही कलाकृती ही एक सामाजिक कलाकृती असते. वाङ्मय, तत्वज्ञान ,कला या गोष्टी कोणत्या नैतिक परिस्थितीत उदयाला येतात. हे बघणे आवश्यक ठरते. वंश (RACE) युग (moment) आणि परिवेश (millue) म्हणजे सभोवतालचे वातावरण या कोणत्या अवस्थेत नैतिक स्थिती निर्माण होते असे प्रश्न तेन यांनी विचारले आहेत. समाजशास्त्रीय समीक्षा करीत असताना एखादी कलाकृती कशी समृद्ध आहे आणि तिचा अर्थ कसा लावायचा हे जेव्हा आपण तपासून बघतो तेव्हा त्या लेखनात आपल्याला एखादा युगाचा, एखादा मानव वंशाचा आत्मा आढळतो. एखादी कलाकृती संपूर्ण राष्ट्र किंवा युगाचे प्रतिनिधित्व करणारी असते. कारण त्या कलाकृतीत त्या राष्ट्रातील त्या युगातील त्या समाजातील जीवन साकार झालेले असते. तेनच्या विचारांचा थोडक्यात सारांश आहे. वाङ्मय कृतीतून संस्कृतीच्या स्थिती गतीचे थोडक्यात खरेखुरे चित्रण आढळते. माणूस कळून घेण्यासाठी या वाङ्मय कृतीचा अभ्यास केला जातो. तेन च्या या तीन घटकांत मार्क्स आणि एंजल्स यांनी "आर्थिक घटकाचा" देखील उल्लेख केला आहे. या आर्थिक घटकाचा देखील परिस्थितीवर कसा परिणाम होतो

हे मार्क्सने दाखवून दिले आहे. त्यामुळे या विविध घटकांचा लेखकावर व तदअनुषंगाने त्याचा कलाकृतीवर परिणाम होतो, याचे कारण साहित्य आणि समाज यात अन्योन्य संबंध आहे. कोणता तो " फिनिक्सच्या राखेतून उठला मोर" या लेखक जयंत पवार लिखित कथेची समाजशास्त्रीय समीक्षा करून पडताळून बघू.

## ४.१आ.२ लेखकांविषयी

जयंत पवार हे एक पत्रकार, मराठी नाटककार आणि नाट्यसमीक्षक आहेत.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेने घेतलेल्या नाट्यलेखन स्पर्धेत 'काय डेंजर वारा सुटलाय' या नाटकासाठी जयंत पवार यांना सर्वोत्कृष्ट लेखनाचे प्रथम पारितोषिक मिळाले. २०१४ साली जानेवारी महिन्यात १० ते १२ या तारखांना महाड येथे झालेल्या १५व्या कोकण मराठी साहित्य परिषदेच्या साहित्य संमेलनाचे जयंत पवार हे अध्यक्ष होते.

जयंत पवार यांना २०१२ सालचा साहित्य अकादमी पुरस्कार त्यांच्या 'फिनिक्सच्या राखेतून उठला मोर' या कथासंग्रहासाठी मिळाला.

जयंत पवार यांची साहित्यसंपदा:-

- अधांतर ( नाटक)
- काय डेंजर वारा सुटलाय( नाटक)
- टेंगशेच्या स्वप्नात ट्रेन (दीर्घांक)
- दरवेशी (एकांकिका)
- पाऊलखुणा (वंश या नाटकाचे व्यावसायिक रूप)
- फिनिक्सच्या राखेतून उठला मोर (कथासंग्रह)
- बहुजन संस्कृतिवाद आणि लेखक (भा़ाषाविषयक)
- माझे घर
- वरनभातलोन्चा नि कोन नाय कोन्चा (कथासंग्रह)
- वंश
- शेवटच्या बीभत्साचे गाणे (दीर्घांक)
- होड्या (एकांकिका)

munotes.in

## ४.१आ.३ " फिनिक्स च्या राखेतून उठला मोर " या कथेविषयी

" फिनिक्सच्या  राखेतून उठला मोर" ही कथा" महाराष्ट्र टाईम्स दिवाळी अंकात(२००६) मध्ये पूर्वप्रकाशित झाली होती. नंतर ती पुस्तक रुपाने प्रसिद्ध झाली.

## ४.१आ.४ कथानक आणि समीक्षा

समाजशास्त्रीय समीक्षेच्या दृष्टीने विचार करता समाज आणि समाजातील लोक यांच्यातील क्रिया-अंतरक्रिया याचा विचार करावा लागतो. " फिनिक्सच्या राखेतून उठला मोर." या कथेची सुरवात च लेखकाने पुढीलप्रमाणे केली आहे.

सुंदरीने आपले चेतक बाहू फैलावून आवाहन करावं किंवा एका मोहक प्राण्याने आपला जबडा इतका वासावा की, त्याचा वरचा ओठ आकाशाला भिडावा आणि खालचा ओठ भूपृष्ठावर उतरत लांब पसरलेल्या जीभेखाली दडून जावा किंवा गेट वे ऑफ ग्लोबल इंडिया तसा हायस्ट्रीट फिनिक्सचा महादरवाजा सताड ऐसपैस उघडा आहे .अजगराने घेतलेल्या श्वासागणिक छोटे प्राणी खेचले जावेत, त्याच्या जबड्यात तशा लॅन्सेट, बेंझ, आयकॉन, इनोवा, स्कॉर्पिओ, सँट्रो, मारुती 800 आत पळत आहेत. शुभ्र सफेद इस्त्रीदार शर्टस, पँटस, ट्राऊजर्स जीन्स, ऐटदार फ्रेश क्लर्स, ब्रीफ्स सांभाळणारे हात, लेदर बॅग्ज विथ लॅपटॉप लटकलेले खांदे, ….. कोरम लाऊंजमध्ये बसून लाईट डिश किंवा स्नॅक्स घेऊन लेमन टी सह सिगरेट्स ओढत फकाफक गप्पा करू शकतात…"

फिनिक्स मिलच्या आवारात साकार झालेल्या" हायस्ट्रीट फिनिक्स" या मॉलचे हे वर्णन.. मुंबईतील " फिनिक्स मिल" ही एकेकाळी मोठ्या प्रमाणात उत्पन्न देणारी, अनेक कामगारांना रोजीरोटी देणारी मिल होती. गिरणी कामगारांचा वेतनवाढीसाठी संप होतो आणि तो खूप चिघळतो. अति ताणल्यामुळे या संपात ही मिल बंद पडते. जागतिकीकरणाचा परिणाम त्या काळात समाजातील प्रत्येक घटकावर पडलेला दिसत होता त्याचेच एक दृश्य रुप म्हणजे त्याकाळात उदयास आलेली  मॉल संस्कृती. या लाटेत त्या फिनिक्स मिलची मोक्याची जागा बळकावून तिथे बहुराष्ट्रीय कंपन्यांनी( MNC) आपापले ब्रँडस विकण्यासाठी तिथे हायपर मार्केट सुरु केले. ग्राहककेंद्रित या कंपन्यांचे लक्ष्य येथील तथाकथीत मध्यम वर्ग, नवश्रीमंत वर्ग आणि उच्चभ्रू वर्ग यांच्यावरच मुख्यत्वे होते. कमी दर, उच्च दर्जाचा माल यासारख्या जाहिरातींचा मारा करून सर्वसामान्य लोकांना आकर्षून घेण्याचा सपाटा या कंपन्यांनी लावला होता. या कथेतून लेखक जयंत पवार यांना असे सुचवायचे आहे की ही मॉल संस्कृती सर्वसामान्य जनतेला कशी आकर्षित करून घेते आणि याच भूमीवर घाम गाळलेल्या गिरणी कामगाराच्या प्रश्नांना उच्चवर्गीय, भांडवलदार आणि सरकार कशी काडीचीही किंमत देत नाही .

munotes.in

कथेचा अवकाश पट चांगलाच मोठा आहे. साधारण मार्च १९३९ ते २००० या ५०-६० वर्षाचा इतिहास रंगवलेला आहे. कथेच्या अनुषंगाने अनेक गोष्टी उलगडत जातात आणि तत्कालीन समाजाचे प्रतिबिंब दाखवतात. भांडवलदार- कामगार यांच्यातील परंपरागत प्रचंड दरी येथे लेखकाने अधोरेखीत केली आहे.

घनःश्याम हडकर हा साधारण एकवीस किंवा बावीस वर्षाचा, विजोड. हडकुळा असा तरुण. त्याचा पेहेराव मॉल संस्कृतीत अजिबात न बसणारा आहे. न सरावलेल्या नजरेने घनःश्याम हडकर या मॉलमध्ये शिरला होता. त्यावेळी सकाळचे साडे आठ वाजले होते. संपूर्ण घटनेचे आवर्तन रात्री बारा वाजेपर्यंत पूर्ण होते. म्हणजे साधारण पंधरा-सोळा तासांच्या या अवकाशात लेखक आपल्या पुढे ५०-६० वर्षाचा पट उलगडून दाखवतो.

हा घनःश्याम " मॉल संस्कृतीत अगदी न शोभणारा, विसंगत दिसणारा, खिशात एकशेबारा रुपये घेऊन एक बऱ्यापैकी शर्ट घ्यायला आलेला आहे. इंटरव्ह्यूला जाताना जरा चांगल्यापैकी शर्ट घातला की कदाचित चांगली नोकरी मिळेल असे तथाकथित तरुणांना वाटते तसे त्यालाही वाटते. म्हणजे स्वतःचे शिक्षण, कुवत, पात्रता किती आहे याकडे न बघता बाहय झगमगाटाकडे बघणाऱ्या तरुणांचेच तो एकप्रकारे प्रतिनिधित्व करताना दिसतो.एकशे बारा रुपयांत काहीच मिळणार नाही याची त्याला कल्पना आहे पण शर्ट मिळाला नाही तर दुसरी कोणती तरी वस्तू घ्यावी असा त्याचा मानस आहे. नाहीतर नुसता बाजार तरी फिरून यावा असे त्याला वाटते. वस्तू हाताळाव्यात अशी त्याची इच्छा आहे.. परंतू मॉलच्या वातावरणाशी पूर्णपणे विसंगत असलेल्या घनःश्यामला त्याच्या प्रत्येक हालचालीवर कोणीतरी नजर ठेऊन आहे असे वाटते, आणि ते खरे देखील असते. एरवी त्याच्यासारखीच सामाजिक स्तररचना असणाऱ्या परंतू मॉल मध्ये काम करणाऱ्या तरुण-तरुणी त्याला सारखे हटकतात, त्याच्यावर खेकसतात. यांची औकात फार फार तर  सत्राशे- अठराशे... फारफार तर दोन हजार... त्याच्या वर नसणार... पण काऊंटरच्या पलिकडे असल्यामुळे त्यांचा स्तर उंचावलेला दिसतो. ते सगळेच घनःश्याम कडे संशयास्पद नजरेने बघतात. प्रत्येक गोष्टीत  टोकतात. मॉलमधील मालाचे वर्णन लेखकाने हुबेहुब केले आहे.

बाय वन गेट थ्री फ्री... तीनशे रुपयांच्या खरेदीवर तीन शर्ट फ्री.. पण एक शर्ट शंभर रुपयाला मिळणार नव्हता. त्याच्या खिशात एकशे बारा रुपये होते पण अशा परिस्थितीत त्याला शर्ट घेता येणार नव्हता. हीच खरी मॉल संस्कृतीची विशेषता.. कारण ग्राहकांची क्रयशक्ती वाढली पाहिजे. इतक्या आकर्षक गोष्टी तिथे मांडून ठेवलेल्या असतात की आवश्यकता नसणाऱ्या गोष्टी देखील घेण्याचा ग्राहकाला मोह व्हावा. शेवटी चटकन खिशात घालता येईल अशी चड्डी चोरण्याचा मोह घनःश्यामला देखील आवरत नाहीं. पण ही गोष्ट एक सिक्युरिटी बघतो आणि त्याच्या मागे लागतो. मॉलमधले सगळे सिक्युरिटी त्याच्या मागे लागतात, त्यांना गुंगारा देण्यात थोडावेळ यशस्वी होतो, कंपाऊंडबाहेर पळतो पण चोर-

चोर आवाज ऐकून समोरून येणारी एक व्यक्ती त्याला पकडते आणि मग मागून पाठलाग करणारे सारेच त्यावरच तुटून पडतात आणि हात धुवून घेतात. इतके की घनःश्याम अगदी रक्तबंबाळ होतो आणि प्राण सोडतो त्यावेळी नऊ त्रेचाळीस झालेले असतात. अवघ्या सव्वा तासात "मॉल संस्कृतीने" एक बळी घेतलेला असतो असे दिसते.एक रस्ता सोडून असलेल्या घनःश्यामच्या घरापर्यंत पाच तासाने त्याच्या मृत्यूची बातमी कळते. इतकी माणसं स्वतःच्या मस्तीत आहेत. परात्म आहेत. जवळ कोणतेही ओळ्खपत्र नसताना पाच तासात ही बातमी त्याच्या घरी पोहोचली ही लौकरच पोहोचली असे लेखक उपरोधाने म्हणतो कारण समाजातील व्यवस्थेमधील असलेल्या त्रुटी त्याला अधोरेखित करायच्या आहेत. त्यानंतर त्याची अंत्ययात्रा निघेपर्यंत रात्रीचे बारा वाजतात या सगळ्या पंधरा-सोळा तासाचा हा अवकाश पट आहे.

महिपतराव- गंगाराम- पंढरीनाथ- गिरीधर- घनःश्याम- लहानगा जीवन अशा चार पिढ्यांचा इतिहास कथेमध्ये आला आहे. घनःश्यामचे वडील गिरीधर. त्यांचा हा एकुलता एक मुलगा बहिणींची लग्न झालेली आहेत. फिनिक्स मिलमध्ये काही वर्षांपूर्वी कामाला असणारे त्याचे आजोबा पंढरीनाथ हडकर अजूनही हयात आहेत. मात्र गिरीधर आणि त्यांच्या मधून विस्तव देखील जात नाही त्याला एक नैतिक कारण आहे. दत्ता सामंतांनी गिरणी कामगारासाठी केवळ सातशे रुपये पगारवाद मिळावी म्हणून जो संप केला होता तो त्याकाळात( 1975 -76) खूप चिघळला होता. तत्कालिन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी तो चिरडून टाकण्यासाठी अनेक उपाय योजले. संप मोडून काढण्यासाठी बदली कामगार घुसवून त्यांना अधिक रोजगाराची लालूच दाखवण्यात आली होती. त्याकाळच्या समाजरचनेचे हुबेहुब प्रतिबिंब कथेत पडलेले दिसते.. त्यावेळी गिरीधरने आपले पॅकिंग कंपनीतले काम सोडून संप मोडणाऱ्या बदली कामगारांत सहभागी व्हायचे असे ठरवले होते. त्यासाठी त्याला अधिक रोजगार मिळणार असतो. त्यावेळी पंचवीस वर्षे प्रामाणिकपणे फिनिक्स मिलमध्ये राबलेला पण गेली आठ वर्षे कोणतेही कारण न दाखवता मालकाने काढून टाकलेला पंढरीनाथला आपल्या मुलाचे हे कृत्य आवडलेले नव्हते. ती एकप्रकारची फितुरीच आहे असे त्याला वाटत होते पण गिरीधरला त्यावेळी अधिक रोजगार अधिक भत्ते आणि रोजचे फुकट चे जेवण एवढीच अमिषे भुलवित होती. आपल्या शत्रूला बळ देण्यासाठी आपल्या पोरानेच जाव हे काही पंढरीला पटत नाही.पंढरीनाथच्या नाही म्हणण्या मुळे गिरीधर संतापतो आणि तेव्हापासून बापाशी संपर्कच तोडून टाकतो. संप फोडण्याला गिरीधारीने हातभार लावलेला असतो. अधिक रोजगार देणारी नोकरी फसवून मिळवलेली असते; पण कामे करण्यात तो खूपच आळशी, कामचुकार, गर्विष्ठ आणि झोपाळू असल्यामुळे लवकरच नवा मालक त्याला हाकलून देतो गिरीधारीची अवस्था ' न घरका ना घाट का अशी होते ' पुढे पुढे तर तो दारुच्या व्यसनापायी कामातूनच जातो, निष्क्रियच बनतो. आणि कालांतराने फिनिक्स मिल बंदच पडते ही हकीकत निवेदनाच्या ओघात समजते.

१९३९ च्या संपात गंगारामची दुसरी पत्नी विठाबाई हिचा सहभाग होता आणि तो संप तिने यशस्वी केला होता. बिटीया मिलमध्ये त्यावेळी कामगार कपात चालू असते त्यावेळी जवळजवळ २००दिवसांचा संप विठाबाई यशस्वी करते. सप्टेंबर मध्ये हिटलर ने पोलंडवर हल्ला केला. दुसऱ्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर बिटीया मिल च्या मालकाने कामगारांना विनाशर्त कामावर घेतलेलं असतं... कामगारांचा विजय झालेला असतो. मात्र त्या ऐतिहासिक विजयाचा सूड बरोबर अडोतीस वर्षांनी म्हणजे १९७७ मध्ये घेतला जातो. इंदिरा काँग्रेसचे सरकार पडते आणि त्याची जागा जनता सरकार घेते. पण या गोष्टीचा विजयानंद साजरा करण्याआधीच १९ सप्टेंबर १९७७ मध्ये फिनिक्स मिलमध्ये आग लागून सगळे भस्मसात होते. चार हजार आयुष्य बरबाद होतात. सरकार कोणाचही येवो कामगाराच्या समस्यांमध्ये कोणताच बदल होत नाही हेच समाजातील जळजळीत वास्तव लेखकाला येथे अधोरेखीत करायचे आहे.

सुंदर होण्यासाठी उखडले जावे लागते आणि हे उखडले जातात ते कामगारच! या सगळ्या प्रकारात भरडला जातो तो कामगार वर्गच! हडकर कुटुंबाच्या तीन पिढ्या ज्या फिनिक्स मिलमध्ये राबल्या ज्यांनी आपला घाम गाळला, रक्त गाळले, मिलमध्ये प्रचंड कापड उत्पादन केले त्यांचा आणि त्यांच्या सारख्या अनेक गिरणी कामगारांचा धनाढय, स्वार्थी गिरणी मालकांनी घात केला होता. मुद्दामच गिरणीला आग लावून, नुकसान दाखवून टाळेबंदी केली होती. बदलत्या काळानुसार सामान्य माणसाची मूल्येही पार बदलून गेली होती भांडवलशाही आणि नोकरशाही यांच्या सततच्या संघर्षात कितीतरी पिढ्या बरबाद झाल्या होत्या . समाजातील हे दोन स्तर लेखक जयंत पवारांनी अधोरेखीत केले आहेत . त्याबद्दल लेखक जयंत पवार लिहितात--

" पण या आगीत सारंच भस्मसात झालं तरी कसं म्हणावं? कामगारांचे गाढव श्रम, बोनसचे वायदे, हक्कासाठी लढे, संप आणि घेराव, त्यांची टीनपाट आयुष्य आणि चिंधीभर स्वप्न हे लाकूड भुसा-कोळसाच होते. गेले जळून. पण मिलच्या इमारतीचे लोखंडी सांगाडे राहिले तगून आणि त्यांच्या आधाराने कल्पकता, भव्यता, सौंदर्यानुभूती, ऐश्वर्य उठलं सोन्यासारखं झळझळून..."

आईच्या आजारपणात श्यामची शाळा सुटते; गिरीधरच्या व्यसनापायी श्यामच्या आई च्या म्हणजेच गिरीजाच्या दागिन्यांना बाहेरची वाट बघावी लागते.  शानौशौकत च्या मागे लागून घनःश्याम आईचे मंगळसूत्र देखील विकून टाकतो. आणि त्याचा व पुष्पाचा उधारीवर चालणारा संसार सुरु होतो.... या झुळझुळीत जगात घनःश्यामला नक्कीच नोकरी मिळू शकते यावर त्यांचा विश्वास आहे.

या बदललेल्या वातावरणाचा परिणाम सर्वसामान्यांच्या जगण्यावरही झाला. सौंदर्याचे, संपन्नतेचे आकर्षण त्यांनाही वाटू लागलं शिवाय दूरचित्रवाहिन्यांवरील जाहिराती, मालिका यांनी तर या सामान्यांची दिशाभूल चालविली होतीच .त्याबद्दल लेखक लिहितो----

"एका बाजूला बिग बझार आणि दुसऱ्या बाजूला त्याची बहीण(?) चिकणी लाईफ स्टाईल! त्यांनी घनःश्याम आणि पुष्पा सारख्या असंख्यांच्या मनात सुबक, सुवासिक रमणीय स्वप्न पेरली आहेत. लेखक म्हणतो "....... तुम्हाला जे हवं ते इथे मिळेल .. ते घेण्यासाठी पैसे नकोत, क्षमता हवी. पैसे नसले तर क्रेडिट कार्ड चालू शकतं... चाळीतल्या मुली चालल्या आहेत थव्याथव्यानं. ब्युटी पार्लरमध्ये फेशियल, ब्लिचिंग, स्टेपकट्स, अंडरआर्म्स वॅक्सिंग इत्यादी केल्यावरच हायस्ट्रीट फिनिक्सच्या दरवाज्यात पाऊल टाकायची अहता प्राप्त होते ते त्यांना माहीत आहे त्या लाइफ स्टाईल मध्ये फिरतात आणि मग बिग बाजारमध्ये घेतात बाहत्तर रुपयांच्या हेअर पिना. घरोघरीच्या टीव्हींनी तेवती ठेवली आहेत त्यांची स्वप्नं, जी डोक्यात घेऊनच त्या झोपी जातात आणि स्वप्नात बघतात लाइफ स्टाईलच्या मायानगरीत नेणाऱ्या राजपुत्राची प्रतिमा. जशी की पुष्पा. घनःश्यामशी लग्न करायला घरून पळून येताना आपलं सासर बिग बाजारच्या समोरच आहे या कल्पनेने ती नखशिखान्त मोहरली होती. अनेकदा आत जाऊन आली होती. कधी तरी ऐटीत ट्रॉली घुमवत फिरायचं आणि एकेक पॅक पटपट उचलत मालामाल होऊन यायचं ही तिची सर्वोच्च महत्वाकांक्षा आहे. अशा उच्च महत्वाकांक्षेने भारलेल्या असंख्य तरुणी आणि अगणित तरुण हायस्ट्रीट फिनिक्सच्या महाद्वारावर तिष्ठत उभे आहेत."

समाजातील मोठी शोकांतिका लेखक जयंत पवार यांनी आपल्या या कथेतून मांडली आहे. एक आवर्तन पूर्ण होते आणि त्या आवर्तनात लेखकाने विविध सामाजिक प्रश्नाचे, समस्यांचे बारकाईने रेखाटन केले आहे. दुसऱ्या महायुद्धाची परिस्थिती, कामगार- भांडवलदार संबंध, स्वतःच्या स्वार्थासाठी कामगारांच्या प्राणांची पर्वा न करणारा मालक वर्ग, सत्ता बदल झाला तरी कामगारांची स्थिती आहे तशीच आहे हे सांगण्याचा केलेला प्रयत्न, सुंदर सुवासिक झुळझुळीत वातावरणाला भुलणारे तरुण-तरुणी आणि जागतिकीकरणाच्या या रेट्यात या सगळ्यांचे वाजलेले बारा या सगळ्या गोष्टी आपल्या उपरोधिक शैलीने जयंत पवार यांनी अगदी टोकदारपणे मांडल्या आहेत.

या कथेबद्दल सुप्रसिद्ध लेखिका निरजा म्हणतात----

" या संपाची पार्श्वभूमी असलेली आणखी एक कथा म्हणजे 'फिनिक्सच्या राखेतून उठलेला मोर' ही कथासंग्रहाचं नाव असलेली कथा. ती आठवण करून देते ती संपात उद्ध्वस्त झालेल्या कामगारांच्या हतबल जगण्याचा प्रवास दाखवणाऱ्या 'अधांतर' या नाटकाची. हजारो कामगारांच्या पोटापाण्याची सोय करणाऱ्या फिनिक्स मिलचं मॉलमध्ये झालेलं रूपांतर म्हणजेच शोषितांच्या कबरीवर बांधलेला चकाकत्या दुनियेचा चंदेरी महालच. ८२च्या संपानं देशोधडीला लावलेल्या कामगारांच्या हातात आपण दिलेल्या अयशस्वी लढ्याच्या आठवणीशिवाय काहीच उरले नाही. आता तीस वर्ष पूर्ण झाल्यानंतरही त्यातून न सावरलेल्या कामगारांच्या कहाण्या आजही अस्वस्थ करतात. अनेक कामगारांच्या बायकांनी हातात लाटणंपोळपाट घेतलं, नैराश्यानं घेरलेली अनेक तरुण मुलं मारामाऱ्या,

दंगे करून आपला संताप व्यक्त करायला लागली. त्यांचा उपयोग मग गुन्हेगारी विश्वातील लोकांनी करून घेतलाच, पण वेळ आली तर लाठ्या काठ्या हातात घेणारी मुलं राजकीय पक्षांनीही जवळ केली. जी इथं वळली नाहीत त्यांना या कथेतील शामसारखी वणवण करावी लागली. इंटरव्ह्यूला जाण्यासाठी चांगला शर्ट नसलेला शाम या मॉलमध्ये शिरतो तेव्हा खरं तर तो जिच्या अंगाखांद्यावर खेळला त्या गिरणीच्याच दारात जातो. फक्त आता तिचं एका प्रचंड मोठा जबडा असलेल्या मॉलमध्ये रूपांतर झालं आहे. हजारोनं पैसा कमवणाऱ्या लोकांच्या दृष्टीनं शामचं तिथं येणं म्हणजे त्याच्या चारित्र्यावर डाग पडल्यासारखं वाटणं होय. अशा मुलानं कोणत्याही वस्तूला हात लावला तर संशयानं पहाणारी आपली व्यवस्था शामचा बळी घेते. ज्या व्यवस्थेनं एके काळी कामगारांचा बळी घेतला होता ती व्यवस्थाच पुन्हा एकदा त्या वर्गातील तग धरून जगण्याचा प्रयत्न करणाऱ्या या लोकांचा बळी घ्यायला उत्सुक आहे. जगणाऱ्यांच्या यादीत वळवळत जगणारी आणि मरणाऱ्यांच्या यादीतून निसटलेली ही अशी अनेक नावं संवेदनशील माणसांना अस्वस्थ करत असतात. हा लेखक त्याला अपवाद असणं शक्य नाही हे या कथा वाचल्यावर लक्षात येतं.(म. टा. १ एप्रिल २०१२ तुकड्या तुकड्यात विखुरलेलं आजचं वास्तव -- नीरजा)

चाळ, कामगार वस्ती हे विषय आले म्हणजे दत्ता सामंतांचा तो प्रसिद्ध 'गिरणी कामगार संप' आलाच, त्याच संपाची पार्श्वभूमी असलेली कथा म्हणजे 'फिनिक्सच्या राखेतून उठलेला मोर'. ही कथा मूळातून वाचणे नितांत गरजेचे आहे, वाचल्यावरच कळेल की जयंत पवारांनी ह्याच कथेचे शीर्षक आपल्या पहिल्यावहिल्या कथासंग्रहाला का दिले असावे.पवारांचे लेखन हे काही औपराधिक नसून सत्यस्थितीचे जे चित्रण ते समोर आणतात त्याचा अस्सलपणा मजकुरात जाणवत जातो. फिनिक्स नावाची मुंबईतील एक गिरणी आणि ती बंद पडल्यावर झालेल्या उलथापालथी... या कथेत अगदी सविस्तर पणे मांडल्या गेल्या आहेत. कथेच्या शीर्षकाविषयी स्वतः लेखक सांगतो, " मी आयुष्याची तीस-बत्तीस वर्षे जिथे घालवली तो गिरणगांव, नाटकवाल्यांचं जग, साहित्यिकांचं जग, पत्रकारितेच्या निमित्याने जगाकडे बघण्याची खुली झालेली खिडकी, मुंबईतला गिरण्यांचा संप, बाबरीकांड, धार्मिक पुनरुज्जीवनवाद आणि जातीय दंगे, जागतिकीकरणाचे भलेबुरे आघात सगळ्यांचा परिणाम माझ्या जाणीवांवर आणि पर्यायाने लेखनावर झालेला आहे.

"कथाकार हा कधी काळच्या वंचितांचा वंशज आहे. कथाकाराने डोळ्यांना दिसणाऱ्या आणि कानांना ऐकू येणाऱ्या वास्तवापलीकडे पोहचण्याचा प्रयत्न केला पाहिजे. माझा स्वत:चा तसा प्रयत्न असतो. जसं घडलं तसं सांगणं, म्हणजे, कथा हे सोपं समीकरण रूढ झाल्याने कथा नि:सत्व झाली."कथा या वाङ्मय प्रकाराच्या संदर्भातलं हे विचार प्रवर्तक असं चिंतन कथाकार जयंत पवार यांनी 'फिनिक्सच्या राखेतून उठला मोर' या कथासंग्रहाला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्यानंतर व्यक्त केलेलं.

फिनिक्सच्या राखेतून उठला मोर या कथासंग्रहाला दिलेल्या प्रस्तावनेत निखिलेश चित्रे यांनी असे म्हटले आहे की----

"…. स्वतःच्या जगण्याशी अत्यंत प्रामाणिक असणाऱ्या आणि सभोवतीच्या सामाजिक राजकीय वास्तवाच नीट भान असणाऱ्या जयंत पवार यांचा ' फिनिक्सच्या राखेतून उठला मोर' हा पहिला कथासंग्रह प्रसिद्ध होणं, ही आजच्या मराठी कथेसंदर्भात महत्वाची घटना आहे. जयंत पवार हे कथा या माध्यमाच्या नव्या शक्यता तपासून पाहणारे गंभीर लेखक आहेत. कोणत्याही चांगल्या लेखकाला पछाडणाऱ्या जन्म, मृत्यू, दु ख क्रौर्य, हिंसा या गोष्टी पवारांच्या कथेत निव्वळ ' थीम्स' पुरत्या मर्यादित राहत नाहीत, तर लेखकाच्या सतत सुरु असलेल्या चिंतनाचे विषय म्हणून समोर येतात. पवारांची कथा वाचकाला जगण्याच्या धुमश्चक्रीत मध्यमभागी आणून उभे करते. आयुष्याच्या कोलाहलात एकमेकांमध्ये मिसळलेले आवाज कान देऊन ऐकण्याचा प्रयत्न करते. या कथा म्हणजे व्यक्तीच्या समाजात जगण्याचे दस्तऐवज आहेत. समाजात जगताना होणारे आनंद आणि त्रास त्यांच्या संपूर्ण व्यामिश्रतेसकट या कथा वाचकांपुढे मांडतात…."

**आपली प्रगती तपासा**

१) 'फिनिक्सच्या राखेतून उठला मोर' कथेची समाजशास्त्रीय समीक्षा करा.

------------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------------

## ४.१आ.५ सारांश

अशाप्रकारे गिरणगावचा गेल्या ६०-७० वर्षाचा इतिहास शब्दबद्ध करणारी आणि वर्तमानातील दिशाभूल झालेली भांबावलेली तरुण पिढी बदलत्या वातावरणाला, जागतिकीकरणाच्या परिणामांना कशी बळी पडत आहे हे दाखवणारी "फिनिक्सच्या राखेतून उठला मोर" ही एक प्रत्ययकारी कथा जयंत पवार यांनी लिहिली आहे. कामगारांनी घाम गाळलेल्या या मिलमध्ये मुद्दाम आग लावून, अनेक कामगारांची कुटुंब उद्धवस्त करून, त्या जागेवर पुन्हा कामगारांची कुटुंबे न सावरता त्यातून मॉलरूपी चमचमता संपन्नतेचे प्रतीक असणारा नाचरा मोर उभा करून कामगारांच्या जखमेवर जणू मीठ चोळले आहे असे लेखकाला सुचित करावयाचे आहे.

munotes.in

## ४.१आ.६ संदर्भ ग्रंथ


१. फिनिक्सच्या राखेतून उठला मोर - जयंत पवार

(कथासंग्रह) लोकवाङ्मय गृह

२. जागतिकीकरण आणि मराठी साहित्य- डॉ . गीता मांजरेकर

३. साहित्यवेध- शिरवाडकर के. रं

४. समीक्षेची नवी रुपे- गंगाधर पाटील

५. https://www.loksatta.com/manoranjan-news/jayant-pawar-1228255/

६. https://mr.m.wikipedia.org/wiki/%E0%A4%9C%E0%A4%AF%E0%A4%82%E0%A4%A4_%E0%A4%AA%E0%A4%B5%E0%A4%BE%E0%A4%B0


## ४.१आ.७ सरावासाठी प्रश्न

१) " फिनिक्सच्या राखेतून उठला मोर" या कथेची समाजशास्त्रीय समीक्षा करा

२) " गिरणगावचा गेल्या ६०-७० वर्षांचा इतिहास शब्दबद्ध करणारी आणि वर्तमानातील दिशाभूल झालेली भांबावलेली तरुण पिढी बदलत्या वातावरणाला, जागतिकीकरणाच्या परिणामांना कशी बळी पडत आहे हे दाखवणारी "फिनिक्सच्या राखेतून उठला मोर" ही एक प्रत्ययकारी कथा आहे" या विधानाचा परामर्श घ्या.

आ) टीपा लिहा.

१) घनःश्याम हडकर

२) "फिनिक्सच्या राखेतून उठला मोर" या कथेतील मॉलसंस्कृती

## ४.१आ.८ पुरक वाचन


१. https://www.maayboli.com/node/39780

२. पेंडसे लालजी- साहित्य आणि समाजजीवन


❖❖❖

घटक : ४

# ४(२)

# उपयोजित समीक्षा

## १. चौक (नाटक)

लेखक: मकरंद साठे

**घटक रचना**

४.२.१ प्रस्तावना

४.२.२ लेखकाविषयी

४.२.३ मकरंद साठे यांची साहित्यसंपदा

४.२.४ " चौक" या नाटकाविषयी

४.२.५ कथानक आणि समीक्षा

४.२.६ सारांश

४.२.७ संदर्भ ग्रंथ

४.२.८ सरावासाठी प्रश्न

४.२.९ पुरक वाचन

## ४.२.१ प्रस्तावना

कोणतीही कलाकृती ही कोठेही, कशीही निर्माण होत नाही किंवा ती कोण्या एका व्यक्तीची निर्मिती नसते. तर स्थलकालाच्या मर्यादेत असलेल्या लेखकाची ती निर्मिती असते आणि तो लेखक ज्या समाजात रहातो, ज्या समाजाचा घटक असतो त्या समाजासाठी, त्या समाजाच्या परिप्रेक्ष्यात त्याचे लेखन असते. त्या समाजाचा त्या लेखकाशी आणि त्या लेखकाचा त्या समाजाशी अन्योन्य संबंध असतो. त्या समाजाशी त्या लेखकाचा आणि त्याच्या साहितकृतीचा काय संबंध असतो, एखाद्या साहित्यकृतीच्या निर्मितीला लेखकाच्या भोवतीचा परिवेश कसा आणि कितपत कारण ठरतो याचा शोध घेणे अपरिहार्य ठरते.

समाजशास्त्रीय समीक्षा साहित्यकृती ला एक सामाजिक निर्मिती मानते आणि तिच्या यशापयशाची चिकित्सा करते.तिच्या विश्लेषणाचा प्रयत्न करते. अर्थनिर्णयन करण्याचा प्रयत्न करते.साहित्य हे समाजाचा आरसा असल्यामुळे समाजाचा अभ्यास करणाऱ्या समाजशास्त्राच्या अभ्यास कक्षेत साहित्याचा अभ्यास येतो.

या दृष्टीने "चौक" या मकरंद साठे लिखित नाटकाची समाजशास्त्रीय पद्धतीने समीक्षा करू.

## ४.२.२ लेखकाविषयी

मकरंद साठे  हे एक मराठी नाटककार, लेखक व नाट्यदिग्दर्शक आहेत. साहित्य अकादमीच्या अनुवादित पुस्तकाच्या २०१७  सालच्या पुरस्कारासाठी च्या निवड समितीचे ते सदस्य होते. मराठी रंगभूमीवर सातत्याने नावीन्यपूर्ण, प्रयोगशील अशी नाटके त्यांनी केली व त्यातून मराठी साहित्याला एक नवीन दिशा मिळाली. थिएटर अकॅडमीने १९९० च्या दशकात आयोजित केलेल्या कार्यशाळेत 'चारशे कोटी विसरभोळे' या नाटकामुळे ते मराठी साहित्य सृष्टीला परिचित झाले. नाटकाच्या नावापासूनच काहीतरी वेगळ देण्याचा त्यांचा प्रयत्न होता. मकरंद साठे यांचं वैशिष्ठय म्हणजे ते नेहेमीच्या चाकोरीबध्द चौकटीत अडकलेले दिसत नाहीत. त्यांनी नेहेमीच नवनवीन वाटा चोखाळलेल्या दिसतात.

त्यांची लेखनशैली सहज, सरळ असूनही उपरोधिक आहे. मानवी जिवनातील विसंगतीवर त्यांनी बोट ठेवले त्यातूनच त्यांनी चिरंतन प्रश्नांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. हा त्यांचा प्रयत्न त्यांच्या " रोमन साम्राज्याची पडझड, सापत्नेकराच मूल, ठोंब्या, गोळायुग डॉट कॉम या नाटकामधून दिसून येतो. या न-नाट्य शैलीतूनच थेट सामाजिक वास्तवाला भिडणाऱ्या नाटकांची निर्मितीही त्यांनी केली. व्यवस्थेला प्रश्न विचारणाऱ्या सॉक्रेटिसच्या सत्यान्वेषी विचारांचा पाठपुरवठा करणारे त्यांचे " सूर्य पाहिलेला माणूस" हे नाटक विशेष गाजले. पुण्यातील गजबजलेल्या रस्त्यावर ट्रॅफिक जॅम झाल्यानंतर उद्भवणाऱ्या परिस्थितीचे आणि त्यातील पात्रांच्या मनोव्यापाराचे, सामाजिक स्थितीगतीचे चित्रण करणारे " चौक" हे रुपकात्मक नाटक ; आणि ते पुढे गेले हे शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या प्रश्नाला वेगळ्याबाजूने विचार करायला लावणारे नाटक लिहून मराठी नाट्य सृष्टीत त्यांनी मोलाचे योगदान दिले.

नाटकाबरोबरच " अच्युत आठवले आणि आठवण" आणि " ऑपरेशन यमू" यासारख्या चिंतनात्मक आणि वैचारिक घुसळण करणाऱ्या कादंबऱ्या देखील त्यांनी लिहिल्या. मकरंद साठे यांचा पिंड वैचारिक चिंतनशील लेखक आणि वाचकाचा आहे. त्यामुळे आजच्या काळातील " मल्टीपल आयडेंटिटी क्रायसिस" ची विविधरूपे दर्शविणारे अनेक लेख त्यांनी लिहिले. समकालिन समाजात घडणाऱ्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक घडामोडी आणि त्याच वेळी त्याच परिप्रेक्ष्यात जन्म घेणाऱ्या कलाकृती यांच्या मध्ये एक घट्ट नाते असते या चिंतनशीलतेतून,चिकित्सक वृत्तीतूनच त्यांनी " मराठी रंगभूमीच्या तीस रात्री" हे तीन खंडात्मक लेखन त्यांनी केले आहे. ते अतिशय महत्वाचे आहे.

## ४.२.३ मकरंद साठे यांची साहित्यसंपदा

- कादंबरी:- अच्युत साठे आणि आठवण, आषाढ बार, काळे रहस्य, गार्डन ऑफ ईडन उर्फ साई सोसायटी
- नाटके: - ऑपरेशन यमू, गोळायुग डॉट कॉम, चारशेकोटी विसरभोळे, चौक, ते पुढे गेले, वारंवार कुरुक्षेत्री येताती मनुष्ये, सूर्य पाहिलेला माणूस, सापत्ने करांचे मूल
- वैचारिक/ इतर:-
- निवडक निबंध-१,२ रंगभूमी व साहित्य,
- First Proof : The Penguin Book of New Writing from India 6 (सहलेखक- सुनंदा सिकंदर, अन्नू ज लाईस)
- Man Who Tried to Remember (मूळ मराठी, इंग्रजी अनुवादक : शांता गोखले)
- मराठी रंगभूमीच्या तीस रात्री (मराठी नाटकाचा इतिहास, खंड १-२-३)
- सांस्कृतिक अस्मिता आणि जागतिकीकरण (वैचारिक)
- A Socio - Political History of Marathi Theatre - Set of 3

## ४.२.४ " चौक " या नाटकाविषयी

"चौक" हे मकरंद साठे यांचे नाटक २००५ साली पुस्तक रुपात प्रकाशित झाले.अनुष्टुभ (दिवाळी अंक २००४) च्या दिवाळी अंकात पूर्वप्रसिद्ध झाले होते.

मकरंद साठे यांच्या ' अच्युत आठवले आणि आठवण' या कादंबरीतील महत्वाचे पात्र अच्युत आठवले या नाटकात मध्यवर्ती पात्र म्हणून दिसतात.आणि याच कादंबरी मध्ये अच्युत च्या शेजारी राहणाऱ्या गाडगीळ या पात्राचे "चौक" या नाटकात प्रताप असे नाव झालेले दिसते.

'Identity Crisis' निर्माण झालेली ही पात्रे असून विविध प्रकारच्या अंतर्गत आणि बाह्य परिस्थितीशी सतत लढा देणारी आहेत.

## ४.२.५ कथानक आणि समीक्षा

नाटकाच्या सुरवातीला रंगमंचावर सगळी पात्रे फक्त हावभाव आणि काही हातवारे करीत आहेत.नाटकाचा सूत्रधार गर्दीतून चालत असणाऱ्या अच्युत आठवले यांच्याशी ओळख असल्याचे

दाखवतो.बोलताना तो आपल्या अडचणी अच्युत सराना सांगतो आणि अच्युत सर देखील त्याच्या अडचणी अगदी सहानुभूती पूर्वक रीतीने ऐकून आपल्या व्याख्यानाला जायला निघतात.त्यांच्या व्याख्यानाचा विषय असतो "अस्मितांचे ध्रुवीकरण आणि मराठी कविता".आपल्या नाटकविषयक अडचणींबाबत पुन्हा एकदा सल्ला घेऊ असे सांगून सूत्रधार नाटक सुरू करतो.

सुत्राधार प्रेक्षकांना अच्युत आठवले यांची ओळख करून देतो.अच्युत सर हे सूत्रधाराचे सब कुछ आहेत.म्हणजे गाईड,मित्र, फिलॉसॉफर, गुरू असे वेगवेगळ्या स्वरूपात आठवले सूत्रधाराला नेहेमी भेटत असतात.अच्युत आठवले काही प्रमाणात अर्थतज्ज्ञ आहेत. विचारवंत आहेत त्यांना दुसऱ्याबद्दल सह अनुभूती आहे; दुसऱ्यांच्या मताबद्दल आदर आहे. अनेक समाजोपयोगी कामे त्यांनी केली आहेत. अनेक समाजोपयोगी संस्थांशी त्यांचा जवळचा संबंध आहे.

नाटकाचा सूत्रधार एकेक पात्रांची ओळख करून देतो. जशी जशी ही पात्रे रंगमंचावर अवतरतात तस तशी त्यांची ओळख सूत्रधाराच्या माध्यमातून घडत जाते. नाटकाची रचना अशी आहे की पात्राच्या मनात काय चाललंय हे सूत्रधाराला समजते आणि सूत्रधार ते प्रेक्षकांपर्यंत पोहोचवतो. ओळख करून देतांना ओळख या संकल्पनेबद्दल सूत्रधार म्हणतो " ओळखी - इंग्रजीत identities - विविध असतात प्रत्येकाच्या. अगदी असंबद्ध चौकटींमधून उलगडणाऱ्या ओळखी असतात."

गर्दीतल्या प्रताप ची ओळख सूत्रधार करून देतो ती म्हणजे प्रताप हा या गटातला आहे की ज्या गटातील लोकांच्या भावना पटकन भडकतात. काहीही झाले तरी ते स्वतःशी रिलेट करतात आणि दुसऱ्या गटाची ओळ्ख करून देताना तो त्यांचा उल्लेख भावना न भडकणारे असा करतो. म्हणजे ते शांत आहेत का? समजूतदार आहेत का? तर नाही. कारण त्यांची ओळख करून देताना सूत्रधार म्हणतो," आणि हे ... काहीही म्हणजे काहीही होवो--- यांच्यासमोर एखाद्या बाईवर बलात्कार होवो, बाबरी मशीद पडो, शीखांच्या विरोधी दंगा, बॉम्बस्फोट... काहीही... यांच्या भावना भडकतच नाहीत…" म्हणजे एका अर्थाने समाजातील निष्क्रिय गटाचे प्रतिनिधित्व करणारे हे लोक आहेत. सूत्रधाराच्या वाक्यात झालेल्या उल्लेखातून समाजात घडलेल्या तत्कालिन महत्वपूर्ण घटनांची झलक दिसते. बाबरी मशीद (१९९२), शीखांच्या विरोधी दंगा (१९८५), बॉम्बस्फोट (१९९२), या त्या कालखंडात देशात घडलेल्या महत्वपूर्ण घटना! पण सर्वसामान्य लोकांच्या आयुष्यात या सगळ्या गोष्टींनी फारसा फरक पडत नाही असे लेखकाला सुचवायचे आहे.

प्रताप हा डिप्लोमा धारक आहे. त्याची नोकरी गेलेली आहे. डिप्लोमा धारक या शब्दावरून प्रतापचा शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक स्तर कळतो. डीग्री प्राप्त करणे न परवडणारे असल्यामुळे प्रताप सारखी कित्येक मुले त्याकाळात डिप्लोमा करताना दिसत त्या सगळ्यांचं प्रतिनिधीत्व प्रताप करतो. जागतिकीकरणाच्या रेट्यात अनेक तरुणांची स्वप्न उध्वस्त झाली आहेत ; असे लेखकाला सुचवायचे आहे. प्रताप सध्या अमेरिकेच्या बाजूने आहे कारण अमेरिका पाकिस्तानच्या विरोधात कारवाई करेल

असे चित्र (आशावादी?) दिसत आहे. म्हणजेच जागतिक पातळीवर कोणत्याही समाजातील एखाद्या शुल्लकश्या तरुणाचे मत कितपत ग्राहय धरायचे हा मोठ्ठा प्रश्नच आहे. शिवाय जागतिक राजकारणात अमेरिका या महासत्तेचा कौल अत्यंत महत्वाचा ठरतो असे दिसते.

त्यानंतरचा नाटकातील प्रसंग म्हणजे चार दिवसापूर्वी अच्युत आणि प्रताप एकाच बसने प्रवास करत असताना काय घडले ते सूत्रधार सांगत आहे. बसमध्ये पुष्पाताई गोगटे आणि त्यांच्या शेजारी बसलेले सरकारी नोकर यांची देखील ओळख सूत्रधार करून देतो. पुष्पाताई या विधवा ब्राम्हण आहेत आणि समाजातील लोकांच्या नजरेत आपलं एकटेपण जाणवू नये म्हणून गळ्यात मंगळसूत्र ठेवते. म्हणजेच समाजात वावरताना आजच्या काळात देखील विधवा स्त्रीला या विविध क्लृप्त्या वापराव्या लागतात. पुष्पाताईंच्या शेजारी बसलेले होनप त्यांच्या चांगल्याच ओळखीचे  आहेत. ते त्यांना त्यांच्या घरी सोडायला निघाले आहेत. एकीकडे पुष्पाताईंना त्यांची मदत हवी आहे पण दुसरीकडे त्यांना होनपांची अतिरेकी सहानुभूती नकोशी वाटते पण ती त्यांना सहन करावीच लागते. एका ठराविक पातळी पर्यंत होनप देखील त्यांच्या एकटेपणाचा, त्यांच्या स्त्रीत्वाचा फायदा उठवताना दिसतात. समाजातील अशा प्रकारे स्त्री उपलब्ध (available) आहे का याची चाचपणी करणाऱ्या पुरुषाचे प्रतिनिधित्व होनप करताना दिसतात.

अच्युत आणि प्रतापची बस ज्या भागातून जात होती त्या भागात दंगा झाला होता. मात्र तो नेहमी पेक्षा लवकर शमला होता. सूत्रधार दंग्याविषयी सगळ्यांची मतं विचारतो. पुष्पाताईंना दंग्याविषयी काही बोलायचे नाहीए. त्यांना त्याच्याविषयी काही देणं घेणं नाही. होनपांना सरकारी मालमत्तेचा,म्हणजेच बसेस वगैरे जाळण या गोष्टींचा, विध्वंस होतो या गोष्टीचे दुःख होते. याचे कारण अप्रत्यक्षपणे त्यांच्याच खिशातून हा पैसा कराच्या रुपातून वसूल केला जाणार असतो या गोष्टीची त्यांना कल्पना आहे. त्यामुळे त्यांना दुःख होते. अन्यथा (कदाचित?) त्यांना या घटनेचे काही वाटले नसते. प्रतापला दंग्यात कोणी का मरेना पण त्याच्यासारख्या माणसांच्या सतत नोकऱ्या जातात याचेच दुःख अधिक आहे. अच्युत सरांची प्रतिक्रिया मात्र संय्यत आहे. त्यांना एका वाक्यात या दंग्याबद्दल प्रतिक्रिया देता येत नाही. किंबहुना तो त्यांचा स्वभावच नाही. त्यांच्या मते आजकाल छोटे छोटे समुह खूप वाढल्याने दंगे, चकमकी वारंवार होतात पण गटातील सदस्यांची संख्या अत्यल्प असल्यामुळे ते पटकन शांत देखील होतात. अच्युत सरांचं दुःख असे की, एकमेकांची मते, विचार पटू शकतील अश्या व्यक्ती हळूहळू कमी होत आहेत. समुहात आपले अस्तित्व टिकवण्याच्या नादापायी लोक चटकन समूह सोडताना दिसतात. एकमेकांशी पटवून घेत नाहीत. फार फार तर आठ- दहा लोकांचे एकमत होते, त्यापेक्षा जास्त संख्येने एखादया विचारसरणीचे लोक एकत्र येत नाही म्हणून मोठ्या मोठ्या संस्था, संघटना, शाखा हळूहळू नष्ट होत आहेत. त्यांचे अस्तित्त्वच हळूहळू ढेपाळत चालले आहे. असे विचार मनात येत असाल्यामुळे ते प्रताप काय बोलतोय याच्याकडे त्यांचे थोडे दुर्लक्ष होते. पुष्पाताई देखील होनपापासून

मनाने दूर सरकल्या आहेत कारण त्यांची सहानुभूती त्यांना नकोशी वाटते त्यांना देखील त्यांची स्पेस जपायची आहे एका परिघावरच होनपांना ठेवायचे आहे. होनपांची अतिरेकी ढवळाढवळ पुष्पाताईंना नकोशी वाटते. प्रत्येक जण आपले असित्त्व टिकवण्याची धडपड करत आहे. या सगळ्या गोष्टींचा प्रतापला राग आला होता; कारण त्याची नोकरी गेली होते. संपूर्ण समाजरचनेवर तो चिडला होता पण रागवायचे कोणावर हा देखील एक मोठ्ठा प्रश्नच होता त्याच्या समोर कारण सध्याच्या समाज व्यवस्थेत शत्रू कोण हेच समजेनासे झाले आहे. याबाबत भाष्य करताना सूत्रधार म्हणतो-

"पूर्वी शत्रू कळायचा. आता काही शत्रू कळतात पण बरेचसे चेहराहीन असतात. बस उशीरा आली शत्रू कोण? अमेरिका आणि इराकमध्ये युद्ध झाल्याने पेशोलचे भाव वाढले त्यामुळे भारताच्या अर्थकारणावर परिणाम होऊन गरिबांची ससेहोलपट अजूनच वाढली. शत्रू कोण?

शत्रू कोण ते प्रतापला कळत नाही. त्याचा राग, संताप उद्वेग आणि न दाखवता येणार दुःखही कमी होत नाही. शिवाय बसमध्ये शेजारी बसलेले अच्युत सर देखील काही आपलेपणा, सहानुभूती दाखवत नाहीयेत हे बघून प्रताप रडू लागतो. आणि मध्येच मिस्टर आठवले म्हणून ओरडतो. आपल्याबरोबर बसमधले आणखी सहा जण रडत आहेत हे बघून त्याला बरे वाटते. अच्युत सरांनीच त्याला सांगितले असते की जगात एकासारखे सात जण असतात. म्हणजे या परिस्थितीतून आपण एकटेच नाही जात आहोत तर आपल्याबरोबर सहाजणांची देखील आपल्यासारखी च परिस्थिती आहे ही गोष्ट मानसिकदृष्ट्या त्याला सुखावणारी आहे पण त्याच बरोबर आपली Identity गेली, आपले वेगळेपण गेल हे पाहून प्रताप वैतागतो. उद्वीग्न होतो. आणि त्याची ही अवस्था कशामुळे निर्माण झाली याची पूर्ण कल्पना अच्युत सरांना आहे. माणसाला काय पाहिजे आहे हेच त्याला आकळत नाहीये प्रत्येक जण आपले अस्तित्त्व टिकवून ठेवण्यासाठी लढत आहे. Identity crisis समाजात दिसत आहे. समाजातील या सगळ्या गोष्टींवर लेखकाने भाष्य केलेले दिसते.

नाटकातील सूत्रधाराला सर्व पात्रांच्या मनात काय चालले आहे ते कळते. एके ठिकाणी तो म्हणतो-
"..... पूर्वीपण अशी नऊ वाक्ये प्रत्येकाच्या मनात असायचीच. पण सगळ समाज जरा एकसंघ होता ना पूर्वी. ही न बोललेली नऊ वाक्य सहज कळायची एकमेकांना. अगदी शत्रूची सुद्धा... सासूची सुनेला.... ब्राम्हणाची दलितांना... आणि भांडवलदारांची कम्युनिस्टाला, त्यांची न बोललेली नऊ वाक्य न ऐकताही माहिती असायची. They shared Many thing. आता? आता एकमेकांचे शत्रूसुद्धा एकच वाक्य बोलतात. जस संघपरिवारातले आणि कम्युनिस्ट दोघेही स्वदेशी- स्वदेशीचा जागर करतात. valentine day च्या विरुद्ध बोलतात. पण ते किती वेगळं बोलत असतात. खरतर.... त्यांना एकमेकाचं काही कळतंय असंच वाटत नाही... कारण त्यांची न बोललेली नऊ वाक्ये अगदी वेगळ्याच ठिकाणून येतात..."

प्रतापला वाटतं की अच्युत सर कधी भांडवलदारी व्यवस्थेच्या बाजूने बोलतात तर कधी कम्युनिस्टच्य... मात्र अच्युत सरांच्या मते समाजात अशा विविध समस्या आहेत, वाढते गंभीर प्रश्न आहेत की त्याबद्दल सर्वसमावेशक भूमिका घेणे त्यांच्यासारख्या विचारवंताला च एवढे कठीण झाले आहे की तिथे सर्वसामान्य माणसाचे काय होत असेल?

पुष्पाताई गोगटे बसल्या बसल्या विचार करतात की अच्युत सर आणि प्रताप कोणत्या गटातील असतील? युनियन वाले? कम्युनिस्ट? त्यांना स्वतःला कम्युनिस्ट (साम्यवादी) आवडत नसावेत असे त्यांना वाटते कारण त्यांच्या दिवंगत पतीला देखील साम्यवादी विचारसरणीचे लोक आवडत नव्हते. म्हणजे इथे लेखक स्त्रीचे समाजातील स्थान स्पष्ट करतो. स्त्रीला स्वतःचे असे काही मत नाही. पतीला वाटते म्हणून, त्याला आवडत नाही म्हणून आपल्यालाही कम्युनिस्ट आवडत नाहीत असे त्यांना वाटते ... वाटते या शब्दाने समाजातील स्त्री साहित्यात प्रतिबिंबीत होते. होनपाना अच्युत सर इकोनॉमी ओपनिंगवाले, खाजगीकरणाच्या बाजूने असणार असे वाटते तर स्वतः होनपांना वाटत की सरकार साम्यवादी लोकांकडे दिले पाहिजे. वरील सर्व मनोगतातून एकंदर सामाजिक संरचना, सामाजिक गुंतागुंत, सामाजिक स्तरानुसार प्रत्येक पात्राची विचारसरणी अधोरेखीत केलेली दिसते.

शेवटी बस एका चौकात एके ठिकाणी बंदच पडते. त्यात बसलेल्या पात्रांच्या मनात उठणाऱ्या आंदोलनावरून त्यांची वैचारिक पातळी, सामाजिक स्थिती आणि गती समजते. बस बंद पडल्यामुळे आणि वाहतूक ठप्प झाल्यामुळे सर्वात आधी पुष्पाताई वैतागतात त्याचे कारण टिपिकल मध्यमवर्गीय स्त्रीच जीणं मुल आणि संसार, संसार आणि नोकरी, घरातली आणि बाहेर ची अशी तारेवरची कसरत करणाऱ्या मध्यमवर्गीय, मध्यमवयीन मराठी स्त्रीच प्रतिनिधित्त्व पुष्पाताई करतात. घड्याळ्याच्या काट्याशी त्यांचं जीवन बांधलेल असतं. त्यात थोड़ा जरी फरक पडला तरी त्यांचं सगळच वेळापत्रक कोलमडून पडणार असतं. पुष्पाताई वैतागतात कारण त्या त्यांच्या दोन्ही मुलांना घरी एकटेच सोडून येत असतात. धाकटा मुलगा रौनक साडे अकरा वर्षाचा आणि मोठी मुलगी सायली तेरा वर्षाची! धाकट्या मुलाला भूक लागली असणार म्हणून घरी लौकर पोहोचण्याची त्यांची तगमग चालू आहे. मुलीची मात्र तेवढी त्यांना काळजी वाटत नाही उलट मुलीबद्दल सूक्ष्म आकस त्यांच्या मनात दिसतो हे पुढील वाक्यावरून लक्षात येते-"--- काही कामाची नाही सायली. तेरा वर्षाची झाली. तिच्या वयान मी स्वयंपाक करत होते.... म्हटलं काही जरा तर अंगावर येते सटवाई... मुलगा-मुलगी त फरक करू नको म्हणते..... कोण शिकून मोठ्ठ होऊन बघणारे माझ्याकडे? ही ? नटवी?.... लग्न करून गेली तरी खूप... रौनकचा अभ्यास बुडणार... आणि अवंतिका पण :? आणि म्हणाजे तिला नवरा सोडणार की नाही ते पण कळणार नाही"

पुष्पाताई या स्वगतावरून अद्यापही सनातन विचारामध्ये गुरफटलेल्या स्त्रीचं प्रतिनिधीत्व करताना दिसतात. समाजात स्त्री आणि पुरुष हा भेदभाव रहाणार च! असचं त्यांच्या स्वगतावरून जाणवतं

आणि हा भेद स्वतः स्त्रीच करते ही देखील समाजातील मोठी आश्चर्यकारक आणि धक्कादायक गोष्ट आहे. म्हातारपणी आपाल्याला मुलगाच बघणार हा सनातन विचार त्या करतात हेही लेखक अधोरेखीत करतात सायलीला मात्र या भेदाभेदाची चीड येते असे दिसते. पण ती देखील पुष्पाताईच्या भूमिकेत शिरली की तसेच वागेल असे वाटते सध्या तरी स्वतःची मतं ठामपणे मांडणारी एक नव कुमारी आहे अशी आशा वाटते प्रसारमाध्यमांचा मध्यमवर्गीय, मध्यमवयीन आणि नोकरदार स्त्रियांच्या मनावर कसा परिणाम होतो आहे ते स्वगतातील "अवंतिका" या मालिकेच्या उल्लेखावरून दिसते. विशेषतः या मालिकांच्या वेळापत्रकानुसार या स्त्रियांनी आपले दैनंदिन वेळापत्रकही बनवलेले दिसते आणि त्यात जरासाही बदल झालेला त्यांना चालत नाही एवढा या प्रसार माध्यमांचा त्यांच्यावरील मोठ्ठा प्रभाव दिसून येतो.

बसच्या आजू बाजूच्या वाहनावरील वाहनांवरील वाहनांमधील बसलेली माणसे ही आता नाटकातील व्यक्तिरेखा बनतात. बसच्या एका बाजूला रिक्षामध्ये चार पात्र बसले आहेत रिक्षा आणि बस च्या मध्ये स्कूटरवर दोघेजण आहे तर बसच्या दुसऱ्या बाजूला एका गाडीत एक तिशीतील श्रीमंत जोडपे बसले आहे या आलिशान गाडीतील यश आणि सुप्रिया या जोडप्याबद्दल सूत्रधार प्रेक्षकांना सांगतो हे दोघेही तिशीतले आहे त्यांचे कपडे उत्तम दिसणे एकदम पॉलिसी आहे आणि त्यांच्या भावना कधीच घडत नाही आहे रे या गटातील व्यक्तींचे प्रतिनिधित्व करणारे यश आणि सुप्रिया दिसतात या दोन्ही व्यक्तिरेखा उच्च मध्यमवर्गीय किंवा नवश्रीमंत वर्गातील आहेत असे दिसून येते ट्रॅफिक जाम,नुकतीच होऊन गेलेली दंगल, ऑक्टोबर हीट, तापलेले वातावरण या सगळ्यांचा परिणाम चौकात ट्रॅफिक जॅम मध्ये अडकलेल्या सगळ्यांवर होऊ लागलेला दिसतो.

उच्चभ्रू गटाचे प्रतिनिधित्व करणारे यश आणि सुप्रिया यांना अशा प्रकारच्या परिस्थितीत अडकल्यावर गाडीतल्या छोट्या टीव्हीवर चित्रपट किंवा त्यासारख्याच मनोरंजन करणाऱ्या गोष्टी पाहण्याचा सराव आहे लेखक या दोघांना 0.001 टक्के लोकांपैकी समजतो यश हा टेक्नोसॅव्ही आहे एका सॉफ्टवेअर कंपनीचा मालक आहे त्याने नुकतीच आपली गाडगे सिस्टिम ही कंपनी एका अमेरिकन कंपनीला विकली आहे आणि आता दुसरी कंपनी तो सुरू करणार आहे सुप्रिया ही त्याची पत्नी असून ती यासोबत त्यांच्या पार्ट्यांना जाते पण त्याच्या व्यवसायात कुठलीही मदत ती करत नाही ते एकेकाळी नाटकात काम करत असत पण मुलगा लहान असल्यामुळे ती आता नाटकात काम करत नाही समाजात अशा प्रकारच्या लोकांचा एक गट आजकाल सातत्याने दिसतो त्या गटाचा हा एक चेहरा आहे. सतत इंग्रजी पाडणाऱ्या या सुप्रिया ने मुलाचे नावे मात्र गुरुदत्त असे संस्कृत नाटकातील ठेवलेले आहे ही एक मोठी विसंगती लेखकाने मांडली आहे. शेवटी हीदेखील आपली स्वतःची आयडेंटिटी जपणाऱ्या आणि त्याचा हव्यास करणाऱ्या गटाची खूण आहे असे लेखक म्हणतो लेखक या पात्रांच्या माध्यमातून समाजाचा समाजात घडणाऱ्या घटकांचा समाजात घडणाऱ्या घटनांचा एक आरसा

आपल्याला दाखवतो सुप्रिया आणि यश झी टीव्ही चॅनल बघत आहे त्यात एका राजस्थानी सुताराची मुलाखत चालली आहे अनेक वर्षापूर्वी तो या शहरात आलेला आहे पूर्वी त्याची सुतार की चांगली झाली पण आता रेडीमेड मोडरन फर्निचर आल्याने सुताराचा धंदा बसला आहे. तो आता सिक्कीम लॉटरी च्या आशेने जगतो आहे.जागतिकीकरणाच्या रेट्यात या अशा कौशल्य असणाऱ्या कारागिरांवर मोठाच घाला पडला आहे आणि त्यामुळे यांत्रिकीकरणाचा समाज जीवनावर ती कसा परिणाम होतो हे लेखक या गोष्टीतून दाखवून देतो मात्र या गोष्टींचे यशला काही देणं घेणं नाही तो या मुलाखतीवर वैतागून दुसरे चैनल लावून बघतो सुप्रिया त्याच्याकडून रिमोट घेऊ पाहते पण तो रिमोट देत नाही त्याचा पुरुषी अहंकार तेथे जाणवतो आणि सुप्रियाची आयडेंटिटी काय असा प्रश्न प्रेक्षकांना पडतो

गाडीच्या बाहेर एक वारकरी उभा आहे भीक मागतो आहे सूत्रधार या वारकरी बद्दल सांगतो हे ऍक्च्युली वारकरी आहे माळकरी पण आता वारकरी याचा अर्थ असा की हे वारकरी असण्याबरोबरच अल्पभूधारक शेतकरी बनवते त्यांची शेती गेली मजुरीही कुठे मिळेना कारण आपल्या सगळ्यांना माहीत आहे दुष्काळ पाऊस ऊस त्याला लागणारे पाणी सहकारी कारखान्यांची बेकार वाढ ....' म्हणजेच जागतिकीकरणाचा शेतीवर आणि शेतकऱ्यांवर झालेला परिणाम हा देखील एक महत्त्वाचा प्रश्न समाजामध्ये दिसतो. जागतिकीकरणाबरोबरच अल्पभूधारक शेतकऱ्यांचे प्रश्न किती महत्त्वाचे आहेत पण त्याकडे कोणीही लक्ष द्यायला तयार नाही हे एकूणच या नाटकातील घटनांमुळे दिसत कारण यश आलिशान गाडीत बसून त्या वारकऱ्याला धडधाकट आहे असे असून देखील भीक मागतो देवाच्या नावाखाली पैसा कमावतो म्हणून ओरडतो तेव्हा माझ्या विठ्ठलाला काही बोलू नका मला बोलला तरी चालेल असे जेव्हा वारकरी त्याला सांगतो तेव्हा अजूनही वारकऱ्यांची जी विठ्ठलावर ही श्रद्धा दिसून येते पण यश म्हणतो की तो मराठी माध्यमातूनच शिकला आहे आणि या संतांनी या वारकऱ्यांनी या टाळकुटे यांनी समाजाचा वाटोळं केलं त्याचा आरडाओरडा ऐकून पोलीस येतो आणि वारकऱ्याला तिथून हाकलून लावतो सहाजिकच समाजातील ही जी तफावत आहे ती आपणास येथे दिसून येते.

यश पोलिसाला या ट्रॅफिक जाम मधून सोडवा असे सांगतो पण पोलीस देखील हतबल आहेत त्याच्या एकट्या कडून हे काम होणार नाही हे त्याला पक्के माहिती आहे यश ला मदत करत असतानाच पोलिसाच्या मनात येतं" इतक्या मोठ्या गाड्या नीच ट्रॅफिक जाम होतात हे लोक करोडो कमावणार एसी बसवणार ट्रॅफिक जाम करणार " यशला वाटतं की भारतात तो वगळता कोणीच नेकीने काम करत नाही आणि म्हणूनच ट्रॅफिक जाम होता त्याला वाटतं पोलीस फुकट पगार घेतात काहीच काम करत नाही पोलिसाला वाटतं कि या गाडीत बसणाऱ्या लोकांमुळेच ट्रॅफिक जाम होतो आणि आपला पगार अतिशय कमी आहे आणि थोडेफार पैसे कोणाकडून घेतले तर लोक पोलिसांनाच भ्रष्टाचारी म्हणतात पण पोलिसाला दहा रुपये देऊन यशराज ट्रॅफिक मधून बाहेर काढा अशी विनंती करतो पोलीस सांगतो

की तो काही करू शकणार नाही कारण त्याच्याकडे मोबाईल नाही वाटल्यास यश ट्रॅफिक कंट्रोल रूमला फोन लावा यश वैतागतात स्वतःच्या मोबाईल वरून फोन लावून देतो पोलीस कंट्रोल रूम ला फोन लावतो तर ते हेड ऑफिस ची संपर्क साधायला सांगता समाजाची वृत्ती यातून दिसून येते प्रत्येक जण स्वतःचे काम न करता एकमेकांवर काम सोपवण्यात पटाईत आहेत हीदेखील परिस्थिती आपल्या समाजात दिसून येते असे लेखकाला सुचवायचे आहे असा हा अंदाधुंदी चा कारभार पाहून शेवटी पोलिसही वैतागतो.

सुप्रिया च्या मनात यश बद्दल प्रेम नाही किंचित द्वेष आहे तिला यश ची अरेरावी सहन होत नाही पण सर्व भौतिक गोष्टी सोडून जाण्याची तिची तयारी देखील नाही आणि म्हणूनच सतत आपण त्याला घाबरत राहिलो तो आपल्याला सोडून देईल त्याला पकडून ठेवण्यासाठी आपण विविध उपाय केले तरीही तो अरेरावी वृत्ती सोडत नाही याबद्दल सुप्रियाला खंत वाटते आणि सुप्रिया चिडचिड झाली आहे म्हणून यशदा ते आवडत नाही सुप्रियाला चांगलाच धडा शिकवायचा आहे त्यासाठी दिला माहेरी निघून जावे असे वाटते दोघांच्या नात्यांमध्ये एक तणाव दिसतो आपण निर्माण केलेल्या चौकटीत सुप्रिया ने आपण सांगू तसे रहावे आपण सांगू तसे वागावे असे मला वाटते तेदेखील स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठी त्याची धडपड चालू आहे यश सुप्रिया काही बोलण्याच्या आधीच तिला रिक्षातील बाई दाखवतो सुप्रिया त्याने वारकऱ्याला दोन रुपये दिले असते तर त्याने काहीतरी खाल्लं असतं असं देवा म्हणते तेव्हा या गोष्टीची देखील यशदा चीड येते अतिशय संतापून, चिरडी ला येऊन यश तिला म्हणतो- ..."तुला मिळतं ना खायला खातेस बारीक व्हायचे बारीक व्हायचंयतिकडे बघा पीट सॅम्प्रस बघा ...अमेरिकेवर... तू, तो वारकरी ...तुझा मामा '...असे सगळे असंबद्ध बोलणं यश बोलून त्याच्या मनातला सगळा उद्वेग, संताप आणि एकूणच या समाजव्यवस्थेवर असलेला त्याचा राग व्यक्त करतो आणि ते व्यक्त करण्यासाठी त्याला कोणीही चालतं. एकदा तो पोलिसावर चिडतो. एकदा तो वारक-यावर चिडतो आणि उरलीसुरली त्याची पत्नी सुप्रिया ही आहेच.

यश आणि सुप्रिया यांच्या गाडी शेजारीच दोन व्यक्ती स्कूटर वर बसलेले दिसतात. ते दोघेही वैतागून गेले आहे. ते दोघेही साधारण 45 वर्षाचे आहेत. त्यापैकी एक आहेत पाटील तर दुसरे आहेत ताम्हणे.पाटील है कम्युनिस्ट गटातले आहे तर ताम्हणे व्यवसायात असूनही सोशालिस्ट आहेत. लेखकाने वापरलेला असूनही हा शब्द येथे महत्त्वपूर्ण ठरतो. कारण व्यवसायात असणारे सहसा साम्यवादी नसतात. ते धंद्यात कोणाची फसवणूक करत नाही, पिळवणूक करत नाही ते खरोखरच सद्गृहस्थ आहेत असे दिसते. पाटील हे गृहस्थ देखील मनाने फार चांगले आहेत सच्चे आहेत पण वैचारिक दृष्ट्या कच्चे आहेत असे लेखक म्हणतो. ताम्हणे यांना धर्म जाती महत्त्वाच्या वाटतात. कारण पाटील म्हणतात, "सोशालिस्ट म्हणतात आणि स्वतःची जात बघूनच लग्न करता... ब्राह्मण मिळाली तर जास्तच बरं ..."पाटलांना या सोशालिस्ट लोकांचा तथाकथित समतावाद अजिबात पटत नाही.

munotes.in

त्यांना समाजात समूह परिवर्तन हवे आहे. ते म्हणतात, "पूर्वी आयडियालॉजी वरून फूट पाडायचे. म्हणजेच विचारधारा महत्त्वाची ठरायची. आता सगळेजण अस्मिता चे राजकारण करून एकमेकात फूट पाडतात. 'आयडियालॉजी' म्हणजे जागतिकीकरणाचा काहीतरी मानवी चेहरा असल्यासारखे दाखवायचे आणि वरवर शिव्या द्यायच्या आणि पोटातून परदेशी बँकांना देश विकायचा"

समाजवाद आणि समाजवादीही या सत्ताधारी भांडवलशाही व्यवस्थेचेच आतून समर्थक आहे असे पाटलांना वाटते त्याच वेळी ताम्हणेंनाही कम्युनिस्ट हे आतून अमेरिकेचे समर्थक आहेत असे वाटतात.

वाहतुकी मध्ये असलेल्या रिक्षात तीन पात्रे दिसतात सीमंतिनी निंबाळकर साधारण पस्तिशीची स्त्री आहे दुर्गा खरे या 65 वर्षाच्या बाई आहेत तर प्रासका दोरा हा आदिवासी आहे; जो शिक्षणाच्या जोरावर आज बराच पुढे पुढे गेला आहे. या सीमंतिनी बाईंची ओळख करून देताना लेखक म्हणतो, "…. सगळ्यांविषयी ...म्हणजे समाजवाद,गांधी, मार्क्स ..झालं तर परंपरा... सगळ्यांविषयी खूप आदर असणारे ...कारण अशा गोष्टींविषयी नीट विचार करायला तिला वेळच नसतो ….कारण खूप कामात असते ती तितकी शिकली की हिंदुस्थानातील तिला फारसा नाही खूपच नाहीयेपण ती झटून येथे आहे प्रॉब्लेम असा आहे की भावना भडकणार कधी योग्य आणि भावनांना उघडपणे कधी योग्य हे तिला कळत नाही ती एनजीओ बरोबर काम करते हे ॲक्च्युअली आपल्यासाठी जास्त महत्त्वाचं…." म्हणजेच सीमंतिनी निंबाळकर स्वतःच्याच अस्तित्वाच्या गोंधळात अडकलेली स्त्री दिसते कोणत्याही गोष्टीबद्दल सखोल विचार न करता उथळ पणाने कार्य करणाऱ्या आणि त्यात स्वतःचा स्वार्थ साधू पाहणाऱ्या समाजाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या स्त्रियांपैकी ती एक आहे. समाजात अशा व्यक्तींचे एक वैशिष्ट्येपूर्ण स्थान असते असे दिसते. अशा सो कॉल्ड समाजसेवा करणाऱ्या सीमंतिनी निंबाळकर आदिवासींनी तयार केलेल्या वस्तू निर्यात करते. तळागाळातल्या लोकांचे उत्थान करण्याचा तिचा प्रयत्न आहे. अर्थात असा हा दिखावा अनेक जण करताना दिसतात; त्यापैकीच सिमंतिनी एक ! त्यासाठी ती आदिवासींपैकी एक पण शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक स्तर उंचावलेल्या प्रासका दोरा या तरुणाला भेटते.

प्रासका दोरा हा ओरिसातील आदिवासी मधील असून शिकून इलेक्टॉनिक्स मधील पदवी घेऊन अमेरिकेत स्थायिक झाला आहे. तो देखील या रिक्षात बसलेला आहे. दुर्गा खरे या एक विद्वान, व्यासंगी व्यक्तिमत्वाच्या असून त्या पासष्ट वर्षाच्या आहेत. समाजात त्यांचे स्वतःचे असे खास वजन आहे. याचे कारण त्यांची नीतिमत्ता. स्वच्छ, नितळ जीवन जगत असल्यामुळे समाजात त्यांचा एक दबदबा आहे आणि त्यामुळेच लोक त्याना घाबरतात. हा एक मुद्दा विशेष महत्वाचा ठरतो. समाजात काही हाताच्या बोटावर मोजता येतील अशा व्यक्तिमध्ये दुर्गाबाईंचा समावेश करता येईल. त्याच्या चारित्र्यवान

वागण्यामुळे, नीतिवान जीवन जगण्यामुळे लोक त्यांना घाबरतात. रिक्षाचालक हनीफभाई हे मुस्लिम असून त्यांना मराठी भाषा मात्र व्यवस्थित बोलता येते.

या रिक्शातील वर्णनानंतर सूत्रधार म्हणतो की, "लोकांचे संवाद प्लेटोने किंवा फुल्यांनी लिहिले तसे कोणीतरी लिहून काढले पाहिजेत. पण त्यातील फोलपणा लवकरच त्याला कळतो. कारण प्लेटो आणि फुले तत्वज्ञानी, विचारवंत होते. त्यामुळे जरी असे संवाद लिहिणारे असले तरी माणसामाणसामध्ये संवाद राहिलाय कुठे? सगळा विसंवाद च आहे. दोन व्यक्तींमधल संवादाचं स्वरूपच बदलत आहे. प्रचंड दरी त्यांच्यामध्ये निर्माण होत आहे. सुसंवाद सोडाच साधा संवादही हरपत चालला आहे. सगळे वरवरचे.... बेगडी... लोकं संवादरूपी कवाडेच बंद करून टाकत आहेत. आपल्याभोवती एक अदृश्य भिंत निर्माण करीत आहे. म्हणून तो म्हणतो, "..... आता दोन माणसातल्या संवादच स्वरूपच बदललं आहे. मध्ये मोठी दरी आहे. डायलॉग जवळजवळ नाहीच. मग कोणाची कुवत असली तरी असे डायलॉग लिहायची.. तरी काय उपयोग?.... समाजामध्ये कुवतीचा उपयोग होईनासा झाला, की कमी कुवतीच्या माणसाना कॉन्फिडन्स येतो....." म्हणजेच कुवत असलेली माणसे निष्क्रीय असतात, वागतात आणि त्यामुळे कुवत नसलेल्या लोकांचे फावते, ही खरी समाजाची शोकांतिका आहे. असे लेखकाला सुचवायचे आहे.

नाटकात अच्युत अशी व्यक्ती आहे की त्याच्या विचारसरणीमुळे एकटी पडणार नाही आणि इतरांना एकटे देखील पडू देणार नाही. ते सतत इतरांशी संवाद साधत रहातील. कारण संवादामुळे अनेक प्रश्न सुटायला मदत होते असे त्यांचे मत आहे. त्यामुळेच ते प्रतापशी पुन्हा संवाद साधतात. प्रतापची समजूत घालतात. जरी त्याचे थोड्यावेळा पूर्वी अच्युतसरांशी मतभेद झालेले असले तरी अच्युत त्याच्याशी संवादाचा पुल तोडून टाकत नाहीत. ते प्रतापला सद्यपरिस्थिती मागील कारणमीमांसा समजावून सांगतात. समाजामधील विविध प्रकारच्या घटना प्रसंगांचा एकमेकांशी कसा अन्योन्य संबंध आहे हे समजावून सांगताना," प्रताप, प्रश्न शेवटी येतो तो' रेट ऑफ ग्रोथ वाढवण्याचा.' रेट ऑफ ग्रोथ' वाढला की मुळात संपत्ती गोळा होते. त्यासाठी सरकारने ग्रोथ ओरिएंटेड अपॉच्युनिटी तयार करायला हव्यात म्हणजे इन्फ्रास्टवर वगैरे... आणि दुसऱ्या बाजूला गव्हर्नमेंट च एक्स्पेंडेचर कमी करायला पाहिजे........ आणि इकॉनॉमिक ग्रोथ म्हणजे डेव्हलपमेंट असंही नाही. I agree पण सरकारचा रोल शिक्षण Law and order आणि आरोग्य हे वगळता हळूहळू कमी करण हा पहिला टप्पा तर असायलाच हवा.उद्योगधंद्यांना चालना मिळावी म्हणून लेबर लॉज बदलण्याची वेळ आली. We have to became competitive...... लेबर पॉलिसी... [हाच लॉ आता आपल्या भारतात २२ सप्टेंबर २०२० मध्ये नव्याने आलेला दिसतो. Indusrial Relations of three Labour codes.. यानावाने].. फिस्कल शिस्त.... त्यातून अमेरिकेसारख्या देशांनी ॲग्रिकल्चर सेक्टरमध्ये स्वतःच्या देशात फार सबसिडीज दिल्या आहेत."

याचा अर्थ अच्युत सर जगामध्ये घडणाऱ्या गोष्टींची परिचित आहे आणि जागतिक राजकारणाचा भारतीय समाजावर काय परिणाम होत आहे याच आहे त्यांचा वैचारिक अभ्यास पक्का आहे असे दिसते त्याचप्रमाणे जागतिकीकरणाचा भारतीय अर्थव्यवस्थेवर काय परिणाम झालेला आहे याचाही नेमका अर्थ अच्युत आठवले सांगू शकतात त्याचप्रमाणे जागतिक पातळीवर घडणाऱ्या घडामोडींचा अभ्यास देखील त्यांच्या या विधानातून दिसून येतो एकंदरीत भारतीय समाजव्यवस्था जागतिक स्तरावर कोणत्या पातळीवर आहे याची चर्चा लेखक अच्युत आठवले यांच्या माध्यमातून करताना दिसत दिसतो

प्रतापला अच्युत सरांनी अमेरिकेची तुलना केल्याने फार राग येतो एकीकडे जलसे वाटते अमेरिकेने पाकिस्तानला विरोध केला तर ते चांगले आहे त्यावेळी तो अमेरिकेच्या बाजूने बोलतो तर एकीकडे त्याला वाटते ही अमेरिकेशी संबंध तोडले पाहिजेत कारण अमेरिकेला चीनने अमेरिकेला दूर ठेवले मुळेच चीनचा विकास झाला पण त्याला समजतात अमेरिका महासत्ता आहे आणि अमेरिकेला ठेवणे दूर ठेवणे कोणालाच परवडणार नाही देखील अप्रत्यक्षपणे अमेरिकेला आमंत्रणच देत आहे असे जागतिक राजकारणात दिसते माहिती आहे पण प्रताप सारख्या सर्वसामान्य तरुणांना जागतिक स्तरावर कोणत्या घडामोडी घडत आहेत त्यांचे परिणाम काय होत आहेत आणि सर्वसामान्य लोकांवर त्याचं काय प्रभाव पडत आहे याची कल्पना नाही त्याचे हे रागवणे चिडणे हे अनेक पैलू न समजल्यामुळे अज्ञानातून आलेले आहे असे वाटते पण प्रताप नवीन ज्ञान मिळू शकत नाही त्यामुळे तो गोंधळलेला आहे आणि त्यामुळेच अच्युत सरांचे त्याला समजावण्याचे प्रयत्न ठरतात प्रताप मध्ये नवीन ज्ञान मिळवण्याची क्षमता नाही आणि तशी संधी देखील त्याला मिळत नाही भारतातील गोंधळलेल्या तरुणांचे प्रतिनिधित्व करणारा असा हा प्रताप आपल्याला दिसत दिसतो

असाच आपला संताप व्यक्त करायला प्रताप बस बाहेरून उतरतो आणि बाहेर गर्दीत मिसळतो. अच्युत मात्र आपल्या भूमिकेवर ठाम आहेत ते अमेरिकेच्या बाजूने नसले तरी अमेरिकेचे वाढते हस्तक्षेप भारतीय राजकारणात किंवा एकंदरीत जगाच्या सर्वच देशाच्या राजकारणात त्याची ढवळाढवळ अमेरिकन महासत्तेचा सर्व देशांवर पडलेला प्रभाव कौतुक त्यांना नाही, अच्युत सरांना लोकशाही मान्य आहे किंबहुना लोकशाही वरच त्यांचा विश्वास आहे दलितांना दिल्या जाणाऱ्या सवलती त्यांना मान्य आहेत पण त्याचबरोबर जातीचे राजकारण केले जाते त्याला मात्र त्यांचा ठाम विरोध आहे त्यांच्या मते लोकशाही सकारात्मक बनली पाहिजे लोकशाही जर एखाद्या समाजाला पंगू बनवत असेल तर ती उपयोगाची नाही असे अच्युत सरांचे मत आहे दूरचित्रवाणी यांवर दाखवल्या जाणाऱ्या चर्चा बातम्या या सगळ्यांचा प्रताप च्या मनावर उलट परिणाम दिसतो तो सकारात्मकतेने या सगळ्यांकडे न बघता उलट नकारात्मक रीतीने बघू लागलेला आहे असे एकंदर त्याच्या वागण्यावरून दिसते एक भावना प्रक्षुब्ध झालेले व्यक्तिमत्व म्हणून प्रताप कडे बघता येईल

पुढे सूत्रधार सरांना प्रश्न विचारतो की त्यांना मदत करणारे प्रेशर ग्रुप समाजात नाहीत का त्यावर अच्युत सरांचे असे म्हणणे आहे की आपल्या समाजात प्रेशर ग्रुपस फक्त जातीच्या आधारावर तयार होतात त्यामुळे केवळ जातीचे राजकारण केले जाते त्यातून कोणतेही विधायक कार्य घडताना दिसत नाही बेकारी समाजातील विषमता अस्तित्वाचे प्रश्न या सगळ्या गोष्टी सोडवण्यासाठी कोणीही एकत्रित होत नाही या ठिकाणी सूत्रधाराला जातीचा उल्लेख दलितांच्या संदर्भातला वाटतो पण केवळ एका सवर्ण नावे जातीचा उल्लेख दलितांच्या संदर्भातच केला जातो असे जेव्हा सूत्रधारा चे मत दिसते तेव्हा अच्युत सर असे हे मतप्रदर्शन अभ्यास न करता केलेले आहे असे त्यांना वाटते आणि ते त्यांना आवडत नाही

अच्युत सर नेहमीच भावनांना बांध घालणारे आहेत. अशी माणसे समाजात फार दुर्मिळ असते आणि त्यामुळेच समाजात त्यांची किंमतही शून्य असते हेही सूत्रधाराच्या लक्षात येते कारण त्यांना सगळेजण टेकन टू बी ग्रांटेड म्हणजेच प्रत्येक जण गृहीत धरतो आणि त्यामुळे समाजात त्यांना कोणतीच किंमत नसते आपल्या समाजाची ही मोठी शोकांतिका आहे असे लेखक यातून दाखवतो खरंतर ज्या व्यक्ती खरोखरच शून्य किमतीचे आहेत. उदाहरणार्थ होनपांसारखे हे मात्र आपल्या सत्तेमुळे आपल्या नोकरीमुळे आपल्या सांस्कृतिक वर्चस्व च्या जोरावर शतकानुशतकं आत्मविश्वासाने वावरत आहे उदाहरणार्थ ज्या पद्धतीने पुष्पाताई गोगटे यांच्याशी जवळीक साधण्याचा प्रयत्न करतात त्यातून हीच गोष्ट अधोरेखित होते सूत्रधाराला होनपांना सहानुभूती दाखवावी असे जरासुद्धा वाटत नाही ते यामुळेच!

गाडीमध्ये असलेल्या यश आणि सुप्रिया यांची कहाणी सूत्रधार जेव्हा आपल्याला सांगतो त्यातून यशला सुप्रिया आपल्याला आणखी एक मुलगा हवा आहे अशी मागणी करते पण तिची मागणी साफ धुडकावून लावतो तत्कालीन समाजाचे हे प्रतिबिंब लेखकाने केवळ दोन वाक्यात आपल्या समोर व्यक्त केल्या स्वतःचे निर्णय स्वता न घेऊ शकणारी अशी सुप्रिया आणि हम दो हमारा एक एवढ्याच बंधनात राहू इच्छिणारा यश हे तत्कालीन नवश्रीमंत शिवाय उच्चमध्यमवर्गीय सामाजिक स्तराचे प्रतिनिधित्व करतात सुप्रिया च्या मागणीकडे दुर्लक्ष करत यश टीव्ही वरचे चैनल बदलतो त्यात ऐका दाजीबा हे गाणं तो बघत राहतो ऐका दाजीबा हे त्या काळात अतिशय हिट झालेले मराठीतील गाणे त्याचा उल्लेख लेखकाने या नाटकात केलेला दिसतो जेणेकरून हे गाणे ऐकून गाडी बाहेरही पोरं असतात ती नाचू लागतात एवढं वर्णन अतिशय चपखल बसत एक सॅक लावलेला तरुण गाणं ऐकून गाडीत डोकावतो त्याला मात्र पोलीस पकडतात. हा तरुण गंमतीने म्हणतो हे की, "मला कशाला पकडतात? माझ्याकडे बॉम नाही." पण ही थट्टा पोलिसाला आवडत नाही. तो त्या तरुणाला मारू लागतो. ही गोष्ट बघून यश आनंद मानतो. तो काहीही न बोलता ती घटना एन्जॉय करतो. त्याला असं वाटतं की भारतातला कायदा अधिक कडक केला पाहिजे. म्हणजे समाजातील गुन्हेगारांना चटकन शिक्षा मिळेल त्यांना अगदी फासावर लटकावे अशी मनापासून इच्छा आहे. याचा अर्थ समाजात चोर सोडून संन्याशाला

फाशी हा प्रकार सर्रास चाललेला आहे. एकामागे एक घटना सूत्रधार आपल्यासमोर मांडत आहे. सुप्रियाची नाटकात काम करण्याची इच्छा.... त्याला देखील यश नकार देतो. संसार सांभाळून अभिनय करणे कसे जमू शकते हे ती त्याला पटवून देते, तरीही त्याला ते मंजूर नाही. बऱ्याचदा सुप्रिया चे म्हणणे मान्य न करता च तो तिला विरोध करताना दिसतो. त्यावेळी त्याची भाषा आक्रस्ताळी होते. आणि सुप्रिया ला वाटते की यश आपल्यावर अधिकार गाजवण्यासाठी अशा पद्धतीने वागतो. त्यामुळे हातात कोणत्याही प्रकारचे आर्थिक सुबत्ता नसलेली किंवा आर्थिक स्थैर्य नसलेली सुप्रिया यश च्या हातातले बाहुल बनलेली आहे असे दिसते. वैतागलेली आहे.

"नाटकात काम करू देत नाही ...मूल नकोय कारण मूल म्हणजे किचकीच ....आय विल दिखाओ him" अस ती म्हणते. यातून तिचा भाषेतील धेडगुजरीपणा अधोरेखित होतो.

संतापलेला प्रताप बस बाहेर पडतो त्याला अच्युत सर शोधायला बाहेर पडतात. याठिकाणी त्यांना खूप वर्षापूर्वी आपल्या मित्राबरोबर घातलेला वाद आठवतो आणि त्यावर अच्युत सरांच्या आईने केलेला प्रश्न आठवतो. आईला मोठा प्रश्न पडलेला असतो की माणसं का भांडतात? हाच प्रश्न त्यांना आत्ता आठवतो आणि त्याबद्दल ते सूत्रधाराशी संवाद साधू लागतात की आईला " माणसं का भांडतात? हा प्रश्न पडलेला दिसतो. आई म्हणाली होती, ".... दोन माणसं प्रेम का करू शकत नाहीत? मला हे तुमचं consumerism आणि communism का काय ते काही समजत नाही पण दोन माणसं खरं तर किती सहज एकमेकांबरोबर जगू शकतात......" प्रतापशी बोलताना अच्युत सरांना वाटायला लागत की त्याच्याशी बोललं पाहिजे. संवाद महत्वाचा आहे. त्याच्याशी संवाद साधायला योग्य ती भाषा शोधायला हवी. पण समाजात या ज्या वेगवेगळ्या प्रकारच्या दऱ्या आहेत, जी विषमता आहे त्यामुळे एकमेकांशी संवाद साधने जड होत आहे पण शेवटी माणसामाणसांमधील संवाद हाच महत्त्वाचा आता तर अख्ख्या जगाच्या जनसमुदायाला भिडणे आवश्यक ठरत आहे जागतिकीकरणामुळे माणसा-माणसाच्या अस्तित्वावरच एक प्रश्न चिन्ह उभे राहत आहे याची एक झलक अच्युत सरांच्या बोलण्यातून दिसते या माणसा-माणसातील दऱ्या आयडेंटिटी मिडीया सगळेच माणसाच्याजीवनावर परिणाम करीत आहे सरांचे हे बोलणे ऐकून सूत्र झाला वाटते की सध्याची परिस्थिती बदलण्यासाठी समाजातील लोकांनी थोडे कठोर व्हायला पाहिजे पण कठोर म्हणजे आक्रमक नाही हिंसाचारी नाही असे सरांचे म्हणणे आहे त्यापेक्षा लोकांनी थोडे सहनशील व्हायला हवी, सहिष्णू व्हायला हवे, पुत्र झाला. अच्युत सरांचे हे बोलणे फारसे पटत नाही पण मतभेद जरी झाले तरी संवाद साधला गेला या गोष्टीवरच अच्युत सर समाधानी आहेत त्यांच्यामध्ये माणसाने समाजाशी स्वतःला तोडून घेणे योग्य नाही माणूस ना समाजाचाच एक घटक आहे त्यामुळे व्यक्तीच्या जीवनावर समाजाचा परिणाम घडतो तसाच व्यक्तीमुळे समाजात देखील काही फरक घडून येतो अस्तित्ववाद सर्वांना मान्य नाही.

हा सर्व संवाद चालू असताना बाहेर यश आणि सुप्रिया च्या गाडी बाहेर एक तरुण यशच्या गाडीत डोकावून बघतो. उत्सुकतेने टीव्ही मध्ये काय चालले आहे हे तो बघत असतो;पण पोलीस त्याला तसे करण्यापासून हटकतो. त्याची सेक पोलीस तपासून लागतो तेव्हा तो गंमतीने म्हणतो की आज काही बॉम्ब वगैरे नाही पण या त्याच्या सहज व्यक्त केलेल्या वक्तव्यावर पोलीस पडतो कारण तो देखील या ट्रॅफिक जाम मुळे वैतागलेला त्यामुळे कुठेतरी त्याचा राग या तरुणावर निघतो. आपल्या अधिकाराचा वापर तो पोलीस करून बघतो आणि त्याला मारू ला लागतो त्या तरुणाला मारताना बघून रिक्षा मधील दुर्गाबाई त्याला थांबवायला रिक्षा बाहेर उतरु बघतात पण सीमंतिनी मात्र त्यांना दडवून ठेवते रिक्षावाला आणि बाई पोलिसांलाच पाठिंबा देतो. आदिवासी देखणे दोरा का देखील दुर्गाबाईंनी बाहेर पडावे असे वाटत नाही. दुर्गा दुर्गाबाईंच्या मते हे सगळे गोळे आहेत संवेदनशून्य अशा परिस्थितीत अन्यायाविरुद्ध आवाज उठवला पाहिजे मग तो वर्दी विरुद्ध का असेना असे स्वच्छ नीतिमत्ता असलेल्या विरगाव दुर्गाबाईंना वाटते आणि दुर्गाबाई आणि अच्युत सर पोलिसाला अडवण्याचा प्रयत्न करतात त्याला त्या तरुणाला मारण्यापासून परावृत्त करतात तसा प्रयत्न करतात एवढ्यात तो तरुण पोलिसाला आपले नाव सांगून आपण ओरिसातल्या आहोत असे सांगतो. तरी देखील रिक्षातून खाली उतरतो आणि पोलिसाला समजावण्याचा प्रयत्न करतो. या ठिकाणी दोरा हा तरुण ओरिसा राज्याचा आहे हे बघून लगेच त्याची मदत करायला पुढे सरसावतो हा प्रांतवाद सरळ-सरळ आपल्या भारता मधल्या राज्यापैकी एक सामाजिक समस्या आहे असे लगेच दृष्टीपथास येते कारण जो दोरा का दुर्गाबाईंना या तरुणाला मदत करण्यापासून घडवत होता तोच त्याचे नाव आणि तो कोणत्या प्रदेशातून आलेला आहे हे कळल्याबरोबर त्याच्या मदतीला पुढे सरसावतो पोलीस मात्र त्या तरुणाला सोडायला तयार नाहीत कारण अशा संशयात्मक व्यक्तीला सोडणे घातक आहे तुम्ही कायद्याच्या मध्ये येऊ नका असे तो दुर्गाबाईंना सांगतो परंतु सर्वसामान्य लोकांना कायद्यापासून दोन हात लांबच ठेवले जाते हा एक मोठा विरोधाभास आपल्या समाजामध्ये दिसतो हे येथे लेखकाला अधोरेखित करायचे आहे पोलीस त्या मुलाला मारतच असतात तेव्हा तो तरुण त्याला म्हणतो कि त्याचे काका ओरिसात चीफ सेक्रेटरी आहेत आणि त्यांचा एक साधा फोन देखील महाराष्ट्राच्या गृहसचिव आला आला तर त्या पोलिसाची बदली अतिशय दुर्गम भागात होऊ शकते हे ऐकून पोलीस घाबरून त्या तरुणाला सोडून देतो त्या मुलाच्या बॅगेतून बाहेर पडलेले एक चित्र पाहून यश अगदी हरवून जातो.

सीमंतिनी बाईचे आदिवासींच्या कलेच्या मार्केटिंग करण्याची अतिशय प्रगत अशी कल्पना ऐकून दुर्गाबाई अतिशय उद्विग्न होतात आणि तिच्याबरोबर तांबट आळीत न जाण्याचा निर्णय घेतात तेवढ्यात बस मधून पुष्पा ताईंची एक अस्पष्टशी किंकाळी बाहेर पडते आणि त्या त्यांच्यासोबतच्या होऊन पुन्हा जाब विचारतात. होनप मात्र सारवासारव करतात. सीमंतिनी बाईला दुर्गाबाईंच्या असं हे मदत करणं लोकांच्या मध्ये ढवळाढवळ करणं या गोष्टी आवडत नाही. दुर्गाबाईंची भूमिका मात्र माणसाने माणसाला हव्या त्या वेळी मदत केलीच पाहिजे तीही न मागता. पण सीमंतिनी ला वाटतं

दुर्गाबाई सारख्या बाई मी आणि इतर अनेकांनी गरिबांना मदत करण्याचा प्रयत्न केला असूनही आपल्या देशाची गरिबी दूर झाली नाहीच ना मग कशाला करायचे त्यांच्यासाठी काही? ही त्यांची वृत्ती बघून दुर्गाबाई हतबल होतात. त्या मनात म्हणतात, "पूर्वी यांना फक्त करायचं नाही. आता नाही झाले ते मग कसलीच आशा उरत नाही. नाही गेली गरिबी पण काहीच नाही झाले असं कसं आणि आमचे उपाय असतील चुकीचे मग तुम्ही करा तुमचे वेगळे उपाय नुसता असा फायदेशीर त्रयस्थ पणा काय कामाचा?" असेही एकमेकांच्या बद्दल एकमेकांची स्वगत सूत्रधार प्रेक्षकांपुढे आणताना दिसतो. सीमंतिनी च्या मनात मात्र दुर्गाबाई सारख्या स्त्री बद्दल एक असूया मत्सर थोडीशी चीड आहे. ती स्वतःशी म्हणते, "देअर इज नो पॉईंट इन टॉकिंग टू हर ! सारखं खाली दाखवतात इतरांना, संसार ना मूल ना बाळ, एक पर्मनंट प्राध्यापकाची नोकरी. त्या सुती साड्या! कसली स्टेटस असत नाहीत यांना. सारखे टोचणे ! सारखी नैतिक टोचणी! एन्जॉय करायला लागलं तरी या विरुद्ध! लोककलेच्या विरुद्ध, डान्सच्या विरुद्ध,व्हॅलेंटाईन च्या विरुद्ध, दोन माणसे प्रेमाने एकत्र आली तरी त्यांच्या कपाळावर आठ्या !" अशाप्रकारे सीमंतिनी बाईचं खरं रूप स्वगताच्या माध्यमातून बाहेर पडते. ज्या दुर्गाबाईंना ती बरोबर घेऊन जाणार असते,तिची समाजसेवा दाखवणार असते त्या दुर्गाबाईंच्या विषयी तिचं मत कसा आहे हे कळते हे या स्वगतावरून कळते.

त्याच वेळी सुप्रिया, जी यशवर चिडून गाडीतून बाहेर पडून रस्त्यावरच्या गर्दीत मिसळलेली होती, ती बाहेरच्या गर्दीचा मस्तवालपणा पाहून पुन्हा घाबरून गाडीत येते. सुप्रियाला वाटत असते यश आपल्यावर सत्ता गाजवतो. आपल्याला काहीही मनासारखे करू देत नाही. नाटकात काम करणे, स्वतःच्या मर्जीने दुसरं मूल होऊ देणे यापैकी कोणतीच गोष्ट तिला करू देत नाही. त्यामुळे ती बाहेर पडते; पण समाजातल्या पुरुषी अरेरावी मुळे त्याची एक छोटीशी झलक पाहूनच ती घाबरून पुन्हा आपल्या सुरक्षित अशा गाडीत येऊन बसते. म्हणजेच सुप्रिया अशा तरुणींचे प्रतिनिधित्व करते की ज्यांना सुरक्षित अशा कवचाला भेदून बाहेर पडायचे नाहीये. समाजात आज अशा तरुणी आहेत की ज्यांना स्वतःच अस्तित्व टिकवण्या करीता काही स्वओळख निर्माण करायची आहे; पण त्याच वेळी त्याची जी किंमत द्यावी लागते ती द्यायला तयार नाहीत. त्यांना सुरक्षित अशा कवचात राहूनच सगळ्या गोष्टी करायच्या आहेत. आणि मग त्या वैतागातून बाहेर पडण्यासाठी त्या फुटकळ, शुल्लकश्या अशा कारणांना जवळ करताना दिसतात. नवश्रीमंत तरुणींच्या आयुष्यात विधायक असे करण्याचे काही उरले नाही की मग त्या अशा सवंगतेकडे, उथळतेकडे (उदा ब्युटीपार्लर मध्ये जाऊन फेशियलल, पेडिक्युएर करणे) वळतात असे दिसून येते.

शेवटी सूत्रधाराला वाटते, माणूस अगदी एकटा झाला आहे..... तो म्हणतो त्याचेच स्वतःचे बोलणे, स्वगत त्याला ऐकू येतात. I need to have a dialogue... मला कोणाशी तरी बोलणं आवश्यक आहे.....

अच्युतसरांना देखील असेच वाटते आहे. माणसामाणसांमध्ये संवाद झाला पाहिजे मग तो कोणत्याही प्रकारे होवो प्रत्येक व्यक्तीने आपल्याभोवती विसंवादाची जी एक अदृश्य भिंत उभी केली आहे ती फोडली पाहिजे. असा विचार करून तेही व्याख्यानाला जायचे म्हणून बसमधून बाहेर पडून चालू लागतात. दुर्गाबाई देखील अच्युत सरांबरोबर चालू लागतात. अच्युत सरांना वाटते की, दुर्गाबाई अद्यापही चाळीस पन्नास वर्ष मागे असल्या तरी त्यांच्या विचारांना नैतिकतेचे अधिष्ठान आहे. त्यांना भलेही वर्तमानाची जाणीव नसली, त्यांचे मन अद्याप भूतकाळात वावरत असले तरी त्यांची मते पक्की आहेत. चारित्र्यवान आणि स्वच्छ राहाणी असल्यामुळे त्यांची सोबत अच्युत सरांना नकोशी वाटत नाही. त्यांच्याप्रमाणेच दुर्गाबाई विचार करतात की अच्युत सर बदलले असले तरी, ते कोणत्या विचारप्रणालीचे आहेत, त्यांचे बोलणे, त्यांचे विचार, त्यांची मूल्ये आता आपल्याला कळायला कठीण जात असले तरी त्यातल्या त्यात त्यांची सोबत आपल्याला चालू शकणार आहे कारण सध्याच्या बदलत्या जीवनशैलीमुळे दुर्गाबाईंना कोणाचीच साथसंगत रुचेनाशी, पटेनाशी झाली आहे.

दोघांची मते थोडीफार जुळणारी असल्यामुळे अच्युतसर आणि दुर्गाबाई जोडीने पुढे चालले. कारण अच्युत सरांना, सर्वसाधारण माणसांना वास्तव स्थितीचे भान नाही आणि त्यांना ते तसे करून घेणे देखील आवश्यक वाटत नाही असे वाटते. ते स्वतःतच मग्न असतात. सुखनैव असतात, असे वाटते. या गोष्टींचा मात्र त्यांना राग येतो. त्यामुळे त्यातल्या त्यात भूतकाळात रमणाऱ्या असल्या तरी वास्तवतेचे थोडेफार भान दुर्गाबाईंना आहे असे अच्युत सरांना वाटतं त्यामुळे ते दुर्गाबाईंशी बोलत, संवाद साधत वाटचाल करू बघतात.

तेवढयात इटालियन फिल्म फेस्टीवल बघायला गेलेले पाटील आणि ताम्हणे अच्युत सरांना भेटतात ते अच्युत सरांना चॉम्स्कीच्या मिडीया बद्दलच्या विधानासंदर्भात त्यांचे मत विचारतात तेव्हा अच्युत सर सांगतात की Media मुळे लोक सुसंघटीत होऊ शकत नाहीत. अमेरिकेत Media चा वापर हेतुपुरस्सर करतात. आपल्याकडे कधीच लोक संघटीत नव्हते. त्यांच्यात जातीभेद, वर्णभेद, धर्मभेद या भिंती उभ्या केल्या गेल्या होत्या. आणि ना कधी सुसंघटीत होऊ शकतील.

नागरिकांमध्ये civic sense देखील नाहीये हे छोट्या छोट्या गोष्टींमधून दिसते. कारण ट्रॅफिकमधून एक गाडी दुसऱ्याच रस्त्याने थेट जाते आणि ही गाडी नक्कीच पुढे आणखीन ट्रॅफिक जॅम करेल हे लक्षात येऊन ताम्हणे आपला राग, संताप व्यक्त करतात. त्याचवेळी चौकात पोलीस नाही हे पाहून तर ते आणखीनच वैतागतात... उद्वीग्न होतात. प्रत्येकाने आपले आपले काम नेकीने केले तरी व्यवस्था सुधारेल असे अच्युत सरांनी म्हटलेले असते. अच्युत सर त्यांना म्हणतात की चीड व्यक्त करण्याची योग्य जागा नव्हे तुम्ही पोलीस मुख्यालयावर जाऊन सत्याग्रह करा... कोणत्या गोष्टीला, कोणी किती प्राधान्य द्यायचं हे समाजातील सर्वच लोकांना समजल पाहिजे. सगळ्यानाच त्याचे भान आल पाहिजे त्यासाठी प्रत्येकाने भावना भडकणं आणि न भडकणं दोन्ही सोडायला हवं....

या गर्दीत वारकरी सगळ्यांकडे भीक मागतो आहे. ताम्हणेंचा हात लागून तो ढकलला जातो. दुरुन ही सगळी हातापायी बघून प्रताप पुढे येऊन चिडून बडबडू लागतो...

" भिकारी नाहीये तो.... वारकरी आहे... बहुजनसमाजाचा आहे... आमचा आहे.... आणि खर तर वारकरीपण नाही... जमीन गेलेला शेतकरी आहे..." असा एक सामाजिक पेच लेखकाने रेखाटलेला दिसतो. वारकरी- अल्पभूधारक- भूमिहीन- समाजातील स्तरव्यवस्था- जागतिकीकरणाचा भारतीय कृषीसंस्कृतीवर झालेला परिणाम या सगळ्या गोष्टीं लेखक एका वाक्यांतून अधोरेखीत करतो...

सरतेशेवटी प्रताप ताम्हणेला ढकलतो... ढकलाढकली चालूच रहाते.. शेवटी तो वारकरी यशच्या गाडीवर आपटतो... यश त्याला त्याच्या स्वभावधर्मानुसार जाब विचारणारच असतो पण शेवटी त्याला त्या वारकऱ्याबद्दल सहानुभूती वाटते. अच्युत सरांना हा ढकलाढकलीचा, मारामारीचा प्रकार पसंद नाही. प्रताप ची नोकरी गेली त्याचा परिणाम म्हणून ही वादावादी केली जाते हे अच्युत सरांना मान्य नाही. त्यासाठी वेगळ मार्ग चोखाळायला हवा असे त्यांचे म्हणणे आहे. त्याही परिस्थितीत ते वाद विसंवाद मारामारी थांबवण्याचा प्रयत्न करत आहेत. पण सगळेच संधीचा फायदा घेऊन मनातील राग, संताप, खदखद व्यक्त करतात. संधीचा फायदा घेत गर्दीतला कोणीतरी त्याच्या हातात काठी आणून देतो आणि वाद अधिकच चिघळतो. हिंदू- मुसलमान, ब्राम्हण- मराठा, विचारवंत- निबुद्ध, भांडवलदार- नोकरदार-साम्यवादी,आदिवासी- प्रगत नवश्रीमंत, नीति- अनीति, असहाय्य स्त्री- स्वार्थी स्त्री- पुरुष अशा सगळ्या च्या माध्यमातून लेखकाने समाजाचे प्रतिबिंब "चौक" या नाटकात रेखाटले आहे.

**आपली प्रगती तपासा**

१) 'चौक' नाटकाची समाजशास्त्रीय समीक्षा करा.

------------------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------------------

## ४.२.६ सारांश

२००५ मध्ये प्रकाशित झालेल्या या नाटकात तत्कालिन समाजाचे यथायोग्य प्रतिबिंब पडलेले दिसते. समाजाचा विस्तृत चेहेरा रेखाटण्याचा प्रयत्न या नाटकातून झालेला दिसतो. १९९१ पासून भारताने खाजगीकरण, उदारीकरण या ज्या गोष्टी स्विकारल्या आहेत त्याचे पडसाद या नाटकामध्ये पडलेलेले दिसतात. जागतिकीकरणाचा प्रचंड परिणाम समाजातील प्रत्येक स्तरावर, प्रत्येक घटकावर पडलेला

दिसतो त्याचे काही पैलू लेखकाने या पात्रांच्या माध्यमातून, त्यांच्या समस्यामधून, त्यांच्या संवादातून मांडण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

विचारवंत प्रा० अच्युत आठवले यांची सगळ्या गोष्टींकडे बघण्याची व्यापक दृष्टी आहे. पण त्यांच्यासारख्या लोकांना गृहीत धरलं जात. आणि मग कमी पात्रता असलेले लोक जास्त आत्मविश्वासी होतात. विदुषी दुर्गा बाई सारख्या लोकांपासून एक नैतिक भय इतर लोकांना वाटतं आणि त्यामुळेच त्यांच्यापासून पुढील पिढयांचे लोक दूर रहातात कारण सद्यकाळात एवढी नैतिकता कोणाला पटत नाही, पचत नाही. प्रताप सारख्या भावना चटकन भडकणाऱ्या लोकांचे प्रमाण समाजात खूप आहे हे देखील लेखक अधोरेखित करतात आणि पुष्पाताई गोगटे यांच्या सारख्या मध्यमवर्गीय विधवांचे समाजात काय स्थान आहे? त्यांचा कसा फायदा घेतला जाऊ शकतो; त्यातून स्वतःला वाचवण्याचा काय उपाय केला जाऊ शकतो हे पुष्पाताईंच्या वागण्यातून कळून येते तर होनपासारखे मध्यम पांढरपेशा स्तरातील व्यक्ती वेळ पडल्यास अनैतिक गोष्टी करण्यास कशा धजावू शकतात याचा उल्लेख नाटकात आला आहे.

सिमंतिनी उच्चमध्यम वर्गातील पण समाजसेवेच्या नावाखाली अप्रगत(आदिवासी विभागातील) लोकांचे शोषण करणाऱ्या लोकांपैकी एक दिसते. तर प्रासका दोरा सामाजिक अडीअडचणीवर मात करून उच्च पदावर प्रस्थापित झालेल्या पण मनात अजूनही प्रांतवाद/ प्रदेशवाद जपणाऱ्या समुहाचे प्रतिनिधित्व करणारा दिसतो.

"आहे रे गटातील" लोकांचे प्रश्न, त्यांचे समाजातील समस्यांपासून अलिप्त रहाणे त्यांच्या प्रश्नांची जाणीव देखील नसणे, नवश्रीमंत वर्गात स्वतःला अ‍ॅडजस्ट करण्याचा प्रयत्न, आणि स्वतः ची ओळख सांभाळण्याची केविलवाणी धडपड यश आणि सुप्रिया या पात्रांद्वारे लेखकाने दाखवली आहे.

साधारणपणे जागतिकीकरणाचा, खाजगीकरणाचा आणि उदारीकरणाचा समाज स्वास्थावर कसा परिणाम झाला आहे याचे प्रत्ययकारी चित्रण" चौक" या नाटकात दिसते. विशिष्ठ क्षेत्रातील लोकांना रोजगाराच्या प्रचंड मोठ्या प्रमाणात संधी मिळून त्यांचे सामाजिक स्तरांतरण होणे, विशिष्ठ क्षेत्रातील लोकांचा रोजगार हरपणे, भविष्यातील असुरक्षितता, माणसामाणसा मधील ताणतणाव, स्वतःची ओळख टिकवून ठेवायचा केविलवाणा प्रयत्न, शेतकऱ्याचे प्रश्न, कृषिसंस्कृतीवर झालेला परिणाम, भूमिहिन शेतकरी, प्रसारमाध्यमांचा समाजावर पडणारा परिणाम, वैफल्यग्रस्त तरुण, भ्रष्टाचार, प्रांतवाद, आदिवासींच्या लोककलांचा जागतिक पातळीवर बाजार मांडून त्यांना मात्र या गोष्टींचा काहीच मोबदला न देणारी याच समाजातील सुशिक्षित पण उथळ माणसं, सार्वजनिक ठिकाणी कसे वागावे याचे जरादेखील भान नसणारे बेजबाबदार नागरीक, संवेदनाशून्य आणि कृतीशून्य झालेली माणसे, दहशतवादाचा समाजावर होणारा परिणाम, समाजात असणारी भांडवलशाही,कम्युनिस्ट, फॅसिस्ट, सोशालिस्ट, धार्मिक- जातीय- प्रांतिक मांडणी या सगळ्या गोष्टी या साहित्यकृतीत दिसतात.

समाज आणि व्यक्ती यांच्यात पडणारे तुकडे, त्यात व्यक्तिच्या जीवनात घुसू लागणारे धर्म आणि आधुनिक तंत्रज्ञान, सोशल मिडियाचा वारेमाप प्रभाव आणि त्यामुळे व्यक्ती व्यक्तींची होणारी अनाकलनीय घुसमट सुरु झालेली या नाटकातून दिसते.

थोडक्यात, कोणतेही साहित्य म्हणजे लेखकाने त्या त्या विशिष्ठ सामाजिक परिस्थितीला दिलेला प्रतिसाद असतो. लेखक, त्याची साहित्यकृती आणि वाचक यांच्या आंतरक्रियांमध्ये सामाजिक परिस्थिती अपरिहार्यपणे महत्वाची असते. म्हणूनच

" चौक" या मकरंद साठे लिखित नाटकाचा, लेखकाची व्यक्तीगत निर्मिती म्हणून विचार न करता एक सामाजिक घटित म्हणून विचार केला पाहिजे. आणि " चौक" या नाटकाच्या निर्मिती मागील सामाजिक परिस्थिती कोणती आणि लेखकाने या परिस्थितीला कसा प्रतिसाद दिला आहे याचा मागोवा घेण्यात आला आहे.

## ४.२.७ संदर्भ ग्रंथ

१. साठे मकरंद- चौक(नाटक)

२. पाटील गंगाधर- समिक्षेची नवी रूपे - मुंबई १९८१

३. कुळकर्णी, वा. ल.- साहित्य: स्वरूप आणि समीक्षा, पुणे १९७५

४. शिरवाडकर, के. रं.- मार्क्सवादी साहित्यविचार- पुणे- १९८०

५. मराठी विश्वकोश

६. https://mr.vikaspedia.in/education/93893e93993f92494d92f93e93593f93792f94093893094d93591593e939940/93893e93993f92494d92f93e91a94792a94d93091593e930/93893e93993f92494d92f93892e94091594d93793e-93293f91f930930940-91594d93093f91f93f93893f91d92e

## ४.२.८ सरावासाठी प्रश्न

अ]

१. " चौक" या मकरंद साठे लिखित नाटकाची समाजशास्त्रीय समीक्षा करा.

२. "चौक" या मकरंद साठे लिखित नाटकाचा, लेखकाची व्यक्तिगत निर्मिती म्हणून विचार न करता एक सामाजिक घटित म्हणून विचार केला पाहिजे" या विधानाचा परामर्श घ्या.

आ] टीपा लिहा:-

१. अच्युत आठवले

२. "चौक" मधील वातावरण निर्मिती

३. "चौक" मधील रूपकात्मकता

## ४.२.९ पुरक वाचन

१. साठे मकरंद- अच्युत आठवले आणि आठवणी (कादंबरी)

२. मराठी रंगभूमीच्या तीस रात्री- खंड१,२,३

३. मार्क्सवादी साहित्यविचार- पुणे- १९८०

❖❖❖

munotes.in

घटक : ४

# ४(३अ)

## अ. लावणी - टुमदार कुणाची छान

शाहीर परशराम

**घटक रचना**


४.३अ.१ प्रास्ताविक

४.३अ.२ लेखकांविषयी

४.३अ.३ "टुमदार कुणाची छान" या लावणी विषयी

४.३अ.४ लावणी आणि समाजशास्त्रीय समीक्षा

४.३अ.५ सारांश

४.३अ.६ संदर्भ

४.३अ.७ सरावासाठी प्रश्न

४.३अ.८ पुरक वाचन


## ४.३अ.१ प्रास्ताविक

पंडिती साहित्यप्रकारा नंतर मराठी साहित्यात एक प्रकारची पोकळी निर्माण झाली होती ती भरून काढण्याचा प्रयत्न शाहिरी वाङ्मयाने केला होता. अज्ञातदास, अनंतफंदी, परशराम, रामजोशी, होनाजीबाळा, सगनभाऊ, प्रभाकर यांनी शाहिरी वाङ्मय भरास आणले. तत्कालिन समाजाचा विचार केला तर, पेशवाई कालखंडात " शाहिरी वाङ्मय" भरास आले होते. या शाहिरी वाङ्मयातून लावणी आणि पोवाडे असे दोन काव्यप्रकार अनुक्रमे शृंगार रसयुक्त आणि वीररस युक्त निर्माण झाले; कारण पेशवाईचा राज्यविस्तार पार अटकेपार पोहोचला होता. शाहिरांची लेखणी आपल्या आजूबाजूला असलेला परिसर, भोवतालची सृष्टी, सामाजिक आणि सांस्कृतिक पर्यावरण, इतिहास यांचे गुणगान करू लागलेली दिसते.

## ४.३अ.२ लेखकांविषयी

कोणत्याही साहित्यिकाचे जीवन आणि त्याची कलाकृती यांचा अन्योन्य संबंध असतो. त्याच्या जीवनात घडणा-या अनेक घटनांचा परिणाम त्यांच्या साहित्यकृतींवर झालेला दिसतो. त्या वैविध्यपूर्ण

घटनांचा, अनुभवांचा प्रभाव त्यांच्या साहित्यकृतींवर पडलेला दिसतो. याच अनुभवांचा, घटनांचा वापर करून साहित्यिक कलानिर्मिती, साहित्यनिर्मिती करत असतो. शाहिर तर समाजाच्या अधिक जवळ गेलेले आहे असे दिसते. परशराम यांचा जन्म शिंपी कुळात झाला. तत्कालिन इतर शाहिरपेक्षा शाहिर परशराम आजूबाजूच्या समाजात, संस्कृतित अधिक मिळून मिसळून, एकरूप झाले होते असे त्यांच्या लावण्यांवरून दिसून येते. त्यांच्या साहित्यातून सामाजिकता दिसून येते. शाहिर परशराम यांचे चरित्र बघितले तर, त्याचे जीवन सर्वसामान्य जनतेमध्ये, ग्रामीण भागात गेल्याने लोकांच्या मानसिकते बद्दल त्यांना चांगलीच कल्पना होती म्हणून त्यांच्या कलाकृतींमध्ये जनमाणसाच्या सामाजिक आणि मानसिक परिस्थितीचे वर्णन आलेले दिसते.

नाशिक मधील सिन्नर येथील वावी या गावी इ.स १७५४ मध्ये अक्षयतृतीयेच्या शुभमुहुर्तावर शाहीर परशराम यांचा जन्म झाला. पेशवाईचा ऐन भराचा हा कालखंड ! विठ्ठलाच्या साक्षात्काराचा प्रसंगही त्यांच्या आयुष्यात दिसतो विठ्ठलाने आशीर्वाद देऊन परशरामांना सांगितले, " अभंग पुरे आता लावण्या रच." मात्र ही आख्यायिकाच असावी असे दिसते.त्यांनी त्यांच्या लावण्या आपले गुरू विठ्ठल खत्री यांस समर्पित केल्या होत्या असे दिसते. शाहीर परशरामांचे वेगळेपण म्हणजे," इतर शाहीरांच्या मानाने परशरामांचे अवलोकन अतिशय सूक्ष्म होते व त्यांची विनोददृष्टीही प्रशंसनीय होती. त्यामुळे त्यांच्या लावण्यांत खूप विषयवैचित्र्य आहे."( म. ना. अदवंत ) अदवंतांनी त्यांच्या सामाजिक लावण्यांचा विचार करून त्यांचे निरीक्षण सूक्ष्म होते असे म्हटले आहे.

परशरामांचे समाज निरीक्षण अतिशय सूक्ष्म होते हे त्यांच्या सामाजिक लावण्यांच्या अभ्यासावरून लक्षात येते. समाज हा एकच विषय असला तरी त्यातील गुंतागुंत त्यांच्या लावण्यांचा अभ्यास केला तर लक्षात येते.मुलुखगिरीत गुंतलेल्या, संसारात शिणलेल्या आणि विलासात आंबलेल्या मनाला उभारी देवून जीवनात रंग भरण्याकरिता परशरामांनी लावणीची रचना केली. लोक जीवनातील असंख्य विषय निवडून त्यात लौकिक भाव भावनांची सुंदर चित्रे रेखाटली आहेत. त्यांच्या लावण्यांमध्ये तत्कालिन अनेक विषय आले आहेत. जवळपास समाजाशी निगडित सर्वच विषयांवर परशरामांनी लावण्या किंवा पोवाडे रचले आहेत किंवा त्याचा संदर्भ तरी त्यामध्ये आला आहे. याचे कारण ते नेहेमी समाजात मिसळत गेले आणि समाजाच्या एकंदर वृत्ती- प्रवृतींचे अवलोकन करीत राहिले. तत्कालिन समाजाचे सूक्ष्म अवलोकन त्यांच्या लावण्यांमधून दिसून येते. आजू बाजूचा समाज, परकीय आक्रमणं, सैनिकांचे जीवन, त्यांना लढाईच्या निमित्याने परदेशी जावे लागणे आणि त्यामुळे त्यांच्या जीवनात शृंगार रसाला मिळालेले प्राधान्य या सगळ्या गोष्टी या लावण्यांतून दिसून येतात.

स्त्रीसौंदयाचे वर्णन करणा-या अनेक लावण्या शाहिरी वाङ्मय प्रांतात दिसून येतात.

## ४.३अ.३ "टुमदार कुणाची छान" या लावणी विषयी

परशरामांच्या "टुमदार कुणाची छान" या लावणीत देखील स्त्रीसौंदर्याचे वर्णन अतिशय बारकाईने केले आहे.

## ४.३अ.४ लावणी आणि समाजशास्त्रीय समीक्षा

परशरामाच्या यांच्या लावणी मधील ही सर्वगुण रूपसंपन्न ऐन बारा- तेराच्या वयातील आहे. ह्या लावणीमध्ये स्त्रीयांनी धारण केलेले अलंकार, कपडे यांचे जसे वर्णन येते तसेच स्त्रीच्या शरीरांचेही वर्णन मुक्तकंठाने केलेले अहे. या लावणीत यौवनेचे आलेले वर्णन आणि त्यासाठी परशरामाने वापरलेल्या उपमा जगावेगळ्या आणि अस्सल मराठमोळ्या आहेत.

**शाहिर म्हणतात-**

टुमदार कुणाची छान नवति भरज्वान पुसा रे आलि कुठून
स्वरूपाचे तुटती तारे कडारे कड विजवा पडतिल तुटून ॥ धृ॥
छबिदार सुरत फांकडी बुंद राखडी जडुन वर खडे
गुंफिली वेणि नागिणी लडा रे गालांवर दोहीकडे
पान खाऊन ओठ करि लाल अंगावर शाल झळकती चुडे
गजगति चाले हळूहळू उरी गं जोबन उमटले हुडे
वय अटकर बांधा लहान
हरपलो पाहुन भुक तहान
कर अर्पण पंचीप्राण रणीं ग जाऊ कटून....॥१॥

पहिल्या कडव्यांत, या तरुणीचे अतिशय बारकाईने वर्णन केले आहे. तिच्या सौंदर्याचेच नव्हे तर तिने केलेल्या साजशृंगाराचे देखील अतिशय बहारदार पद्धतीने वर्णन आले आहे. अशी ही टुमदार म्हणजे सुंदर तरुणी कोणाची आहे आणि नवीनवेली भर जवानीत असलेली ही तरुणी कुठून आली आहे असा प्रश्न या नायकाला पडला आहे. तिचे रूप इतके सुंदर आहे की कडकड करून विजाच जणू अंगावर पडतील असे वाटत आहे.

बुंथ म्हणजे डोक्यावरून सर्व शरीरभर आच्छादनासाठी घेतलेले वस्त्र, ओढणी, खोळ. तसेच बुरखा किंवा घुंगट. तसेच रूप किंवा वेश या अर्थानेही बुंथ हा शब्द वापरलेला आढळतो. याठिकाणी बुंद असा शब्द दिसतो त्यावर खडे जडवलेले आहेत. सुंदर वेणी गुंफलेली आहे .ती नागिणी सारखी पाठीवर रुळते आहे. लडीवाळ अशा केसांच्या बटा दोन्ही गालांवर रेंगाळत आहेत. सौंदर्याचे वर्णन करताना तत्कालिन समाजाचे प्रतिबिंब दिसते . कारण "साहित्य ही सामाजिक संस्था असून समाजात निर्माण

झालेली भाषा हे त्याचे माध्यम असते. प्रतीकात्मक आणि छंदोबद्धता ही जी साहित्याची पारंपरिक साधनतंत्रे आहेत, त्यांची प्रकृतीच सामाजिक आहे" असे रेने वेलेक यांनी म्हटले आहे. म्हणजे छबिदार सुरत हा शब्द तत्कालिन समाजाचे प्रतिबिंब दाखवणारा आहे. उर्दू,फारशी भाषेचा अंमल मराठी भाषेवर झालेला आहे तो या उदाहरणावरून स्पष्ट दिसतो. पान खाऊन ओठ लाल झाले आहेत. अंगावर शाल पांघरलेली आहे आणि हातात चुडे झळकत आहेत. अशीही तरुणी गजगती ने हळूहळू चालत आहे. गजगती हे खास सौदर्याचे लक्षण आहे. डौलदार चाल, उरी तारुण्य उफाळून आले आहे. जोबन म्हणजे तारुण्य हा देखील सर्रास जनमाणसात वापरला जाणारा उर्दू शब्द!

पुढील ओळीत अटकर बांधा, लहानवय असा उल्लेख आला आहे. तिचे सौंदर्य बघून नायकाचे भान हरपले आहे तो आपली तहानभूक विसरून गेला आहे.

वय बारा-तेरात ऐन आलि भरात भुइ ग ठेंगणी
दंडि बाजुबंद बाहुट्या सर पहुच्या हिरे जडले कंगणी
गगनांत चांदणी ठळक मारिशी झळक उभि ग अंगणी
किती नटुन थटुन मारिशील छनाछन नैनाच्या संगिणी
झालों घावाविण घायाळ
झोंबला विखारी व्याळ
जणू टाहो करि कोयाळ
तूं न कळे घालशी माळ
कोणाला गे उठून .......॥ २ ॥

या तरुणीने घातलेल्या विविध अलंकारातून तत्कालिन समाजाचे प्रतिबिंब पडलेले दिसते. बाजुबंद, सर, पहुच्या, हिरेजडीत कंगण अशी ही अलंकारांनी नटलेली तरुणी एखादया चमचमणाऱ्या चांदणीप्रमाणे, अंगणात उभी राहून नयनांच्या संगिणी( बंदूक) चालवत आहे. शृंगाररसा चा परिपोष पुढील ओळींतून दिसतो. हा तरुण सैनिक घावाशिवायच तिच्या नजरेच्या वाराने घायाळ झाला आहे. असा हा मदनाचा विखारी दाह त्याला होत आहे. अशीही रतीसम असलेली तरुणी उठूनकोणाला माळ घालेल असा प्रश्न त्याला पडला आहे.

दूर देश बंगाल  मुलुख कंगाल गेलो सलासैल आलो करून
नाही धनदौलतीला कमी आणिले उंट मालाचे भरून
चाहिल ते माग या घडि देइन बिनघडी ताजवा धरून
तुझे भारोभार देईन सखे खैरात करीन तुजवरून
असा हेत मनामधिं धरून
राहिलो रुपाला भूलून
चार महिने तुजसाठीं ठरून
मजा  [सखे ] दे पटून ...॥ ३ ॥

हा सैनिक महाराष्ट्र सोडून अनेक ठिकाणी मुलुखगिरी करून आला आहे. पार बंगालप्रांतापर्यंत तो जाऊन आला आहे. लढाई करून धनदौलत कमावून आणली आहे. उंटावरून खूप संपत्ती भरभरून आणली आहे. ही तरुणी जे मागेल ते देण्याची ऐपत त्याच्याकडे आहे. तराजू भरभरून खैरात करण्या इतकी संपत्ती त्याच्याकडे आहे. असा हेतू मनामध्ये धरून, तिच्या रुपाला भुलला आहे. चार महिन्यांपासून तिची वाट पहात आहे. मराठी राज्यात पेशव्यांचे राज्य होते. त्यांच्या राज्यविस्तारासाठी अनेक तरुण सैनिक विविध प्रांतात लढाईला जात असत त्याचे यथोचित प्रतिबिंब वरील कडव्यात पडलेले दिसते. काही उर्दू- फारसी शब्द देखील अगदी सर्रासपणे जनमाणसात रुळले होते याचे प्रत्यंतर येते.

धरिं चला राजअंबिरा गुणगंभिरा पाहिले कसून
वचनाचा करावा मान करिन सन्मान पलंगी बसून
विठु परशरामाचा नक्ष चहुंकडे दक्ष पहा जा पुसून
गातो रामकृष्ण रामाचे तोड मूळ वस्तादापासून
नवशिके ठाउके बेसूर
चाल बदलुन गाती टौर
घरोघरी वाजविती डौर
जशि अक्षतिजेची गौर
काय तिशीं रे झटून .....|| ४ ||

शेवटी, शाहिर परशराम आपल्या गुरुंचा उल्लेख करून, त्यांच्या पासून हे सगळे साहित्य निर्माण करू शकलो (मूळ वस् स्तादापासून) आणि नवशिके कसे बेसूर, चाल बदलून गातात आणि घरोघरी आपला डौर वाजवतात याचा उल्लेख केला आहे.

**आपली प्रगती तपासा**

१) 'टुमदार कुणाची छान' या लावणीची समीक्षा करा.

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

## ४.३अ.५ सारांश

लावणी म्हणजे लावण्यगीत ! शृंगार रसाचा परिपोष! लावणी वाङ्मयाच्या प्रेरणेविषयी श्री. वि. ल. भावे म्हणतात," राष्ट्राच्या अंगात राष्ट्रातील नागरिकात सामर्थ्य आणि वीररस खेळत असल्यामुळे त्यंाच्या आविष्कारार्थ पोवाडे आणि लावण्या रचल्या गेल्या." याच काळात शृंगार आणि वीर रस निर्माण करणारे लावणी आणि पोवाडे हे साहित्य निर्माण झाले. आणि समाजात साहित्य म्हणून मान्य झाले. भाषेपासून समाजाला वेगळे करता येत नाही. समाजातल्या व्यक्तीच्या क्रियाप्रतिक्रिया भाषेच्या माध्यमातून होत असतात आणि त्या त्या साहित्यिकाची विचारसरणी भाषिक चिन्हांच्या रुपात झालेली भाषिक निर्मिती असते असे मत बाख्तिन आणि त्यांच्या सहकार्यांनी मांडले आहे. प्राचीन साहित्यकृतीची समीक्षा करत असताना या साहित्याची निर्मिती कोणत्या अवस्थेत होते याचा विचार करता लावणी हा साहित्यप्रकार तत्कालिन समाजाची गरज होती असे दिसते. समाजातील मर्द गड्यांच्या, सैनिकांच्या प्रेरणांचे संतुलन व्हावे अशी त्यामागील भूमिका होती.

" मोहिमेवर गेलेल्या शिपाई, सरदार याना घरच्या आठवणीने व्याकुळ होत तेव्हा त्यांना लावणीतील ठेक्याने आणि शृंगारिक वर्णनाचे सुखवण्याचे काम केले. त्यामुळेअशा शिपाई, सरदार यांना सुखविण्यासाठी लावणी अवतरली असावी .-"( डॉ. गंगाधर मोरजे ) शृंगारपर लावण्यांमध्ये स्त्री सौदयीचे विविध अंगाने वर्णन केले आहे. डॉ गंगाधर मोरजे म्हणतात," परशरामाने त्यामध्ये तिचे रूप, तिची चाल, तारुण्य, पोशाख, हालचाली, बोलण्याची लकब,. इ सर्व गोष्टींचे वर्णन आपल्या लावणीमध्ये केले आहे.वाडमयाच्या अभ्यासातूनच तत्कालिन स्थितीगतीचे चित्रण दिसते. परशराम कालिन समाज जीवनाचे प्रतिबिंब त्यांच्या लावण्यांमधून पडलेले दिसते. त्या काळातील रिती, रिवाज, स्त्री पुरुष मानसिकता, सामाजिक स्तर, वेशभुषा, केशभुषा वस्त्रप्रावरणं, अलंकार आणि एकूणच जीवनशैली "टुमदार कुणाची छान" या लावणीतून दिसून येते.

## ४.३अ.६ संदर्भ


१.https://mr.m.wikipedia.org/wiki/%E0%A4%B6%E0%A4%BE%E0%A4%B9%E0%A5%80%E0%A4%B0_%E0%A4%AA%E0%A4%B0%E0%A4%B6%E0%A5%81%E0%A4%B0%E0%A4%BE%E0%A4%AE

२. lib.unipune.ac.in

३. मोरजे, ग. ना. मराठी लावणी वाङ्मय पुणे१९९९

४. ir.unishivaji.ac.in

## ४.३अ.७ सरावासाठी प्रश्न

१) " टुमदार कुणाची छान" या लावणीची समाजशास्त्रीय समीक्षा पद्धतीने समीक्षा करा.

२) तत्कालिन समाजाचे प्रतिबिंब " टुमदार कुणाची छान" या लावणीत कसे पडले आहे ते सोदाहरण स्पष्ट करा.

आ) टीपा लिहा:-

१) लावणी लेखनामागील प्रेरणा

२) शाहीर परशराम यांचे व्यक्तिमत्व

## ४.३अ.८ पुरक वाचन

१.https://mr.m.wikipedia.org/wiki/%E0%A4%B6%E0%A4%BE%E0%A4%B9%E0%A5%80%E0%A4%B0_%E0%A4%AA%E0%A4%B0%E0%A4%B6%E0%A5%81%E0%A4%B0%E0%A4%BE%E0%A4%AE

२. लोकसंस्कृतीचा गाभारा

३.https://vishwakosh.marathi.gov.in/20466/

४.https://www.marathifilmdata.com/chitrapat/sahir-parsuram/

❖❖❖

**घटक : ४**

# ४(३आ)

## आ. भारूड

## "दादला नको ग बाई"

संत एकनाथ

**घटक रचना**

४.३आ .१ प्रास्ताविक

४.३आ.२ लेखकाविषयी

४.३आ.३ तत्कालिन समाजाचे प्रतिबिंब

४.३आ.४ सारांश

४.३आ.५ संदर्भ ग्रंथ

४.३आ.६ नमुना प्रश्नसंच

४.३आ.७ पूरक वाचन

## ४.३आ.१ प्रास्ताविक

समाज प्रबोधनाचा एक उत्तम आविष्कार म्हणून 'भारूड' या काव्यप्रकाराकडे बघितले जाते."बहुजन" समाजात जे रुढ ते बहुरूढ याचे अपभ्रंश रूप म्हणजे भारूड! दोन तोंडाचा पक्षी असा देखील एक अर्थ सांगितला जातो. भारुडाला देखील दोन अर्थ प्राप्त झालेले दिसतात. "भा" म्हणजे आभा, प्रभा, दीप्ती, प्रकाश, प्रतिभा. स्फूर्तीच्या बळावर केलेली जोमदार रचना! ल. रा. पांगारकरांची उपपत्ती योग्य वाटते ती म्हणजे "जे बहुरूढ भाषेत सादर केले जाते ते भारुड!"

भारूडातील विषय हे सर्वसामान्यांच्या परिचयाचे व नित्याच्या व्यवहारात वावरणारे व आढळणारे असतात. व्यवसाय, नाती-गोती, सामाजिक वृत्तिदर्शन, गाव, दैवी भूमिका, भूत-पिशाच्च, पशु-पक्षी, सण आदि बाबी असे विविध विषय एकनाथांच्या भारुडांत दिसून येतात.

## ४.३आ.२ लेखकाविषयी

(१५३३-१५९९). महाराष्ट्रातील एक श्रेष्ठ संतकवी. जन्म पैठण येथे. संत भानुदासांचे पणतू. वडिलांचे नाव सूर्यनारायण आणि आईचे रुक्मिणी. त्यांचे वडील मोठे पंडित असावेत, असे एक मत

आहे. बालपणीच आईवडील निवर्तल्यामुळे एकनाथांचे संगोपन त्यांचे आजोबा चक्रपाणी यांनी केले. वयाच्या बाराव्या वर्षी एकनाथांनी देवगिरी येथील जनार्दनस्वामींकडे जाऊन त्यांचे शिष्यत्व पतकरले. तेथे सहा वर्षे राहून संस्कृत शास्त्रपुराणांचे व ज्ञानेश्वरी सारख्या अध्यात्मग्रंथांचे अध्ययन त्यांनी केले. गुरुकृपेने परमेश्वरी साक्षात्कार झाल्यावर एकूण सात वर्षे त्यांची तीर्थयात्रेत घालविली. या तीर्थयात्रेत प्रथम काही दिवस जनार्दनस्वामी त्यांच्याबरोबर होते.

**संत एकनाथांची साहित्य संपदा:-**

आळंदीस जाऊन नाथांनी ज्ञानेश्वरांच्या समाधीचा जीर्णोद्धार केला (१५८३) आणि त्यानंतर ज्ञानेश्वरीची संहिता शुद्ध केली (१५८४).

i) चतुःश्लोकी भागवत (सु. १५५५)

ii) हस्तामलक

iii) शुकाष्टक

iv) रुक्मिणी स्वयंवर (१५७१)

v) भावार्थ रामायण

नाथांची भारूडे ही व्यापक सामाजिकता आणि विश्वव्यापक दृष्टी यामुळे निर्माण झाली. भारूडाची निर्मिती होण्यास नाथांचे तत्कालिक जीवन व त्यांची पराकोटीची भक्ती आणि प्रेमळ स्वभाव, आजूबाजूचा परिवेश कारणीभूत ठरले असे म्हणता येईल. नाथांच्या काळचा समाज हा सततच्या परकीय आक्रमणाने पार कोसळून गेला होता. भयग्रस्त अवस्थेत प्रत्येक व्यक्ती जगत होती. गरीब, अडाणी अशिक्षित लोकांच्या अज्ञानाचा गैरफायदा घेऊन त्यांना लुबाडले जात होते. सर्वत्र अंधश्रध्दा पसरली होती. खऱ्या मानवता धर्माला लोकं विसरले होते.ढोंगी, भोंदू, स्वार्थी लोकांनी समाज पोखरून टाकला होता. अनिष्ट रूढी, परंपरांचं स्तोम माजलं होतं. सर्वसामान्य जनता आपला आत्मसन्मान विसरली होती. क्षात्रतेज कुचकामी ठरत होते. स्त्रियांवर अन्याय अत्याचार होत असलेतरी गप्प बसून बघितले जात होते. स्वकर्म, स्वधर्माची जाण बुजत चालली होती. अज्ञानी जनता निराकार,निर्गुणाला न पुजता कोणत्याही दैवतांच्या मागे लागली होती.त्यामुळे ग्रामदेवतांचं महत्त्व वाढू लागलं. खरी भक्ती काय असते हेच लोकाना कळेनासे झाले होते.बळींचा भडिमार होऊ लागला. अनेक दैवतांची पूजा केली जाऊ लागली. सर्वत्र अंधश्रद्धा बळावली होती. समाज प्रबोधनाचे हे महत्वाचे कार्य एकनाथ महाराजांना करायचे होते. तत्कालिन समाजात असलेली अंधश्रद्धा नाथांना दूर करायची होती. खऱ्या भक्तीची शिकवण लोकांना द्यायची होती. साधा, सरळ व सोपा भक्तीमार्ग सोडून अन्य मार्गांनी जाणाऱ्या भोळ्या जनसामान्यांना अध्यात्मिक वाटेकडे न्यायचे होते. म्हणून नाथांनी रुपकाचा अलंकार लेवून भारूडांना सजवलं. नाथाची प्रतिभा शक्ती इतकी अलौकिक होती की, नाथांना कधी शब्दांची वाण पडली नाही. जणू काय सरस्वतीने आपलं सगळ शब्दभांडारच त्यांच्यासमोर उघडं केलं होतं.

एकनाथांच्या आवडत्या आध्यात्मिक रूपकांबरोबरच या भारुडात देखील सामाजिक रूपकात्मकता आढळते. तत्कालीन यावनी सत्तेचा मराठी समाजावर झालेला अंतर्बाह्य अनिष्ट परिणाम त्यातून सूचित केला आहे.जन्मजात स्वभावाबरोबरच तत्कालीन परिस्थितीनेही एकनाथांचे व्यक्तिमत्त्व घडविले असे आपणास दिसते.

## ४.३आ.३ तत्कालिन समाजाचे प्रतिबिंब

नाथांची साहित्य संपदा बघितली तर त्यातील भारूड हा काव्यप्रकार तत्कालिन समाजजीवनाचं वास्तव साक्षात्कारी स्वरूपच आहे. सामाजिक जीवन हाच काव्याचा म्हणजे भारूडाचा विषय त्यांनी केला होता. अध्यात्मिक अधोगती आणि सामाजिक अवनती याचे प्रभावी दर्शन भारूडाद्वारे नाथांनी घडविले. चराचराला एक मानणारे, स्वतःच्या आनंदात मग्न होणारे एकनाथ महाराज ब्रह्मसाक्षात्कारी परमात्म सिद्धीप्राप्त महापुरूष होते. तत्कालिन समाजाला जागृत करण्याचे महान कार्य संत एकनाथ महाराजांनी केलं. अतिशय कनवाळू मनाचे थोर कलावंत, एक प्रतिभाशाली कवी म्हणजे एकनाथ महाराज! आणि अशा या कवीच्या ठिकाणी साधुत्वाची परमावधी आढळते. आणि कवित्वाचा उत्कट विलास दृष्टीस पडतो.

बहुजनसमाजाला रूपके समजतात व आवडतात, म्हणून एकनाथांच्या रूपकप्रचुर शैलीचा अवतार झाला. मराठीचा पुरस्कार करतानाही, सर्वसंग्राहक भाषादृष्टीने त्यांनी संस्कृत भाषेचे प्रौढत्व तिला प्राप्त करून दिले आणि आपल्या भारुड रचनेत बोलीभाषेचाही स्वीकार केला. वीररसाचा आविष्कार, अभंग रचनेतील भेदक समाजचित्रण, कीर्तनोपयोगी नाट्यपूर्ण कथाकाव्य यांही बाबतींत संतसाहित्यातील पहिले कर्तृत्व एकनाथांचेच आहे. संतत्वात अभिप्रेत असलेल्या लोकसंग्रहाचे, लोकसेवेचे व लोकाद्धाराचे साधन म्हणूनच एकनाथांनी कवित्वाची साधना केली म्हणूनच त्यांच्या काव्यरचनेत आशयाभिव्यक्तीचे वैचित्र्य व वैपुल्य निर्माण झाले.

नाथांच्या भारुडांमधून विनोद रसाचा आविष्कार दिसतो. त्यांच्या बऱ्याच भारूडांतून विनोदाची निर्मिती करून त्यांनी दमल्या-भागल्यांना, संसारिकांना आपले श्रम विसरायला लावले. त्याचवेळी समाजाला जागृत करून त्यांचा दुराभिमान दूर करण्यास तर परस्परांमध्ये समभाव, समता, परधर्मसहिष्णूता प्रस्थापित करण्याचा विशुद्ध हेतू भारूडाद्वारे साध्य करून घेतला. नाथांच्या भारूडाचे अंतरंग अध्यात्माचे तर बाह्यरंग मात्र लौकिक पातळीवरील विविध व्यक्तींच्या दर्शनाचे असल्यामुळे बहुजनाशी आपुलकीचे नाते त्यांना जोडता आले. भारुडाच्या माध्यमातून लोकांचे संघटन, जनजागृती व मनोरंजन अशा विविध भूमिकांचा संगम नाथांनी घडवून आणला. नाथांच्या भारूडाचा मुख्य प्रधान हेतू नुसतं मनोरंजन नव्हता तर अध्यात्म लोकांच्या गळी उतरविण्यासाठी नाथांनी भारूडांना मनोरंजनाची झालर दिली होती. समाज प्रबोधन, समाज जागृती आणि अद्वैत

munotes.in

ज्ञानाची प्रचिती आणून देणे ही मुख्य भावना, सद्हेतू होता. समाजातील अनिष्ट प्रथा, परंपरांवर त्यांनी प्रहार केला. समाजातील, परिवेशातील, निसर्गातील कुठलीही वस्तू त्यांच्या काव्य संपदेचा विषय बनलेली दिसते. नाथ हे थोर समाजसुधारक होते. मानव समाजाचा उद्धार कसा होईल याची तळमळ त्यांना लागली होती आणि त्यामुळेच त्यांनी समाजातील सर्व तळागाळातील थरांना सहज कळतील, पचतील, रुचतील, असेच साहित्य त्यांनी निर्माण केले. त्या साऱ्या आचार-विचारांवर गुणकर्मात एकत्वाचे, समतेचे सूत्र अनुस्युत आहे हे दाखवायास पाहिजे. नाथांनी तेच केले. समाजातील विविध पात्रांचं, व्यक्तींचं, पशू-पक्ष्यांचे, विविध खेळांचं चित्रण( विंचू, दादाला, रोडगा, हमामा इ०) नाथांनी भारूडाद्वारे लोकांसमोर ठेवले.

नाथांची बहुतांश भारुडे आकाराने छोटी, सुटसुटीत आणि आशयसंपन्न आहेत. नाथांइतके मार्मिक समाजाचे निरीक्षण दुसरे कोणी केले असेल. लोकमानसशास्त्राचा त्यांचा अभ्यास अतिशय सूक्ष्मतम होता. बहुजन समाजाची भाषा, त्यांची मानसिकता, त्यांचे जीवनसंदर्भ यांची त्यांना अतिशय बारकाईने जाणीव होती. समाजाला आलेली ग्लानी देखील त्यांना बोचत होती. समाज एका गर्तेत कोसळला होता. परचक्र आणि धर्माला आलेली ग्लानी यामुळे सगळा समाज विखुरला गेला होता त्यामुळे या सगळ्यांना भक्तीमार्गाच्या एका धाग्यात बांधून पारमार्थिक सुखाकडे वळवण्याचे अत्यंत कठीण कार्य नाथांनी भारुडाच्या माध्यमातून करण्याचा यत्न केला.

नाथ महाराज कलावंत होते. त्यांनी कलावंतांचे खरे मर्म दर्शवून समाज सापेक्ष असे लेणे मराठी साहित्य सरस्वतीच्या अंगावर चढवले. भारूडाची विविधता, विपुलता व सर्व संग्रहाकता तसेच बहुगूण संपन्नतेने तत्कालिन मानवी जीवन व बुद्धीला थक्क करून सोडले. तसेच ते सदयस्थितीत देखील तेवढेच लागू पडते असे दिसते. नाथांचे साहित्य अभिजात आहे. समाजातील विनाश टाळून पारमार्थिक आणि ऐहीक सुख साधण्याकरिता त्यांनी नीती, सदाचार आणि सत्प्रवृत्तीचे तत्त्व अंगिकारून भारूडाच्या अंगाने प्रचार व प्रसार करण्यासाठीच नाथांनी भारूडाची निर्मिती केली होती. त्यांच्या भारूडात नीती, रीती, आचार, विचार, देवधर्म इत्यादींबरोबर गूढ गुंजने आहेत. यावरून नाथांच्या खऱ्या कवित्वाची साक्ष पटते. चांगला आचार-विचार, सत्यनिष्ठा, समानत्व आणि सर्वांच्या ठायी परमेश्वराला पाहाण्याची दृष्टी आणि सद्सद्विवेक बुद्धी यांची शिकवण देणारी नाथांची प्रत्येक भारूडे समाज जीवनाचे विस्तृत अवकाशपट आपल्यापुढे सादर करतात. समाजातील कोणताही विषय त्यांच्या भारुडाला निषिद्ध नाही असे दिसते. समाजातील वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था, सामाजिक, आर्थिक, पारमार्थिक, व्यावहारिक सर्व विषयांचा समावेश नाथांनी आपल्या भारुडातून केला असून सामाजाचे यथार्थ दर्शन त्यांच्या भारुडांतून दिसते. सर्वसामान्य लोक पारमार्थिक गोष्टीत न जाता लौकिक गोष्टीमध्ये अडकलेले असतात ;त्यांना यातून पारलौकिक जगात नेण्याचे काम नाथांच्या भारूडाने केलेले दिसते. संत एकनाथ एक उत्तम विचारवंत, समाज सुधारक, सामाजिक समस्यांचे

यथायोग्य भान असणारे असे शिक्षक होते तत्कालिन समाज व्यवस्थेचे त्यांनी सूक्ष्म अध्ययन केले होते. " त्यांच्या अभिव्यक्तीचे एक अस्सल मनोरम रुप म्हणजे "भारूड" होय.

नाथांची भारुडे, केवळ काव्यप्रकार नसून त्यात अध्यात्म, साहित्य, नाटय, गायन वादन नृत्य, लोककला, लोकवाड़मय, अभिधा- लक्षणा- व्यंजना, लौकिक आणि पारलौकिक, शाश्वत आणि अशाश्वत, मनोरंजन आणि उद्बोधन, संसारमाया आणि मोक्ष, आसक्ती आणि निवृत्ती या सगळ्यांचा सुंदर मिलाफ असलेली रचना आहे. तत्कालिन समाजाचे हुबेहुब प्रतिबिंब पडलेली ही भारूडे समाजाचे मनोरंजन त्याचबरोबर उद्बोधन करीत असल्याचे दिसतात.नाथांच्या भारूडाची पार्श्वभूमी अतिशय उदात्त व व्यापक स्वरूपाची असून नाथांनी समाजातील अनाथांना सनाथ केले.

अशाच प्रकारच्या भावना वेगळ्या रूपकामधून खाली दिलेल्या भारुडात व्यक्त केल्या आहेत. आपल्याला हतबल करणाऱ्या, परमेश्वरापासून दूर ठेवणाऱ्या परिस्थितीला यात दादला म्हणजे नवरा असे संबोधून तो नको असे म्हंटले आहे. ईश्वरासी समरस होण्यासाठी या दादल्याच्या तावडीमधून सुटायला पाहिजे असे ते सांगतात.

मोडकेंसे घर तुटकेसे छप्पर । देवाला देवघर नाही ॥१॥
मला दादला नलगे बाई ॥धृ॥
फाटकेच लुगडे तुटकीसी चोळी । शिवाया दोरा नाही ॥२॥
जोंधळ्याची भाकर आंबाडयाची भाजी । वर तेलाची धार नाही ॥३॥
मोडका पलंग तुटकी नवार । नरम बिछाना नाही ॥४॥
सुरतीचे मोती गुळधाव सोने । रांज्यात लेणे नाही ॥५॥
एकाजनार्दनी समरस झाले । तो रस येथे नाही ॥६॥

वाङ्मय, तत्वज्ञान, समाज कला या गोष्टी कोणत्या नैतिक परिस्थितीत निर्माण होतात ? वंश, युग, वातावरणाच्या कोणत्या अवस्थेत नैतिक स्थिती निर्माण होते ?" असे प्रश्न हिपोलिट तेन यांनी विचारले आहेत. प्राचीन साहित्यकृतींकडे बघताना त्यातील ओळींच्या मधल्या जागा वाचायच्या( Between the lines), त्या संहितेच्या मजकुराखालचा मजकूर वाचायचा, त्यातली विशिष्ट भावना, विचारांची हालचाल समजून घ्यायची आणि मनाच्या कोणत्या अवस्थेत ती लिहिली गेली हे समजून घ्यायचे...... वाङ्मयातून च संस्कृतीच्या स्थितीगतीचे खरे चित्रण आढळते. एकनाथांच्या भारुडातून देखील तत्कालिन समाज रचना आणि साहित्याचे प्रयोजन लक्षात येते. प्राचीन साहित्यकृतींची समीक्षा करताना त्याकाळातील समाजाचे प्रतिबिंब त्या साहित्यकृतीत कसे पडलेले असते ते अधोरेखित होते. संत एकनाथांनी भारुडे का व कोणत्या परिस्थितीत लिहिली याचा विचार करणे आवश्यक ठरते.

साहित्याची भाषा यात अनेकार्थतेला अतिशय महत्व आहे. नाथांच्या भारुडातून असे अनेक अर्थ निर्माण होतात. कधी संवाद लयतत्व निवडले जाते; तर कधी विरोध लयतत्व निवडले जाते.

"दादला नको ग बाई" या सर्वसामान्य लोकांना समजणाऱ्या रुपकात देखील अनेक अर्थ दिसून येतात. अनेक गोष्टींमधून संतुष्ट न रहाता नाही त्या गोष्टीमधून असंतुष्ट रहाणारी गृहीणी हे विरोधलयतत्व मांडले गेले आहे. म्हणजे दादला नको असण्याची कारणे सांगितली आहेत ती सुसंगत वाटतात. पण एकनाथांनी एकाजनार्दनी समरस झाले, तो रस येथे नाही. असा शेवट करून संवाद लय साधली आहे. मोडकेसे घर, तुटकेसे छप्पर, देवाला देवघर नाही. यातून एरवाद्या व्यक्तीला माफक गोष्टी मिळतात पण त्यात समाधान नाही असे वाटते. किंवा फाटकेच लुगडे, तुटकीशी चोळी, शिवाया दोरा नाही या उदाहरणातून जेवढे मिळते आहे त्यात समाधान नाही किंवा एवढे तरी कुणाच्या नशिबात आहे आहे त्यात संतुष्ट असावे असे ऐकणाऱ्याला/वाचणाऱ्याला वाटू शकते. किंवा जोंधळ्याची भाकरी, आंबाडीची भाजी असा बेत असताना ही स्त्री वर तेलाची धारच नाही असे रडत बसते असे वाटते .मोडका पलंग, तुटकी नवार वर नरम बिछाना नाही किंवा सुरतीचे मोती गुळधाव सोने। रांज्यात लेणे नाही असे म्हणून सतत तक्रार करणाऱ्या एखाद्या स्त्रीचे हे प्रातिनिधिक चित्र आहे असे दिसते. पण शेवटच्या कडव्याने यातील संवाद तत्व वर उफाळून येते आणि संपूर्ण भारुडाचा अर्थच बदललेला दिसतो.

आता येथे मोडकेसे घर याचा अर्थ हा विनाशी देह तुटके छप्पर म्हणजे कुविद्या किंवा खऱ्या ज्ञानाचा अभाव आणि देवघर म्हणजे- अंतरीचा ज्ञानदीप म्हणजेच शुद्धभाव असा अर्थ घेतला तर या कडव्याचा अर्थ उलगडतो. अविवेकी नवऱ्याबरोबर संसार करणे कसे दुःखदायक आहे आणि परमेश्वरासारख्या पतीच्या संसारात कोणते सुख मिळते हे " दादाला" या भारुडातून एकनाथ महाराज सांगतात एका मैत्रिणीस ही स्त्री सांगत आहे असे एकनाथांनी मांडले आहे. म्हणजेच सद्सद्विवेक बुद्धी जागृत असलेली ही स्त्री आपाल्या मैत्रिणीस आपल्या घराचे वर्णन करते आणि अशा अशाश्वत पार्थिव देह तोही नष्ट होणारा म्हणजेच काहीच शाश्वत नाही आणि अशा घरात भावाचे देवघर नाही.

दुसऱ्या कडव्यातील अभिधा वेगळ्या व्यंजनेने पाहू जाता फाटकेच लुगडे याचा अर्थ भ्रांती किंवा भ्रम. काय योग्य आणि काय अयोग्य हे न कळण्याची परिस्थिती आणि ही परिस्थिती तुटकी चोळी म्हणजे कुबुद्धीने येते. शिवाय दोरा म्हणजे यम-नियमाचे बंधन! यम (अहिंसा सत्य, अस्तेय, ब्रम्हचर्य, अपरिग्रह-लोभ सोडणे) आणि नियम (शुचिता, संतोष, तप, स्वाध्याय, ईश्वरप्रणिधान ) यांचे बंधन नसेल तर जीवन किती यातनामय होते याची एक कल्पनाच एकनाथ महाराजांनी दिली आहे.

तिसऱ्या कडव्यातील जोंधळ्याची भाकर आणि आंबाड्याची भाजी म्हणजे अशाश्वत माया रुपी विषय वासना.. ऐहिक विषयात मनुष्य गुंतून राहिला. स्वार्थ साधता साधता परमार्थ साधायचा राहूनच गेला. अशी अवस्था झालेली असते आणि भाजी भाकरी यासारखे अशाश्वत, कदान्न मिळते. त्यावर तेलाची धार म्हणजे स्नेह, स्निग्धता ही नाही म्हणून असा अविवेकी दादला मला नको असे ही स्त्री म्हणते.

चौथ्या कडव्यातील, मोडका पलंग आणि तुटकीशी नवार हे आशा तृष्णेचे प्रतीक आहे. जो पर्यंत मनुष्याच्या अशा या आशा, अपेक्षा संपत नाहीत तोपर्यंत त्याला मिळणारी सगळी सुखं क्षणभंगूर आहेत. नरम बिछाना शाश्वत सुखाचे प्रतीक आहे..

एकनाथ महाराजांनी पुढील कडव्यात संवाद तत्त्वाची लय पकडली आहे. सुरतेचे मोती, गुळधाव सोने म्हणजे आत्मज्ञान, विवेक, स्वधर्मजागरण पण अशा गोष्टी राज्यात लेणे नाही. येथे धर्माला आलेली ग्लानी एकनाथांनी अधोरेखित केली आहे. समाजाचे प्रतिबिंब यातून व्यक्त झालेले दिसते. परकीय आक्रमणाने समाज स्वतःचे तेज, बुद्धी, विवेकशीलता सगळ्या गोष्टी विसरून गेला होता. समाजावर अगणित बंधने होती. सर्वत्र अनाचार, स्वैराचार माजला होता. अशा या समाजात या सगळ्या गोष्टींचा अभाव होता .त्यावर या भारुडातून प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

भारुडाच्या अंतिम कडव्याकडे बघितले तर, संत एकनाथ महाराज नेहेमीप्रमाणेच आपल्या गुरुंचा जनार्दन स्वामींचा उल्लेख करून इथे ऐहिक जीवनात तो रस म्हणजेच पारमार्थिक, अध्यात्मिक रस नाही म्हणून मला "हा अविवेकी संसार नको त्यामुळे प्राप्त होणारा, अधोगतीला कारणीभूत होणारा" अविवेकाचे, दुःखाचे, आशा- तृष्णेचे मूळ असलेला दादला देखील नको असे सुचित करतात.

**आपली प्रगती तपासा**

१) संत एकनाथांनी भारुडाच्या माध्यमातून समाज प्रबोधन कसे केले आहे, ते सांगा?

---------------------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------------

## ४.३आ.४ सारांश

नाथांच्या या भारूडातून तत्कालिन समाजाचे प्रत्यक्ष दर्शन घडते. वाङ्मयाच्या अभ्यासातूनच संस्कृतीच्या स्थितीगतीचे खरेखुरे चित्रण आढळते. प्राचीन कलाकृतीतून तत्कालिन समाजाचे जे प्रतिबिंब पडलेले असते त्यावरून त्या काळच्या माणसाची, त्या काळच्या समाजाची, तत्कालिन परिवेशाची कल्पना येऊ शकते. तत्कालिन माणुस कसा होता हे समजते. तेन ने साहित्यकृतीकडून लेखकाकडे आणि लेखकाकडून त्याच्या भोवतीच्या सामाजिक स्थितीकडे जाण्याचा जो विचार मांडला आहे तो हाच!

## ४.३आ.५ संदर्भ ग्रंथ


१. (विकीपिडीया)

२. https://maharashtratimes.com/editorial/article/aurangabad-marathwada-eknath/articleshow/51566393.cms

३. https://anandghare2.wordpress.com/category/%E0%A4%B8%E0%A4%BE%E0%A4%B9%E0%A4%BF%E0%A4%A4%E0%A5%8D%E0%A4%AF-%E0%A4%86%E0%A4%A3%E0%A4%BF-%E0%A4%B8%E0%A4%BE%E0%A4%B9%E0%A4%BF%E0%A4%A4%E0%A5%8D%E0%A4%AF%E0%A4%BF%E0%A4%95/

४. तुळपुळे, शं. गो. पाच संतकवि, पुणे, १९६२.

५. न. र. श्री एकनाथ : वाङ्मय आणि कार्य, मुंबई, १९५०.

६. वि. ल. महाराष्ट्र सारस्वत, मुंबई, १९६३.

७. श्रीएकनाथ संशोधन मंदिर, श्रीएकनाथ-दर्शन, २ खंड, औरंगाबाद, १९५२.

८. जोशी वसंत स.

माहिती स्त्रोत : मराठी विश्वकोश


## ४.३आ.६ नमुना प्रश्नसंच

१. "दादला नको ग बाई" या भारूडाची समाजशास्त्रीय पद्धतीने समीक्षा करा.

२. "तत्कालिन समाजाचे प्रतिबिंब" दादला नको गं बाई" या भारुडातून कसे दिसते ते स्पष्ट करा.

३. "दादला नको गं बाई" या भारुडाच्या माध्यमातून संत एकनाथ तत्कालिन समाजाला कोणता मार्ग दाखवू इच्छित होते ? याचा परामर्श घ्या.

आ) टीपा लिहा.

१. भारुडातील " प्रतीकात्मकता"

२. भारुडाच्या माध्यमातून समाज प्रबोधन

**क) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. समाज प्रबोधनाचा एक उत्तम अविष्कार म्हणून कोणत्या काव्यप्रकाराकडे बघितले जाते?

२. एकनाथाचे जन्मगांव कोणते?

३. नाथांच्या भारुडामधून कोणत्या रसाचा अविष्कार होतो?

## ४.३आ.७ पूरक वाचन


१. https://mr.vikaspedia.in/education/childrens-corner/92d93e930924 94092f-90792493f93993e938/938902924-90f91592893e925

२. https://www.santsahitya.in/eknath/eknath-bharud/

३. https://maharashtratimes.com/editorial/article/aurangabad-marathwada-eknath/articleshow/51566393.cms

४. http://lib.unipune.ac.in


❖❖❖

munotes.in

**घटक : ४**

# ४(३इ)

## इ. कविता

## "शहर"

कवी - दया पवार

**घटक रचना**

४.३इ .१ प्रस्तावना

४.३इ.२ लेखकाविषयी

४.३इ.३ शहर कविता

४.३इ.४ सारांश

४.३इ.५ संदर्भ ग्रंथ

४.३इ.६ नमुना प्रश्नसंच

४.३इ.७ पूरक वाचन

## ४.३इ.१ प्रस्तावना

कोणतीही कलाकृती ही समाजात निर्माण होत असते. लेखकावर आणि त्याच्या कलाकृतीवर देखील समाजाचा प्रभाव पडलेला दिसतो. समाजाचे प्रतिबिंब साहित्यकृतीवर पडणे अपरिहार्य आहे. कारण साहित्य आणि समाज यांचा अन्योन्य संबंध दिसतो. अडोर्नोच्या मते वाङ्मयकृती वास्तवाचे सुबक प्रतिबिंब साकार करीत नाहीत किंवा ज्ञानही देत नाहीत, तर वास्तवतेत राहूनच वास्तवातली विरोधात्मकता दाखवीत असतात. " कला हे प्रत्यक्ष जगाचे नकारात्मक ज्ञान आहे." असे त्यांचे म्हणणे आहे. समाजातील विरोधात्मकता किंवा विरोधाभास दाखवण्याचे कार्य साहित्य करत असते.

## ४.३इ.२ लेखकाविषयी

दया पवार तथा दगडू मारुती पवार हे एक आघाडीचे दलित साहित्यिक होत. कविता, कथा, समीक्षा, आत्मकथन, ललितलेख असे विविध साहित्य प्रकार त्यांनी हाताळले.अहमदनगर जिल्ह्यातील धामणगाव हे त्यांचे जन्मगाव. घरच्या दारिद्रयामुळे व जातिव्यवस्थेतून निर्माण झालेल्या जाचक व प्रतिकूल परिस्थितीमुळे सतत संघर्ष करतच त्यांना आपल्या आयुष्याचा मार्ग चोखाळावा लागला.

महाराष्ट्र बौद्ध साहित्य सभा, प्रगत साहित्यसभा या संस्थांशी संबंध आल्याने १९६८ पासून दलित साहित्य चळवळीत ते सक्रिय सहभागी होते. मुंबईत परळ येथे एका पशुवैद्यक महाविद्यालयात प्रयोगशाळा साहाय्यक म्हणून काम करत त्यांनी शिक्षण घेतले. सुरुवातीला त्यांनी 'अस्मितादर्श' या नियतकालिकात लेखन केले.एका वेगळ्याच अनुभवविश्वाचा वाचकांना परिणामकारकरित्या परिचय करून देणाऱ्या या संवेदनशील साहित्यिकाचे सप्टेंबर, १९९६ रोजी निधन झाले

**दया पवार यांची साहित्यसंपदा:-**

कोंडवाडा (कवितासंग्रह)

चावडी (कथासंग्रह)

जागल्या (कथासंग्रह)

धम्मपद (कवितासंग्रह)

पाणी कुठंवर आलं गं बाई... (वैचारिक)

पासंग(कथासंग्रह)

बलुतं (आत्मकथन). 'बलुतं'चा जेरी पिंटो यांनी इंग्रजी अनुवाद केला आहे.

बीस रुपये ('विटाळ'चा हिंदी अनुवाद)

विटाळ (वैचारिक)

## ४.३इ.३ शहर कविता

" सामाजिक प्रतिबिंब दाखवणारी ' शहर' ही दया पवार यांची अतिशय वास्तववादी कविता! विसाव्या शतकातील एक शहर खोदकाम करताना मिळाले अशी कवीने कल्पना केली आहे. म्हणजे तत्कालिन समाज हा भविष्यकाळातील असावा. या शहरात कवीला कोणकोणत्या गोष्टी दिसतात याचे वर्णन आले आहे. अत्यंत उपहासाने कवी म्हणतो, यंत्रयुगाच्या काही थोड्याफार खुणा त्याला दिसतात; पण बाकी सगळी स्थिती पुरातन काळातील. केवळ तांत्रिक प्रगती झाली आहे पण मानसिकता मात्र अश्मयुगातील!

या शहरात संस्कृती जतन करणाऱ्या अनेक गोष्टी सापडतात. हातभर कुठेही खोदा शेंदूर फासलेल्या अनेक मूर्त्या, तुटक्या-फुटक्या अवस्थेत सापडतात. कुठे सोंड फुटलेल्या, कुठे शेपूट तुटलेल्या अशा या मूर्त्या बघून कवीला वाटते; बरे झाले या मूर्त्या सापडल्या, पुरातत्त्व विभागात, एखादया संग्रहात ठेवण्यासाठी! या सगळ्या मूर्त्या कोणत्या तरी विशिष्ठ अशा धर्माचे प्रतिनिधित्त्व करत आहेत अशा या मृत झालेल्या, भूसा भरून ठेवण्याच्या लायकीच्या असलेल्या मूर्त्या धर्माचे सोंग पुढील पिढयांना दाखवण्याच्या दृष्टीने उपयुक्त आहे.

अशातच, एक उखडलेली पाटी कवीला दिसते, तो आश्चर्याने( की उपहासाने?) विचारत होतो," अरे ही पाटी कसली?" .... त्या पाटीवर लिहिलेले असते," पाणपोई सर्व जातिधर्मांना खुली." म्हणजे धर्मदाय संस्था देखील जातीपातीच्या बंधनात अडकलेली होती. धर्म करताना देखील जातीव्यवस्था विसरली जात नव्हती किंबहुना अत्यंत हास्यास्पद अशी ही पाटी कवीला वाटते. माणसामाणसांत ही जातीची भिंत आढळून येते. अत्यंत उपरोधात्मक अशी ही ओळ असून समाजातील शोषणव्यवस्थेविरुद्ध कवीने बारीक पण लागणारा चिमटा काढलेला आहे. मोठेपण दाखवताना, धर्म करताना, दान करताना देखील माणसाच्या मनातून हा विचार जात नाही, या दुख ऱ्या नसेला कवीने आपल्या ओळीत पकडल आहे. "जी डोक्यातून जात नाही ती जात", असं या समाजातील जाती व्यवस्थेबद्दल म्हटलं जातं ते खरच आहे असे दिसते. शेवटी अतिशय तांत्रिक प्रगती करून देखील प्रतिगामी व्यवस्थेप्रमाणे वागायचे यामुळे कवी म्हणतो," छान केले, असले शहर मातीत गाडण्याच्या लायकीचे, कसले ते यंत्रयुग, विसाव्या शतकात दर्शन अश्मयुगाचे !"

समाजशास्त्रीय समीक्षेत हिपोलाइट तेन (१८२८-१८९३) याफ्रेंच साहित्य अभ्यासकाने आपल्या "History of English Literature" या ग्रंथात " साहित्य ज्या वातावरणात निर्माण होते त्यावर भर देणारा वंश (Race), समाज (Millue) आणि काल (Moment) या तीन घटकांना प्राधान्य देणारा सिद्धांत मांडला. " तत्त्वज्ञान वा धर्मापेक्षा साहित्य हे अधिक परिपूर्णतेने व भावनिकतेने सांस्कृतिक हेतूची अभिव्यक्ती करते." या सिद्धांताचा विचार केला तर ' शहर' ही कलाकृती तत्वज्ञान वा धर्मापेक्षा अधिक परिपूर्णतेने व भावनिकतेने सांस्कृतिक हेतूची अभिव्यक्ती करताना दिसते.

समाजामध्ये जे वास्तव आहे, त्या त्या परिप्रेक्ष्यात त्या त्या व्यक्तीला काय सहन करावं लागतं, त्याचा परिणाम काय होतो, किती नकार पचवावे लागतात, किती वेदना साहवी लागते आणि मग त्या वेदनेतून विद्रोहाचा हुंकार कसा उमटतो हे त्या व्यक्तीच्या साहित्यकृतीतून उमटत असतं. दलित जाणिवेचा हुंकार दया पवारांच्या कलाकृतीमधून जाणवतो.

" वास्तवाचे रूप ज्याला जसे दिसते तसे त्याने आपल्या कलाकृतीतून सांगावे." यालाच श्री. बेडेकर वास्तववाद म्हणतात आणि' कलावंताची प्रतिज्ञा" मानतात. सामाजिक बांधिलकीऐवजी कलावंताची प्रतिज्ञा ही संकल्पना पसंत करताना श्री. बेडेकर सांगतात की, स्वतःच्या जीवनदृष्टीन बाह्य वास्तव व मानवी जीवन पाहून त्याचा आविष्कार करणे आणि स्वीकारलेल्या माध्यमाशी प्रामाणिक राहाणे हे कलावंताच्या प्रतिज्ञेचे दोन भाग आहेत. याचा विचार करूनच ' शहर' या कलाकृतीत कवीने जे शहराचे वर्णन केले आहे; त्यात विसाव्या शतकातील वातावरण, बाह्यरूप जरी बदलले असले, यांत्रिक प्रगती जरी झाली असली, तंत्रज्ञानाने मानवी जीवन बदलले आहे असे बाह्यात्कारी जरी वाटत असले तरी मानसिकता बदलली नाही असे कवीला अधोरेखित करायचे आहे. समाजातील जातीव्यवस्था बदललेली नाही. शेंदूर लावलेल्या मूर्त्या या धर्मातील मूर्तीपूजा आणि तद्अनुषंगाने येणारे कर्मकांड

आणि उदारतेचा आव आणून ' सर्व जातींसाठी खुली' अशी पाटी यांतून समाजातील दाहक वास्तव मांडले आहे.

"खोदकाम करताना विसाव्या शतकातले शहर सापडले " या ओळीतून काळ आपल्या समोर येतो. वर्तमान काळात राहून भविष्यकाळाची कल्पना करून कवीने कविता लिहीली आहे आणि वर्तमानकाळातील दाखले देऊन हा वर्तमानकाळ किती वाईट अवस्थेतून जात आहे याचे सूतोवाच केले आहे. साहित्यकृती ही भाषिक कृती असते. भाषा ही प्रतीकांची किंवा चिन्हांची व्यवस्था असते. तशीच साहित्यकृती ही देखील एक चिन्हव्यवस्था असते. त्यामुळे ती सामाजिक आणि सांस्कृतिक परस्परांमधील क्रिया प्रतिक्रियांसाठी साधन बनते ; आणि विविध क्रिया प्रतिक्रियाचे विश्लेषणही करत असते. सामाजिक संबंध आणि सामाजिक संरचना याचीही चिकित्सा ती करत असते; त्यामुळे साहित्यकृतीकडून समाजाकडे आणि समाजकल साहित्याकडेही येते.

"कागदासारखे" कुणी आपल्या अजस्त्र मुठीत चुरगाळले' असे कवी पुढे लिहितो. काळाच्या ओघात नष्ट झालेलं, आणि त्या काळाच्या पुसटशा खुणा त्यात दिसत आहेत त्या म्हणजे भेलकांडलेली यंत्रचाके आणि थोटकासारखी गिरणीची धुराडी या दोन गोष्टीमधून. यंत्रयुगाची येवढीच चाहूल. बाकी सगळी स्थिती प्राचीन मोहोजोदारो - हडप्पा संस्कृतीतील. म्हणजेच विसाव्या शतकातील सामाजिक स्थितीचे वर्णन कवी करतो आहे; ते म्हणजे विज्ञानाच्या प्रगतीमुळे माणूस वैज्ञानिक दृष्टीकोनाचा बनला पाहिजे अशी अपेक्षा असताना तो विविध श्रद्धा-अंधश्रद्धाच्या विळख्यात, जातीधर्माच्या बंधनात गुरफटलेला दिसतो.

पुढे कवी समाजातील रुढी परंपरा आणि त्यातील फोलपणा यावर बोट ठेवतो. मूर्तीपूजा करणाऱ्या विशिष्ठ धर्मातील देव देवता आणि त्यांच्या अस्तित्वावर टीका करतो. ज्या मूर्त्यांना स्वतःला जपता येत नाही; त्या भग्नावशेषात दिसतात आणि तेही प्रचंड संख्येत आढळतात त्यामुळे देवाच्या अस्तित्त्वाविषयीच शंका घेतली जाते. विशिष्ठ धर्मातील देवदेवता कोणत्या याचा सूचक उल्लेख कवी करतो. अशा या फुटक्या तुटक्या मुर्त्या प्राचीन वस्तूसंग्रहाला सुशोभित करण्याच्या कामीच उपयोगी येतील असे कवीला वाटते. विसाव्या शतकात कोणते धर्म होते, कोणत्या जाती होत्या हे सगळ्या पुढील पिढ्यांना दाखवण्यासाठी नि: सत्व, भुसा- पैंढा भरलेले धर्म नावाचे सोंग सजले होते. बरे झाले असे कवी उपरोधाने म्हणतो. ज्या धर्माने, ज्या जातीने ' दलित समाजावर' सतत अन्याय, अत्याचारच केला होता त्याची चीड बरे झाले या शब्दातून व्यक्त होते. अशा या धर्माच्या, जातीपातीच्या भिंती असलेल्या विसाव्या शतकातील एका शहराची ही कथा आहे. विसाव्या शतकातील समाजाचे प्रतिबिंब कवितेत पडलेले आहे..

उपरोधाने विचारतो, " अरे ही पाटी कसली ' पाणपोई सर्व जातीधर्मांना खुली'. वरवर पहाता या पाटीत काही वावगे वाटत नाही पण त्यातील खोच कळते. दानधर्म करताना सुद्धा बेगडीपणा सुटत नाही. उदारपणा दाखवण्याचा देखावा केला जातो. आणि या सगळ्या गोष्टी पुन्हा पुन्हा अधोरेखित केल्या

जातात. येथे समाजात असलेल्या माणसामाणसांतल्या उच्चनीच जातीपातींच्या उतरंडी चे प्रतिबिंब कवितेत दिसून येते.

पुन्हा कवी येथे छान केले, असले शहर मातीत गाडण्याच्या लायकीचे" विसाव्या शतकाला "यंत्रयुग" म्हणून संबोधले जाते ; पण या युगात माणुसकीचे दर्शन नाही, वैचारिक प्रगती नाही, विसाव्या शतकात अश्मयुगाचे दर्शन म्हणजेच अजून ही माणसाचा मागासलेपण गेले नाही ही गोष्ट येथे प्रतिबिंबित होते.

सामाजिक वास्तवाला एक संरचना असते. इतिहास आणि समाजाची संरचना पाहात असताना, साहित्यकृतीमध्ये या संरचनेचे खरेखुरे प्रतिबिंब देखील पडलेले दिसते त्याचबरोबर त्याचे विरूपीकरण देखील झालेले आहे असे दिसते.. विसाव्या शतकातील समाजाचा विद्रुप चेहेरा कवीने रेखाटला आहे.

**आपली प्रगती तपासा**

१) 'शहर' या कवितेत कवी दया पवारांचा आत्मविष्कार स्पष्ट करा?

--------------------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------------------

## ४.३इ.४ सारांश

"शहर" या कवितेकडे जीवनवादी पद्धतीने बघितले पाहिजे. कवितेची आकृतिरचनेची सूत्रे कवितेचा आकृतीबंध साकारण्यासाठी साधन म्हणून कवी दया पवार यांनी प्रेरणेने निवडलेली रचनासूत्रे आहेत असे दिसते. कवीची उपरोधिक शैली आविष्काराची रचनासूत्रे कवी दया पवार यांच्या मूळ प्रेरणेची आविष्कार निर्मितीची साधने आहेत असे म्हणता येईल.

## ४.३इ.५ संदर्भ ग्रंथ

१. https://mr.m.wikipedia.org/wiki/%E0%A4%A6%E0%A4%AF%E0%A4%BE_%E0%A4%AA%E0%A4%B5%E0%A4%BE%E0%A4%B0

२. http://web.bookstruck.in/book/chapter/10669

३. शिरवाडकर के. रं.- मार्क्सवादी साहित्यविचार पुणे- १९८०

४. http://www. indiramahavidyalaya.com

## ४.३इ.६ नमुना प्रश्नसंच

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न**

१. "शहर" या कवितेची समाजशास्त्रीय पद्धतीने समीक्षा करा

आ) टीपा लिहा.

१) शहर" कवितेतील रुपकात्मता

२) दलित साहित्यामागील प्रेरणा

३) कवी दया पवार यांचा आत्माविष्कार

## ४.३इ.५ पुरक वाचन:-

१. http://sahitya.marathi.gov.in

२. http:// lib.unipune.ac.in

❖❖❖

munotes.in

**घटक : ४**

# ४(३ई)

## ई. कविता

## नाही नदी नाही नाला

कवी : इंद्रजित भालेराव

**घटक रचना**

४.३ई.१ प्रास्ताविक

४.३ई.२ लेखकाविषयी

४.३ई.३ "नाही नदी नाही नाला" कवितेसंबंधी

४.३ई.४ कवितेची समीक्षा

४.३ई.५ सारांश

४.३ई.६ संदर्भ ग्रंथ

४.३ई.७ सरावासाठी प्रश्न

४.३ई.८ पूरक वाचन

### ४.३ई.१ प्रास्ताविक

ग्रामीण भागातील परिसराचे सहज, ओघवत्या शैलीत वर्णन कवी इंद्रजित भालेराव यांनी आपल्या नाही नदी, नाही नाला" या कवितेतून केले आहे. मराठवाड्यातील ग्रामीण भागाचे चित्रण त्यंच्या " पीकपाणी" मधील कवितांमधून दिसते. काबाडकष्ट करणाऱ्या कष्टकऱ्यांच्या आणि शेतात राबणाऱ्या शेतकऱ्यांच्या वेदना इंद्रजित भालेराव यांच्या या कवितेत मुखर झालेली दिसते.

### ४.३ई.२ लेखकांविषयी:-

इंद्रजित नारायणराव भालेराव हे एक मराठी कवी असून ग्रामीण कवी म्हणून इंद्रजीत भालेराव ह्यांचे नाव मराठी साहित्याच्या क्षेत्रात प्रसिद्ध आहे.२०१९ सालच्या फेब्रुवारी महिन्यात पैठण येथे होणाऱ्या अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनाचे ते नियोजित अध्यक्ष होते.

लेखक इंद्रजीत भालेराव यांची साहित्यसंपदा:-

आम्ही काबाडाचे धनी (कविता संग्रह १९९२)

उगवले नारायण (कविता संग्रह १९९६)

कुळंबिणीची कहाणी (कविता संग्रह १९९६)

गाऊ जिजाऊस आम्ही (कवितासंग्रह)

गावकडं चल माझ्या दोस्ता (कविता संग्रह, १९९८)

गाई घरा आल्या (ललित)

घरीदारी (ललित)

टाहो (कविता संग्रह, २००२)

दूर राहिला गाव (कविता संग्रह १९९४)

दूर राहिला गाव (कविता संग्रह १९९४)

नाद (कविता संग्रह)

पीकपाणी (कादंबरी?/कविता संग्रह, १९८९)

पेरा (कविता संग्रह, २००२)

बलचनमा (अनुवादित कादंबरी; मूळ हिंदी लेखक - नागार्जुन)

बहिणाबाई (साहित्यसमीक्षा)

भूमीचे मार्दव (कवितासंग्रह, २०११)

मऱ्हाटवाडी (समीक्षात्मक ललित लेख)

मळा (कादंबरी)

मळ्यातील अंगार (सामाजिक)

मुलूख माझा (कवितासंग्रह)

रानमळ्याची वाट (कवितासंग्रह, १९९६)

लळा (ललित)

संपादित. विवेक आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण शिल्पकार चरित्रकोश. मुंबई: साप्ताहिक् विवेक् (हिदुस्थान प्रकाशन संस्था).

## ४.३ई.३. "नाही नदी नाही नाला" कवितेसंबंधी

इंद्रजित भालेराव यांचा " पीकपाणी" हा कवितासंग्रह १९८९ साली प्रकाशित झाला. साध्या सरळ बोलीभाषेत असल्यामुळे आणि सादरीकरणाच्या कौशल्यामुळे सर्वसामान्य वाचकांपर्यंत सहज पोहोचली. काय संगायचे आणि कसे सांगायचे याची धारणा त्यांच्या मनात पक्की असल्यामुळे ज्या

परिवेशाशी,ज्या समाजाशी त्यांचा निकटचा संबंध आहे त्या समाजाचे, त्या परिवेशाचे प्रतिबिंब त्याच्या कवितेतून आढळते.

कवी विविध पाण्याच्या स्त्रोतांचा प्रतीकात्मक वापर करतो आणि भाषेला समृध्द करत जातो.

## ४.३ई.४ कवितेची समीक्षा

कवी आपल्या गावाच्या पाण्याविषयी सांगत आहे. कवीच्या गावच्या पाण्याची रीत अडाणी आहे. हे पाणी म्हणजे गावच्या भोळ्याभाबड्या लोकांचे प्रतीक आहे असे दिसते.

नाही नदी, नाही नाला, नाही खळाळत पाणी या ओळीतूनच गावातल्या पाण्याची रीत कवी सांगतो. हे पाणी मोठी नदी नाही किंवा नाला नाही किंवा खळाळत पाणी नाही म्हणजेच अतिशय संयत आणि मर्यादित अशा स्वरूपाचे हे पाणी आहे. नाला हा शब्द कदाचित कवीने न्यून दाखवणारा म्हणून वापरला आहे पण तरीही त्यातून काही न्यून नाही असेच कवी सुचवत आहे. आणि पाण्याची रीतच अडाणी याचा भाषिक संदर्भ घेणे आवश्यक ठरते. पाण्याची रीत अडाणी जेव्हा कवी म्हणतो याचा अर्थ समजाचे साहित्यात प्रतिबिब पडलेले दिसते. भाषा आणि इतर प्रतीकांच्या आधारे ही अन्योन्य प्रक्रीया घडत असते. पाणी हे ग्रामीण जीवनातील, ग्रामीण परिसरातील लोकांचे प्रतिनिधीत्व करते. अशा या पाण्याची रीतच अडाणी असे जेव्हा कवी म्हणतो तेव्हा त्याचा संबंध गावातल्या भोळ्या-भाबड्या, अडाणी लोकांशी असतो !

गावातल्या पाण्याचे आणखी वैशिष्ट्य कवी सांगतो,

"नाही मारीत मुसंडी होऊनिया धबधबा,
माझ्या गावच्या पाण्याचा नाही कुठे दबदबा"

पुन्हा या गावातील लोकांचा शांत, संयत स्वभाव वर्णन केला आहे. कुठे आक्रमकता नाही.कवीच्या गावच्या पाण्याचा कुठे दबदबा नाही ; म्हणजेच येथील लोकांचा कुठेही भितीदायक असा दबदबा नाही.

"नाही समुद्राची ओढ,नाही आकाशात झेप,
नाही सोसवत त्याला फार दूरवर खेप"

गावातल्या पाण्याचे असे वर्णन करत असतांना समाज आणि साहित्य यातील अन्योन्य क्रिया मुख्यतः भाषा आणि इतर प्रतीकांच्या आधारे घड़ते. मानव विविध प्रतीके तयार करतो आणि ही प्रतीके संस्कृती चा अविभाज्य भाग असतात. असेच या कवितेत पाणी हे प्रतीकात्मक रीतीने येते. अशा या पाण्याला समुद्राची ओढ नाही की आकाशात झेप घेण्याची प्रबळ इच्छा नाही त्याला फार दूरवर खेप त्याला सोसवत नाही. त्याच्या इच्छा, आकांक्षा अपेक्षा अतिशय कमी आहे. गावाच्या पाण्याची महत्त्वाकांक्षा

फार नाहीत. थोडक्यात, जशा अवस्थेत आहे तशा स्थितीत संतुष्टता मानण्याची वृत्ती गावच्या पाण्याची आहे म्हणजेच गावच्या लोकांची वृत्ती अतिशय अल्पसंतुष्ट आहे.

"नाही साचून झालेला डोह गहिरा काळोखा,

माझ्या गावच्या पाण्याला नाही आळोखा पिळोखा"

गावातल्या पाण्याचा स्वभाव हा त् गावातील माणसांशी समधर्मी दाखवला आहे. पाणी हे साचून राहिलेले नाही. ते स्वच्छ, नितळ आहे. (साचलेले पाणी . गूढ, गहिरे आणि काळोखे असते) या पाण्याचा साचून डोह झालेला नाही.  गावातल्या लोकांची मने पण अतिशय स्वच्छ, पारदर्शी आहेत. कोणताही गढुळलेपण, शेवाळलेपण नाही.त्यांच्या मनात कोणताही संदेह नाही. गावच्या पाण्याला आळोखापिळोखा नाही म्हणजेच आळस ठाऊक नाही. तसे गावातल्या माणसांचे देखील आहे असे कवी सुचवतो आहे.

" माझ्या गावच्या पाण्याचे, खोल जमिनीत झरे

कुणी फाकवारे माती, झरे होतील पिसारे"

अंतर्यामी निर्मळ अशा गावच्या माणसांचे प्रतीक म्हणून गावच्या पाण्याचे वर्णन केले आहे. अशा या माणसांच्या मनात प्रेमाचे झरे आहेत; थोडेसे त्यांच्या मनात डोकावून बघितले तर पिसाऱ्याप्रमाणे प्रेमाचे झरे उचंबळून येतील असे कवीला वाटते.

कवितेचे मध्यवर्ती आशयसूत्र " पाणी" आहे. या पाण्याची विविध रुपे कवीने कवितेत मांडली आहेत. पाणी हे प्रतीकात्मक रित्या येते पाण्याचे विविध स्त्रोत, पाण्याचा स्वभाव माणसाच्या स्वभावधर्माशी मिळता जुळता आहे. ते एक चिन्ह आहे. पहिल्या कडव्यापासून पाचव्या कडव्यापर्यंत कवीने वेगवेगळी पाण्याची रूपे/प्रतीके निर्माण केली आहेत. नदी, नाला, खळाळत पाणी, धबधब्यासारखे मुसंडी मारणारे पाणी, समुद्राची ओढ असणारे पाणी, आकाशात झेप घेणारे पाणी, गहीरे डोहातले पाणी, जमिनीतल्या झऱ्यांप्रमाणे असणारे पाणी अशी पाण्याची विविध रुपे कवीने मांडली आहेत.

**आपली प्रगती तपासा**

१) 'पीकपाणी' या कवितेची समानशास्त्रीय पद्धतीने समीक्षा करा?

-----------------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------------

## ४.३ई.५ सारांश

कवी इंद्रजित भालेरावांनी ग्रामीण जीवनाशी ठेवलेली बांधिलकी त्यांच्या " नाही नदी नाही नाला" या कवितेतून दिसते. त्यांच्या या कवितेतून गावच्या जिव्हाळ्याची कहाणी अधोरेखित झाली आहे. कला किंवा साहित्य कोणत्या मानसिक स्थितीत उदयास येते आणि ही मानसिक स्थिती कशी तयार होते या प्रश्नाचे उत्तर म्हणून ; "तेनने", वंश, परिवेश आणि युग याविषयीचा सिद्धात मांडलेला आहे. त्यात परिवेश किंवा भोवतालची परिस्थिती या संदर्भात तेन यांना नैसर्गिक आणि सामाजिक परिस्थिती अन्युस्यूत आहे. मनुष्य जगात एकटा नसतो त्याच्याभोवती निसर्ग, पर्यावरण, त्याचा समाज असतो. कलावंतावर देखील या गोष्टींचा परिणाम होत असतो. कलावंताच्या वृत्ती- प्रवृत्ती आणि वांशिक वैशिष्टये भौतिक- सामाजिक परिस्थितीमुळे,घटनामुळे प्रभावित होतात, परिपुष्ट होतात किंवा पूर्णपणे बदलतात. विशिष्ठ नैसार्गिक परिस्थितीमुळे, पर्यावरणामुळे तिथल्या लोकांचा स्वभाव विशिष्ट त-हेचा बनला आहे आणि त्या स्वभावाची अभिव्यक्ती त्यांच्या संस्कृती, कला आणि साहित्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे कवी इंद्रजीत भालेराव यांच्या या कवितेतून पाण्याच्या प्रतीकांतून गावच्या माणसाच्या स्वभावाविषयी विचार मांडला आहे.

## ४.३ई.६ संदर्भ ग्रंथ

१. पीकपाणी- इंद्रजीत भालेराव ( कवितासंग्रह)

२.https://mr.m.wikipedia.org/wiki/%E0%A4%87%E0%A4%82%E0%A4%A6%E0%A5%8D%E0%A4%B0%E0%A4%9C%E0%A4%BF%E0%A4%A4_%E0%A4%AD%E0%A4%BE%E0%A4%B2%E0%A5%87%E0%A4%B0%E0%A4%BE%E0%A4%B5

## ४.३ई.७ नमुना प्रश्नसंच

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न**

१) "पीकपाणी" या कवितेची समाजशास्त्रीय पद्धतीने समीक्षा करा.

२) साहित्यकृतीच्या विश्लेषणापेक्षा अर्थनिर्वचनावर जीवनवादी समीक्षा अधिक भर देते या विधानाचा "पीकपाणी" या कवितेच्या आधारे परामर्श घ्या.

**आ) टीपा लिहा**

१) कवितेची भाषा

२) कवितेतील प्रतीकात्मकता

**क) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. "पीकपाणी" कवितासंग्रह कोणत्या साली प्रकशित झाला?

२. "पीकपाणी" या कवितासंग्रहात 'पाणी' हे कशाचे प्रतीक आहे?

३. "पीकपाणी" कवितासंग्रह कोणाचा आहे?

## ४.३ई.८ पूरक वाचन

१.https://www.lokmat.com/blog/maharashtra/songs-farmers/

२.https://youtu.be/nRmHdu4L6Q0

३.https://youtu.be/L9wcXTKObok

❖❖❖

munotes.in